शतक महोत्सवी अंक

परस्परं भावयन्तः
म प्र

# हितगुज

मराठे प्रतिष्ठान
मुंबई
यांचे मुखपत्र



# तव स्मरण सतत स्फूर्तिदायी घडो



जन्म १०/९/ १९३८ मृत्यू ५/२/२०००

## मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक व आधारस्तंभ

## कै. सुरेशभाऊ सखाराम मराठे (पृ. ३९९)

मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी , मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी - २४३०२४५३

## यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन

Marathe Pratishthan

# मनोगत

प्रिय सभासदगण,

स.न.वि.वि.

आपल्या हितगुजने आता शंभरी गाठली. सध्याच्या व पूर्वीच्या सर्व संपादकांच्या योगदानामुळेच हे शक्य झाले. हा सुवर्णदिवस दि. १४ डिसेंबर २०१४ रोजी आपण साजरा करणार आहोत. साधारण तेहतीस वर्षापूर्वी सन १९८१ मध्ये प्रतिष्ठानचे मुखपत्र अनियतकालिक हस्तलिखिताच्या स्वरुपात सुरु झाले. या कार्यात कै. श्री. सुरेशभाऊ मराठे, कै. श्री. भाऊसाहेब मराठे, सध्याचे विश्वस्त श्री. वि. के .मराठे यांचा मोठा सहभाग होता. प्रतिष्ठानचा Logo ख्यातनाम चित्रकार माननीय श्री. राजाभाऊ मराठे यांनी तयार केला. सध्याचे विश्वस्त श्री. वि. के. मराठे यांनी सुचविल्याप्रमाणे या मुखपत्राचे 'हितगुज' अस नामांतर होऊन १९८७ पासून मुद्रित स्वरुपात ते प्रकाशित होऊ लागले. त्यानंतर १९९२ ते १९९४ या अपवादात्मक कालखंडानंतर बरीच वर्षे श्री. लक्ष्मण शं. मराठे यांनी संपादक म्हणून हितगुजची धुरा सांभाळली. मध्यंतरी सध्याचे उपाध्यक्ष श्री. सी. गो. खांबेटे यांनी संपादकाचा कार्यभाग सांभाळला व हितगुजचा कारभार सध्याच्या संपादिका सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांच्या हवाली केला. या सर्व संपादकांचे मी व्यक्तीशः माझ्यातर्फे आणि प्रतिष्ठानच्या वतीने कौतुक करतो व हितगुजच्या भरभराटीसाठी शुभेच्छा चिंतितो. हितगुजचा Logo व हितगुजच्या २५व्या, ५० व्या तसेच या १००व्या अंकांची आकर्षक मुखपृष्ठे श्री. राजाभाऊ मराठे यांनी तयार केली यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. अर्थातच हितगुजच्या अथक वाटचालीत आपणा वाचकांचा सहभाग ही मोलाचा!

पूर्वीच्या निवेदनानुसार, आर्थिक कारणांमुळे ९७व्या अंकानंतरचे अंक आम्ही फक्त ज्या सभासदांनी एकूण रु. २०००/- भरले त्यांनाच पाठवू शकलो. तरीसुद्धा आपल्याशी असलेल्या दृढ नातेसंबंधांची आठवण म्हणून हा शतकमहोत्सवी अंक आपणास पाठवत आहोत. आम्ही आपणास परत एकदा आवर्जून विनंती करतो की आपण अद्याप एकूण रु. २०००/- ची देणगी दिली नसल्यास रु. २०००/- किंवा २००९ च्या अहवालानुसार रु. १०००/- दिले असल्यास उर्वरित रु. १०००/- ची देणगी त्वरीत पाठवून हितगुजच्या कार्यास हातभार लावावा व आपले सभासदत्व चालू ठेवावे.

मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ व व्यक्तीशः माझ्यातर्फे आपणांस नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

आपला  
रमाकांत विद्वांस  
अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान

दिनांक : १४ डिसेंबर २०१४

Marathe Pratishthan

|| श्री ||

|| वंदेमातरम् ||

# संपादकीय

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार हितगुज चा शंभरावा अंक प्रकाशित होत असताना मला फार आनंद होत आहे. आपल्या सर्व कपिगोत्री परिवाराच्या शुभेच्छांमुळे आणि मराठे प्रतिष्ठानच्या सहकार्यामुळे हितगुज ने शंभरी गाठली आहे. इवलेसे रोप लावियेले द्वारी, तयाचा वेलु गेला गगनावरी असेच हितगुज विषयी म्हणता येईल. साध्या वहीच्या आकाराचे आठ पानांचे हस्तलिखित परिवार समाचार पत्रिका १९८१ मध्ये मराठे प्रतिष्ठानने मुखपत्र या स्वरुपात निघत असे. मराठे प्रतिष्ठानचे तेव्हाचे कृतीशील कार्यवाह आज वयोवृद्ध झालेले श्री. विनायक केशव (पृ.२०) (वि.के.) वरळी यांनी हितगुज हे समर्पक नांव दिले. हितगुजचा दहावा अंक १९८७ मध्ये छापिल स्वरुपात निघाला. चित्रकार राजाभाऊ मराठे यांनी हितगुज चा उत्कृष्ट लोगो तयार केला. ५०व्या आणि १०० व्या अंकाचे मुखपृष्ठही त्यांनी रेखाटले आहे हा आपला भाग्ययोग आहे.

हितगुजचा ५० वा सुवर्णमहोत्सवी अंक जून २००२ मधे निघाला. ७५ वा अमृतमहोत्सवी अंक सप्टेंबर २००८ मधे निघाला आणि १०० वा अंक डिसेंबर २०१४ ला प्रकाशित होत आहे. ५०व्या हितगुज अंकाचे, पत्रकार–साहित्यीक आपले कुलबांधव श्री. ह. मो. मराठे यांनी तर ७५व्या अंकाचे विख्यात नाटककार, साहित्यीक, नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. सुरेश खरे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या १०० व्या अंकासाठी तर काय साक्षात देव च अवतरले, प्रकट झाले आणि केले की प्रकाशन. तात्पर्य हितगुज वाचण्याचा लोभ

## निमंत्रण

**मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेचा ३६ वा वर्धापन दिन सोमवार दिनांक २६ जानेवारी २०१५ रोजी आयोजित केला आहे. त्यामधे पुण्यातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षिस समारंभही होणार आहे. शिवाय काही सांस्कृतिक कार्यक्रम ही सादर केले जातील तरी या कार्यक्रमाचा आपण अवश्य लाभ घ्यावा व सहकुटुंब, सहपरिवार आणि नातेवाईकांसमवेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, ही विनंती.**

**स्थळ -**
**वेदशास्त्रोत्तेजक सभागृह,**
**स्पोर्टस ग्राऊंड समोर,**
**विश्व कल्पना हॉटेल जवळ,**
**पेशवेपार्क चौक, पुणे - ४११ ०३०**
**वेळ - संध्याकाळी ५ ते ८**

विख्यात संगीतकार कवी, गायक, यशवंत देवांनाही आवरता आला नाही, ते प्रसन्न झाले आणि समस्त मराठे परिवाराला देवांचे कृपाशिर्वाद लाभले यापरते भाग्य ते कोणते? हितगुज असा भाग्यवान आहे.

हितगुज चा हा शंभरावा अंक वैविध्यपूर्ण आहे. विविध साहित्य प्रकाराने नटलेला आहे. या शंभराव्या अंकात काय नाही ये हो? कथा आहेत, कविता आहेत, विडंबन गीत, प्रवास वर्णने, मुलाखती, आत्मवृत्त, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रे, विविध आठवणी, रोमांचकारी अनुभव, ट्रेकिंग, गिर्यारोहण, क्रीडा विश्व, आरोग्यविषयक,

Marathe Pratishthan

विनोद, चुटके, कोडी, पाककृती, सुगरणीचा सल्ला, प्रकाशझोत, परमार्थपर चिंतन, सुभाषिते, आध्यात्मीक, वैचारिक तरीही बोजड नाहीत असे प्रासादिक लेख इत्यादि साहित्याचा खजिना म्हणजे हितगुजचा हा १०० वा अंक आहे. विविध ललित साहित्याने पुरेपूर भरलेला शिवाय फोटोतून ही महत्वाच्या व्यक्तिंचे केलेले कार्य उल्लेखनिय व्हावे म्हणून फोटो प्रकाशित केलेले आहेत. या फोटोतून आपल्याला शतायू आजी, शतक वीर सेंच्युरी मारणारा क्रिकेटवीर, नव्वदी ओलांडलेले तरी आज ही पोहणारे वीर यासारख्या कर्तबगार व्यक्तींचे दर्शन होईल.

मराठे कुळातील कुळधर्म – कुळाचार, बोडण, पूजा, श्री देव व्याडेश्वर स्तोत्र, इ. ची प्रमाणभूत, ठाशीव माहिती आहे. हितगुजचे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मण शंकर (पृ. ५२०) यांचा हितगुजच्या वाटचालीचा वेध घेणारा लेखही या अंकात आहे.

प्रकृती बरी नसतानाही वा. ग. नी त्वरीत लेख लिहून पाठविला पहिला लेख १०० व्या अंकासाठीचा त्यांचा आला. नीलांबरी ताईंनीही सवड काढून अधिवेशनावर अभ्यासपूर्ण लेख लिहिला. कालिदास मराठे यांनीही परिश्रम घेऊन कै. जानकीबाई मराठे यांची दुर्मिळ कथा शोधली आणि प्रकाशनार्थ पाठवली. आपल्या कुलबांधव–भगिनिंनी ही २० ऑक्टोबरच्या आत म्हणजे वेळेवर त्यांचे साहित्य प्रकाशानार्थ कुरियरने, पोस्टाने, ई मेल ने पाठविले (ईमेल साहित्याच्या साठी श्री प्रभाकर मराठे यांनी फार मदत केली) देणगीदार, विज्ञापने देऊन आर्थिक मदत हितगुजला झाली. त्यासगळ्यांना धन्यवाद देते.

चांगल्या लेखकाला विषय व घटना या मध्ये रस नसतो. त्याच्या दृष्टीने भावनेचा अविष्कार महत्वाचा असतो. ज्या लेखनात सामान्य माणसाचे आयुष्य येते त्यामध्ये त्याचे सृजन दिसते ते चांगले लेखन होय असे मी मानते आणि आपल्या कुलबांधव–भगिनींचे लेखन या पातळीवरचे आहे आणि म्हणूनच साहित्यीक–मुल्य असलेले, सकस आणि सरस असे झालेले आहे. आणि त्यामुळेच हितगुजचा हा १०० वा अंक वाचनीय व दर्जेदार झाला आहे. कायम स्मरणात राहिल अशा योग्यतेचा आहे.

कोणत्याही व्यक्तीचा वाढदिवस म्हणजे त्याचे आयुष्यातील एक वर्ष सरल्याची खूण त्यातून पंचाहत्तरी, शंभरी म्हणजे त्याच्या जीवनाचा ऊत्तार असतो. पण मासिकाचे तसे नसते. मासिकाचा वर्धापन दिन म्हणजे मासिकाच्या वाढीची, प्रगतीची, विकासाची खूण हितगुजच्या १०० व्या अंकाचे अनन्यसाधारण महत्व त्यासाठी आहे.

'शतायू भव' माणूस १०० वर्ष जगला म्हणजे पुष्कळ जगला. परावलंबित्व न येता जगत असला तर बरं वाटतो. हवासा वाटण्याच वयच नसत. वार्धक्य आलं की हातपाय थकतात, शरीर साथ देत नसते, त्यामुळे हळूहळू जगण्यातला रसही कमी कमी होत असतो. आपण हाती–पायी धड असताना. परमेश्वराने वर न्यावे. आपले कोणाला काही करावे लागू नये, मुलाबाळांना आपला त्रास होता कामा नये असे सर्वांनाच त्यावयात वाटत असते. (माणसे, नातेवाईकही कंटाळतात जरी तसं बोलून दाखवत नसली तरी) भाषाप्रभू पु. भा. भाव्यांनी तर म्हटल आहे की जख्खड म्हातारा हा आशीर्वाद देण्याच्या कामाचाही नसतो.

पण मासिकाच्या बाबतीत असे होत नाही. एखाद्या मासिकाचे १०० व्या वर्षात पदार्पण म्हणजे ऐन सळसळत्या तारुण्यात पदार्पण करणाऱ्या नवयुवकासारखे असते. हितगुजचा १०० वा अंक

Marathe Pratishthan

ताजा टवटवीत रसपूर्ण निघाला आहे. ह्यापुढचे अंक ही तसेच निघतील याची निश्चिती मला वाटते. कारण आपल्या सारखे प्रतिभावंत लेखक मंडळी हितगुज मधे लिहित असतात. आणि लेखक – कवी–कलावंतांना वय नसते. वार्धक्य नसते. त्यांची सृजनशक्ती अमर असते. कारण दैवी सिद्धहस्त प्रतिभेची देणगी त्यांना लाभलेली असते. तेव्हा या पुढचाही हितगुज ताजा, सकस, सरस, टवटवीत आणि परिपक्व व वाचनीय निघत राहील.

हितगुज असेच सदासर्वदा, अखंडपणे अव्याहत चालू राहो. त्याची भरभराट होवो आणि त्याच्या ५०० व्या अंकाच्या प्रकाशनाचे स्वप्न ही पूर्ण होवो ही कुळदेवतेकडे प्रार्थना करते. आणि चिरंजीव भगवान श्री परशुरामांना वंदन करते.

घेऊ शोध कर्तृत्वाचा, प्रेरणादायी गुणवंताचा सन्मान माहेरवाशीणींचा, जतन करु समृद्ध परंपरा, पालन करु कुळधर्म–कुळाचार, सत्कर्म आचरणाचा, आकाश पेलू, कष्ट झेलू मनी विचार कुलबांधवांच्या हिताचा, मनी ध्यास हितगुज–मराठे प्रतिष्ठानचा ।।

आपली शुभचिंतक
डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)
८/१३, सहकार नगर, वडाळा मु. ३१,
दूरध्वनी २४१५०८८९

## नेत्रज्योति रक्षणार्थ उपासना

अस्याश्चाक्षुषो विद्याया अहिर्बुघ्न ऋषिः गायत्री छंदः
सुर्यो देवता चक्षुरोगावृित्तये जपे विनियोगः ।
ॐ चक्षुः चक्षुः चक्षुः तेजः स्थिरा भव ।
मां पाहि पाहि ।
त्वरितं चक्षुरोगान् शमय शमय ।
मम जातरुपं तेजो दर्शय दर्शय ।
यथा  हं अन्धो न स्यां तथा कल्पय कल्पय ।
कल्याणं कुरु कुरु ।
यानि मम पूर्वजन्मोपार्जितति चक्षुः प्रतिरोधक
दृष्कृतानि सर्वाणि निर्मूलय निर्मूलय ।
ॐ नमः चक्षुः तेजोधात्रे दिव्याय भास्कराय ।
ॐ नमः करुणाकराय अमृताय ।
ॐ नमः सूर्याय ।
ॐ नमो भगवते सूर्याय अक्षितेजसे नमः ।
खेचराय नमः । महते नमः ।
रजसे नमः । तमसे नमः ।
असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्मा अमृतं गमय ।
उष्णा भगवानं शुचिरुपः ।
हंसो भगवान् शुचिः अप्रतिरुपः ।
य इमां चाक्षुष्मती विद्यां ब्राह्मणो नित्यमधीते,
न तस्य अक्षिरोगो भवति,
न तस्य कुले अन्धो भवति,
अष्टौब्राह्मणान् ग्रहयित्वा विद्यासिद्धीः भवति ।।

### सभासदांना सुचना

**प्रतिष्ठानचे सारस्वत बँक वरळी येथील खाते ३१ मार्च २०१५ रोजी बंद केले जाणार आहे. त्यामुळे सभासदत्व शुल्क/देणगी आदी रक्कम सभासदांनी कृपया IDBI बँक, दादर (प.) शाखा येथे 'मराठे प्रतिष्ठान'च्या नावे असलेल्या बचत खाते क्र. 0501104000043519 *IFSC Code IBKL 0000501* मध्ये जमा करावी.**

**या अंकात छापलेल्या लेखांशी व विचारांशी मासीकाच्या संपादिका व प्रतिष्ठान सहमत असतीलच असे नाही. तसेच, सर्व लेखक, जाहिरातदार, देणगीदार व प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्यांचे प्रतिष्ठान आभारी आहे.**



Marathe Pratishthan

# संवाद कुलबांधवांशी

श्री हेमंत अरुण मराठे (पृ.०२१)
कार्यवाह मराठे प्रतिष्ठान

नमस्कार, कुलबांधव आणि भगिनिंनो,

प्रथमतः हितगुजच्या या शतकमहोत्सवी अंकासाठी आपल्या सर्वांतर्फे खुप खुप शुभेच्छा! हितगुजचा हा शंभरावा अंक आणि या अंकामधे मला लिहायला मिळणे हे माझे भाग्य. खरच जेव्हा ही संस्था मराठे प्रतिष्ठान सुरु झाली, ती सुरु करण्यामागे ज्यांनी मोलाची भूमिका बजावली त्यांच्या मनात त्यावेळी काय भावना होत्या? नक्कीच काही उदात्त भावना होत्या त्यामुळेच, आपल्या संस्थेचे मुखपत्र सुरु केले गेले. त्याची सुरुवात तर हस्तलिखिताने झाली. कल्पना करा आज आपण सर्व तंत्रज्ञान वापरत आहोत. मात्र ३०-३५ वर्षापूर्वी या सगळ्या सोयी नव्हत्या आणि एकमेकांना भेटण्यावर जास्त भर. पायाला भिंगरी लावल्या सारखे त्यावेळी संस्थापक मंडळी फिरली आणि सर्वांना संपर्कात आणले. खरच कमाल आहे. त्यांनी जे रोपटे लावले त्याची मशागत केली. वाढवले त्याची फळे आज आपल्याला मिळताहेत. शतक महोत्सवी अंक, फार फार आनंद होत आहे.

आता आपली जबाबदारी वाढली आहे. आता संपर्कमाध्यमे खूपच आहेत. त्यामुळे आपणाला एकमेकांच्या संपर्कात रहाणे सोपे आहे. त्याचा आपण जरुर फायदा घेतला पाहिजे. हितगुजचा हा १००वा अंक आपण सर्व वर्गणीदारांना पाठवत आहोत. ज्यांनी वाढीव वर्गणी दिली नाही त्यानांही, फक्त सर्वांना परत विनंती आहे आपण वर्गणी दिली नसेल तर त्वरीत ती जमा करावी म्हणजे पुन्हा पहिल्याप्रमाणे हितगुज जास्तीतजास्त कुलबांधवांपर्यंत पोहोचेल.

मराठे प्रतिष्ठान आणि हितगुज यांचे सुरुवातीपासूनचे शिलेदार, आपले मनोगत, अनुभव या अंकामध्ये विदित करत आहेतच. मात्र या सर्वामध्ये आपणा सर्वांचा पाठींबा अतिशय मोलाचा आहे. आपल्या सहकार्यामुळेच मराठे प्रतिष्ठानच्या या मुखपत्राचा आजवरचा प्रवास अव्याहत सुरु आहे व पुढे ही सुरुच राहील.

आपण पाहिले असेल मागील काही अंकामध्ये आम्ही थोडे प्रयोग केले आहेत. महत्वाचे म्हणजे वजन आटोक्यात ठेवणे आणि अंकातील मजकूर दर्जात्मक असणे, त्याचबरोबर, पाने भरलेली दिसणे, कारण जागा फुकट घालविणे आपल्यास परवडत नाही. आपणापैकी काहींनी त्यावर प्रतिक्रियाही पाठविल्या. त्यातील सुचनांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्याचबरोबर पुढील काही दिवसात वेबसाईटवर देखील अंक वाचता येऊ शकेल, मध्यंतरी तांत्रिक कारणाने हे शक्य होत नव्हते. आता नूतनीकरण करुन लवकरच हि सुविधा उपलब्ध होईल.

मी आपणाला सांगू इच्छितो की आपण दिलेल्या देणग्यांचा योगय विनियोग करण्याची जबाबदारी आम्हा कार्यकारीणीवर आहे. आपला निधी सुरक्षित रहावा या हेतूने आपण आता IDBI या बँकेत खाते सुरु केले आहे. कारण निधीची सुरक्षितता महत्वाची.

बंधु-भगिनींनो आम्हाला आपल्या प्रतिष्ठानचे कार्य विस्तारावे असे वाटते. त्यामुळे आमची अशी इच्छा आहे की, वेगवेगळ्या विभागातील कुलबांधव भगिनींनी आपआपल्या भागातील मराठे परिवारांशी संपर्कात रहावे. विविध कार्यक्रम आयोजित करावेत. विभागीय मेळावे घ्यावेत. त्यासाठी क्रियाशील कार्यकर्ते आम्हाला हवे आहेत. आपण स्वतःहून या कार्यात सामिल व्हावे व आपला परिवार क्रियाशील करावा. ज्यांना काही मदतीची गरज असेल त्यांना संपर्कात आणणे हे ही त्या त्या विभागातील कार्यकर्त्यांनी अवश्य करावे. मित्रांनो, आपणांस कोणतेही आरक्षण नाही आणि आपणांस ते नको. आपणच आपला विकास करु हा विश्वास आम्हा मराठे परिवारामध्ये आहे. त्यामुळे एकमेका साह्य करु अवघे धरु सुपंथ या विचाराने आपणांस कार्य करायचे आहे.

सर्व मराठे परिवारांस नविन वर्ष २०१५ च्या खुप खुप शुभेच्छा. आता आपली रजा घेतो. आता भेट पुढील वर्षी.

संपर्कासाठी भ्रमणध्वनी : ९२२०६९९९५७
ईमेल - hemant.a.marathe@gmail.com



Marathe Pratishthan

हा श्री व्याडेश्वराचा महामंत्र आहे.
प्रातःकाली स्नान केल्यावर या मंत्राचा
किमान ११ वेळा जप करावा. अधिक केल्यास उत्तम

**ॐ नमो भगवते श्री व्याडेश्वराय । भूतनाथाय ।**
**भूतबांधां नाशय नाशय । कष्टं चूरय चूरय**
**मनोवांछितं पूरय पूरय ।**
**ॐ ह्रीं श्री व्याडेश्वराय नमः ॐ ।**

## कवि विश्वनाथकृत
## श्री व्याडेश्वर स्तोत्रम

अनाथबन्धूं करुणैकसिन्धुं प्रसन्नमुर्तिं सुपवित्रकीर्तिम् ।
गौरीकलत्रं कमनीयगात्रं वाडेश्वरं नौमि जगन्निवासम् ।।१।।

लसालिनेत्रं सुभञ्चवक्त्रं भुजङ्भूषं लघुचित्रवेषम् ।
भस्माङ्गरागं क्रतुशिष्टभागं वाडेश्वरं नौमी जन्निवासम् ।।२।।

चनद्रावदातं गजवक्त्रतातं चन्द्रार्धचूडं जगदेकनीडम् ।
पवित्रगोत्रं वृषराडपत्रं वाडेश्वरं नौमि जग्नन्निवासम् ।।३।।

आनंन्दंकन्दं हतवेरिवृन्दं कृतान्तकालं नृकपालमालम् ।
तीवप्रतापं प्रलयाग्निकोपं वाडेश्वर नौमि जग्नन्निवासम् ।।४।।

शिरोधिनीलं करिच्चिर्मचलं पिनाकहेतिं भृतभूरिभूतिम् ।
समस्त हेतुं प्रलयाकान्तकेतुं वाडेश्वरं नौमि जग्नन्निवासम् ।।५।।

वाडेश्वरं नौमि हरं महेश्वरं गङ्गाधरं पापहरं कृपाकरम्
गौरीवरं शूलधरं हतासूर विश्वम्भंर देववरं परात्परम् ।।६।।

इति वाडेशदेवस्य स्तोत्रं यः सर्वदा जपेत् ।
लब्धा वाडेश्वर भक्ति भुक्तिमुक्ति लभेत सः ।।७।।

Marathe Pratishthan

# ब्रह्मर्षि स्वामी केवलानंद सरस्वती

## - तथा नारायणशास्त्री सदाशिव मराठे (पृ.९३)

(इ.स. १८७७-१९५५)

लेखक - श्री. ना. बा. मराठे



वाई म्हणजे दक्षिणेकडची काशी, काशी हे भारतातील संस्कृत विद्येचे माहेरघर तर वाई गेली दोनशे वर्ष महाराष्ट्रतील संस्कृत विद्येचीगंगोत्री. आज मराठी विश्वकोशाचे काम वाईला चालू असल्याने महाराष्ट्रांतील विविध विद्याशाखांतील विद्वान विश्वकोशाच्या कामानिमित्ताने वाईची येजा करीतच असतात. आपल्या लेखणीचे ठसे उठवितात अन पुनश्च स्वगृही परततात.

विश्वकोशाचे प्रचंड काम गेली सोळा वर्ष ज्या वास्तूत चालू आहे त्या वास्तूचे नांव आहे स्वामी केवलानंद स्मृति मंदिर! स्वामी केवलानंद सरस्वती यांचे इ. स. १९५५ साली (फाल्गुन शु. ७ शके १८७७) देहावसान झाले. आणि त्यांच्या शिष्योत्तमांनी प्राज्ञपाठशाळेच्या क्रीडांगणात स्वामींची समाधी बांधावयाचे ठरवले. या समाधीवर जी प्रशस्त वास्तू उभारली गेली तिचेच नामकरण झालं स्वामी केवलानंद स्मृती - मंदीर.

स्वामींचे पूर्वाश्रमीचे नांव होते नारायणशास्त्री सदाशिव मराठे, ऑक्टोबर २२, १९३१ (शके १८५३ विजया दशमी) दिवशी त्यांनी गुपचूप कराड जवळील टेंभू या कृष्णाकाठच्या गावी जाऊन संन्यास घेतला आणि केवलानंद स्वामी झाले. मुळचे कोकणातले. जन्म मार्गशीर्ष शु. ४ शके १७९९ मधील (किंवा इ.स. १८७७). इ.स. १९०१ मध्ये वाईला संस्कृतच्या वरिष्ठ ज्ञान संपादनासाठी आले आणि आजन्म तिथेच वास्तव्य केले मात्र निःस्पृह आणि निरिच्छ वृत्तीने, गुरु प्रज्ञानंद स्वामींजवळ वेदान्त शिकले न्याय, व्याकरण, मीमांसा, षडंगवेदाचे अध्ययनही वाईलाच तत्काली प्रसिद्ध असलेल्या वेगवेगळ्या शास्त्री पंडितांकडे झाले आणि १९०१ पासून ते प्राज्ञमठांत संस्कृत अध्यापन करु लागले. त्यांच्या अध्यापनाची ख्याती महाराष्ट्रभर पसरल्याने त्यांच्या भोवती विद्यार्थ्यांचा समूह जमू लागला. विद्यार्थ्यांची रीघ थोपवणे त्यांना अशक्य होते प्राज्ञमठाचे त्यांनी प्राज्ञपाठशाळेत रुपांतर केले. संस्कृत बरोबर आधुनिक अतिहास, भूगोल, संगीत इत्यादीचेही शिक्षण सुरु केले. स्वामींना संगीताची विशेषतः शास्त्रीय संगीताची चांगली जाण होती. पुढे १९२० सालापासून संस्कृत पाठशाळेची राष्ट्रीय माध्यमिक शाळा शाखा निर्माण झाली. संसारात पडायचं नाही हे त्यांनी वयाच्या तेविसाव्या वर्षीच ठरवलं होतं. त्यामुळे संन्यासी जीवन अथवा ब्रह्मचर्याश्रमी जीवन यात त्यांना फारसा फरक वाटला नाही. या जीवनात ते माधुकरी वृत्तीनंच राहत गंगापुरीच्या घाटावर एक लहानसं मारुती मंदिर आहे. त्यामंदिरावर लहानशी मठी आहे. तिथंच त्यांचा वास असे, औंधचे राजे पंतप्रतिनिधी स्वामींना भेटायला आले तेही त्याच मठीत. राजेसाहेबांच्या स्वागतासाठी फक्त एक चटई अंथरलेली असायची. म.म.पां.वा. काणे आले तरी तीच चटई. अन् मुख्यमंत्री दे. भ. बाळासाहेब खेर आले तरी त्याच चटईवर त्यांचं स्वागत होई.

दिनचर्या ठरुन गेली. सुर्योदयापूर्वी प्रातर्विधी उरकून स्नान संध्यादि आटपून सकाळी एकदा बैठक मांडली की अकरापर्यंत. मग भिक्षा आणून ऐक वेळ जेवत. थोडीशी वामकुक्षी की पूनः कार्यमग्न. संध्याकाळी पाच पर्यंत. मग गावाबाहेरच्या दत्तमंदिरापर्यंत सैर व्हायची. उतारवयात तीही बंद झाली. मग केवळ गंगापुरीच्या विस्तीर्ण घाटावर या टोकापासून त्या टोकापर्यंत फेऱ्या मारायच्या.

त्यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली त्यावेळी त्यांचा एक भव्य सत्कार करण्यात आला. न्या. मू. गजेन्द्र गडकर हे मुद्दाम अध्यक्ष म्हणून आले होते. गंगापुरीचा घाट माणसांनी फुलून गेला होता. स्वामीनी त्यावेळी केलेले भाषण त्यांनी जीवनात घेतलेल्या वृत्ताचे द्योतक होतं पांडित्य 'निर्विद्य अथ बाल्येन तिष्ठासेत' महापंडित बनूनही लहान मुलांच्या निरागस वृत्तीनं राहायला आलं

Marathe Pratishthan

पाहिजे ही औपनिषदिक वृत्ती त्यांनी जोपासली आणि त्यांचंच शिक्षण दिलं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (वय ७७) या त्यांच्या पट्टशिष्यासह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पसरलेली स्वामीजींच्या हाताखाली शिकून तयार झालेली पिढी ही आता उतारवयात आली आहे.

महाराष्ट्रातील विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सामाजिक व धार्मिक जीवन आणि गेल्या पंचवीस वर्षातील जीवन यात आता आमूलाग्र फरक पडलेला दिसतो. या मागे ज्या महंतानी तात्विक बैठक उचलून धरली त्यात पं. नारायणशास्त्री मराठे यांचं नाव जरुर घ्यावे लागेल.

इ.स. १९२५ मध्ये खानदेशात सोनगीर येथे पंडित परिषद भरली होती. उघडउघड पंडितांचे दोन तट पडले होते, एक गट होता सनातन पंडितांचा, वाराणसीचे पं. लक्ष्मणशास्त्री द्रविड, राजेश्वर शास्त्री द्रविड, अनंत कृष्णाशास्त्री काशी, इत्यादि स्मृतीत व धर्मशास्त्रात सांगितलेल्या हिंदूच्या चालीरीतीत आपणाला कोणताही बदल करण्याचा हक्क नाही असं समजणाऱ्या विद्वानांचा आणि दुसरा होता पं.नारायणशास्त्री मराठे व त्यांचे शिष्य, म. प. श्रीधरशास्त्री पाठक, गीता वाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे, विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव आदीचा कालानुरुप समाजात बदल घडून आला पाहिजे असं प्रतिपादन करणाऱ्या पंडितांचा आणि त्यांत दुसऱ्या गटाने यश संपादन केले होते त्याचे बरेचशे श्रेय पं.नारायणशास्त्री यांचेकडेच जाते.

इ. स. १९२७ मध्ये अकोला येथे भरली ब्राह्मण परिषद. अध्यक्ष निवडले गेले पं. नारायणशास्त्री मराठे. त्यांनी आपल्या भाषणात पुरस्कार केलेली तत्वे आता पन्नास वर्षानी बिनबोभाट समाजात रुजून गेली आहेत असंच दिसून येते. ''ब्राह्मण म्हणून घेणाऱ्या सर्व पोट जातीचा रोटी-बेटी व्यवहार व्हावा, हिंदूच्या सर्व जाती समान आहेत. महाराष्ट्रातील मराठा माळी आदि सर्व जमाती क्षत्रिय समजल्या जाव्यात व त्यांना वेदोक्त संस्कार करण्याचा हक्क प्राप्त व्हावा.''

इ. स. १९३३ साली महात्मा गांधीनी अस्पृश्यता निवारण यावर धर्मशास्त्राचा पाठिंबा मिळविण्यासाठी ज्या पंडितांना येरवडा तुरुंगात भेटीला बोलावले त्यात स्वामी केवलानंदानाही पाचारण केले होतं आणि त्यावेळी स्वामीनी महात्मा गांधीच्या अस्पृश्यता निवारणाला पूर्ण संमती दिली होती.

लग्नमुंजी इत्यादि आपले संस्कार पुष्कळ वेळ घेतात. ते सुटसुटीत करुन ठराविक वेळात उरकता यावेत म्हणून तशा तऱ्हेचे नवीन पद्धतीचे धार्मिक विधी तयार केले. त्यासाठी धर्मनिर्णयमंडळ स्थापन करुन ते महाराष्ट्रात प्रचलित केले. कलकत्त्याचे डॉ. सुनीतीकुमार चटर्जी यांनी त्या विधीची प्रत मुद्दाम मागवून घेऊन इंग्रजी भाषांतरासह ती छापून घेतली आहे. तिचा अमेरीकेत हिंदूच्या विवाहादि संत्कारांना अत्यंत उपयोग होत आहे. असे नुकतेच डॉ. चटर्जी यांनी सांगितले.

इ. स. १९५१ सालच्या मे मध्ये काकासाहेब गाडगीळ यानी डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते श्री सोमनाथाची पुनः प्रतिष्ठा केली. त्यासाठी स्वामीजींनी तेथील सारा प्रतिष्ठाविधी स्वतःच्या देखरेखीखाली करवून घेतला. रोज दहा तास उभे राहून ते काम व्यवस्थित व्हावे म्हणून अपार प्रयत्न केले. त्यांचे पट्टशिष्य प. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वामीजींचे चरित्र लिहिले आहे. त्यात त्यांनी केलेला समारोप पहा.

''स्वामींनी आपले आयुष्य अध्ययन, अध्यापन, विद्याव्यासंग, तपःस्वाध्याय, ध्यान, धारणा, समाधी, ईश्वरप्रणिधान यांत व्यतीत केले. प्रसिद्धीची यत्किंचितही अभिलाषा न धरता वाई सारख्या गावात राहून त्यांनी डोंगराएवढी कामगिरी केली. विद्याव्यासंगात निमग्न असूनही ते समाजापासून अलग राहिले नाहीत. सामाजिक सुधारणांचा त्यांनी योग्य तो पुरस्कार केला. प्राज्ञपाठशाळेचे स्वयंपाकघर अस्पृशांना दाखविण्यासाठी नेणारा विधवा वपनात विकल्प सांगणारा, अखिल हिंदूंना वेदाधिकार देऊन सर्व हिंदूत सांस्कृतिक साम्य व्हावे असे म्हणणारा, पोटजाती मोडून जंजाळ कमी करायला सांगणारा व कर्त्या शिष्यांची परंपरा निर्माण करणारा असा हा ऋषी महाराष्ट्राच्या सामाजिक क्रान्तीचा खरा द्रष्टा होता.''

पूज्य विनोबाजी स्वामींजवळ वेदान्ताचे अध्ययन करण्यासाठी मुद्दाम एक वर्ष १९१६-१७ साली वाईला येऊन राहिले होते हे वाईकरांना माहीत आहे. आचार्य विनोबाजींनी स्वामींचे केलेले वर्णन त्यांच्याच शब्दात पहा.

''स्वामींनी सारे जीवन जनसेवेला वाहिले, धर्म कोशाचे कार्य आरंभिले, सुधारणेला चालना दिली. हे सगळे त्यांचे कार्य मोठे निश्चित आहे. पण त्याही पेक्षा मोठे



Marathi Pratishthan

आहे त्यांचे अंतरंग. शत्रु आणि मित्र, उदासिन आणि मध्यस्थ, परके आणि सख्खे, सर्वांना समान लेखणारे त्यांचे हृदय ही जीवनातली मोठ्यात मोठी कमाई, ती त्यांनी सिद्ध केली. अशांच्या शुभ संकल्पनात जगात विविध कार्ये होतात. त्यांच्या सुक्ष्म देहाकडुन घडलेली कार्ये मोजत बसणे आंधळेपणाचे लक्षण होईल.''

त्यांनी लिहून ठेललेली ग्रंथसंपदाही अशीच मोठी आहे. इ. स. १९२७ साली म्हणजे अकोल्याची ब्राह्मण परिषद झाल्यावर समाजाची गरज लक्षांत घेऊन त्यांनी धर्मकोशाच्या कार्याला हात घातला. धर्मपरिवर्तन घडवून आणायचे तर ज्या क्षणी जरुर असेल त्याक्षणी लीलया स्मृतिग्रंथातील वचनं सांपडू शकतील असा संदर्भग्रंथ आपल्याजवळ तयार असला पाहिजे या सामाजिक-धार्मिक आवश्यकतेतून त्यांनी धर्मकोश मंडळ स्थापन केले. आर्थिक भार उचलणारे त्यांचे मित्र वामनराव नाईक हे पुढे आले होते. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनीही आर्थिक मदत देऊ केली म्हणून धर्मकोशाची तीन कांडे ११ भागात छापून तयार होऊ शकली. संन्यास घेतल्यावर त्यांनी दुसऱ्याच एका भव्य प्रकल्पाला हात घातला. त्याचे नांव आहे 'मीमांसा कोष' इ. स. १९३६ ते १९५५ अशा वीस वर्षाच्या कालावधीत तो त्यांनी एका हाती तयार करुन लिहून काढला. त्यांचे हयातींत ६ खंड छापूनही झाले. राहिलेला ७ वा खंड नंतर छापण्यात आला. म. म. पां. वा काणे यांनी १२००० छापील पृष्ठे भरतील एवढा मजकूर एका हाती लिहून धर्मशास्त्राचा इतिहास हाता वेगळा केला त्याच दर्जाचे काम स्वामीजींनी एक टंकी केले याचे रसिकपणे कौतुक करण्यास फ्रान्समधील प्रसिद्ध भारतीय विद्यापंडीत डॉ. रेनाँ हे पुढे सरसावले तेथपर्यंत भारतीय विद्वानांना असा मीमांसाशास्त्रावर प्रचंड संदर्भ ग्रंथ भारतात तयार झाला आहे याची दादच नव्हती.

त्यांनी लिहून ठेवलेल्या इतर संदर्भ ग्रंथाची नांवही अशीच सामान्य विद्वानांच्या कह्या पलिकडची आहेत उदा.: मीमांसादर्शनम अद्वैतसिद्धीचा मराठी अनुवाद, एतरेय विषयसूची, कौषीतकीब्राह्मण - विषयसूची, सत्याषाढसूत्र विषयसूची, अद्वैतवेदान्त कोश इत्यादी.

वाईसारख्या गांवात कृष्णातटाकी राहून निमूटपणे समाजाची विधायक सेवा करणाऱ्या या कर्मयोग्याची आठवण या निमित्ताने महाराष्ट्राने व भारताने ठेवली पाहिजे. ते एक सामाजिक कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवून त्या ऋषीचे स्मरण व नामोच्चारण या निमित्ताने करावयास हवे.

शान्तस्वान्तो योगजादात्मधर्मात्
सिद्धस्तत्र तारयन् जैमिनेर्यः ।
धन्य धीरं धारिण मोक्षालक्ष्म्याः
पाज्ञाचार्य केवल त नमामः ।।
(लक्ष्मणशास्त्री जोशी कृत नमन)
(अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन गोवा,
दि. २६ जाने. १९८०)

*With Best Compliments from*

***S. S. Marathe***
***Interior Designer***

*All types of Curtains, Sobeet Latch Lock*
*Aluminium Sliding Windows*
*Grills, Safety Doors All Types of Furniture etc.*

Kirtee Nagar, Co-op.Hsg. Soc. F-6, Wadgaon BK, Pune - 41
Ph. : 24351284, Mob. : 9822026615

*Prop : S. S. Marathe ❖ Mrs. Prajakta Sidhesh Athavle*

Marathe Pratishthan

# ‘मराठे प्रतिष्ठान’ आणि ‘हितगुज’ चे अवलोकन

श्री. वा. ग. मराठे (पृ. ५०३)

ब्रह्मर्षि स्वामी केवलानंद सरस्वतींच्या शुभाशिर्वादाने मी आज ‘हितगुजच्या’ म्हणजेच मराठे प्रतिष्ठानच्या मुखपत्राचे अवलोकन करुन आतां येणाऱ्या या शतकी अंकाचे बारसे करत आहे.

मराठे प्रतिष्ठानची पहिली सभा मराठे उद्योगभवन येथे १८–८–७९ ला झाली व या सभेला श्री. आनंदराव मराठे हे ही हजर होते. ता. २४–९–८३ ला घाटकोपरच्या सभेत मुखपत्र असावें असे ठरले.

मराठे प्रतिष्ठानचे पहिले गोवा संमेलन २६ व २७ जानेवारी १९८० रोजी गोवा ढवळी येथे झाले. त्यासभेत ७० ते ८० लोक उपस्थित होते. त्यांत बहुसंख्य महिलांचा सहभाग होता. मात्र या सभेत वेंगुर्ला ते बेळगांव व आजूबाजूचे लोक हजर होते. त्यापूर्वी सन्मानीय पाहुणे म्हणून माननीय तर्थतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी येणार होते पण त्यांच्या आजारपणामुळे ते आले नाहीत. तरीसुद्धा प्रतिष्ठान काय काय करते ह्याचा प्रगतिपर आलेख त्यांच्या पर्यंत जात होता हे विशेष. आम्ही स्मरणिका काढली त्यावर श्री केवलानंदांचे कृष्णवर्णीय चित्र ही छापले होते. तें मी मोठ्या मेहनतीने प्राज्ञपाठशाळेतून मिळविले. तिथे ही मराठे म्हटल्यावर आजोबांचे नातू म्हणून तिथल्या कार्यकर्त्यांनी मोठ्या आदराने समाधीदर्शन, पाठशाला, वगैरे आपुलकीने दाखविली व एक लहान रंगीत फोटो पण दिला. त्याच फोटोचा कृष्णवर्णीय फोटो तयार केला व स्मरणिकेला साजेसा असा मुखपृष्ठावर छापला. तीच पहिली स्मरणिका व त्याचे मुल्य होते रुपये पांच. परंतु तेसुद्धा कुणी द्यायला तयार झाले नाही. ही एक आनंदाची गोष्ट आहे असे करुन शेवटी मी मुंबईला आल्यावर कै. सुरेशभाऊंना केवळ रुपये बाराशेच दिले. बाकी खर्चाचे मी काहींच बोललो नाही. ह्याबद्दलचा आनंद म्हणजे गोव्याला ७०/८० लोक हजर होते हे त्याचे फलित. विशेष म्हणजे किरांतचे कै. श्रीधर मराठे ह्यांनी एक पान प्रतिष्ठानला स्वतंत्र देऊन आमची प्रतिष्ठानची जाहिरात केली. मला सांगावेसे वाटतेकी हीच खरी प्रतिष्ठानच्या हितगुजची पूर्वपीठिका आणि आज मागे वळून पाहतानां मराठे प्रतिष्ठान हितगुज हे वजनदार मानाने आणि श्रीमंतीने तळपतानां आम्ही पाहात आहोत.

मराठे प्रतिष्ठानचे १९९७ मध्ये रत्नागिरी येथे ६ वें मराठे संमेलन झाले. त्यांत बऱ्याचश्या चर्चा झाल्या त्याचर्चेत हितगुज हे त्रैमासिक संपर्क माध्यम आहे ते १६ पानांचे वर्षाला ४ अंक काढावेत असे ठरले व सभासद संख्या ६०० वरुन ८५० पर्यंत न्यावी असे ठरले. हितगुज मासिक व्हावे अशी अनेक सभासदांची इच्छा होती. पण त्यासाठी वर्षाला रु. ५०,०००/– हवेत ते जाहिरातीने मिळवावेत असे ठरले व रु. १०००/– देणगीदार मिळवावे. मात्र १९९९चा हितगुज दिवाळी अंक काढावयाचा असे ठरले व त्याचे संपादकपद श्री. लक्ष्मण मराठे यांचेकडे आले. मात्र श्री. लक्ष्मणरावांच्या धडाक्यामुळे व त्यांच्या अतिशय धाडसी रु. २००/– च्या सभासदत्वामुळे हितगुज बाळसेदार होऊ लागले. खरं पाहाता त्यांची योजना मलाही स्वप्नवत् वाटली पण ती त्यांनी प्रत्यक्षांत उतरविली. हे सत्य आहे.

खरं तर रत्नागिरीच्या संमेलनानंतर प्रतिष्ठानची शिडें पार समुद्रापार म्हणजे हळु हळु सातासमुद्रापार दिसूं लागली पण पुन्हा एकदा गोव्याच्या समुद्रातच आपले गलबत हेलकावे घेऊं लागले. तिथे परिसंवाद, चर्चा, संवाद होऊं लागले व नंतर, मासिक मेळावे, चर्चा, आपआपसांत मेळावे होऊं लागले. एकमेकांचे सख्खे वैरी सख्खे भाऊ बनल्याची उदाहरणे ही बरीच आहेत. हे विशेष. खरं पाहातां प्रतिष्ठानने आम्हाला काय दिले? असा एक विचार मनांत डोकावतो. काय दिलें नाही पण जें दिले ते आपल्या मनांत आडपडदा न ठेवता दिले. खरं पाहतां या हितगुजने प्रत्येकाचे हितच केलेले आहे. व्यापारी मासिक, कितीशी १०० व अंक काढतात? उद्योग किती होतो. पाठबळ, आर्थिक झळ असूनही एका कुटुंबाचे हे मुखपत्र आज अव्याहत शिडांत हवा भरुन चालत आहे. ही बोट या महासागरांत डौलाने चालत आहे. लाटेवरती हेलकावे खाणारच तरी सुद्धा त्याला कप्तान मिळतातच. कै. सुरेशभाऊ, कै. भाऊसाहेब, कै. मालतीबाई, कै. वामनभाऊ, कै. बापूसाहेब, किती किती म्हणून नांवे सांगू? प्रत्येकाने शिडात हवा भरलेली आहे. नवनवीन लेखक, कथाकार, प्रवासवर्णने लिहिणारे श्री. मोहनरावां सारखे जगप्रवासी, लेहलडाख पाहणारे श्री. सदानंद ह्यांनी किती किती आपल्याला दाखविलेले आहे. इथे कोणकोणी देशी फिरुनी राहिला। परि माझीया मनी तो जिंकला ।। असेंच म्हणावे लागेल नाहीं का? शास्त्रज्ञ, लेखक, राष्ट्रपती सन्मान, स्पोर्टस् वगैरे वगैरे विजयीं दरवर्षी आपण बक्षिसें व मुलांचे कौतुक करतो तेव्हांचे विद्यार्थी आतां तर मोठे शास्त्रज्ञ निर्माण झाले आहेत व त्यामुळे हे लोक आवर्जून मराठे प्रतिष्ठानचा उल्लेख करतात. आणखीन काय पाहिजे? आपली आठवण ठेवतात हेच पुष्कळ आहे. नाही कां?

Marathe Pratishthan

आपल्या प्रतिष्ठानला सीमांचे, भाषेचे बंधन नाही. याचे उदाहरण म्हणजे ९ वे मराठे संमेलन दुर्ग उडपी येथे झालेले. त्यामुळे कितीतरी मराठे लोक बेंगलोर ते त्रिची पर्यंत सर्वदुरचे कुलबंधु व भगिनी तर आघाडीवरच होत्या हें सर्व आपल्या हितगुज मुळेच झाले नाहीं का?

मुख्य प्रश्न आर्थिक आहे पण तो हळु हळु प्रगतीपथावर येईल. आत्ताच्या संपर्क माध्यामाद्वारे आपले सर्व कुलबंधु जवळ जवळ येत आहेत. त्यांना काय हव नको तें तर कळत आहेच. प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रांत विद्याविभूषीत आहेत. तरुण पिढीला आपण सांगण्याची जरुरी नाही. एक व्यासपीठ बनवुन ठेवलेले आहे. हे ही नसे थोडके श्री. वि. के. मराठे सारखे कथाकार, सौ. सुमेधा सारख्या प्रथितयश संपादिका, सौ. उर्मिला मराठे कवयित्री, यक्षगान सादर करणारे कारवारचे मराठे, त्सुनामीच्या डॉ. सीमा मराठे, सौ. नीलांबरी वधुवर सुचक केंद्र चालवून कितीतरी जणांच्या रेशीमगांठी बांधून दिल्या, असे कितीतरी प्रकल्प होऊं लागले आणि त्यामुळे नुसते मराठेच नाही तरी मराठ्यांच्या माहेरवाशिणी सुद्धा प्रतिष्ठानला योगदान देत आहेतच. आपल्या टीपॉयवर हितगुजचा अंक एखाद्या अपरिचिताला दिसला तर तो प्रभावित होऊन बाह्यांगाबरोबर अंतरंगावरही प्रभावित होतो हें विशेष. असे हे आपले हसरे हितगुज सर्वांच्या नजरा खिळवून ठेवते. मग त्यासाठी आपल्याला थोडाबहुत आर्थिक भार सहनकरावा लागला तर कां बरे नाके मुरडावीत. आपल्या कुटुंबाची संख्या जवळ जवळ ५००० च्या पुढे असावी. विचार करा कीं प्रत्येकजण प्रतिष्ठान स्थापण्यापूर्वी प्रत्येक कुलबांधव कितीजणांना ओळखत होता व आतां आपण किती जणांना परिचित आहोत. ह्याचा विचार येणाऱ्या पिढीनें करावा, जाणारे जातच राहाणार पण येणारे इथेच राहणार, काहीं विचार आत्मकेंद्रित होतात ते विकेंद्रीत झाले तर काय नुकसान होईल ह्याचा ठोकताळा आपला आपणच केलेला बरा.

मराठे प्रतिष्ठानचे सुरुवातीचे खांब जर्जर होऊन गेले व कांही माझ्या सारखे अजून आहेत ही परंतु खांबातील लोखंडाच्या सळ्या आतां गंजू लागल्याची जाणीव आम्हांलाही आहे त्यामुळे आमची गाडी आतां कितीशी धावणार? काया वाचा मनं स्पर्धा कशी जिंकणार. त्यामुळे नव विचार, नवी पिढी, नवा जोम, नवे तंत्रज्ञान ह्याला जुळेल असेच सूर पुढे हितगुजला जुळवावे लागणार आहेत. आणि त्या दृष्टिने सर्वांनाच एकमेकांचे विचार तरंग एकमेकांस दिसावयास हवेत. प्रगती होतच असते. तंत्र आत्मसात करावयास हवे किती तरी माध्यमें आहेत त्याच्या आधारे आपापली ध्येंये साधावयास हवीत. मला वाटते आणि मी तरी सुज्ञांस सांगणे न लगे, असेच म्हणेन मला सुचलेले विचार घेतलेला मागोवा, धांडोळा, मनःचक्षुंना जसा दिसेल तसा मी लिहिला.

श्री. वा. ग. मराठे (पृ. ५०३)

❏❏❏

# काळ आला होता पण वेळ?

श्री. मोहन सदाशीव मराठे

आम्ही ६/७ जण कारमधून सिंहगडावर जात होतो शेवटच्या चढावर वळताना एंजिन गरम झाल्याने गाडी बंद पडली. ड्रायवरने उतरुन बॉनेट खोलले. वाफा बाहेर . येत होत्या. मी हि पुढे बसल्याने उतरुन पाहू लागलो. गाडी हळूहळू मागे घसरु लागली. माझ्या लक्षात आल्यावर डोळ्यासमोर भयंकर संकटाची चाहूल लागली. मी मोठ्ठा दगड उचलून चाकामागे लावण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही मी गाडीतील लोकांना दार उघडून बाहेर पडायचा ओरडून इशारा दिला. खिडकीचे दार घट्ट पकडून मी गाडीला थांबविण्याचा प्रयत्न केला. पण कसचे काय. ड्रायव्हरने हँडब्रेक लावला नसल्याने गाडी मागेमागे घसरतच राहिली. घसरतच राहिली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या खडी मुरुमाच्या ढिगाला अडकून थांबली. गाडीतल्या लोकांनी बाहेर पडल्यावर मागील खोल दरी पाहून त्यांना दरदरून घाम फुटला. भीतीने गाळण उडाली. आम्ही चढत वर जाऊन थंड ताक पिऊन चित्तशांती केली. वरुन लोक घसरणाऱ्या गाडीकडे भयभीत पणे पहात होते. एरवी रस्त्याच्या कडेला खडी मुरुमाचे ढीग टाकणाऱ्या बांधकाम खात्याला आपण दोष देतो पण त्यांनीच आमचे प्राण वाचविले होते.

श्री. मोहन सदाशीव मराठे (पृ.३६५)
५, रामभुवन, अहिंसा मार्ग, खार (प.).
मुंबई ४०० ०५२.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठानला पोरके करुन मालतीबाई गेल्या!

**विनायक केशव मराठे, (पृ. २०) वरळी-मुंबई**

(आपल्या मराठे कुलवृतांताच्या द्वितीय आवृत्ती-१९९१ चे संपादक श्री. वि.गो. उर्फ भाऊसाहेब मराठे (पृ.६९) यांच्या पत्नी व प्रतिष्ठान व हितगुजच्या कामामध्ये सर्वतोपरी भाग घेणाऱ्या मालतीबाईंचे प्रदीर्घ आजारानंतर दिनांक २९-१-२०११ रोजी अमेरिकेत निधन झाले. कथा, कादंबऱ्या व बालवाङमयाद्वारे साहित्यसेवा आणि दूरदर्शन व आकाशवाणी विविध प्रकारचे विपुल लेखन करुन त्यांनी समकालीन स्त्रीसाहित्यकांमध्ये आपले विशेष स्थान निर्माण केले आहे. आपल्या कुलवृत्तांताचे बाबतीत तर त्यांचे योगदान फारच महत्वाचे आहे. ॲप्पल या कंप्यूटर कंपनीत उच्चपदावर असलेल्या आपल्या मुलाने (माधव) भेट म्हणून दिलेल्या संगणकाचा उपयोग करुन त्यासाठी उतारवयात संगणकाचे स्वयंशिक्षण घेऊन त्यांनी कुलवृत्तांताच्या कामी भाऊसाहेबांना अहोरात्र सहाय्य केले व एक महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास नेला. या निमित्त लोकमान्यनगरमधील त्यांचे निवासस्थान म्हणजे प्रतिष्ठानचे कार्यालयच झाले होते. त्यांच्या या काळात दृढ संपर्कात आलेल्या आपल्या व्हि. के. मराठे यांनी त्यांचे स्मृतिनिमित्त सोबतचा लेख स्वतःची प्रकृती साथ देत नसूनही आग्रहाने मला बोलावून लिहवून घेतला.

हे सर्व मराठे परिवाराला व हितगुजच्या वाचकांना प्रेरणादायी ठरेल अशी आशा आहे - सहसंपादक सी. गो. खांबेटे)

मालतीबाई गेल्या ही काहीशी धक्कादायक बातमी श्री. सी. गो. खांबेटे यांनी ३० जानेवारीच्या सकाळच्या प्रहरी दूरध्वनीवरुन मला दिली. मालतीबाई गेली बरीच वर्षे अमेरिकेत स्थायिक झाल्या होत्या. त्यामुळे केवळ फोनद्वारे त्यांचे व भाऊसाहेबांचे त्रोटक संबध शिल्लक राहिले. भाऊसाहेब व मालतीबाई यांच्या समस्त मित्रपरिवाराने त्यांना अत्यंत चांगल्या आरोग्यावस्थेत अमेरिकेत जाईपर्यंत पाहिले होते. आणि त्यांच्या त्याच प्रतिमा आमच्या मनावर कोरल्या आहेत. म्हणूनच स्वर्गवासी झालेल्या मालतीबाई यांच्या नांवाचे अगोदर कै. हे उपपद लावण्यास मन धजत नाही. म्हणूनच मी मालतीबाई गेल्या एवढीच प्रतिक्रिया श्री खांबेटे यांचेकडे व्यक्त केली.

भाऊसाहेब आणि मालतीबाई यांनी मराठे प्रतिष्ठानच्या कार्यालयास सर्वस्वी वाहून घेतले होते. मुलेबाळे परदेशी गेल्यावर साधारणपणे मातापित्यांचे घर ओस पडते. त्यांचा वेळ जाता जात नाही. कोणत्याही मोठ्या पाहुण्याची ही जोडपी आतुरतेने वाट पहात असतात याचे हृद लेखन संध्या-छाया या नाटकात आपणाला अनुभवता येते. पण भाऊसाहेब आणि मालतीबाई हे जोडपे याला सर्वस्वी अपवाद होते. कारण त्यांच्या स्नेहबंधनाच्या कक्षा एवढ्या विस्तृत होत्या की पाहुण्यांची वाट बघण्याचे त्यांना कारणच नव्हते. उलट पाहुण्यांच्या वर्दळीने त्यांना अगदी नकोसे झाले असावे असा माझा तर्क आहे. मात्र त्यांनी तसे कधीही दर्शविले नाही हा त्या उभयतांच्या मनाचा मोठेपणाच आहे. आपल्या प्रतिष्ठानच्या संदर्भात बोलायचे तर कार्यकर्त्यांनी त्यांच्या सौजन्या चा पुरेपूर व बऱ्याच वेळा अगदी अतिरेकी फायदा घेतला. भाऊसाहेबांबरोबर कोणत्याही विषयावर बोलणे, चर्चा करणे युवा प्रतिष्ठानचे काम करणे हा एक सुखद अनुभव होता. म्हणून सेवानिवृत्तीनंतर दोन घास पोटात घातल्यावर आम्ही अगदी अधाशीपणे त्यांचेकडे धाव घेत असू. जिन्यात आमच्या पावलांचा आवाज ऐकल्यावर (अशी आपली समजूत) भाऊसाहेब आतूनच ललकारी देत, या, या दार उघडेच आहे.

असे होते भाऊसाहेबांचे अतिथी प्रेम. पण खरी गंमत तर पुढेच आहे. आल्या आल्याच आम्ही कोचावर बसण्याअगोदर भाऊसाहेबांचा पहिला प्रश्न - व्हि. के. तुम्ही गेल्या वेळी काय म्हणत होता? - मला नेहमीच बुचकळ्यात टाकत असे. कारण गेल्या खेपेला आम्ही कुलबंधुकडून आलेल्या पत्रांच्या, निरोपांच्या संदर्भात, नवीन पत्ते सापडल्याबाबत, अथवा इतर अनेक गोष्टी बोललेले असू. म्हणून काही तरी उत्तर द्यायचे म्हणून मी म्हणत असे, तुम्ही त्या वाराणसीहून आलेल्या पत्राबद्दल म्हणताय ना? त्यावर डोळ्यावरचा चष्मा टेबलावरक ठेवत भाऊसाहेब - व्हि. के., मुद्यावर या. ही वाराणसी मध्येच कुठून आणलीत? मी चांगल्या बटाटेवड्यांचे स्वप्न पहात होतो आणि तुमचे नांव पुढे करुन ते आजच पूरे होईल या आशेत होतो. पण ही वाराणसी आपल्या आड आली हा

Marathe Pratishthan

आमचा सुखसंवाद चालू असताना मालतीबाई स्वयंपाकघरातून हॉलमध्ये येण्याच्या दरवाजात उभ्या आहेत हे आमच्या लक्षात येत नसे. अहो एवढ्याशा गोष्टीसाठी व्ही. के. ना कशालामधे आणता? त्यांना बटाटेवडे आवडतात हे तुम्ही काल बोलला आहात. त्यांचे पोट जरा रिकामे होऊ द्या. मग दुपारी आपण हात मारु.

मालतीबाईंनी केलेला हा गौप्यस्फोट बाजूला सारत भाऊसाहेब म्हणत, अहो बटाटेवडे दुपारी. आत्ताचे काय? काय, व्ही.के, बरोबर ना? मी काय बोलणार. दोघांकडे आळीपाळीने बघत मी गप्प बसत असे. त्यावर मालतीबाई म्हणत– त्याचीही व्यवस्था झाली आहे. आज चहा नाही. कालचं कोकमं आली आहेत. त्याचे सरबत तयार आहे. बरोबर नेहमी प्रमाणे फरसाणची बशी तयार आहे. तेव्हा तुमचे काम सुरु होऊ द्या. प्रतिष्ठानच्या कामाला अशा रितीने खाण्यापिण्याने सुरवात होऊन त्याचा शेवट संध्याकाळी, कधी कधी तर रात्री देखील, फलाहाराने होत असे!

हे वर्णन फक्त एका दिवसाचे नाही, तर काही वर्षाचे आहे. भाऊसाहेबांनी १७ हजारावर पत्रे स्वहस्ते अत्यंत सुरेख अक्षरात लिहिली. आम्ही काम करताना असंख्य नोंदी तपासून पाहिल्या. अनेक वेळा दुरुस्त्या केल्या. विशेषतः परिशिष्टे बनवतानां मा. ना .मराठे व भाऊसाहेब यांनी जबरदस्त मेहनत घेतली. कारण मी निवृत्तीनंतर एक खाजगी नोकरी पत्करल्यामुळे मला दिवसभर काम करता येत नव्हते. आमचे मुखपत्र त्याकाळी अगदीच प्राथमिक अवस्थेत होते. भाऊसाहेब स्वतःच ते लिहीत असत व त्यानंतर सुरेशभाऊंच्या छापखान्यात त्याची मुद्रणप्रत तयार होत असे.

एकदा कार्यकारिणीच्या सभेत भाऊसाहेब म्हणाले, व्हि. के., हे मुखपत्र, मुखपत्र मला मुखशुद्धी सारखे वाटते, काही चांगले नांव शोधा. त्यावर मी – भाऊसाहेब , नांव शोधायला हरकत नाही. पण तुम्हाला संस्कृतप्रचुर भाषेत हवे का सहज समजेल असे सोपे हवे?

व्हि. के. गोपाळ म्हणा कि गोविन्द म्हणा, कोणते तरी नांव द्या आपण लगेच त्याचा नामकरण सोहळा येथेच उरकू.

मी थोडावेळ विचार करुन म्हटले, भाऊसाहेब, तुम्हाला हितगुज हे नांव कसे वाटते? यावर भाऊसाहेबांच्या ऐवजी सुरेश भाऊंनीच हे तर अगदी समर्पक आहे. चला आत्ताच आपण हे नांव पक्के करुया असे म्हणून शिक्कामोर्तब केलेय मी प्रतिष्ठानमध्ये येण्याचे अगोदर भाऊसाहेब आणि मालतीबाईच मुखपत्राचे सर्व काम करीत असत. म्हणून त्यांची संमती घ्यावी असे मी सुचविले. भाऊसाहेबांनी लगेच टेबलावरील फोनच घरी लावून मालतीबाईंना सांगितले. तेव्हां त्यांनी समंती लगेच दिलीच आणि वर त्या म्हणाल्या, उद्या आपल्याकडे व्ही. के. येतील तेव्हा त्यांना म्हणा, जेवून येऊ नका. नाही तर अजीर्ण होईल. या अशा आपल्या मालतीबाई. प्रतिष्ठानच्या प्रत्येक कामात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. वधूवर सूचक मंडळाचे काम करावे का हा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्यांची उस्फूर्त प्रतिक्रिया लक्षणीय होती.

सुखवस्तू घरातील सुशिक्षित मुलींच्या विवाहाला मदत करण्याच्या ऐवजी आपण सामान्य कुटुंबातील सामान्य मुलींच्या विवाहाला मदत करुन त्यांचे संसार उभारुन दिले तर ते प्रतिष्ठानच्या उद्देशाला धरुन होईल. – अशी होती मालतीबाईंची सामाजिक जाणीव.

हितगुज मध्ये मालतीबाईंनी बरेच साह्य केले. प्रुफे तपासणे, मुद्रणप्रत तयार करणे, लिखाणातील व्याकरण पाहणे, वगैरे कामे त्या हौशीने करीत. एवढेच नव्हे तर सुरुवातीला आम्ही हितगुजच्या अंकाना वेष्टने घालून, त्यावर नांव पत्ते लिहून, ते गठ्ठे पोष्टात नेऊन देत असू. या कामी सुद्धा त्यांची खूप मदत होत असे. खरे म्हणजे मी व भाऊसाहेब अंकांची गाठोडी पोष्टात घेऊन जाण्याचे कामच प्रामुख्याने करीत असू.

यावरुन एक गमतीची गोष्ट आठवते. मालतीबाईंनी माळ्यावरील अडगळ हा लेख हितगुजमध्ये छापण्या अगोदर माझ्या हाती दिला. मी तो वाचला. त्यांचे लिखाण कथा, स्मरणलेखन, आणि लघुनिबंध यांच्या सीमेवर फेरफटका मारणारे होते. तेव्हा कोणत्या साहित्य प्रकारात हे मोडते हे सांगणे कठीण होते. मी हे म्हटल्यावर भाऊसाहेब हसून म्हणतात, अडगळच ती. इतके दिवस माळ्यावर होती, आता तुमच्या हितगुज मध्ये ठेवली, इतकेच! कसली कथा नि कसला निबंध?

Marathe Pratishthan

हा शेरा ऐकून मालतीबाई रागावून मला म्हणाल्या, व्ही. के., तुम्ही संपादक म्हणून नांव घालत असाल तरच मी यापुढे माझे लिखाण देईन. अर्थात मी माझे नाव संपादक म्हणून घातले नाही तरी सुद्धा मालतीबाईंची साहित्यिक मदत चालूच होती.

असे कितीतरी किस्से मालतीबाई आणि भाऊसाहेब यांच्या लाघवी स्वभावाने सांगता येतील. थोडक्यात, मालतीबाई या प्रतिष्ठानला मातृस्थानी होत्या. त्यांनी प्रतिष्ठानच्या कार्यावर व कार्यकर्त्यांवर अलोट प्रेम केले. त्यांच्या साहित्यिक मित्र–मैत्रिणींकडे ते आमच्या छोट्याशा हितगुजची प्रशंसा करीत. एकदा तर त्या म्हणाल्या, किर्लोस्कर समूहाने किर्लोस्कर खबर अशी छोट्या उपक्रमाने सुरुवात करुन किर्लोस्कर, स्त्री, व मनोहर अशी दर्जेदार मासिके निर्माण केली. आपल्या प्रतिष्ठानचा विस्तार झाल्यावर आपले हितगुजसुद्धा अगदी प्रोफेशनल दर्जाचे त्रैमासिकच नव्हे मासिक स्वरुपात देखील आणता येईल.

खांबेट्यांचा फोनवरुन निरोप आल्यावर या सर्व अठवणी माझ्यापुढे फेर धरु लागल्या आणि मनात असा विचार आला की मालतीबाईंना खरीखुरी श्रंद्धांजली वाहायची असेल तर हितगुजचे कार्य वृद्धिंगत करुन मालतीबाईंच्या इच्छेप्रमाणे ते सर्व सामान्य मराठी माणसाला आवडेल अशा मासिक स्परुपात त्याची परिणती करण्यासाठी प्रतिष्ठानच्या कुलबांधवांना झटावे लागेल.

विनायक केशव मराठे, (पृ.२०)
वरळी – मुंबई,
दुरध्वनी ०२२–२४३०३३२९

❑❑❑

# अंतर्नाद

**कोणा एका शांत रम्य वेळी ईश्वराला एकटेपणाची जाण झाली
वाटलं त्याला मी का राहावे एकुले असावे मला संगी साथी भले**

**'एकोऽहं बहुस्याम्' संकल्प मनी निर्मितिची साद आली ध्यानी
निःश्वासातून प्रकटला वेद्संभार नयनरम्य सृष्टीचा आविष्कार**

**सूक्ष्मजीव, पक्षी प्राणी स्वेदज अंडज उद्भिजांची वर्णी
सर्वात शेवटी निर्मिला मनुष्य प्राणी मगच समाधान त्यास बावनखणी**

**त्याबरोबरच प्रकटले दोन शब्द एक होत ॐकार आणि दुसरा अथ
म्हणूनच पहिल्याशिवाय मंत्र नाही आणि दुसऱ्याशिवाय ग्रंथ नाही**

**हे सर्व योग्य आहेत मानवाला पण कसे गुंफावे साऱ्याच रचनेला
प्रश्न हा गहन की हो पडला आद्य पुरुष परमेश्वराला**

**मग वदली प्रकृती तयाला तुझ्या निःश्वासाचा खेळ सगळा
त्याचाच नाद नाही का ध्यानी आला अरे तुझ्याच बा परमेश्वरा !**

**या नादावर डोलवी सगळे जरी प्रत्येकाचे गुज वेगळे
दे प्रत्येक जीवाला वरदान श्वास आणि नादाचा साज छान**

**भ्रमराची भ्रामरी असो असो प्राण्यांचा हुंकार
सागराची खळखळ असो असो धनुष्याचा टणत्कार**

**पक्षांची किलबिल असो असो पानांची सळसळ
या सृष्टीत भरुन राहिला नाद तो अविरत पल**

**मानवाला देवत्व यावे म्हणून ऋषींनी तप केले
योगमार्गाचे वेगवेगळे उलगडले पट सगळे**

**भक्तियोग असो असो ज्ञानयोग कर्मयोग असो असो राजयोग
मार्ग एवढे शोधले पण ते एकट्याचेच सगळे**

**एकाचवेळी अनेकांना लाभ त्यातून कसे मिळावे
शेवटी त्यांच्या ध्यानी आले आसरा घ्यावा त्या नादाचा
एकाच वेळी अनेकांना लाभ देई तो सम्यक साचा**

**म्हणूनच प्रकटला नादयोग सूर आणि ताल यांचा संयोग
हळूच त्यांच्या समन्वयाने भली सम सुद्धा प्रकट जाहली**

**रागांच्या सवे आल्या रागिणी ऋतू-समयाची अवचित वर्णी
गानवृन्दासवे साज नटली नृत्याचीही साथ लाभली**

**मानवच नाही तर प्राणीमात्र या नादाला पूर्ण समर्पित
प्रत्येक जीवाच्या अंतरी वसे विलक्षण हा अंतर्नाद**

**सर्वांना जोडणारा दुवा नादाचा हा अमोल ठेवा
एकाचवेळी आनंदमेवा समाधी लाभ होई सर्वा**

**मनिमनिचा अंतर्नाद जागवू संगीतातच नाही सर्वत्र प्रकटवू
व्यवहारातही त्याचा ठाव घेऊ अंतर्नादाचे सामर्थ्य जाणवू**

**मानवमात्रात हा जर जागला माऊलीचे पसायदान येई फळाला
राष्ट्राच्या उन्नयानाला साथ खरी याचीच कि हो**

**हा जर सर्वत्र जागला भ्रष्टाचाराला नाही थारा
प्रत्येक स्त्री मध्ये सर्वा दर्शन होईल कि हो दुर्गेचे**

**गलिच्छ राजकारण होईल राष्ट्रकारण जनमनाला आनंदाचे क्षण
त्याचे एकमेव उत्कट कारण अंतर्नादाचे जागरण,
अंतर्नादाचे जागरण**

**डॉ. अभिजित फडणीस (मराठे)**

Marathe Pratishthan

# मी हितगुज संपादक : प्राथमिक जुळवाजुळव

**श्री. लक्ष्मण शंकर (पृ. ५२०)**

**हितगुजच्या ५० अंकाची नॉनस्टॉप वाटचाल लक्ष्मणरावांनी केली. मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र हितगुजच्या पडत्या काळात त्यांनी संपादकाची धुरा खांद्यावर घेतली आणि वेळेवर, नियमित हितगुज अंक प्रकाशित होऊ लागला. त्यांचे हे मनोगत - संपादिका**

**'भटो भटो लग्न कर, तर म्हणे तूच हो नवरी' असं काहींस झालं, आणि मी हितगुजचा संपादक झालो.**

मराठे प्रतिष्ठान परिवार पत्रिका म्हणून वहीच्या आकाराच्या ८ पानांचे हस्तलिखित मुखपत्र १९८१ मधे सुरु झाले. ही पृष्ठसंख्या क्रमाक्रमाने ४८ पर्यंत वाढत गेली. 'मुखपत्र' चे नामांतर 'हितगुज' झाले. प्रचलित 'लोगो' स्वीकारला गेला. नोव्हेंबर १९८७ मधील १०व्या अंकापासून छापील स्वरुप हितगुज निघू लागले.

मात्र फेब्रुवारी ९२ मधील १६व्या अंकानंतर पैशांअभावी हितगुज बंद करण्याचा प्रस्ताव ऑक्टोबर १९९३ मधे वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे आला. त्या वेळी मी उत्साहाच्या भरात असा विचार मांडला की मराठे परिवारांतील संपर्काचे माध्यम म्हणून हितगुज चालू राहिलेच पाहिजे आणि तहहयात वर्गणीदार नोंदणी करून ते नियमितपणे प्रसिद्ध करणे शक्य आहे. सभेत सर्वानुमते तत्त्वतः हा विचार मान्य करण्यात आला.

त्यानंतरच्या मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभेला मला खास निमंत्रित म्हणून बोलावण्यात आले आणि मी माझी हितगुज प्रकाशनाबाबतची योजना या सभेत विचारार्थ मांडावी असे सांगण्यात आले. माझ्या योजनेवर साधक –बाधक चर्चा होऊन हितगुज प्रकाशनाची स्वयंपूर्ण योजना मान्य करण्यात आली. ती अशी –

१. प्रतिष्ठानच्या सुमारें ५०० सभासदांकडून रुपये २०० (एकरकमी) तहह्यात वर्गणी घेऊन यापुढे फक्त अशा वर्गणीदारांनाच हितगुज पाठवावे. मराठे प्रतिष्ठानच्या सर्व सभासदांना हितगुज विनामुल्य पाठवण्याची प्रचलित पद्धत बंद करण्यात यावी.

२. हितगुजचे किमान ८ पानांचे ४ त्रैमासिक अंक दरवर्षी मार्च, जून, सप्टेंबर, आणि डिसेंबरच्या आठवड्यांत नियमितपणे प्रसिद्ध करण्यात यावे. ५०० तहह्यात वर्गणीदारांकडून मिळणाऱ्या रु. १ लाख रकमेच्या व्याजातून एवढा खर्च भागेल.

३. जाहिराती व हितगुज निधीसाठी देणाग्यांद्वारे अधिक रक्कम मिळवून पृष्ठसंख्या वाढवावी व अंक अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करावा.

४. आतापर्यंतच्या १६ अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराप्रमाणेच अंकाचे स्वरुप सर्वसाधारपणे असावे.

५. हितगुजसाठी एक सल्लागार समिती असावी. या समितीच्या मार्गदर्शनानुसार हितगुजच्या संपादकांनी संपादन, मुद्रण, प्रकाशन आणि वितरण याबाबतची जबाबदारी पार पाडावी. (अनेकदा हितगुजमधून आवाहन करुनहि कोणीही सभासद आपण होऊन या समितीत काम करण्यासाठी पुढे न आल्यामुळे म.प्र. चे कार्यकारी मंडळ हीच सल्लागार समिती ठरली आणि कार्यकारी मंडळाच्या मार्गदर्शनानुसार हितगुज प्रकाशित होत राहिले.)

मीच संपादक म्हणून काम करावे असे कार्यकारी मंडळाने आग्रहपूर्वक सांगितले आणि मी हि ते मान्य केले. मात्र किमान १०० तहहयात वर्गणीदार झाल्यानंतरच यापुढचा अंक प्रसिद्ध करावा, म्हणजे व्याज व मुद्दल रकमेतून आठ–दहा अंक तरी निश्चित प्रसिद्ध होऊ शकतील हाहि माझा विचार सर्वमान्य झाला. आणि मी हितगुजचा संपादक म्हणून कामाला लागलो.

पहिले लक्ष्य होते महिना–दीड–महिन्यांत १०० वर्गणीदार नोंदवण्याचे. त्यासाठी कुलवृत्ताताचे संपादक भाऊसाहेब (वि.गो.) मराठे यांचेकडील कुळबांधवांच्या यादींतून मुंबईची वेगवेगळी उपनगरे आणि मुंबई जवळील कल्याण, कसारा, अंबरनाथ, बदलापूरपर्यंत येथील कुळबांधवांचा विभागवार याद्या तयार

Marathe Pratishthan

करण्यांत आल्या. गिरगांवपासून पश्चिम रेल्वेवर दहिसरपर्यंत आणि मध्यरेल्वेवरील कल्याण-अंबरनाथ-बदलापूरपर्यंत एकेका ऊपनगरांत-विभागांत २/३, २/३ दिवस जाऊन पत्ते शोधून काढून कुलबांधवांना भेटून त्यांना नवीन योजना समजावून देऊन. वर्गणीदार नोंदणीचा धडककार्यक्रम राबवण्यांत आला. मी १९९१ अखेर नोकरींतून निवृत्त झालो होतो आणि निवृत्तीनंतर पैसा मिळवण्यासाठी कांहीहि काम स्वीकारायचे नाही असे ठरविलेले असल्यामुळे मला या कामासाठी पूर्ण वेळ म्हणजे आठ तास नव्हे, तर १०-१०, १२-१२ तास देणे शक्य झाले.

दादर, विलेपार्ले, बोरीवली, मुलुंड, ठाणे, कल्याण अशा ठिकाणी मराठे बहुसंख्येने असल्यामुळे या केंद्रांवर प्रयत्नांचे केंद्रीकरण करण्यात आले. तसेच पुण्यांतहि कै. आण्णा मराठे, सौ. नीलांबरी मराठे, श्री. अरुणराव मराठे या कार्यकर्त्यांमार्फत प्रयत्न करण्यात आले. मी माझ्या घरी गोव्यांत दहा-बारा दिवसांसाठी गेलो असतां गोव्यांतल्या बहुतेक साऱ्या मराठ्यांना भेटून आलोय गोव्याहून येतांना वाटेत बेळगांवला ५ दिवस व मिरजेला २/३ दिवस राहून मिरज-सांगलींतल्या मराठ्यांनाहि भेटून आलो.

परिणामी १०० वर्गणीदारांचे लक्ष्य गाठून हितगुजचा नवीन योजनेतला पहिला अंक (हितगुज अंक १७) मार्च १९९४ मधे प्रसिद्ध करण्यात आला (पाने १३). तो पूर्वीप्रमाणे मराठे प्रतिष्ठानच्या सर्वच सभासदांना पाठवण्यांत आला आणि या अंकात प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी हितगुज प्रकाशनाच्या स्वयंपूर्ण योजनेचा माहिती देऊन सर्व सभासदांना विनामूल्य पाठवण्याचा हितगुजचा हा शेवटचा अंक असून नाइलाजाने हा निर्णय घ्यावा लागत आहे. याबद्दल क्षमस्व असे सांगून पुढील जूनचा अंक मिळण्यासाठी १५ मे १९९४ पूर्वी तहहयात वर्गणीदार होण्याचे सर्व सभासदांना आवाहन केले. तसेच एप्रिल ९४ मधे सुमारे ५०० सभासदांना अंतर्देशिय पत्रे पाठवून हितगुजचा अपमृत्यू टळावा. आता पालनपोषणाची जबाबदारी आली अशा तऱ्हेने अध्यक्षांनी वर्गणीदार होण्याची विनंती केली.

या आवाहनाचा पाठपुरावा म्हणून पोस्टांतून कार्डे आणून नात्यांतल्या, ओळखीतल्या सुमारे ४०-५० लोकांकडून ठराविक मजकुराची १०, १५, २५, ३०, ४०, अशी यादी करुन सुमारे पाचसहाशे पत्रे निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या लोकांना पाठवून तहह्यात वर्गणीदार होण्याची विनंती पुनः पुन्हा करत करत वर्गणीदार नोंदणीचा धडाका चालूच राहिल. यामधे विशेष नोंद घेण्यासारखा अनुभव- दादरला एका घरी वर्गणीदार होण्याची विनंती करण्यासाठी गेलो असता घरांत भेटल्या एक साठीच्या पुढच्या आजी. त्यांनी आमच्या प्रयत्नांचे स्वरुप ऐकून घेतले आणि म्हणाल्या मीहि तुम्हाला कांही पत्रे लिहून देते. तुम्ही कशाला तसदी घेतां, इतर तरुण मुलें, विद्यार्थी यांचे कडून पुरेशी पत्रे मला लिहून मिळतील असे सांगितले तर ऐकेचनात. म्हणाल्या मलाहि काहींतरी प्रतिष्ठानसाठी करुं द्या ना ! शेवटी त्यांनाहि मी १० कार्डे व मजकूर दिला आणि ५/६ दिवसांनी त्यांचेकडूनहि लिहिलेली कार्डे आणून पत्ते लिहून रवाना केली.

असाच आणखी एक अनुभव - १९ व्या अंकात (सप्टेंबर ९४) आम्ही लिहिले मी वर्गणीदार नसूनहि मला हा अंक कसा आला? असा प्रश्न तुम्हांला पडला असेल. आपल्यासारख्या कांही मान्यवर वाचकांना आम्ही तो मुद्दामच पाठवला आहे. केवळे अनवधानाने आपली वर्गणी पाठवायची राहिली असेल या कल्पनेने ! कारण आपणाला हितगुज हवे असणार असा आम्हाला विश्वास आहे. त्वरित वर्गणी पाठवून आपली विश्वासार्हता सिद्ध कराल अशी खात्री आहे. याला एका कुळबांधवांचे उत्तर आले - वर्गणी पाठवून आपली विश्वासार्हता सिद्ध कराल अशी खात्री आहे असे आवाहन करुन वाचकांना धर्मसंकटांत पाडण्याची कल्पना अभिनव. त्याबद्दल अभिनंदन. माझी वर्गणी पाठवण्याची इच्छा नाही.

या सर्व प्रयत्नांचे फलित म्हणजे मार्च १९९६ अखेर वर्गणीदार संख्या ५०९ म्हणजे प्राथमिक लक्ष्य पूर्ण झाले. पण पुढे प्रयत्न चालूच राहिले आणि वर्गणीदार संख्या १००० च्या पुढे पोंचली.

१७ वा अंक मार्च १९९४ मधे १६ पानांचा नंतरचे २ अंक ८ पानी, त्यानंतर ९ अंक १२ पानी आणि त्यानंतर अंक २८ पासून अंक ६७ पर्यंत (४० अंक) १६ पानी काढले. यामधे काही खास अंक जास्त पानांचेहि होते. या प्रमाणे अंक १७ पासून ६७ पर्यत ५१ अंक नियमितपणे मार्च, जून, सप्टेंबर

Marathe Pratishthan

आणि डिसेंबर मधे १९९४ ते १९९६ सप्टेंबर पर्यंत प्रसिद्ध करण्यात आले. वयोमानानुसार येणाऱ्या वैयक्तिक शारिरिक अक्षमतेमुळे त्यापुढे ही जबाबदारी पेलणे कठीण झाल्यामुळे मी हे काम थांबवले.

संपादक म्हणून अंकातील साहित्याचे स्वरुप इत्यादीबाबत सविस्तर पुढील वेळी.

श्री लक्ष्मण शंकर (पृ. ५२०)
(भूतपूर्व संपादक)
मुलुंड

❑❑❑


**हार्दिक शुभेच्छा!**

**मराठे प्रतिष्ठान हितगुज १०० वा अंक**



**जीवनसाथी सुयोग्य निवडीसाठी**



**प्रथमवर, पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित, आर्मी, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाच्या किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी**

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्या ५**
**संपर्क २४३० ५६०७ शुक्रवार बंद**

**मेधा दामले,**
**इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड, सेनाभवनसमोर,**
**माहिम, मुंबई - ४०० ०१६.**


## बालगोपालांसाठी

## पक्षी-प्राणी विषयक मनोरंजक माहिती

१) चित्ता सिंहासारखी डरकाळी फोडत नाही मांजरासारखा म्याँवु करतो.
२) झेब्र्याच्या पांढऱ्या अंगावर काळे पट्टे असतात. कोणत्याही दोन झेब्र्यांवरील पट्टे एकसारखे नसतात.
३) सरड्याची जीभ त्याच्या शरीराच्या दुप्पट लांब असते.
४) चिंपांझी आरशामध्ये आपला चेहरा ओळखू शकतो. पण माकडाला जमत नाही.
५) पाण्याशिवाय उंदीर उंटापेक्षा जास्त काळ राहू शकतो.
६) सुतारपक्षी एका सेकंदाला २० टोचे लाकडावर मारतो.
७) हिप्पोपोटॅमस मादी पाण्यामध्ये पिल्लाला जन्म देते हा प्राणी माणसापेक्षा जास्त जलद धावू शकतो.
८) एक गाय तिच्या आयुष्यात २ लाख ग्लास दूध देते.
९) ब्लू व्हेल देवमासा हा सर्वात मोठा असून त्याचे जन्मतः वजन ५० टन असतेते पुढे १५० टनापर्यंत वाढते त्याचे हृदय एका मोटरकार इतके मोठे असते आणि त्याची जीभ एका हत्ती इतकी लांब असते. त्याच्या शिट्टीचा आवाज कोणत्याही प्राण्याच्या आवाजापेक्ष मोठ्ठा असतो व तो १८८ डेसिबल्स इतका असतो.
१०) डॉल्फीन झोपतात तेव्हा त्यांचा एक डोळा उघडा असतो.
११) रात्रीच्या वेळी मांजर माणसापेक्षा ६ पट अधिक स्पष्टपणे पाहू शकते.
१२) सिंहीण शिकारीचे काम ९०% पेक्षा जास्ती करते. सिंह ऐतोबासारखा पडून रहातो.

प्रेषक - मोहन मराठे (पृ.३६५)
खार, मुंबई

Marathe Pratishthan

# अदलाबदल

भा. ल. महाबळ

विजय व शुभांगी यांना, प्रेमाचा रस्ता सरळ नसतो, तो वळणा-वळणाचा, वरखाली असतो, शिवाय त्यावर मुंबईतील रस्त्यांप्रमाणे खड्डे व झाकणे नसलेली उघडी मॅनहोल असतात. हे माहीत होतं. त्याचबरोबर आपल्या दोघांचेही वडील सुस्वभावी व प्रेमळ आहेत, त्यामुळे आपल्या प्रेमाचे रुपांतर विवाहात होणार याची त्यांना खात्री होती. सावधगिरी म्हणून या दोघांनी, एकत्र विचार करुन, आपल्या परीनं पावले म्हणजे हात उचलून दोन पत्रेही लिहिली होती.

प्रत्यक्षात वेगळंच घडलं होत. विजय व शुभांगी यांच्या हातात त्यांना निराशेच्या दरीत लोटणारी दोन पत्रे होती. ही पत्रे त्यांनी लिहिलेल्या दोन पत्रांना चपराक मारणारी उत्तरे होती.

एक पत्र होतं, अप्पासाहेबांनी, आपला मुलगा विजय याला लिहिलेल व दुसरं पत्र होतं अप्पासाहेबांनीच, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, श्रीयुत वामनराव पारखे या पूर्ण गावाला आदरणीय अशा पारखेसरांना म्हणजे शुभांगीच्या बाबांना लिहिलेल.

पत्रांमध्ये आणखी एक वेगळेपणा होता, पत्रांत अदलाबदल झाली होती. विजयला लिहिलेलपत्र पारखेसरांच्या घरच्या पत्त्यावर गेलं होत व पारखेसरांना उद्देशून लिहिलेलं पत्र विजयला कॉलेजच्या पत्त्यावर मिळालं होत.

"अप्पासाहेबांनी बहुधा घाईघाईत पत्रे व पाकीटावरचे पत्ते यात गल्लत केली असावी." "आय ॲम सॉरी" शुभांगी उद्‌गारली.

"माझ्या वडिलांनी गल्लत केली, त्यासाठी तू का सॉरी म्हणते आहेस ? पत्रांची अदलाबदल तू थोडीच केली आहेस?" अदलाबदल होऊनही, दोनही पत्रे आपल्यापर्यंत पोचली आहेत. विजयच्या चेहऱ्यावर कष्टी भाव होता.

पारखेसरांनी त्यांना मिळालेल पत्र शुभांगीला दिलं व ते म्हणाले, "शुभांगी, हे पत्र विजयसाठी आहे. चुकुन माझ्या पत्त्यावर आलं आहे. मी ते वाचलं आहे तू समंजस, शहाणी मुलगी आहेस. तू ही हे पत्र वाच व विजयला दे. बाप म्हणून मला तुझा अभिमान आहे. दोघं मिळून हे पत्र वाचा. विवेकबुद्धी जागी ठेवून तू निर्णय घे. हे पत्र चुकून माझ्याकडे आलं हे बरं घडलं. विजयनं एखादे वेळेस हे पत्र तुला दाखवलंही नसत! प्रेम करणं म्हणजे देणं, दुसऱ्याकडून लुबाडून घेणं नाही हे ध्यानी ठेव म्हणजे झालं. देहाच्या सौंदर्यापेक्षा मनाची सुंदरता थोर हे तुझ्यासारख्या देखण्या व निर्धन मुलीनं सतत ध्यानी धरावं देहाच सौंदर्य टीकाऊ नाही."

सत्वशील, विद्याप्रेमी पारखेसरांनी आयुष्यभर मनात असेच सुविचार जोपासले होते. स्वभावला धरुन त्यांनी कन्येला उपदेश केला.

"विजय, अप्पासाहेबांनी तुला लिहिलेल पत्र बाबांनी वाचलं आहे."

"पण मला लिहिलेलं पत्र पारखेसरांच्या पत्त्यावर गेलचं कस ?

"कारण पाकिटावरचा पत्ता माझ्या बाबांचा होता. पोस्टमन पत्रांचा बटवडा करतो ते पाकिटावरचा पत्ता पाहून. पाकिट उघडून आतील पत्र कोणाला लिहिलं आहे हे पोस्टमन वाचत नाही. ते जाऊ दे. पत्रातील मजकूर माझ्या दृष्टीनं महत्वाचा आहे. विजय, मी तुझ्याशी लग्न करणार नाही. तुझी व तुझ्या वडिलांची हानी माझ्या हातून होणार नाही."

"शुभांगी, पण मला माझ्या वडिलांची इस्टेट नकोच आहे. मला त्यांचा कापडाचा धंदाही नको. मला तू हवीस. माझ्यावर विश्वास ठेव, मी माझ्या हिंमतीवर कापडाच वेगळं, छोटं दुकान काढेन. तू माझ्यावर प्रेम केलस ते थोडंच माझ्या वडिलांची श्रीमंती, आमचा कापडाचा धंदा विचारात घेऊन? मीही स्वतंत्रपणे मोठा होईन फक्त मला तू माझ्या बरोबर हवीस."

"विजय, अप्पासाहेबांनी स्पष्टपणे लिहिलं आहे की, पारखेसरांसारख्या निर्धनाच्या शुभांगीशी केवळ तिच्या रुपावर भाळून, तू लग्न करणार असशील तर तुला घर सोडावं लागेल, माझ्या मिळकतीतील एक छदाम ही तुला मिळणार नाही. मी तुला बी.कॉम. करायला उत्तेजन दिलं ही माझी चूकच झाली. मला वाटलं होतं की आपल्या कापडधंद्याला तुझ्या शिक्षणाचा उपयोग होईल! पण तू

Marathe Pratishthan

कॉलेजात जाऊन प्रेम करत बसलास."

"शुभांगी, दर शनिवारी–रविवारी, दिवाळी–नाताळ–मे महिना या सर्व सुट्ट्यात गेली चार वर्षे मी पूर्ण वेळ दुकानातच तर काम करत होतो. घरच्या कापडधंद्याला, बी.कॉम. पेक्षा प्रत्यक्ष अनुभवच उपयोगी आहे हे अप्पांच म्हणणं मला पटलेले आहे. मिलध्ये जाऊन कापड मी निवडत असे, ऑक्ट्राय नाक्यावर जाऊन कापड मी सोडवून आणे, इन्कम टॅक्स–सेल्स टॅक्स – शॉप ॲक्ट खालील सर्व व्यवहार मी सांभाळतो. तुझ्या सौंदर्यावर गुरफटून घेऊन तुझ्याबरोबर मी हिंडत नव्हतो. मला माझी जबाबदारी कळते. मी सतत दुकानाच्या कामात असतो हे अप्पा पाहत होते, तूही जाणतेस. तरी अप्पांनी असं का लिहावं?"

"तुझ्या याच गुणांवर तर मी प्रेम केलं, पेठेतील एकमेव मोठे कापडव्यापारी उंडाळेशेठ यांच्या विजय या मुलाची वडिलोपार्जित संपत्ती पाहून नाही. पण विजय, पत्रातील तुझ्या वडिलांची शेवटची वाक्यं काय आहेत? मुलावर सर्व व्यवसाय सोपवून विठ्ठल–विठ्ठल म्हणत उर्वरित आयुष्य घालवावं ही माझी इच्छा आता पुरी होणार नाही. भोकरेसराफ त्यांच्या मुलीकरता मला विचारत होते. मी शब्द दिला होता. माझी निराशा झाली."

"शुभांगी, पत्रातील अप्पांची भाषा मला खोटी वाटते. अप्पा असे नाहीत. मला न विचारता ते माझ्या लग्नाचा निर्णय घेतीलच कसा?"

"विजय, जीवनात सुसंगतीपेक्षा विसंगतीच जास्त असते! माझा निर्णय पक्का आहे, अखेरचा आहे. मी स्वतः अप्पासाहेबांकडे जाणार. त्यांचा मुलगा त्यांच्या निवृत्तीच्या काळातही त्यांचाच राहील, त्यांची श्रीमंतीही मला नको आहे हे मी त्यांना सांगून मोकळी होणार."

"माझ्या हातातील या दुसऱ्या पत्रावर तुझं काय म्हणणं आहे? हे पत्र मला मिळालं आहे, पण प्रत्यक्षात ते अप्पांनी तुझ्या बाबांना लिहिलेलं आहे.

"ते पत्र वाचून मला धक्का बसला आहे. या विषयावर बाबा माझ्याशी काहीच कसे काय बोलले नाहीत? आश्चर्यच आहे.

"शुभांगी, अप्पांनी या पत्रात तुझ्या वडिलांना धन्यवाद दिले आहेत. तुझे बाबा अप्पांना भेटले, तुझ्या बाबांनी अप्पांना सांगीतलं की, मी शुभांगीशी बोलतो, तिचं मन वळवतो व तिचं लग्न इतरत्र करुन देतो. शुभांगी, पारखेसर नेहमीच दुसऱ्याचा विचार करणारे आहेत. आमच्या अप्पांनी त्यांच्या सरळ स्वभावाचा फायदा घेऊन त्यांना गुंडाळलं असणार.

"बाबांनी माझं मन वळवायची तशी गरजच नाही. तुझ्या वडिलांना दुखवून मी तुझी पत्नी होणारच नाही. त्याच बरोबर मी इतर कोणाशीही विवाह करणार नाही. आपल्या प्रेमाच्या आठवणी मला जन्मभर पुरतील. तू तुझ्या अप्पांच्या आज्ञेप्रमाणे भोकरेसराफांच्या मुलीशी लग्न कर.

"या साऱ्याला मीच जबाबदार आहे, मुळात मी ती दोन पत्रे लिहिली नसती तर ही पुढची दोन पत्रे अप्पांनी लिहिली नसती.

"विजय, पहिली दोन पत्रे लिहिण्यात मीही तुझ्याशी सहमत होते. आपलं प्रेम वेळीच आपल्या वडिलांपर्यंत पोचावं, त्यांनी आपल्या प्रेमविवाहाला मंजूरी द्यावी म्हणूनच आपण तो खटाटोप केला होता. चुकीतील आपली हिस्सेदारी शुभांगीनं स्वीकारली.

"मी दोन पत्र लिहिली होती. एक पत्र होतं अप्पांना, दुसरं पारखेसरांना......" आपण कुठं, काय चुकलो हे विजय तपासून पाहत होता.

"अप्पांना तू लिहिलं होतस, माझं बी.कॉमच शेवटचं वर्ष लवकरच पुरं होईल. मी मनापासून अभ्यास करत आहे, मी बीकॉम होईनच. पण मला खरा आनंद आहे तो मी तुमच्या हाताखाली दुकानदारीचा अनुभव घेतला याचा. गेली चार वर्षे सर्वच्या सर्व सुट्ट्यात तुम्ही मला कापडाचा धंदा शिकवलात! या पत्रात तू अप्पांचे आभार मानले होतेस."

"मी पार्श्वभूमी तयार केली होती. बीकॉमचा निकाल लागल्या लागल्या मी अप्पांना आपल्या, लग्नाबाबत विचारणार होतो. अप्पा, मी बीकॉम केलं, मी स्वतंत्रपणे दुकान सांभाळू शकतो."

"आता प्रेमविवाहाला मान्यता देणं तुम्हांला भागच आहे असा दावा तू करणार होतास. होय ना?" शुभांगीनं दुजोरा दिला.

Marathe Pratishthan

"शुभांगी, अप्पांना लिहिलेल्या पत्रात मी तुझ्यामाझ्या प्रेमाबाबत काहीही लिहिलं नव्हतं. काही गरजच वाटली नव्हती. मात्र पारखेसरांना लिहिलेल्या पत्रांत मी स्पष्टपणे आपल्या प्रेमाबाबत व लग्न करण्याच्या इराद्याबाबत लिहिलं होत.

"त्यामागचा तुझा विचारही तू मला सांगितला होतास. मुलीचे वडील मुलगी पदवीच्या शेवटच्या वर्षात गेली रे गेली की तिच्या विवाहाचा विचार चालू करतात! माझ्या वडिलांनी विचार करण्यात व्यर्थ वेळ दवडू नये अशी तुझी सदिच्छा होती.

"शुभांगी, एवढंच नाही. मला भीती वाटत होती. तुझ रुप आणि वर तुझी पदवी याचा विचार करुन तुला मागणी घातली तर? पारखेसरांनी ती स्वीकारली तर? मला तो धोका पत्करायचा नव्हता."

"तू मला हे बोलला होतास! तुझ्या भीतीची मला गंमत वाटली होती." शुभांगी हसली.

"या पत्रांनंतर पारखेसर माझ्याशी काही बोलतील अशी माझी अपेक्षा होती. पण त्यांनी थेट अप्पांच्याकडं का जावं?" मी माझ्या मुलीची समजूत घालतो. मी तुमच्या विजयशी लग्न करणार नाही हे मी पाहतो. अस तुझे बाबा का म्हणाले?

"विजय, याला कारण आहे. पोस्ट माझ्या घराजवळचं आहे, पत्रे मी टाकते, असं मी म्हणाले, प्रत्यक्षात मी पत्रांची अदलाबदल केली. तू अप्पांना लिहिलेल पत्र मी बाबांच्या लिफाफ्यात व बाबांना उद्देशून असलेलं पत्र तुझ्या अप्पांच्या लिफाफ्यात हा कारभार मी केला."

"काय? पण का?" विजयनं दणदणीत आवाजात, हात नाचवत विचारलं,

"सॉरी, मी मगाशीच सॉरी म्हणाले आहे.

"केव्हा?"

"अप्पासाहेबांनी लिहिलेली पत्र अदलाबदल होऊन आपल्याकडे आली त्यावेळी आय ॲम सॉरी असं मी म्हणाले होते. आठवत? तू त्यावर म्हणालास की माझ्या अप्पांनी गोंधळ केला त्याबद्दल तू सॉरी का म्हणतेस?" ते सॉरी मी केलेल्या पत्रांच्या अदलाबदली करता होतं. शुभांगीनं खाली मान घालून अपराधी स्वरात खुलासा केला.

"ग्रेट! तुझ्या ॲडव्हान्स सॉरीबद्दल थॅंक्स." आता माझ्या ध्यानी आलं. तुझ्या पत्रांच्या या अदलाबदलीमुळं अप्पांना आपलं प्रेमप्रकरण समजल, त्यांनी ताबडतोब पारखेसरांना बोलावून घेतलं. माझा सल्ला न घेता, शुभांगी, तू पत्रांची अदलाबदल का केलीस?"

"त्यामागे विचार होता. आपलं प्रेम यशस्वी व्हावं हाच माझा हेतू होता."

"शहाणे, पत्रांची अदलाबदल करुन काय साधणार होतं? उलट तू प्रश्न बिकट करुन ठेवला आहेस."

"विजय, मी चुकले, मी मान्य करते. पण हेतू काय होता ते सांगते. मला बाबांना कळवायचं होतं की मी निवडलेला वर हा बीकॉम आहे, वरती कष्टाळू आहे, घरचा कापडाचा धंदा आपल्याला चालवायचा आहे अशी जाण असणारा आहे. त्याच बरोबर तुझ्या अप्पांनी तुझा विवाह इतरत्र परस्पर ठरवू नये म्हणून माझ्या बाबांना तू लिहिलेल्या पत्रातील आपलं प्रेम मी तुझ्या अप्पांच्या पर्यंत पोचवलं. माझा विचार चुकीचा नव्हता, पण मला उशीर झाला. तुझ्या अप्पांनी भोकरे सराफांची मुलगी तुझ्यासाठी निवडलेली दिसते आहे."

"आता मला सर्व उलगडलं अप्पांनी साहजिकच सरांना बोलावून घेतलं असणार. शिक्षकाची मुलगी मला सून म्हणून नको असं माझे अप्पा म्हणाले असणार. तुझे सरळ बाबा काय बोलणार?

"का? माझे बाबा बोलले ना! माझ्या मुलीचं मन वळवतो असं बोलले."

"आता काय करायचं?"

"विजय, मी अप्पासाहेबांना भेटते तूही माझ्या बाबांची भेट घे आपण खरं बोलू. मी पत्रांची अदलाबदल केली हा माझा गुन्हा मी अप्पासाहेबांपुढं कबूल करुन टाकणार."

"मी सरांना सांगणार की तुम्ही आम्हा दोघांच्या मागं रहा. मला इस्टेटीची पर्वा नाही. मी स्वतंत्र छोटं कापड दुकान टाकतो, संसार चालवतो."

.... शुभांगी अप्पासाहेबांच्या पुढं निर्धारानं उभी राहिली व आपण केलेली पत्रांची अदलाबदल तिनं खरेपणाने भडाभडा बोलून टाकली. अप्पासाहेबांना मधे मधे काही बोलायचं होतं. पण टी.व्ही. वरचे अँकर इतरांना बोलण्याची संधी न देता स्वतःच बडबडत राहतात

Marathe Pratishthan

त्याप्रमाणे शुभांगीच बोलत राहिली. ती का म्हणून अप्पासाहेबांपुढं गप्प राहील? तिला त्यांची इस्टेट नको होती, तिला त्यांच्यापासून त्यांचा विजय हा मुलगा तोडायचा नव्हता, भोकरेसराफांच्या मुलीच्या अप्पासाहेबांच्या गृहातील प्रवेशात तिला विघ्न आणायचं नव्हतं. निघताना ती म्हणाली, "अप्पासाहेब, मला माफ करा. मी अभ्यासू, कष्टाळू वडिलाच्या आज्ञा पाळणाऱ्या विजयवर प्रेम केलं. कापडाचे श्रीमंत व्यापारी उंडाळे यांच्या मुलावर नाही. माझ्या बाबांनी मला शिकवल आहे की प्रेम करण म्हणजे देणं, लुबाडणं नाही. धंद्यातून निवृत्त झाल्यावर, विठ्ठल-विठ्ठल म्हणत शांतपणे जगण्याची तुमची इच्छा मला माहीत आहे. तुमची इच्छा योग्यच आहे. तुमच्या या इच्छेत मी अडथळा आणणार नाही. तुमच्या श्रीमंतीला शोभणाऱ्या संपन्न भोकरे सराफांच्या मुलीशी विजयनं विवाह करावा याकरता मी विजयचं मन वळवण्याची जरुर खटपट करेन. मला स्वतःसाठी तुमच्याकडून काहीही नको. मला फक्त आशीर्वाद द्या तेवढे मला पुरेसे आहेत."

शुभांगीनं वाकून अप्पासाहेबांना नमस्कार केला व ती डबडबल्या डोळ्यांनी बाहेर पडली. अप्पासाहेबांनीही आपले डोळे पुसले.

विजय पारखेसरांकडे गेला व वाचा हरवून बसला. सरांच्या पुढे आपण काय बोलणार? काही झालं तरी, शुभांगीचे वडील त्यांचे शाळेतील सर होते. तो त्यांच्याकडून गणित व इंग्रजी हे विषय शिकला होता. त्यांच्या आचारविचारांचा इतर सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे विजयवरही पगडा होता. आणि आपण आचार काय केला तर खुद्द सरांच्या मुलीवर प्रेम केलं! एक खरं, भले आपल्याला गणित व इंग्रजी विषयात साठ-सत्तर टक्क्याहून जास्त गुण मिळाले नसतील,पण आपलं शुभांगीवरचं प्रेम शंभर टक्के पुरेपूर होत. विजय म्हणाला, "सर मी अप्पांची सेवा करीन, दुकान उत्तम प्रकारे सांभाळीन. पण मी कदापीही भोकरेसराफांच्या मुलीशी विवाह करणार नाही. शुभांगी पण विवाह न करता माझ्या आठवणींवर जगणार आहे. मी तेच करणार, मीही शुभांगीच्या आठवणींवर जगेन."

दोघे ही प्रेमी असे निर्वाणीने बोलले.

वामनराव पारखेसर तातडीनं उठले व अप्पासाहेबं उंडाळे यांच्या भल्या थोरल्या कापड दुकानात हजर झाले. काही झालं तरी त्यांचा वधूपक्ष होता! वामनराव अजीजीच्या स्वरात म्हणाले, "अप्पासाहेब, तुमचंच म्हणणं बरोबर होतं. शुभांगीची परीक्षा घेण्याचा माझा अट्टाहास चुकीचा होता. दोन्ही पोरांच एकमेकांवर प्रेम आहे तर करु दे त्यांना लग्न असं तुम्ही उदारपणे म्हणाला होता. पण माझाच माझ्या मुलीवर विश्वास नव्हता. तुमची श्रीमंती पाहून शुभांगीनं आपल्या रुपाच्या जाळ्यात विजयला पकडलं तर नाही ना हा संशय माझ्या मनात आला. मला वाटलं की शुभांगीवर संस्कार करण्यात मी कमी पडलो. म्हणून मी तुम्हांला विनंती केली की, शुभांगीशी विवाह केलास तर तुला इस्टेटीतील छदामही मिळणार नाही असं पत्र विजयला लिहा. केवळ माझ्या आग्रहाखातर तुम्ही तसं पत्र लिहून मला दिलंत. माझ्या सांगण्यावरुन शुभांगीच मन वळवतो असे मी म्हणालो, त्याबद्दल माझे आभार मानणारे दुसरं पत्र ही तुम्ही मला लिहून दिलंत."

"वामनराव, तुमची मुलगी शुभांगी म्हणजे माझी सून बावनकशी सोनं आहे. तुम्ही आदर्श शिक्षक आहात. तुमची मुलगी माझी सून होणार हे मला भाग्याचं वाटत होतं. सर, आज शुभांगी मला येऊन भेटली. काय ताडताड, छान बोलत होती! तिला श्रीमंतीचा लोभ नाही. सर, तुमची मुलगी तुम्हाला शोभणारी आहे. आमच्या दुकानात स्त्रियांच्या साड्यांचा विभाग मी उघडणार व तो माझ्या सुनेच्या हवाली करणार. तुमची मुलगी सून म्हणून मला पसंत आहे."

"अप्पासाहेब, तुमचा विजयही पितृभक्त आहे. तुमच्या इस्टेटीसाठी नव्हे तर तुमच्याकरता, तुमच्या इच्छेप्रमाणे, तो शुभांगीशी लग्न करणार नाही. त्यांच बरोबर तो दुसऱ्या कोणत्याही मुलीबरोबर लग्न करणार नाही. तो शुभांगीच्या आठवणीवर जगणार आहे."

"कमाल आहे! तुमची शुभांगी मला असंच म्हणाली. तीही लग्न करणार नाही. तीही विजयच्या प्रेमाच्या आठवणीवर जगणार आहे. सर, मला अपराधी वाटतं तुमच्या आग्रहाला बळी पडून मी उगाच तुमच्या शुभांगीची परीक्षा देण्याच्या मसलतीत सामील झालो. उद्या मला माझ्या सुनेने जाब विचारला तर मी काय उत्तर देऊ? आपण दोघांना

Marathe Prakashan

बोलावू व आपली चूक कबूल करुन टाकू. तुमच्या शुभांगीनं जाताना मला वाकून नमस्कार केला पोरगी नम्र आहे."

"अप्पासाहेब, तुमचा विजय प्रामाणिक आहे. त्याच्या प्रामाणिकपणाचा मी उगाच संशय घेतला. मला ही अपराधी वाटतं आहे. मी पत्रांची अदलाबदल करायला नको होती, विजयवर अविश्वास दाखवायला नको होता."

"थांबा, थांबा पत्रांची अदलाबदल म्हणजे?"

"अप्पासाहेब, मी तुमच्याकडून विजयला छदामही देणार नाही असं पत्र माझ्या मुलीची परीक्षा घेण्याकरता लिहून घेतलं खरं, पण नंतर माझ्या मनात संशय आला की विजयनं ते पत्र शुभांगीला दाखवलंच नाही तर ? दुकान व इस्टेट दोन्ही आपल्याला मिळणार नाही हे शुभांगीला समजलं तर ती आपल्याला नाकारेल या भीतीनं विजयनं पत्र तिच्या पासून दडवल तर? शुभांगीला पत्रातील मजकूर कळायलाच हवा अशी माझी इच्छा होती. म्हणून मी पत्रांची अदलाबदल केली.

"सर, दोन्ही पत्र विजय व शुभांगी यांनी पाहिली, वाचली त्यांनी एकत्रितपणे निर्णय घेतला व दोघंही सर्व परीक्षांत उत्तीर्ण झाले आहेत." अप्पासाहेबांच समाधान त्यांच्या शब्दांतून बाहेर पडलं.

"अप्पासाहेब, मधल्यामधे माझ्यामुळे शुभांगीमुळं तुम्ही खोटे पडणार यांच मला दुःख होतं आहे. आता भोकरेसराफांना तुम्ही कसं तोंड देणार? त्यांना तुम्ही त्यांच्या मुलीसाठी शब्द दिला होता ना?"

"पारखेसर, भोकरेसराफांना दोन मुलगेच आहेत. त्यांना मुलगी नाही. विजय व शुभांगी एकमेकांत किती खोलवर मुरले आहते याचा हा पुरावाच आहे. अभ्यास-दुकान आणि शुभांगीवर प्रेम या पलीकडं आमच्या चिरंजीवांना दुसरं काही दिसलंच नाही. भोकरेसराफांना मुलगीच नाही एवढं विजयला कळायला हवं होतं. आपलं हे गाव तसं फार मोठं नाही. या गावात कापडांच एकमेव मोठं दुकान आहे ते उंडाळेंच व एकमेव माध्यमिक शाळा आहे ती तुमची! विजयला या गावातील तरुण मुलींची माहिती असायला हवी होती."

चकीत होऊन पारखेसर म्हणाले, "अप्पासाहेब, कमाल आहे, भोकरेसराफांना मुलगी नाही हे माझ्या ध्यानी यायला हवं होत! मुलगी असती तर ती विद्यार्थीनी म्हणून आमच्या शाळेत आली नसती का?

"सर, तुम्हांला आणखी एक अदलाबदल समजलेली नाही. तुम्ही शिक्षक आहात, सराफ नाही, तरीही तुमची कन्या शुभांगी हे बावनकशी सोनं, सराफाघरी न जाता, बदलून तुमच्या घरी आलेलं आहे.

**भा.ल.महाबळ**
अ-६०१, साईनाथ अपार्टमेंट,
युनियन बँकेच्या शेजारी,
नवघर टाटा कॉलनी रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१.
फोन (०२२) २१६३१९४०

## भावपूर्ण श्रद्धांजली



**कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे (पृ ७६७) ठाणे**

**पती - श्री. प्रमोद कृष्णा मराठे**
**मुलगी - सोनाली, मुलगा - स्वप्नील आणि परिवार**

Marathe Pratishthan

# सांगली ते लंडन

सौ. जयश्री श्रीराम मराठे (पृ.४३)
पुणे

डबा ऐसपैस, अंगणात खेळताहेत कुंदी आणि मंदी. आजुबाजूला गडबड, गोंधळ चालू होता. लग्नघरात माणसांची गर्दी, वर्दळ होती, पण यांच भान दोघींनाही नव्हतं. एक तास उलटला, कुणीतरी खेकसलं, मंदे, पुरे झालं खेळणं, उद्या लग्न आणि खेळतेस कसली? पुरे झाला अल्लडपणा बाप रे ! उद्या लग्न? म्हणजे खेळ वगैरे सर्व सोडून वेगळ्याच विश्वात पाऊल टाकायचं ! शिक्षण पूर्ण केलं. नोकरी केली आणि बघता बघता ही सोमणांची मंदी लग्न होऊन सौ. जयश्री मराठे झाली आणि पुण्याला पोहोचली सुद्धा (२२ डिसेंबर १९६२)

एकत्र कुटुंब, सोवळ, ओवळं कडक, स्वयंपाक येत नव्हता ब्रह्मांड आठवलं! दोन दिवस रडून घालवले पण आलेल्या परिस्थितीला धैर्यानं तोंड द्यायचं बाळकडू माहेरी मिळालं होतं. त्या जोरावर सर्व निभावून नेलं. वर्षभरातच यांची नेमणूक मुंबईला मंत्रालयात झाली. अर्थातच आम्ही मुंबईला पोहोचलो. तिथे गेल्यावर घरासाठी संघर्ष सुरु झाला उन, पाऊस, कसलाही विचार न करता जागेसाठी भटकत होतो. आर्थिकबळ तुटपुंज, इतरही अनेक अडचणी येत होत्या. शेवटी वसईजवळ बांधकाम चालू असलेल्या चाळीतील दोन खोल्या मिळाल्या. डिपॉझिट होतं रु. १०००/- आणि तेही ताबडतोब भरायचं होतं. मुंबईत लोकल प्रवासात पाकिटं मारतात याची जराही जाण नव्हती. साध्या जाळीच्या पिशवीतून नेलेला आणि देवानेच सुरक्षित ठेवलेला रु. १०००/- चा ठेवा मी लगेच पुढे केला. घर देता कां कुणी घर असं म्हणणारे आम्ही दोन खोल्यांच्या महालात रहायला गेलो. दोन फर्लांगावरुन विहीरीचं पाणी आणायचं मदतीला कोणी नाही. पण तरी ही खूप आनंदात होतो. स्वतःच छप्पर ही सर्वावर मात होती.

पुढे हळुहळू अधिकाधिक चांगल्या जागा आम्ही मिळविल्या गोजिरवाण्या तीन मुलींना सांभाळत मी मुंबई म्युनिसिपल माध्यमिक शाळेत नोकरी केली. बी.ए. बीएड. पर्यंत शिक्षण पूर्ण केलं. चांगल्या जागा मिळत गेल्या तरी त्या भाड्याच्याय ! बांद्राच्या सरकारी वसाहतीत दहा वर्ष राहिलो. अखेर धाडस करुन दहिसरला ओनरशिप फ्लॅट घेतला त्यानंतर मुलींची शिक्षणं, त्यांची प्रगती यात दहा वर्ष कशी निघून गेली कळलचं नाही. मोठी मुलगी चि. उज्वला आता खरच मोठी झालीय असं म्हणता म्हणता एकेदिवशी लग्न होऊन सौ. नेहा आठवले म्हणून सासरी गेली. पुढे सणवार, पहिल्या नातवाचा जन्म, त्यांच बालपण न्याहळत बरेच दिवस सुखासमाधनात गेले. मुंबईत जवळ जवळ २५ वर्ष काढली सुरुवातीला कष्टात नंतर सुखात.

आता आम्हाला पुण्याला परत जाण्याची ओढ लागली. डहाणूकर कॉलनीत छान जागा मिळाली. दोघंनी स्वेच्छा निवृत्ती घेतली आणि मधली २५ वर्षे पुसुन टाकून पुण्याला स्थायिक झालो. नोकरी, धकाधकी संपवून मजेत रहायचं ठरवलं. धाकट्या दोघींची म्हणजे नीलिमा आणि मेघना यांची शिक्षण पूर्ण झाली यथावकाश लग्नं होऊन त्याही आपापल्या घरी सुखाने राहू लागल्याय पुढे नातवंडांच्या बाललीलांत ५,६ वर्षे रमून गेलो.

सांसारिक जबाबदाऱ्या पार पडल्या होत्या आता आम्ही दोघांनी आयुष्यात, राहून गेलेले छंद, आवडी जोपासायच्या आणि आनंदात राहायचं ठरवलं. त्याप्रमाणं मी शास्त्रीय संगीत आणि भजन शिकायला सुरुवात केली. यांनी वृत्तपत्रातून लेखन करायला सुरुवात केली. काशी, रामेश्वर यात्रा केल्या. वेळोवेळी भारतातील विविध ठिकाण पाहिली गेली. कित्येक वर्ष यांच्या मनात एक स्वप्नवत गोष्ट होती ती म्हणजे परदेशगमन, युरोप, अमेरीका या पैकी कशाचंही आकर्षण त्यांना नव्हत फक्त ग्रेट ब्रिटन पहाण्याची अनिवार ओढ होती. ज्या ब्रिटिशांनी एकेकाळी जगावर सत्ता गाजवली, त्यांचा देश पाहण्याची इच्छा मात्र जबरदस्त होती. पण ही इच्छा, हे स्वप्न एका मध्यमवर्गीयाचं! साकार होणार कस?

पण झाल कायं, आमची धाकटी मुलगी मेघना कॉमन वेल्थ स्कॉलरशिप मिळवून पी.एच.डी करणयसाठी इंग्लंडला गेली. तिनं आम्हाला प्रेरणा दिली. त्यानंतर आम्ही सर्व माहिती पत्रके मिळवली, आर्थिक नियोजन केलं आणि मनाचा हिय्या करुन इंग्लंडला जायचंच असा निश्चय केला. संसारातल्या जबाबदाऱ्या पूर्ण झाल्या होत्या तरी सुद्धा म्हतारपणासाठी राखून ठेललेली पुंजी खर्च करायची का? उलट सुलट चर्चा रोज होत होती.

Marathe Pratishthan

अखेर इंग्लंड दौरा करायचा हा केलेला निश्चय अमलांत आणण्याचे आम्ही धाडस करायचे ठरविले.

वेगवेगळ्या ट्रॅव्हल कंपन्यांची माहिती काढली. पुस्तके वाचली, पुण्यातील ट्रॅव्हल कार्पोरेशन ऑफ इंडिया येथिल श्री. नॉर्बर्ट या गृहस्थानी सर्वतोपरी पदत केली, विमान तिकिटे, व्हिसा, हेल्थ इंश्युअरन्स, लंडनमधील हॉटेल बुकींग, फॉरिन करन्सी वगैरे सर्व पूर्ण करायला जवळ जवळ महिना लागला, प्रवासाची सर्व तयारी केली.

अखेर गंगेत घोडं न्हालं! २५ जुलै २००६ ला आमही लंडनवर स्वारी करायला निघालो. रात्री दोन वाजता विमानात प्रवेश केला. पट्टे बांधले आणि द्विधा मनस्थितीत मायभूमीवरुन पाय सुटले. ९।। ते १० तासांचा प्रवास. पहाटे ४।। पाचला खिडकीच्या फटीतून उगवत्या सूर्यनारायणाचं दर्शन घेतलं. मोठं विलोभनीय पण रौद्र दर्शन होतं ते! खिडकी ताबडतोब बंद करण्याची आज्ञा झाली कारण प्रखर सूर्यकिरणांचा डोळ्याला त्रास होईल. म्हणून सकाळी सात वाजता (लंडनची वेळ) शुभ्र ढगांच्या कापसाच्या राशीतून आम्ही खाली उतरायला लागलो आणि साडेसात वाजता हिथ्रो विमानतळावर सुखरुप उपरलो. विमानतळावरील सर्व सोपस्कार पूर्ण करुन दहाच्या सुमारास पूर्वनियोजित हॉटेल केंझिग्टनवर टॅक्सीने पोहोचलो. त्या दिवशी भरपूर विश्रांती घेतली. नंतर दुसऱ्या दिलसापासून सुरु होणाऱ्या कॉसमॉस टूरच्या तयारीला लागलो.

या सहा दिवसांच्या रोजच्य दिवसांच रुटीन असं होत की, पहाटे चार वाजता उठून भराभर सर्व आटपायचं, बॅगा कुलुपं लाऊन बंद करायच्या, बरोबर साडेसहा वाजतां रुमच्या बाहेर ठेवायच्या आणि ब्रेकफास्टला जायचं. यथेच्छ खाणं झाल की, थोडी फळ, बिस्कीटं घेऊन बरोबर पावणे आठला बसमध्ये जाऊन बसायचं. आमच्या आधी आमच्या बॅगा बसमध्ये पोहोचलेल्या असायच्या. वाटेतील ऐतिहासिक निसर्गरम्य ठिकाणं पहात संध्यकाळी नवीन गावी नवीनन हॉटेलमध्ये जायचं आमची टूर गाईड एलिस (एलिझाबेथ) फारच छान होती. गोड आवाजात माहिती सांगायची. वर्डस्‌वर्थच्या कविता साभिनय म्हणून दाखवायची. अशा तऱ्हेने दिवस संपायचा. दुसऱ्या दिवशी ओसंडून वाहणाऱ्या उत्साहात गुड मॉर्निंग म्हणून सर्वांच्या स्वागतासाठी एलिस हजर असायची.

२७ जुलै टुरचा पहिला दिवस, ब्रेकफास्ट करुन आठ वाजता निघालो. प्रथम हॅम्प्टन कोर्ट येथील आठव्या हेन्रीचा भव्य ट्यूडर पॅलेस पाहिला. नंतर सॅलसबरी गावी अश्मयुगीन अवशेष पाहिले. रोमन लोकांच्या वास्तूंचे अवशेषही पाहिले. S. S. Great Britain नावाची प्राचीन बोट नांगरलेली पाहिली. १४९७ साली जॉन कॅबट याच बोटीतून अमेरिकेच्या शोधार्थ निझाला होता. १५व्या शतकातली ही बोट अजुनही दिमाखात उभी आहे. तिाी जपणूक केली आहे. इतिहास जिवंत ठेवलाय.

हे ब्रिटिशांचं वैशिष्ट्य! संध्याकाळी ब्रिस्टॉल शहरी पोहोचलो आणि मुक्काम रमदा प्लाझा हॉटेल मध्ये.

२८ जुलै टूरचा दुसरा दिवस 'कोहिनूर ऑफ इंग्लिश लिटरेचर' असं ज्यांच वर्णन करावं त्या शेक्सपियरच्या स्टॅटफोर्ड या गावी आम्ही निघालो. शेक्सपीयरच्या जन्मस्थळी त्याची नाटकं, त्यावेळी वापरत असलेलं लेखनसाहित्य, झोपण्याची जागा, भांडीकुंडी सगळं उत्तम तऱ्हेची मांडणी करुन ठेवलेलं पहायला मिळालं. भरभरुन माहिती सांगणारे तिुले कार्यकर्ते पाहून मन तृप्त झालं. पुढे जाता जाता लॅगोलन गावी दरवर्षी भरणाऱ्या कविसंमेलनाची तयारी पाहिली. वाटेत सर्वदूर लाकडाचा भरपूर वापर करुन बांधलेली दुमजली, वर चिमणी असेलली कौलारु घरं दिसत होती. हे ब्रिटनचं आणखी एक वैशिष्ट्य! नंतर पोहोचलो लिव्हरपूल शहरात येथील समुद्रातूनच ट्रान्स अटलांटिक बोटी जगभराच्या प्रवासाला निघायच्या रात्रीचा मुक्काम होता ब्रिटानिया ॲदल्फी हॉटेल मध्ये. हॉटले कसलं राजमहालच होता तो! झगमगणारे दिवे, भव्य झुंबरं, उत्तम पोशाखालते तत्पर कर्मचारी अशा राजेशाही थाटात आपण एक रात्र तरी राहणार आहोत हे स्वप्नातही अपेक्षीतं नव्हतं.

२९ जुलै टूरचा तिसरा दिवस, आज आम्हाला जायचं होतं स्कॉटलंडला निसर्गरम्य रस्ता. जवळ जवळ ८,९ तास बस चालली होती. घाटाची वाट हिरवीगार मैदान, मधे मधे तलाव, तलावात विविधरंगी कमळं, हिरव्यागार माळरानावर मुक्तपणे हुंदडणाऱ्या आणि मनसोक्त चरणाऱ्या गाईंचे कळप, गुबगुबीत मेंढ्या डॅफोडिल्स फुलांचे भव्य बगिचे, एका बाजूला कातीवकडे तर दुसरीकडे खोल दऱ्या, सर्वच अप्रतिम आणि अवर्णनीयं! संध्याकाळी आम्ही पोहोचलो निसर्ग सौंदर्याने

Marathe Pratishthan

नटलेल्या एडिंबरा या शहरात. शहरांचा राजपुत्र असं या शहराचं वर्णन केलं जातं. रात्रीचा मुक्काम कॅपिटल हॉटेल एडिंबरा येथे.

३० जुलै टूरचा चौथा दिवस या दिवशी एडिंबरा शहर, न्यू टाऊन हे गांव पाहिलं येथेच अनेक शास्त्रज्ञ, संशोधक, लेखक, धाडसी दर्यावर्दी उदयाला आले. स्कॉटलंडच्या राजाचा भव्य आणि उंच किल्ला पाहिला. ख्रिश्चन कॅथेड्रिल अॅबी पाहिलं. प्राचीन काळापासून हे सगळं उत्तम राखलय, नॉर्दबर लँड हे राष्ट्रीय उद्यान पाहिलं. जुनं यॉर्क शहर पाहिल. हे शहर पाहून मला आमच्या मिरजेतल्या घरांची आठवण आली. बाहेर छोटा दिंडी दरवाजा, आत मोठे आंगण आणि ते ओलांडलकी मुख्य वास्तू. एडिंबरा शहरी आमचा दोन दिवस मुक्काम होता. रात्रीच्या जेवणाची व्यवस्था आपली आपणच करायची होती. ब्रेड बिस्किट खाऊन अगदी कंटाळा आला होता. भटक भटक भटकलो अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविशी जगदीशा, अशी आमची अवस्था झाली होती. 'इंडियन फूड' अशी पाटी दिसली आणि 'आनंद पोटात माझ्या माईना' असं गुणगुणतच आत शिरलो आणि मनसोक्त जेऊन तृप्त झालो. अशा रीतीने टूरचा ५ वा दिवस ३१ जूलैला मुक्काम होता जेडबर्ग गावी आणि हॉटेल होतं मेरियट कोर्ट यार्ड.

आज १ ऑगस्ट टूरचा ६वा दिवस, सकाळी प्रथम लँकेशायर शहर पाहिलं. त्यानंतर पुढे घनदाट जंगल होतं. काऊंट ड्रॅक्युला हे काल्पनिक कथानक याच भागातलं, असं एलिसनं सांगितल. पुढे जाता जाता वाटेत ब्रायटनचा समुद्रकिनारा दिसला. अभावितपणे स्वा. सावरकरांची आठवण झाली मन गहिवरलं. बोटीवरुन मारलेली प्रसिद्ध उडी आठवली. ने मजसी ने परत मातृभूमीला हे प्रसिद्ध काव्य त्यांना इथच स्फुरलं. मन थरारलं, नतमस्तक होऊन हात जोडले. नंतर आम्ही केंब्रिज विद्यापीठ पहायला गेलो. भल्या भल्या भारतीयांनी प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत आपलं शिक्षण पूर्ण केलं, त्या विद्यापीठाला पदस्पर्श करण्याचं भाग्य आम्हाला मिळालं, धन्य झालो. दमून भागून टूरचा शेवटचा दिवस संपवून, एलिसचे मनःपूर्वक आभार मानून आम्ही लंडनला मूळच्या केंझिंग्टन हॉटेलवर आलो.

लंडनमध्ये आम्ही आणखी दोन दिवस राहिलो या दोन दिवसात मॅडम टुसाडचा म्युझियम, प्रसिद्ध बिग बेन घड्याळ , पार्लमेंट हाऊस, लंडनआय, बकिंगहॅम पॅलेस, राणीचे हिरेजडित कोच, चेंज ऑफ गार्ड, ट्रॅफल गार चौक,हाईड पार्क वगैरे ठिकाणे पाहिली. तमसा नदीतून नौकाविहार केला. शिवाय लतादीदींचं गाण जिथं ब्रिटिशांनी ऐकल, तो अल्बर्ट हॉल पाहिला, क्रिकेटची पंढरी ज्याला मानताता, जिथं गावस्करच्या नावानं पॅव्हेलियन आहे ते लॉर्डस् मैदानही डोळे भरुन पाहिलं.

जवळ जवळ सगळा देश पाहून झाला होता. सगळया आठवणी बरोबर घेऊन ४ ऑगस्टला आम्ही मेघनाकडे नॉरीचला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी सर्व नॉरीच शहर पाहिलं. आखीव रेखीव रस्ते, सर्व सुखसोई इथं आहेत. लंडन शहराची छोटी प्रतिकृतीच! छोटी छोटी एकसारखी कौलारु दुमजली घरं, घरासमोर छोटा बगिचा. अशी शहराची रचना आहे. इथल्या वेनसमनदीतून आम्हा चार तासांची सफर केली. वेनसम नदी जिथं सागराला मिळते तो ब्रॉडस् हा अप्रतिम सुंदर भाग पाहिला. जिथ सौ. मेघना शिकत होती ती ईस्ट अँग्लिया युनिव्हरसिटी पाहिली. सौ. मेघनाला इथं येऊन अभ्यास करण्याची संधी मिळाली आणि तिच्याबरोबर आम्हीही भाग्यवान ठरलो.

ग्रेट ब्रिटनमधील विविध शहरं, तेथील वास्तू, प्रेक्षणीय स्थळ, निसर्गरम्य परिसर, ऐतिहासिक किल्ले, विद्यापीठं वगैरे सर्व पाहिलं. प्रत्येक ठिकाणचं सौंदर्य आगळं वेगळं! लोक मात्र सगळीकडचे सारखे टिपटॉप, वक्तशीर, शिस्तप्रिय, स्वच्छता प्रिय, सततोद्योगी, सदैव उत्साही हसतमुख, दुसऱ्यांना मदत करण्यासाठी तत्पर आणि धाडसी.

सौ. मेघनाकडे दिवसभर स्वयंपाकपाणी, फिरणं, गप्पा, पत्ते खेळणं, गाणी म्हणणं यात मजेत एक महिना कसा गेला समजलच नाही. या सगळ्या सुखद आठवणींचा अमोल खजिना बरोबर घेऊन परतीच्या मार्गाला लागलो.

फारसं इंग्रजीचं स्तोम नसलेल्या सांगली गावातली ही सोमणांची मंदी! शहरी स्टायलिश वागणं तिला माहित नव्हतं, अशी साधी मुलगी आज ग्रेट ब्रिटनचा टप्पा पार करुन सुखरुप परत आली.

आता पुन्हा नित्याचा अध्याय सुरु!

सौ. जयश्री श्रीराम मराठे (पृ.४३)
बि. नं. २, फ्लॅट नं. ६, चंद्रलोक नगरी सोसायटी डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०३८ मो. ९६५७९९८८३४

Marathe Pratishthan

# मुलाखतीची मुलाखत

## भाऊ मराठे - श्री सदानंद विष्णू मराठे (पृ. ५०७)



**निवेदक भाऊ मराठे**

मराठे प्रतिष्ठानच्या बैठकांना बऱ्याच वेळा भाऊंची उपस्थिती असते. बैठक चालू असताना भाऊ आले, भाऊंचे आगमन झाले की, एकदम बऱ्याच माणसांनी, हॉल भरल्या सारखा वाटे. त्यांचे सगळेच जण कौतुकमिश्रीत स्वागत करीत. ''या भाऊ! कुठे काय कार्यक्रम चाललाय?'' भाऊंची हसायला सुरुवात आणि हसत हसत बोलायला सुरुवात. काही तरी विनोद, चेष्टा, खिल्ली त्यात असणारच. कोणाची तरी टोपी उडवणारच.

ऊंचापुरा तगडा देह, रुंद छाती, सोनेरी काडीचा चष्मा, डोळ्यातून फेकणारी थेट भेदक नजर, चेहेऱ्यावर विलसत असलेला आत्मविश्वास असे 'भारदस्त' भाऊ बोलायला लागल्यावर आणखीनच रुबाबदार एघाद्या ''हिरो'' सारखे दिसतात टिंगलटवाळी, बहकलेपणा, वाह्यातपणा जरी भाऊंच्या बोलण्यात असला ना तरी त्यात ज्ञानामृत-बोधामृत (सुप्तावस्थेत) किंवा मन अस्वस्थ करणारा धागा सापडतोच त्यांच्या बोलण्यातून काहीतरी नवीन ऊमगल्याचे वाटत राहते.

हितगुजचा ७५ वा अंक भाऊंच्या मुलाखतींनी सजला. भाऊ असंख्य कार्यक्रम करतात, उत्तम, कुशल, निवेदक, म्हणून ते लोकप्रिय ठरले आहेत. भाऊ मराठे तुमचे कोण हो ? असे अनेक जण मला विचारणारे भेटतात. त्यांना मी सांगून टाकते सासरे सा ऽ स ऽ रे (मंजिरी मराठे यांची मी थोरली जाऊ असे विचारणाऱ्यांना सांगत असते.) माझ्या मनात आले भाऊंची मुलाखत घ्यावी आणि ती ही शंभरी ओलांडणाऱ्या अंकासाठी लगेच दूरध्वनी केला, ''माझी बोडक्याची कसली मुलाखत घेता? काय पराक्रम केलाय आम्ही? काय दिवे लावले आहते मोठे? विचार सोडून द्या.'' पण मी ठाम. ''कधी वेळ देता मला? तुमची कार्यक्रमांची ''भाऊ गर्दी ''असते ना? गणेशोत्सव, नवरात्र जवळ आले आहे देश-विदेशात तुमचे दौरे असतात. कधी सवड काढताय?'' ''कळवितो मी'' म्हणून भाऊंनी दूरध्वनी ठेवला. त्यांच्या फोनची वाट पाहून आठ-दहा दिवसांनी पुन्हा फोन केला. भाऊ कधी येऊ? तुम्ही आमच्या घरी येता का? मी येऊ? ''मंगळवारी दि. २६ ऑगस्टला संध्याकाळी ५ वा.'' या. भाऊंनी फोन ठेवला. संपादिकाबाई आपली पाठ सोडत नाहीत म्हणून भाऊंचा निरुपाय झाला असावा.

ठरल्याप्रमाणे दि. २६ आगस्टला दूरध्वनी करुन आठवण करुन दिली मी आणि प्रभाकर दोघे ही येतो. कळविले. त्याप्रमाणे त्यांच्या घरी गेल्यागेल्याच कसला भलताच घाट घातलात तुम्ही ! मी तिकडे लक्ष न देताच प्रश्नावलीचा कागद भाऊंच्या हातात ठेवला. भाऊंनी झरर्कन त्यावरुन नजर फिरविली म्हणाले हे राहू द्या आणि भाऊ दिलखुलास मोकळेपणी गप्पा मारु लागले. ओठात एक पोटात एक असे भाऊ नाहीत हे जाणवले. स्वयंभू कोकणस्थ, धबधब्याप्रमाणे भाऊ सांगत राहिले आम्ही ऐकत राहिलो. प्रवाहाला मधेच अडविण्याचे दुष्कर्म मी केले नाही. ओंजळीत जेवढे आणि जसे घेता आले ती ओंजळ रिती करीत आहे.

भाऊंनी तीन नोकऱ्या केल्या, एम. आर. म्हणून

Marathe Pratishthan

साराभाई केमीकल्स मध्ये, जॉन्सन अ‍ॅन्ड जॉन्सन आणि एशियन पेंटस् मधली नोकरी शेवटची. भाऊ त्यांच्या खुमासदार शैलीत सांगतात, त्याचे असे झाले बायको (सौ. वसुंधरा) हातघाईवर आली म्हणाली नोकरी तरी सोड नाही तर मला तरी सोड. कारण भाऊंची फिरतीची नोकरी. पायाला चाके लागलेली, घरात पाय स्थिर नाही. लहान मुलीकडे आणि संसाराकडे बघायला सवड नाही. बायको चेंबुरला सांडूंकडे अकौटंट म्हणून नोकरी करीत होती. ब्रेकफास्ट करत असतानाच भाऊंनी राजीनामा लिहिला आणि १९९५ साली नोकरीला राम राम ठोकला तो कायमचा. स्वतःचा व्यवसाय रंग लावण्याचा तो सुरु केला. १९८९ मधे साधु वासवानी यांचं १४ लाखांच मोठ काम रंग लावण्याच मिळालं. त्यानंतर हिंदुस्थान लिव्हर, ग्लॅस्को (ठाणे) आडवी, उभी पेंट केली, तुम्ही राहता तिथ रॉयल इंटस्ट्रीयल इस्टेट पेंट केली, कितीतरी कामे केली भाऊ सांगत राहतात.

मुलाखत घेऊ शकतो ही जाणीव पहिल्यांदा कधी झाली आणि कशी ? विचारल्यावर भाऊ म्हणाले काही नाही अपघाताने कार्यक्रमाकडे वळलो. डोंबीवलीचा विनायक जोशी म्हणाला ''पावसाची गाणी'' कार्यक्रम बसवतोय. निवेदन तुम्ही करा. ''वेडा का खुळा'' भाऊंनी विचारले रंगवायचं काय करु? लोकांसमोर बोलण्याचा अनुभव तरी आहे का? जन्मजात आगावूपणा माझ्या स्वभावात भिनलेला पण विनायक जोशीनी भाऊंचेकाहीही ऐकले नाही आणि भाऊंच्या शब्दात सांगायचे तर लिटररी घोड्यावर घातला. १९९७ सालची ही गोष्ट. ''सरीवर सरी'' हा पहिला कार्यक्रम मुलुंडच्या सु.ल.गद्रे सभागृहात झाला. तो प्रंचड लोकप्रिय झाला इतका की त्याचे १९० प्रयोग केले.

या कार्यक्रमाच्या आधीची गोष्ट भाऊंना आठवली म्हणाले तेव्हा माझी आई हयात होती. माहेर पुण्याचे पेशव्यांचे रास्ते. खूप श्रीमंत होती. ती गाणारी होती. विनायकराव पटवर्धनांची शिष्या. तिने विचारले पावसाची गाणी बसवताय मग ''पंचमीचा सण आला डोळे माझे ओले हे'' गाणे घ्या त्यात. आईने सुचविले आणि ते गाणे घेतले. त्या गाण्याला वन्समोअर हमखास मिळायचा आई बुद्धिमान, चौकस, एकपाठी, अफाट वाचन, बहुश्रृत अशी होती. तिने मला बालपणी परवचा, संस्कृत, पाठांतर, उच्चारणाचे चांगले संस्कार केले.

'सरीवर सरी' चा तिसरा प्रयोग वरळीच्या नेहरु सेंटर बेसमेंट हॉल मध्ये केला. तेव्हा नेहरु सेंटरचे डायरेक्टर कमलाकर सोनटक्के होते. भाऊंच्या निवेदनाने ते फारच प्रभावित झाले. कार्यक्रमानंतर भाऊंना त्यांनी शाबासकी दिली. त्यांचे कौतुक करताना म्हणाले तुम्ही फार छान जमवलय आणि विचारले तुम्ही काय करता? ''गावच्या उचापत्या करतो.'' भाऊंनी उत्तर दिले. त्यांचा हा वाह्यातपणा पाहून तेही भाऊंसारखे खो खो हसायला लागले. भाऊंचे तत्वज्ञान लोकांना हसविण्याचे. लोक पैसे व वेळ खर्च करुन कार्यक्रमाला येतात. त्यांना आधीच टेंशन ताण तणाव, काळज्या, चिंता, असतात मग निदान कार्यक्रमात तरी त्यांना हसायला लावून थोडा वेळ तरी काळज्या विसरायला लावले पाहिजे. दुसऱ्याला आनंद देता आला पाहिजे. म्हणून मी स्वतः आनंदी, हसत राहतो, उगाच गंभीर, सुतकी चेहरा केलेला मला आवडतच नाही.

अशाच एका कार्यक्रमाला श्रीधर फडके आला. त्याला आवडले त्यांनी बोलावले. एकदा शिवाजीपार्कला गीतरामायणाचा भव्य कार्यक्रम होता. विनोद तावडे पुरस्कृत होता. संजय ऊपाध्ये निवेदन करणार होता. आदल्या रात्री त्याचा फोन, ''भाऊ लोचा झाला मुलगी आजारी, हॉस्पीटलात आहे. मी कार्यक्रम कसा करणार. तू निभावून ने.'' भाऊ म्हणाले ''मी पहाटे चारला ऊठलो, कार्यक्रमाची तयारी केली. रविंद्र साठे, अनुराधा पौडवाल, सुरेश वाडकर इ. नामवंत गायक मंडळी होती. आयत्यावेळी तयारी करुनही कार्यक्रम ऊत्तम झाला. प्रत्येक कार्यक्रमाची फ्रिक्वेन्सी वेगळी असते. आपल्यापेक्षा हुशार ऑडीअन्स असतो. पुड्या सोडून चालत नाही. अभ्यास करुन बोलावं लागतं. कुसुमाग्रजांनी म्हटले आहे.

अभ्यासावाचून भाषण करणे । शस्त्रावाचून समरी जाणे । वा सुरावाचूनि गाणे । हे शक्य कुणाच्या बाला?

**वाचन वेडा**

भाऊंचे वाचन अफाट आहे. भाऊ वाचन वेडा आहेत. आईला वाचनाची हौस, पुस्तके विकत घेऊन ती वाचायची, पुस्तक समोर असेल तर ऊघडेल असे ती म्हणायची तिची पुष्कळ पुस्तके जमली. वयपरत्वे पुस्तके मेंटन ठेवणे कठीण जाऊ लागले मग मुंबई मराठी ग्रंथसग्रहालयाला भेट दिली. माझ्यावरही तोच वाचनाचा संस्कार आईकडून झिरपत आलाय. मी ही माझ्या आवडीची पुस्तके चिक्कार जमवितो, वाचतो, शिवाजी

Marathe Pratishthan

पार्कच्या कट्ट्यावर आमची मित्रमंडळी जमतात. चांगल्या वाचलेल्या पुस्तकावर आणि न आवडणाऱ्या पुस्तकावरही आमची चर्चा होते. आताही विजया मेहतांचे 'झिम्मा' आत्मचरित्र वाचतो आहे.

**भाऊचा धक्का**

भाऊचा धक्का हा भाऊंचा एकट्याचा कार्यक्रम तीन तास भाऊंचा धबधबा कोसळत राहतो.

भाऊचा धक्का याचे पुष्कळ प्रयोग झाले. भाऊचा धक्का हे नांव कस सुचलं? त्यावर भाऊ म्हणाले आमच्या घरी माझा एक अमेरिकन मित्र आला होता. गप्पा मारत असताना माझी लहान मुलगी पटकन माझ्या मांडीवर येऊन बसली. अमेरीकन मित्राने विचारले ही कोण? आतून बायको म्हणाली. काही नाही भाऊने मारलेला धक्का आहे हा भाऊचा धक्का – बायको वसुंधरा ही विनोदी स्वभावाची होती. सुसंवादक भाऊ मराठे घरात आहेत का? असा फो न आल्यावर ती, ''अहो सुसंवादक, तुमची सिलिंग फॅन बोलते फोन घ्या. बाहेर सुसंवाद, घरी विसंवाद'' असे गमतीने म्हणायची माझ्या मुलीचा जन्म दुपारी झाला म्हणून आसावरी नाव ठेवले.

बायको म्हणायची शब्द विरुन जातात तेव्हा तुम्ही लिहा म्हणून पु. ल. देशपांडे यांच्या १) तुझिया जातीचा मिळो आम्हा कोणी २) गाठोडे ३) भावबंध ४) जीवन त्यांना कळले हो ५) पाचामुखी या पुस्तकांचे उत्तम संकलन भाऊंनी केले आहे. कुसुमाग्रजांवर सौदर्याचे ऊपासक दुसरा खंड प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

**सुंदर हस्ताक्षर**

भाऊंचे हस्ताक्षर सुंदर आहे. मराठे प्रतिष्ठानच्या स्पर्धेत त्यांना सुंदर हस्ताक्षरांचे पारितोषिक मिळाले आहे. त्याचा नमुना 'हितगुज' मधे छापला होता. भाऊ बालमोहन विद्यामंदिराचे विद्यार्थी तेथे रावले शिक्षक होते. त्यांनी भाऊंच्या अक्षरांवर संस्कार केला. बोरु ते कित्ते गिरवायला लावले. शाळेत फळ्यावर खडूने सुविचार रोज भाऊ लिहित असत, रावले मास्तरांविषयी भाऊंच्या मनात कृतज्ञता आहे. सुंदर हस्ताक्षर काढायला लावणारे रावले सर त्यांना गुरुस्थानी आहेत म्हणूनच वंदनीय आहेत.

**उत्तम पाठांतर**

भाऊ म्हणतात उत्तम पाठांतर खिशातल्या चिल्लर सारखं असतं केव्हाही दाणकन वापराव. निवेदन करताना त्याचा उपयोग होतो बालपणी आईने पुरुषसूक्त, हनुमान जानवे स्त्रोत्र, भगवत्गीता, रामरक्षा पाठ करुन शिकविले. त्याचा उपयोग कसा झाला हे सांगताना एक आठवण सांगितली प्रसंग सांगितला. गुरुवायूर येथे भाऊ कामानिमित्त गेले होते सकाळी मंदिरात दर्शनाला गेले थेट गाभाऱ्यात तेथला पुजारी नंबुद्री तो संतापला कारण सोवळे कडक – त्याच्या भाषेत मग भाऊंना कळावे म्हणून इंग्रजीत रागावून बोलू लागला. थेट गाभाऱ्यात कसा शिरलास? कोणाच्या परवानगीने? भाऊ म्हणाले स्नान करुन , शुचिर्भूत होऊन मी देवदर्शन घ्यायला आलो आहे, मी ब्राह्मण आहे त्यात माझे काय चुकले? मग म्हणाला जानवे दाखव. भाऊंनी गळ्यातले जानवे दाखविले आणि म्हणाले, ऐक आता मी काय म्हणतोय ते आणि पुरुषसुक्त म्हणायला सुरवात केली. संस्कृत भाषेतील स्पष्ट उच्चार, म्हणण्याची शैली तो नंबुद्री चकीतच झाला आणि भारावून गेला. आणि त्याने भाऊंना देवाचा प्रसाद म्हणून आसोला नारळ दिला. सिल्कचं उपरण देऊन भाऊंचा सन्मान केला. रागावल्याबद्दल भाऊंची क्षमा मागितली.

**मोठ्या व्यक्तींच्या संपर्कात**

आचार्य अत्रे, पु.ल.देशपांडे ,राम शेवाळकर, कवि ग्रेस, कुसुमाग्रज, सी. रामचंद्र, व. पु. काळे, पु. भा. भावे, शंकर वैद्य, मंगेश पाडगावकर अनेक मान्यवर साहित्यिकांच्या संपर्कात येण्याचे भाग्य भाऊंना लाभले. सी. रामचंद्र म्हणजे अण्णा चितळकर यांच्या घरी विख्यात कलाकार अब्दुल सतारिये यायचे, भाऊंना ''तू गाना सीख'' असे म्हणायचे नाशिकला कुसुमाग्रजांच्या बंगल्यात भाऊंनी कुसुमाग्रजांना काही कविता गाऊन दाखवल्या कुसुमाग्रजांनी ''हुषार आहेस,'' म्हणून पाठ थोपटली आणि कवितांची सीडी तू बनवून घ्यायची आहे म्हणून सांगितले. भाऊ म्हणाले इट वाज सचं ए गोल्डन चान्स कुसुमाग्रजांनी हे सांगणे हा फार मोठा बहुमान होता. पण कुसुमाग्रजांच्या अचानक जाण्याने तो योग हुकला. भाऊंना याचे वाईट वाटते.

**रंगाऱ्या, स्वच्छ पाणी पिऊ या**

डोंबिवलीत भाषा प्रभु पु. भा. भावे राहात होते तेव्हा त्यांचे घर रंगविण्याचे काम केले. काम संपत आले तेव्हा भावे म्हणाले चल रंगाऱ्या स्वच्छ पाणी पिऊ या आणि पेयपान करायला बसले. गप्पांच्या ओघात म्हणाले भाऊ, तीन पुरुषोत्तम महाराष्ट्रात कर्तृत्ववान, नावाजलेले आहेत. पु. ग. सहस्रबुद्धे, विचारवंत अभ्यासक, पु. ल. देशपांडे नाटककार-अष्टपैलू व्यक्तीमत्व, मी कथाकार,



Marathe Pratishthan



**कविवर्य मंगेश पाडगावकराची मुलाखत घेताना भाऊ मराठे**

पुरस्कार रु. २००० चा भाऊंना मिळाला, कुडाळकर ब्राह्मण ज्ञाती संस्थेद्वारा जीवन गौरव ट्रॉफी मिळाली. बडोदे येथे त्यांचा सत्कार झाला आणि मानपत्र मिळाले. त्या मानपत्राचा नमुना देत आहे.

विख्यात संगीतकार, कवी, गीतरचनाकार, गायक श्री. यशवंत देव यांच्या वाढदिवसांच्या कार्यक्रमात श्री. भाऊ मराठे यांनी निवेदन केले. त्यावेळी यशवंत देव यांनी भाऊ मराठेंवर उस्फूर्त कविता केली. हितगुजच्या वाचकांसाठी ती प्रकाशित करीत आहे.

**रसीकांची ही भाऊगर्दी त्यातवेगळे भाऊ**
**त्यांच्या मार्मिक संवादामध्ये चला रंगूनी जाऊ**
**सर्वकलाकारांशी भाऊ सुरेख जुळवी मेळ।**
**कंटाळा कधी येतच नाही असा रंगला खेळ**
**कुशाग्र बुद्धी सवे निरीक्षण तरी बोलणे गोड।**
**भाऊंच्या प्रेमळ धक्क्याला नाही जगात तोड ।**
**त्यांच्या स्मरणांजली असती विविध किश्श्यांचे साठे ।**
**नाही कसला ताठा यांचे नाव जरी मराठे ।।**

साहित्यीक, हिंदुत्वनिष्ठ, सावरकरभक्त पण दुदैव म्हणजे तिघांनाही मुल नाही, नाव पुरुषोत्तम ! आम्ही फक्त नावापुरतेच पुरुषोत्तम!... भाव्यांचे हे शब्द ऐकले आणि रम घशाखाली उतरेना कसली प्रचंड वेदना ते बोलून गेले. भाऊनी आठवण सांगितली पु. ल. देशपांडे म्हणायचे कोटी केली की दाढी केल्यावर स्वच्छ वाटतं तसं वाटल पाहिजे.

**आम्हाला सुद्धा सुख हवं असत**

चिराबाजारला (मुंबई) भाऊंचा कार्यक्रम होता मोठ्या संख्येने त्या कार्यक्रमाला हिजडे आले होते. मन लावून कार्यक्रम ऐकत होते. आनंद घेत होते एक चिट्ठी आली या सुखांनो या गाण्याची फर्माईश ऐका हिजड्याने केली होती. अम्हाला सुद्धा सुख हवं असत. अस लिहिल होत.

दुबईला विश्वसंमेलन झाले. कविवर्य मंगेश पाडगांवकर अध्यक्ष होते. भाऊंचा कार्यक्रम तेथे लोकप्रिय झाला. मग अबूधाबी, इस्त्रायल, येथेही कार्यक्रम झाले. सहा दिवस चारी बाजूने वाळवंट असलेला प्रदेश बघितला भाऊ सांगतात.

**पुरस्कार सन्मान**

भाऊंचे असंख्य कार्यक्रम झाले, आजही होत आहेत, त्यांची मोजदाद करत बसण्याची गरज भाऊंना वाटत नाही. तेवढा वेळही त्याच्यापाशी नाही भाऊंचे सत्कार कार्यक्रम बहुमानाने केले जातात. त्यांना पुरस्कारही पुष्कळ मिळाले आहेत. त्याच्या घरातील एक मोठे प्रशस्त दालन भाऊंना मिळालेल्या पुरस्कारांनी स्मृतीचिन्हांनी, भेट-वस्तूंनी सजलेले आहे. प्रकाशचित्रे, फोटोंनी भरलेले आहे, पाहतानाच दमून जायला होते.

मालगुंड येथे कवि केशवसुतांचे स्मारक आहे. तेथील कोकण मराठी साहित्य परिषदेचे (कोमसाप) ग्रंथमित्र

**मराठे प्रतिष्ठानसाठी भाऊंचे योगदान**

मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ कै. सुरेशभाऊ होते तेव्हापासून भाऊ प्रतिष्ठानमध्ये येत आहेत हितगुज चे भूतपूर्व संपादक लक्ष्मणराव मराठे भाऊंच्या घरी आले आणि त्यांना हितगुजचे वर्गणीदार करुन घेतले. हितगुजच्या अमृत महोत्सवी ७५ व्या अंकात भाऊंनी अनेक मुलाखती घेतल्या विज्ञापने ही पुष्कळ आणली. मराठे संमेलनांत भाऊंची हजेरी असतेच. मराठे प्रतिष्ठान चे कार्यक्रम यशस्वी करण्यात भाऊंचा सिंहाचा वाटा असतो. तन-मन-धन एकेक करुन भाऊ कार्यक्रम करतात. त्यामुळे सर्व मराठे परिवाराच्या मनात, समस्त कुलबांधवांच्या मनात भाऊंच्या प्रती कृतज्ञता दाटून आली आहे. ती मुलाखत रुपाने प्रकट झाली आणि वाहू लागली इतकेच मी निमित्तमात्र. भाऊंना मिळालेल्या मानपत्राने मुलाखतीचा समारोप करीत आहे.

मुलाखतीसाठी भाऊंनी एवढा वेळ दिला पण भाऊंना आभार मानलेले रुचणार नाही म्हणून त्यांचे आभार मानले नाहीत पण त्यांच्या जिन्याच्या पायऱ्या ऊतरताना मनाला सारखी रुखरुख लागत होती, ती ही की, आज जर वसुंधरा वहिनी असत्या तर भाऊंबद्दल त्या भरभरुन बोलल्या असत्या. अनेक अज्ञात पैलूंची दालने त्यांनी खुली केली असती.

Marathe Pratishthan

# मानपत्र

## ।। भाऊ मराठे ।।

काय काय म्हणून लिहू?

समस्त मराठे कुलबांधवांचे भाऊ, तुम्हाला हार्दिक अभिवादन।

भाऊ, आपण आपल्या अलौकिक व्यक्तीमत्वाद्वारे जनमानसांत
सुसंवाद साधत आहात तो विलक्षण आहे.

निवेदन म्हणजे केवळ सरधोपट शब्दांनी एकाद्या विषयाची रुक्ष
ओळख करुन देणे नसून, वैशिष्ट्यपूर्ण शब्दचातुर्याने त्या त्या
विषयातील बारकाव्यांची अचूकता प्रभावीपणे सादर करुन तो विषय
जनसामान्यांना सहज आकलन होईल हे आपण आपल्या
समृद्ध भाषा शैलीने सिद्ध करुन दाखवित आहात.

उत्तम व्यक्तिमत्व, कुशाग्र बुद्धिमत्ता, भाषेवरील प्रभुत्व, साहित्याची
जाण, भारदस्त आवाज, सुसंवादातील नेमकेपण,
विनोदाची अचूकता - काय काय लिहू?

या सर्व गुणांचे अद्‌भुत रसायन म्हणजे तुम्ही आणि तुम्हीच भाऊ.....

कारण......

झेपावणाऱ्या पंखांना क्षितीज नसते......

त्यांना फक्त झेपेच्या कवेत मावणारे आकाश असते..

नैसर्गिक बदलांना यशस्वीपणे तोंड देत उत्तुंग भरारी घेणाऱ्या आपणांस
मराठे प्रतिष्ठानच्या हार्दिक शुभेच्छा...

जीवेत् शरद शतम् ।

Marathe Pratishthan

# EUROPEAN REMINISCENCES

श्री. रमाकांत माधव विद्वांस(पृ.६२३)

Between 1977 and 1983, I had occasion to travel abroad over a dozen times. All these trips were for business. Before each of my trip abroad, Shubha - my wife, would pour over tourism literature and brief me about interesting site seeing locations. Government of India was hard up for foreign exchange and all foreign trips had to be cleared by the Reserve Bank of India with limited release of Foreign Exchange. Except week-ends, there was no time for tourism.

In 1983, I and Shubha decided to take an extensive tour of Europe. I was 47 years old and Shubha 43 years old. That was the age when we could undergo the rigors of an extensive tour. We zeroed in on a 24 day tour organized by TCI - Raja Travels that covered France, Switzerland, Italy, Austria, Germany, Holland and that U.K. Our friends – Vinay and Vandana Patwardhan also agreed to join us.

In conducted tours you have to follow the preset itinerary and cannot stay at a place longer, even if you like the place. However, the biggest advantage of conducted tours is that you are transported from hotel to hotel with least amount of baggage handling and avoiding hassles of local travelling between local bus depots or railway stations and hotels. To cover some additional tourist destinations, we and Patwardhans had planned to leave the tour at London and spend one more week in Europe visiting Budapest, Vienna, Zurich and Heidelberg, before returning to India.

Our group was let by Mrs. Rani Ratil and a representative from TCI. The group comprised of 11 families, one old lady and one young boy. Most of them were travelling out of India for the first time. In this article, I am not writing about site-seeing during the trip but about many amusing incidents.

We boarded an Air India Jumbo night Flight for Paris. A friend who was a Senior Flight Dispatch Manager had introduced me and Shubha to the In-flight Supervisor [IFS]. After our flight leveled off, the IFS requested us to shift to Business Class. Since we were with the tour group, we agreed to briefly visit the business class cabin for a chat. While I was having a martini, I told the IFS that Shubha would like to go back to our seats as movie was to start. He told us to take it easy as he who would start the movie later. As usual, I had become friendly with the cabin crew. The flight was via Rome. In the last part of the flight, the crew invited me to the galley to taste some chilled French wine. Shubha was carrying a bag full of Indian snacks. I offered it to the crew and in no time the bag was empty. Later Shubha woke up and came looking for me and found me enjoying my drink with the crew. They thanked Shubha for the snacks and returned her bag full of dry fruit etc. Shubha expressed that this was why I never got bored of long flights.

Our first halt was at Paris for three nights. A tourist coach had come to pick us up from the Airport and the coach was to take us all through Europe. We checked in Hotel Brochant La Tour. It was a tourist hotel. In the bath room, the wash basin was fitted with a telephone shower which could be pulled to the bath tub. May of our friends failed to notice this. At the breakfast table, our friends complained that they had difficult in taking a bath as there was no water tap, bucket and tumbler and they had to bathe drawing water from the basin tap and a glass. I explained to them about the extendable telephone shower and I told them that the tourist hotels we were to stay in, were all first class category and would definitely have all basic amenities and that they will have to be a little innovative.

Raja Travels Trip Rules did not permit members to drink at the common dining table and those wishing to have a drink were expected to take a separate table. At our first dinner, we and Patwardhans took a separate table as Shubha and Vandana were also interested in testing good European wines. Group members asked

Marathe Pratishthan

us why and we told them the reason. They said that they would also like to join us and very soon, except a few ladies all had taken separate tables. Since we were in majority, Mrs. Patil announced suspension of the rule for our tour and requested all of us to drink like the Europeans do. She did not have to repent as all of us restricted ourselves to tasting good European wines.

Our next halt was Geneva in Switzerland for one night. After checking into the hotel, we decided to walk down to the famous Geneva Fountain. On our way, there were many shops displaying watches. Ladies were under the impressions that watches in Switzerland are quite cheap. I decided to pull a fast one. In the first shop a few watches were displayed on hung cravats. I told them that in Switzerland silk was very expensive and the watches were free with the cravats. Since I was known to have widely travelled they believed in me, though Shubha understood my prank but kept quiet. A few shops further down, watches were displayed on a board. I tried to avoid the window but Shubha asked me whether the watches were free with the board or the other way round. I burst out laughing and Shubha told them that I was pulling their legs.

When we returned to the hotel for dinner, we found a notice on the board requesting Indian Guests to keep their rooms clean and avoid payment of penalty. I showed it to Mr. Patwardhan who is an Advocate. We told the hotel manager that the notice could have been for all the guests but since it mentioned Indian Guests it amounted to racial discrimination. The notice was changed immediately. However, later Mrs. Patil told us that their previous batch was responsible for it. A couple of Indian bachelors had managed to cook chicken in their room using a stove and utensils they had brought and had spoiled the carpet and made the room filthy.

Next morning was a tour of Geneva. We left our hotel with baggage and the baggage was in the coach while we went for site seeing and had lunch. In those days, fried items including French fries were normally fat fried. I urged our vegetarian friends to be particular to order oil fried items. [These days most fries are cooked in vegetable oil]. By evening we checked into a hotel Chamonix. This convenience of hotel to hotel transfer and site seeing with baggage in the coach becomes available only in a conducted tour.

A few days later we had a couple of night's stopover in Rome. At breakfast, I told the group that it was great to see the film 'Roman Holiday' on TV last night. Mr. Patwardhan took the lead and expressed that Audrey Hepburn was great. For a while the atmosphere became a bit tense and our friends expressed that their rooms did not have a TV. After a while Shubha told them that it was just a joke as our room also did not have a TV.

The next day was a free rest day. At my request, our coach operator agreed to take us to Naples for a visit to Capri and the Blue Grotto on extra payment.

The Blue Grotto (Italian: Grotta Azzurra) is a natural sea cave on the coast of the island of Capri, southern Italy. The sea cave, is 60 meters long and 25 meters wide. Entrance to the cave - the cave mouth is two meters wide but only roughly a meter high. To enter the cave, visitors have to board small rowboats which transport a maximum of four passengers. The skipper will ask you to lie back along the bottom of the boat while he himself ducks and guides the boat through the opening using a metal chain attached to the cave walls.

Sunlight, passing through an underwater cavity and refracting through the seawater, creates a blue reflection that illuminates the cavern with a brilliant blue or emerald light. A visitor gets a feeling that the light is coming up from underneath and that the water in the cave is more light-filled than the air. A visitor who places a hand in the water can see it "glow" eerily in this light.

One elderly couple whose trip had been sponsored by their daughter, expressed their inability to participate as it meant extra expenses. We all forced them to join us at no cost. Visit to Blue Grotto was not in the itinerary but the place was amazing and every one thanked me profusely for the visit. Blue Grotto came on the itinerary thereafter.

Marathe Pratishthan

Another elderly couple from our group was to travel to the U. S. after our tour. The lady had a craze for shopping and her husband showed no interest. The lady had marked that I had an eye for locating and picking up exclusive curios. While taking a walking tour of Florence, I picked up a mechanical pigeon that could fly. When we got back on the bus, the lady saw the package in my hand. She liked it but there was no time to go back and buy one. She therefore requested me to buy curios in duplicate – one set for her and one for me.

We had one night's stopover at Frankfurt Holiday Inn. As the hotel was short of double rooms, we were put up in a duplex suite. This was my chance to tease my friends. When I told them about the duplex suite, a couple of them came to see for themselves. Somehow, I had to pacify them by saying that it was because I was a frequent visitor to Holiday Inn Chain.

While we were checking out of Holiday Inn Cologne Bonn, Shubha and a few ladies went to the room occupied by us, for freshening up before the long drive to Amsterdam. Shubha forgot to leave the key at the counter and boarded our bus. At the Dutch Border, when Shubha opened her purse to take out her passport, she realized that the room key was still with her. I told her to keep quiet. We managed to mail the key to the hotel, from Amsterdam.

Amsterdam itinerary included visit to a diamond cutting factory. I asked our group whether they would like to skip visit to the diamond cutting factory and instead visit 'Madurodam' – the miniature park and tourist attraction in The Hague. Modurodam is a miniature park and is home to a range of perfect 1:250 scale model replicas of famous Dutch castles, public buildings, Railway and Highway System, Schiphol Airport, Rotterdam Port etc. The window panes and roofs of the buildings are exactly like the real ones. Madurodam has a miniature railway network of approximately 4 km. There are 50,000 miniature lights in this park and the miniature cars drive an average of 14,000 miles per year (which is almost the same as an average Dutchman). Everyone enjoyed the visit and Madurodam has become part of itinerary of most of the tours. itinerary of most of the tours.

In Amsterdam, we had a dinner at an Indian Food Restaurant. The table was well laid out but knives and forks were missing. Just to avoid the hassle of going to the wash room to wash my hands, I requested for knives and forks. The steward replied that Indian Food does not need them. This put me off and I called for the manager and told him that the matter called for a police complaint. He requested me to calm down and within minutes all cutlery was at the table.

We left Holland from Hoek von Holland to Harwich in the U.K. by a steamer. While we were waiting for our baggage, an officer started talking to me. He enquired where we were from and how long we had been touring. He expressed that one has to be really rich to be able to come on a vacation of Europe and the U.K. We left the tour at London. We still had to visit Budapest, Vienna, Zurich, Jung Frau before returning to India. In my article on Hungary,I had had written about Lake Balatone. From Budapest, we made a day's trip to Balatone. I showed Shubha, the Tagore Memorial. I took her to a shop which had proudly displayed photographs of Late Mrs. Indira Gandhi during her visit to the shop as Prime Minister of India. When the lady who owned the shop saw Shubha who was wearing a sari, enter the shop, she personally escorted us around. She took us to the spot where Indirajee had been photographed. I asked Shubha to pose for a photograph. The lady requested me to wait. She came back with the Hungarian Doll which Indirajee was holding in the photograph and I made Shubha's picture with the doll. As a souvenir for Shubha, I bought from the shop a beautiful poncho with the world famous Hungarian Embroidery. .

We had planned to take a flight from Budapest to Vienna and then fly from Vienna to Zurich. However, my friend Dr. Poshgai suggested that he would drive us from Budapest to Vienna, show us around and bring us back to Budapest as the drive each way was only 2 I/2 hours. On the Motorway M 2, Gyor is a town on the border between Hungary and Austria. Dr. Poshgai's old sister, who was alone, had settled at Gyor. We visited her on our way to Vienna. Dr.

Marathe Pratishthan

Poshgai had informed her about our visit. She had cooked for us some very delicious butter cookies. We presented her a Indian Instrumental Music Cassette and a Indian silk head square scarf. She requested us to stop by on our way back. At night, she had prepared some more cookies. She thanked her profusely as she used to have very few visitors. We could see tears in her eyes when we left.

We flew from Budapest to Zurich. Patwardhans were to meet us at Zurich after visiting their relatives in Germany. When I and Shubha approached passport control counter, an officer walked over to us and told us that our visa had expired. He told us that our colleagues had landed a little while ago and they had the same problem. He told us to take it easy as he was going to revalidate our visa. I showed a copy of the letter I had submitted with the visa application and he said he was sorry for the inconvenience caused.

Our last stop before returning to Mumbai was Heidelburg in Gerrnamy. We took Frankfurt Mumbai Air India Flight in the afternoon. That morning, we asked Shubha and Mrs. Patwardhan whether they would like to do last minute shopping. By then we had been travelling for 30 days. Both of them said that they had enough of shopping and site seeing and were anxiously looking forward to reach home.

We all were in our forties and that was the right age to take a long conducted tour which was well planned by TCI and Raja Travels and managed by Mrs. Rani Patil. We all enjoyed the tour so much that even after thirty years, all reminiscences are still quite fresh.

श्री. रमाकांत माधव विद्वांस, (पृ.६२३)
३१. गुडवील अॅशुरन्स सोसायटी,
मनमाला टँक रोड, माटुंगा (प.)
दूरध्वनी – ०२२–२४३०५२६





**दि. ८ जानेवारी २००९ ला मामा परमानंद मार्ग व डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग यांच्या आंतरछेदावरील चौकास मराठे बंधू चौक (दत्तात्रेय व धुंडीराज हरि (पृ. १३४) असे नामकरण शिवसेनानेते श्री. अरविंद नेरकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

**कुमारी तेजश्री पुष्कराज मराठे (पृ.५०३) पुणे**

**(वा. ग. मराठे ह्यांची नात)**

**हिने चित्रकला स्पर्धेत बक्षिसे मिळविली.**





**तिचे**

**हार्दिक अभिनंदन**

Marathe Pratishthan

कथा

# निवृत्ती

सौ. साधना सुधाकर मराठे (पृ.५७)

आज नोकरीतला शेवटचा दिवस या दिवसाची वामनराव गेले दिड ते दोन महिने उत्सुकतेने वाट पहात होते. आता काही न करता आराम करायचा. आजपर्यंत झाले येवढे कष्ट खूप झाले. बदली झालेले गाव सोडून आता वडीलोपार्जीत घरात रहावयाचे. निवृत्त झाल्यापासून दिड ते दोन महिन्यात हातात पैसा आला की हे गाव सोडायचे. मनात मुळ वडिलोपार्जित घराची ओढ होतीच आणि आता कायमचे तिथे रहावयाचा हा एक मनस्वी आनंद होताच. त्यांच्याबरोबर त्यांची सहचारिणी मंगलही येणार होती. मुलाचे लग्न झाले असले तरी त्यांच्या संसारात गुंतायचे नाही. असे दोघांनी ठरविले होते.

बघता बघता जाण्याचा दिवस उद्यावर येवून ठेपला. काय घ्यावे, काय नाही. याची गरज आहे का ? आज हि वस्तू नेऊन काम करायचे अशी मनाची द्विधा अवस्था झाली होती. संबंध रात्रभर उद्या होणाऱ्या प्रस्थानामुळे निद्रादेवीने असहकार पुकारला होता. सकाळ होताच उन्हाच्या आधी निघावे म्हणून आदल्या दिवशी सामानाने भरलेला टेम्पो दारातच उभा होता. सगळ्यांचा निरोप घेऊन निघताना मन थोड नाराज झाले होते पण गावाकडे जाण्याच्या ओढीने दुसर मन पिसासारखे हलके होऊन तरंगल्याचा भास होत होता.

तीन ते चार तासाचा प्रवास उरुन गावांत टेम्पो शिरला आणि नव्या नवरीच्या चेहऱ्यावर जे अधिरे भाव असतात तसे काहीसे मंगलबाईच झाले. टेम्पोतील सामान घराच्या ओटीवर ठेवून परसदारी विहीरीवर जाऊन गार पाण्याची बादली वामनरावांनी भरुन आणली. घराचा वापर गेले ७ ते ८ वर्षे झाला नसल्यामुळे ठिकठिकाणी जळमट व धुळ साचली होती. हातात सामानातील झाडू घेऊन मंगलबाईंनी मुलाच्या मदतीने थोडीफार स्वच्छता केली. जवळचे आणलेले थोडेफार खाऊन चटईवर अंग टाकले.

वामनराव ही प्रवासाने थोडेफार थकले होते. डोळ्यावर गार पाण्याचा ओला रुमाल ठेवून ते शांतपणाने जवळच असलेल्या पडवीतल्या बाकडावर पडले होते. ऊन्हे ऊतरल्यावर त्यांनी थोडेफार लागणारे जुजबी सामान बाहेर काढले. मुलगा व त्याचे मित्र टेम्पोतून पुन्हा जाण्यास निघाले त्यांना वेशीपर्यंत पोचवुन ते माघारी फिरले. मंगलबाईकडे बघत म्हणाले चला आलो हक्काच्या घरी. आता तूही जास्त दगदग करु नकोस आज रात्री नुसता पिठल भात कर. तू ही यायच म्हणून कालपासून धावपळ करत होतीस. आता अगदी शांतपणे रहायच इतकी वर्ष आराम कधी मिळालाच नाही तुला आणि मला. ते खर आहे हो पण मुलाला आणि सुनेला सोडून येतांना मन कासाविस झाल होते. पण मग विचार केला ज्याच्या हातात हात दिला त्या साथीदाराला का दुखवायचे पण मनाची थोडी कुतरओढ झाली. आम्हा बायकांच असच असत बघा. तू म्हणतेस ते पटत गं पण आता तरी आपण आपल्यासाठी नको का जगायला. तेही खरच आहे म्हणा.

मग् लाग बघु स्वयंपाकाला. आज आपण पुन्हा नव्याने संसार मांडला अस वाटतय. इतकी वर्षे नोकरी मुलबाळ त्यांची दुखणी आजारपण शिक्षण लग्न कार्य यात इतके गुरफटलो गेलो होतो कि काळ किती भराभर मागे पडला ते कळलच नाही. पण आज पुन्हा एकदा नव्याने नवलाईचे पहिले आयुष्य जगायचे अस ठरवलय बघ. मंगलबाईने तिरक्या नजरेनी त्यांच्याकडे कटाक्ष टाकत विचारले नव्या नवलाईचे कसे ते कळु दे तरी अस्स का थोडावेळ धीर धर मग सांगतो तुला. जस काही आपण त्या गावचेच नाही असा अगदी आव आणते. तुम्ही बायका म्हणजे पक्या लबाड असतात बर का? आज खूप मोकळ आणि प्रसन्न वाटतय बघ. अग हे निवृत्तीच आयुष्य ही पहिल्या सुखद आठवणीच्या झुल्यावर गिरकी घेत व्यतीत करायच एकमेकांच्या संगतीत.

झुल्यावर अलगद झोका घेत असताना मनाने खूप मागे गेल्या. वयाच्या अठराव्या वर्षीच आपण त्यांची धर्मपत्नी म्हणून ह्यांच्याबरोबर गृहप्रवेश केला. घरात दहा माणस सगळ्यांची मने जपतांना आपली खूप तारांबळ हाई. हातून छोट्यामोठ्या चुका होत असत. त्यातच सासुबाई तेवढ्याच करारी होत्या. घरांत आपण मोठी सून त्यामुळे आणि त्यातून वयानी लहान त्यामुळे म्हणावा तसा वागण्यात बोलण्यात पुरता पोक्तपणा आलेला नव्हता. घरातील बाहेरील नोकर माणसांचे ही आपल्यावर बारीक नजर असायची. त्यामुळे ह्यांच्या येण्याकडे संध्याकाळ झाली की लक्ष लागत असे.

दहा माणसांच्या घरातील वावर त्यामुळे ते

Marathe Pratishthan

आल्यावर सुद्धा लगेच बोलणे व्हायचे नाही. त्यांच्याशी दिवसभरातील घडलेल्या घटना सांगण्यासाठी मन आतुरतेने असे. कितीही वर्ष संसाराला झाली असले तरी ती घटना आठवली कि चटकन डोळ्यात पाणी येत. ह्याच राहून राहून आश्यर्च वाटे. छोट्याश्या क्षुल्लक कारणावरुन घरी आलेल्या पाहूण्यासमोर सासुबाईंनी आपल्या माहेरच्या गरीबी विषयी काढलेले अनुद्‌गार आपल्या मनाला आजूनही क्लेश देतात. महिन्यामागून महिने जात होते. दोघांनी आपल आयुष्य आखीव रेखीव केल होत. आता खूप निवांतपणा मिळत होता. दोघही आपापले छंद जोपासत होते. अधुन मधुन मुलमुली जावई सून नातवंडांचा सहवास लाभत होता. पहिल्या सारखे एकमेकांना विरघळणे. सहवासाच आनंद लुटणे. पहिल्या दिवसाच्या संसारातील आठवणी काढत त्यावर तासन तास बोलत रहाणे हा त्यांचा विरंगुळा असे.

कधी तरी मन ऊदास पण होत असे दोघा पैकी काही कारणाने २ ते ४ दिवस एकमेकांपासून लांब रहावे लागले म्हणजे मनचिंतातूर होई. नाही म्हटल तरी आता सगळ सगळ उसन अवसान होत. पुढला येणारा भविष्यकाळ भेडसावत राही. नकळतपणे मनातील भिती ओठावाटे बाहेर पडे.

होता होता दोघांनाच राहून १० ते १२ वर्ष झाली होती. दोघच्या दोघच असल्यामुळे पहिला ५ ते ६ वर्षापूर्वीचा उत्साह कमी झाला होता. त्यातच शारिरिक आणि मानसिक चिरचिर सुरु होई. काही वेळेला दोघच घरात असली की जीवघेणी शांतता मनाला बोचकारत राही त्या विदशीचा प्रसंग मंगलबाई विसरु म्हणता विसरु शकत नव्हत्या. दिवेलागले होते. त्यांच्याच वयाची त्याच गावातील जुनी मैत्रिण त्यांना अचानकपणे भेटली होती. गप्पांच्या नादात त्यांना वेळेचे भान राहिले नाही. इकडे वामनरावांचा रागाचा पारा चढत होता. मंगलबाईने घाईघाईनेच घर गाठले होते. रात्री मुकाट्याने जेवणे पार पडली. घरांत भयाण शांतता भरुन राहिली होती. त्यांनी घाबरतच आपल्याला घरी येण्यास ऊशीर का झाला त्याचा खुलासा केला होता. पण त्यावेळेस वामनराव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हतेच त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहताच मंगलबाई समजायच्या ते समजल्या मनांत विचारांचे काहूर माजले होते. मन स्वस्थ राहीना. त्यांना अन्न ही गोड लागेना. हा अबोला दोन दिवस राहीला. त्यांची नेहमीची कामे यंत्रवत सुरु होती. पण त्यात चैतन्य नव्हते. मन आनंदून पुढे अबोला ही फार मोठी शिक्षा त्या भोगत होत्या.

एकमेकांच्या मनाला जपणारे एकमेकांना परके झाले होते. काही वेळेला मन बंड करुन कुठे निघुन जावे. दोन दिवसाच्या या जीवघेण्या भयाण शांततेतून पण त्याच्यांशी बांधलेली मनाची निरगाठ सुटता सुटत नव्हती. आपल्या जाण्याने त्यांचे काय होईल हा विचार मनात येताच त्या हवालदिल होत. त्यांचा एखादा निसटता स्पर्श ही आसपास पुरेसा आहे. त्यामानाने खूप हळव्या झाल्या होत्या. नकळतपणे डोळ्याच्या कडा ओलावत होत्या या असला वेदनांचा त्यांना शिणवटा आला होता. पम कोंडी फुटुन त्यातून गैरसमजाशी जमलेली वाफ निघुन जावी म्हणून त्या अधीर झाल्या होत्या.

त्या क्षणाची त्या आतुरतेने वाट पहात होत्या आणि अचानकपणे वामनरावांचा हात त्यांच्या खांद्यावर पडला होता. त्या स्पर्शात काय नव्हते. आज पर्यंत दोघांनी मिळुन वेचलेले सुख दुःखाचे क्षण एकत्र सिमित झाले होते.

एखाद्या अल्लड मुलीप्रमाणे त्यांचा हात त्यांनी खांद्यावरुन पुढे आणून आपल्या हातात धरला होता. तो चिरपरिचित स्पर्श त्यांना सुखावून गेला. आणि नकळतपणे त्यांनी वामनरावांच्या हातावर अलगद आपले थरथरते ओठ टेकवले.

लेखिका सौ. साधना सुधाकर मराठे पृ.५७
मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड,
खालची आळी, मो. ९७६७६५३१३१

## सुगरणीचा सल्ला

- डोश्याचे पीठ जरा जास्त आंबले, की त्याचा उतप्पा करतात. कारण तो जाड असणे जास्त आंबल्याने कार्बन डाय ऑक्साईड जास्त तयार होतो व जाड पीठातूनही बाहेर येऊन जाळी पडू शकते व उतप्पा शिजण्याची क्रिया पूर्ण होते.
- डोशाचे पीठ हलक्या हाताने सारखे करावे, जास्त ढवळू नये.
- डोसा मऊ व फुललेला हवा असेल तर मूठभर पोहे भिजवून तांदूळाबरोबर वाटून मिश्रणात घालतात.

Marathe Pratishthan

# तूच लढायला हवेस

तूच लढायला हवेस तुझ्यासाठी ।
घटनेने दिलेल्या समान हक्कांसाठी ।।

गर्भजल परिक्षेत मुलगी असली, तर गर्भपात करुन घेतील ।
अगतिक मातेचे आणि कोवळ्याकळीचे, अश्रु जगाला दिसणारच नाहीत ।।

चुकून जर आलीस जन्माला, तर घरात सापत्न वागणूक देतील ।
भावाला मिळेल तूपरोटी, तुझ्या नशिबी शिळी भाकरी ।।

हुषार असलीस भावापेक्षा, तरी शिकायची संधी भावालाच ।
मुलगी म्हणजे परक्याचे धन, मुलगा असतो वंशाचा दिवा ।।

हुंड्यासाठी झाला छळ, तरी म्हणतील, दिल्या घरी तू सुखी रहा ।
सासरच्या तक्रारी सांगू नको, माघारी परत येऊ नको ।।

नवरा तुला मारत असला, तरी शेजारी सगळे दारे लावतील ।
चेव येऊन सासरची माणसे, तुझा आणखीच छळ करतील ।।

तुझ्यावर अत्याचार होताना, आजूबाजूला बघे जमतील ।
मदत कुणीच करणार नाही, शूटींग करुन टी.व्ही. वर दाखवतील ।।

जाळत असले कुणी तुला, तर आगीत आणखी तेल ओततील ।
देहाची तुझ्या होताना होळी, षंढासारखे गंमत बघतील ।।

भागवत धर्म सांगेल तुला, स्त्रीचे स्थान घरातच असते ।
न स्त्री स्वातंत्र्य अर्हती, असेच तर लिहून ठेवलेय मनूने ।।

कुणी बापू सांगतील, संकटात धावा कर देवाचा ।
भाऊ मानून पाय धर गुंडांचे, मग येईल त्यांना दया ।।

तुझ्यावरच्या अत्याचारांची दृष्ये टी. व्ही. वर दाखवतील चोवीस तास ।
लोक काढतील मेणबत्ती मोर्चे, नक्राश्रु ढाळतील नेते सगळे ।।

तुझ्या मरणाचा होईल उत्सव, तुझ्या स्वातंत्र्यावर येईल गंडातर ।
तालीबानी फतवे काढतील खाप पंचायती तुलाच शिक्षा करतील ।।

अस्तित्वासाठी लढ तुझ्या, नको मानू हार ।
दुर्गा होऊन तूच आता, कर दुर्जनांचा संहार ।।

कवयत्रि – सुनीती मराठे
(पृ. १८०)
७, तरालिका २१६, भालचंद्र रोड,
मांटुंगा, मुंबई – ४०० ०१९.
फोन – २४१४१८७६

Marathe Pratishthan

# आपण आपल्याजवळ असलो तरच आपण एकटे नाही

**श्री सदाशिव ब. मराठे (पृ. ३८०)**



अंधार दुसरे काही नसून, सुर्य जाता जाता काळी शाई शिंपडून जातो. तोच दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा येऊन ती शाई पुसुन टाकतो.

मनुष्य पण जाता जाता काळोख करुन जातो पण तो सुर्याप्रमाणे अंधार पुसायला परत येत नाही. माणूस पीडा आणि वेदनांच्या वेळी आपण भर दुपारी पण अंधाराचा आभास करत असतो आणि आठवणी, पुस्तके वगैरे गेलेल्या माणसांची आठवण विसरण्या करताच आहेत. माणूस त्यासाठीच अटोकाट प्रयत्न करीत असतो. त्या करता निरनिराळी कारणे शोधत राहतो. परंतु त्याचा काही उपाय उपचार नाही.

प्रकृतिचे कुठलेही तत्व एकटे नाही. माणसांशिवाय सर्वांना काहीना काही कुणाचा आधार आहे. उदा. फुलांना पानांचा, झऱ्याला किनाऱ्याचा म्हणून तर झरा नाचताना दिसतो. कारण त्याला नदीला भेटण्याची उत्कंठा असते. तर नदीही समुद्राकडे ओढ घेत असते. पण समुद्राला कधी एकटेपणा जाणवतो? समुद्र म्हणतो म्हणून तर मी किनाऱ्यावर डोकं आपटत असतो. त्याला आश्वासन फक्त नदीच्या भेटीचे! त्याला वाटते नदीचे पाणी आटून गेले तर? आणि त्यामुळेच माझ्यात खारटपणा आलाय. तसेच, प्रत्येक माणसाला वाटते आपले जवळचें माणूस दूर गेले तर? कदाचित त्या खारटपणामुळेच आपण एकटे तर पडणार नाही नां? त्याची सतत भिती वाटत असते. म्हणूनच वाटते कि आपण एकटे असलो तर आपण थकून जावू, पाय डगमगतील तेव्हां आपला हात धरुन आपल्याला कोण सावरेल?

फुलपाखरासाठी निसर्गाने फूले निर्माण केली की फूलांकरीता फुलपाखरु? वादळांचा पाऊस पाडण्याकरीता. तर रणासाठी तहानेने व्याकूळ न होण्यासाठी वादळ! आकाशांत तारे चमकतात तर पृथ्वीवर दगडाचे काय? परंतु दोन दगड एकमेकांना भेटले तर संगीत सुद्धा निर्माण होवू शकते. एकदा फूलपाखराने फुलास विचारले ''मी किती स्वार्थी आहे. तुझ्यातला रस शोषून घेतो,'' त्यावर फूल म्हणाले, ''अरे वेड्या तुझ्यासाठी तर मी रस निर्माण करतो. तू नसलास तर हा रस सुकुन गेला असता. आणि कदाचित मी लवकर कोमेजून गेलो असतो'', ''तुझे चुंबनच तर मला संजीवन ठेवते'' माणूस पण काहिवेळा फूल किंवा फूलपाखरां सारखा आहे कुणाची साथ न मिळाली तर कोमेजूनच जाणार.

एकटेपणा तलवारीपेक्षा तीक्ष्ण असतो. आणि विषापेक्षाही विषारी असतो. समृद्धि, साधने, सुविधा किंवा साम्राज्य सुख देवू शकत नाही. संग आणि सानिध्यच सुख देवू शकते. समृद्ध अमेरीकेतही एकटेपणा हा 'रोग' म्हटला जातो. त्या देशातीलच एक चिंतक म्हणतो 'अमेरिकेत Pleasure आहे पण Happyness नाही''. कारण Pleasure बाह्य साधनाने मिळू शकतो पण Happyness माणसाला स्वतःच्या अंतर्मनातून मिळतो. आपल्या देशातही हल्ली Pleasure ची मागणीच वाढू लागली आहे. माणूस साधनांचा विकास करुन साथ–संगाचा मात्र निकास करतोय! मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप, कंप्युटर, टेलिविजनच्या सहवासात न राहिला तर जणू एकटा पडल्याचे समजतो. माणसाला आधार तर हवाय पण तो आधार कुणाचा आणि कसा असावा ह्याची जाणीवच विसरलाय. बाहेरच्या आनंदात स्वतःच्या हृदयात साठविलेला आनंद तो शोधूच शकत नाही. आपल्या एकटेपणासाठी आपणच जबाबदार आहोत कारण आपण अंतर्मुखी होवू शकत नाही. सोशियल मिडीयाला आपण सोशियल सपोर्ट सिस्टीम मानून बसलो आणि त्यामुळेच आपण आपल्याच माणसांपासून दूर जात आहोत. साधने आणि संबंध ह्या मधील फरक आपण विसरत आहोत. आपण कुणाला साथ दिली तरच आपल्याला कुणाचा हात मिळेल ही भावनाच नष्ट होत चालली आहे. म्हणूनच आपल्या सोबत आपणच आहोत तर त्याला तरी नीट समानपणे धरुन राहायला हवे, कारण हल्ली जो तो दुसऱ्यापासून दूर पळण्याचाच मार्ग शोधतोय!


**मुळ लेखक :**
**कृष्णकांत उनडकट**
**(गुजराती)**

**अनुवाद आणि संकलन :**
**सदाशिव ब. मराठे (पृ.३८०)**
मराठेवाडा अन्नपूर्णा, शास्त्री पोळ,
कोठीचार रस्ता, वडोदरा – ३९०००१
गुजरात, फोन : ०२६५–२४२३०५५, २४२८६१८

Marathe Pratishthan

# प्रयत्नांती परमेश्वर

**श्री. चि. त्र्यं. मराठे (पृ.क्र.२४८)**



पुण्याच्या महाराष्ट्र विद्यालयांतून अकरावी पास झाल्यानंतर मी भारतीय नौसेनेत स्टोअर खात्यांत भरती झालो. एकदा माझी बदली लोणावळा येथील आय.एन.एस. शिवाजी येथे झाली. लोणवळा येथे गांवापासून दूर कार्ला रस्त्यावर कॉलेज होते. तेथे जाऊन कॉलेज करणे अशक्य होते. म्हणून बहिस्थ विद्यार्थी म्हणून मी बी.ए. होण्याचे ठरवले व पुण्यातील नारायण पेठेतील मेहेंदळे क्लासेसचे चालक श्री. मेहेंदळे यांना भेटून माहिति घेतली व त्यांनीच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचा अभ्यास करुन बी.ए. होण्याचे निश्चित केले. फिरतीच्या नोकरीमुळे मला जुने पेपर अथवा मार्गदर्शन मिळण्यासारखे नव्हते. मी लोणावळा कॉलेज मध्ये परीक्षांना बसून इंटर पास झालो.

लोणावळ्याहून माझी मुंबईला 'दर्शक' बोटीवर बदली झाली. नेव्हीनगर (कुलाबा) येथे राहावयास जागाही मिळाली 'दर्शक' जहाज समुद्रात सर्व्हे करुन नकाशा तयार करण्याचे काम करीत असे व त्याचेकडे ग्रेट निकोबार बेटांवर जेटी बांधण्यासाठी सर्व्हे चालू होते. निकोबार बेटावर जहाज जाण्यापूर्वी मी पुणे विद्यापीठांत जाऊन बी. ए. च्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेचा फॉर्म व फी नियमाप्रमाणे तेथील महाराष्ट्र बँकेत भरले व विद्यापीठाच्या पत्राची वाट पाहू लागलो.

एके दिवशी मला मुंबईतील मावशीचे पत्र आले की पुणे विद्यापीठाच्या परीक्षा लवकरच सुरु होणार आहेत. मी विद्यापीठाला पत्र पाठवून फॉर्म भरण्याची माहिती कळवली व माझा सीट नंबर व परीक्षेचे ठिकाण त्वरीत कळविण्याची विनंती केली. चार दिवसांनंतर एक रिमाईंडर पत्र पण पाठवले.

माझ्या सुदैवाने काहीं दिवसांनतर जहाज मद्रास मार्गे मुंबईला जाण्याचा बेत झाला तेव्हा मद्रासला मी चार दिवसांची रजा घेऊन रेल्वेने मुंबईस येण्याचा विचार केला व वाटेत पुण्यास उतरुन सामानासह विद्यापिठांत जाऊन भेटलो. त्यांनी सांगितले की तुम्ही बँकेत जमा केलेले सर्व कागद (फॉर्म) गहाळ झाले आहेत. आमची चौकशी चालू आहे. म्हणून तुम्हाला परीक्षेचे कळवले नाही. आज पासूनच परीक्षा सुरु झाल्या आहेत. तुम्हाला उर्वरीत पेपरांना बसावयाचे असेल तर आम्ही व्यवस्था करतो. मी याला होकार देताच मला परीक्षेचे वेळापत्रक दिले व उद्या फर्ग्यूसन कॉलेज मध्ये हे पत्र दाखवून पेपर लिहा असे सांगितले.

त्या रात्री पुण्यास राहून दुसऱ्यादिवशीचा पेपर दिला व मुंबईला घरी आलो. नंतर वेळापत्रकाप्रमाणे उरलेले पेपर्स दिले व निकालाची वाट पाहू लागलो.

पुणे विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेचा निकाल जाहीर झाला. पण मला काहींच समजले नाहीं म्हणून पुणे विद्यापीठांत जाऊन चौकशी केली. सीट नंबर शिवाय परीक्षेला बसल्यामुळे माझा निकाल जाहीर केला नव्हता असे समजले. मला पूर्वी विद्यापीठाने दिलेले पत्र दाखवतांच त्यांनी उत्तरपत्रिका शोधल्या व दहा मिनिटांतच पहिल्या इंग्लिश पेपरला न बसल्यामुळे नापास ची मार्कलिस्ट दिली.

मी तेथेच फी भरुन आक्टोबरच्या परीक्षेचा फॉर्म भरला व पास झालो व मला बी.ए. पास झाल्याचे सर्टिफिकेट मिळाले. खरे म्हणजे मी येथेच थांबावयास पाहिजे होते पण एक मन प्रखरतेने सांगत होते की विद्यापीठाच्या चुकीमुळे मला फी चा भुर्दंड व प्रवासाचा त्रास व मनस्ताप भोगावा लागला. म्हणून मी जहाजावरुनच कुलगुरुंच्या नांवे विद्यापीठाला सविस्तर पत्र लिहिले.

थोड्याच दिवसांत मला विद्यापिठाकडून पत्र आले की एक 'व्हेरी स्पेशल केस' म्हणून तुम्ही जादा भरलेली परीक्षा फी मनिऑर्डरने परत पाठवली आहे. असो. अशारीतीने मी पदवीधर बनून नौसेनेमधून रिटायर्ड झालो. कारण त्यावेळी ११ वी पासला कोणीही विचारत नव्हते.


श्री. चि. त्र्यं. मराठे (पृ.२४८)
नवसरगम को.हौ.सो.लि., बी विंग, फ्लॅट नं. १, दुसरा मजला,भुसार आळी विक्रम नगर, कळवा, ठाणे – ४०० ६०५.
मो. ९९६७९३८१०८


Marathe Pratishthan

मा. डॉ. सौ. सुमेधा मराठे
संपादिका हितगुज
८/१३, सहकारनगर, मुंबई - ३१.

महोदया,

अनेक उत्तम आशिर्वाद

आज निवांतपणे आपले हितगुज वाचले.

१) अंक अतिशय देखणा आणि आशयघन आहे.

२) कागद, छपाई उत्तम, संपादन उत्कृष्ट आहे. अभिनंदन.

आम्ही आडनावाने मराठे नाही. परंतु स्वामी समर्थ, रामदास, छत्रपति शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन आणि आचरणात आणलेल्या महाराष्ट्र धर्माचे पालन करणारे मराठे हिंदूच आहोत.

मराठे कधीही राष्ट्रधर्म विसरु शकत नाहीत. आपले राष्ट्र आहे म्हणून आपण मराठे आहोत, असे मला वाटते.

आपला संपादकीय लेख चांगला आहे. 'युद्ध आमुचे'.... ची समीक्षा आटोपशीर तरीही परिपूर्ण वाटते. जागेच्या मर्यादेत उत्कृष्ट आहे. मी हा अंक एका तरुण लेखकास वाचावयास दिला आहे.

हितगुजचा एक अंक डॉ. सौ. शुभा शशांक साठे, यांना केवळ माहितीसाठी सप्रेम भेट म्हणून साध्या टपालाने पाठवावा ही विनंती. टपालाचा पत्ता सध्या येथे मिळाला नाही. कोराडी, जि. नागपूर, येथे त्या विद्युत नगरी त राहतात. क्वॉर्टर (निवास) क्रमांक लक्षात नाही. कदाचीत डॉ. वि. स. जोग साठी निमित्त प्रकाशित ग्रंथात त्यांचा संपूर्ण पत्ता मिळेल. असो. माननीय श्री. प्रभाकररावांना स. न. तसेच इतर कुटुंबियांना यथायोग्य सा.न. आणि स. आ. सांगावीत. कळावे.

आपला शुभचिंतक
**विक्रम सावरकर**
तळवली (बारागांव), ता. मुरबाड, जि. ठाणे)

मा. डॉ. सौ. सुमेधा मराठे
संपादिका हितगुज
८/१३, सहकारनगर, मुंबई - ३१.


स.न.वि.वि.

सप्टेंबर २०१४ चा हितगुजचा ९९वा अंक दोन दिवसापूर्वी मिळाला. नवीन स्वरुपातील हा दुसरा अंक आहे तो चांगला झाला आहे. अक्षर जुळणी, छपाई इ. सर्व चांगले आहे. मुखपृष्ठावरचा संपादिकेचा फोटो तेवढा कमी झाला आहे. हा फोटो असावा की नाही या बद्दल थोडी चर्चा झाली होतीच. पण एकूण अंक व त्यातील मजकूराला नांवे ठेवता येणार नाहीत. अंकातील आपली पत्र लिहिण्यास कारण की ही कथा आवडली व इतर सर्व मजकुर आवडले असाच आहे. आता शंभरावा सुंदर अंकाची प्रतिक्षा आहे.

**वि. म. मराठे**
कार्यकारी अभियंता (निवृत्त)
पद्मश्री, बँक ऑफ महाराष्ट्र शेजारी,
विश्रामबाग, सांगली ४१६ ४१५ (सांगली)

## हसरे हितगुज

**शिक्षक**- मुलांनो, चला निबंध लिहा, विषय आहे, मी अब्जाधीश झालो तर!
सगळी मुलं निबंध लिहू लागतात. बाळू एकटाच बसून राहिलेला असतो.
**शिक्षक**- बाळू तुला नाही का निबंध लिहायचा? असा का बसलायस?
**बाळू** - सर मी माझ्या सेक्रेटरीची वाट पाहतोय.



## शतायुषी आजी

**मराठे परिवारातील पणजीबाई**
**कै. श्रीमती सत्यभामा दामोदर मराठे (पृ.२९२)**
**डोंबिवली यांनी शतक झळकावले! त्या शतायुषी झाल्या.**
**त्यांचा शतकमहोत्सवी सोहळा दि. १३ जानेवारी २००८ ला त्यांच्या नातवंडांनी थाटामाटात साजरा केला.**
**मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. अरविंदराव यांच्या त्या मातोश्री होत्या.**

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठानची अखिल भारतीय अधिवेशने

सौ. निलांबरी रमेश मराठे (पृ.२८०)

मार्च १९७९ मधे बडोदा येथे बृहनमहाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन भरले होते त्यामधे कलकत्ता महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष श्री. ना. बा. मराठे व मुंबईचे श्री. वा. ग. मराठे यांची प्रथमभेट झाली गप्पांच्या ओघात मराठे परिवाराचेही असे संमेलन भरवता येईल का? हा विचार त्यांना स्फुरला आणि तो विचार कार्यवाहीत आणण्यासाठी श्री. वा. ग. मराठे यांनी चंग बांधला प्रयत्नांची पराकाष्ठा केली, भरपूर पत्रव्यवहार केला. त्यांना गोव्यातील मराठे कुलबंधूंनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आणि मराठे परिवाराचे पहिले संमेलन जानेवारी १९८० मधे साजरे करण्याचा मान गोवेकरांनी पटकावला. तेव्हापासून आजपर्यंत मराठे प्रतिष्ठानची ९ आखिल भारतीय संमेलने झाली. मला जी माहिती उपलब्ध झाली त्यानुसार त्याचा वृत्तांत थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

१) १ ले संमेलन - यामधे मराठे प्रतिष्ठानची स्थापना झाली व म. प्र. च्याकार्याबद्दल सविस्तर चर्चा झाली. अनेकांनी आपले विचार मांडले. त्यानुसार खालील उद्दिष्टे ठरविण्यात आली. १) मराठे कुळातील हुशार, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणे २) नविन व चालू उद्यागव्यावसायिकांना आर्थिक व तांत्रिक मदत देणे. ३) सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

जास्तीत जास्त कुलबांधवांनी म. प्र. चे आजीव सभासद व्हावे असे आवाहन या संमेलनात करण्यात आले त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. मराठे परिवारातील मंडळींना संघटीत करण्यासाठी विभागवार प्रतिनिधी या संमेलनात नेमण्यात आले.

हे म. प्र. चे १ ले संमेलन श्री. वा. ग. मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले.

वेगळेपण - बेळगाव येथील समाज कार्यकर्ते श्री. प्रभाकर मराठे यांनी केवळ सूर्याच्या उष्णतेवर अन्नपदार्थ शिजवणारा सूर्यप्रभा कुकरचे प्रात्यक्षिक दाखवले.

२) २ रे समेंलन - प्रतिष्ठानच्या विकासाबद्दल चर्चा झाली. आगाशीचे श्री. ज. गो. मराठे यांचे सुश्राव्य श्रवणीय कीर्तन झाले.

वेगळेपण - ढोल वादनाचा अतिशय सुंदर कार्यक्रम झाला. याचे वैशिष्ट्य म्हणजे ढोल वाजवणाऱ्यांनी ढोलावर १ रुचे नाणे ठेवले होते ते नाणे ढोलाच्या तालावर नाचत होते.

३) ३ रे संमेलन २२ फेब्रुवारीला जी चर्चा झाली त्यात गोव्यामधे टुरीस्ट होम (पर्यटक निवास) बांधण्याची कल्पना चर्चेसाठी घेण्यात आली तिला मूर्तस्वरुप देण्यासाठी अनेक कुलबांधवांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

गोवा आणि लगतच्या भागातील शेतकरी व बागायतदार कुलबांधवांना सहभागी करुन घेता येईल. अशा एखाद्या कुटिरोद्योगाची अभ्यासपूर्ण योजना आखून जास्तीत जास्त कुटुंबांना मदत व मार्गदर्शन करता येईल अशी सूचना मांडली २३ फेब्रुवारीला समेंलनाचे अध्यक्ष श्री. ना. बा. मराठे यांनी आपल्या भाषणात चित्तपावन आणि कपिगोत्र या संज्ञा विषयी उद्बोधक माहिती दिली. कुलसंस्था आणि कुलवृत्तात यांच्या आवश्यकतेचे महत्व सांगितले सर्व कुलबंधूना प्रतिष्ठानच्या कार्यात सक्रीय सहभागी होण्यासाठी आवाहन केले.

प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. वा. ग. मराठे यांनी म.प्र. च्या कार्याचा आढावा घेतला. आपुलकी हेच म. प्र. चे भांडवल आहे याच्या जोरावर चालू व भविष्यकालीन योजना यशस्वी रितीने पार पाडू असा दृढविश्वास त्यांनी व्यक्त केला.

यानंतर म. प्र. च्या विविध उपसमित्यांमधे कार्य करणाऱ्या निमंत्रकांची भाषणे झाली. त्यामधे व्यवसाय मार्गदर्शनाचे श्री सुरेशभाऊ मराठे, हितगुजचे संपादक श्री. वि. के. मराठे, संपर्क व स्वयंसेवक समितीचे प्रा. प्र.दा. चक्रदेव व कुलवृत्तांच्या कामात मदत करणारे श्री. मा. ना. मराठे यांनी कृलवृत्तांतसाठी माहिती गोळा करताना आलेले अनुभव खुमासदार भाषेत सांगितले दुपारी उपस्थितांनी आपले विचार, शंका, प्रश्न आणि सूचना मांडल्या म. प्र. चे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले सर्व सूचनांचा प्रतिष्ठान विचार करेल व पाठपुरावाही करेल. व्यावहारीक लाभाची बैठक असलेल्या कुलवृत्तांताच्या कामाला अग्रक्रम देऊन कुलबांधवांनी आपल्या नात्यातील व परिचित कुलबंधूची माहिती मिळवून पाठवावी अशी

Marathe Pratishthan

विनंती केली. प्रतिष्ठानच्या कार्याला प्रत्येकाने हातभार लावावा. हितगुज वाचले जाते याची पोच द्यावी ही किमान अपेक्षा आहे. गोव्यातील टुरीस्ट होमची कल्पना खूपच चांगली आहे पण प्रश्न, निधी उभारण्याचा आहे. एखाद्या दानशूर व्यक्तीकडून जागा देणगी म्हणून मिळाली तर ही योजना साकार करणे सुलभ होईल.

४) ४थे संमेलन – २१ नोव्हेंबरला संध्याकाळी प्रतिष्ठानचे विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळ, उपसमित्यांचे सभासद, पुणे शाखा व्यवस्थापक मंडळ, सल्लागार मंडळ, संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि कार्यकर्ते यांची संयुक्त बैठक झाली. रात्री ९ ते १२ नाट्यसंगीत व सुगमसंगीताची मैफल गाजवली पंडीत राम मराठे, सौ. अनुराधा मराठे, श्री. मुकुंद मराठे माहेरवाशीणी सौ. पद्मजा बंकापुरे आणि डॉ. सौ. मानसी कणेकर यांचा हा संगीताचा कार्यक्रम खूपच श्रवणीय होता.

२२ नोव्हेंबरला स्वागताध्यक्ष श्री. शशीकांत भास्कर मराठे यांचे भाषण झाले. या संमेलनापासून एक नविन परिपाठ सुरु झाला तो म्हणजे आपल्या परिवारातल्या काही विशेष कर्तृत्वशाली व्यक्तिंबद्दल आपल्याला वाटणाऱ्या प्रेमाचे आणि आदराचे प्रतीक म्हणून त्यांचा घरगुती स्वरुपाचा सत्कार करण्याचा. यामधे संगीतभूषण पं. राम मराठे, सुप्रसिद्ध कवयित्री सौ. संजीवनी मराठे, चतुरस्त्र कर्तृत्वाचे श्री. श्री. प. तथा बापूसाहेब मराठे आणि संमेलनाचे आधारवड श्री. शशीकांत भा. मराठे यांचा सत्कार करण्यात आला.

अनेक उपस्थितांची भाषणे, सूचना, प्रस्ताव, चर्चा, निवेदने झाली त्यातून असे जाणवले की संमेलनाच्या निमित्ताने आजीव सभासदांची संख्या वाढली, एकमेका साहाय्य करु या प्रेरणेतून खूप नविन ओळखी झाल्या. कुलवृत्तांताकरिता माहिती जमविण्याच्या कामास गती आली. सभासदांचे विचार समजण्यास मदत झाली एक खटकलेली गोष्ट म्हणजे हे संमेलन २० ते ४५ वयोगटातील व्यक्तींना प्राधान्य देऊन आयोजित केले होते परंतु या वयोगटातील व्यक्तिंचा अपेक्षित प्रतिसाद लाभला नाही.

५) ५ वे संमेलन – यामधे महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि विविध राज्यांमधून कुलबांधव आले होते. १९ जानेवारीच्या पूर्वसंध्येला डॉ. सुधाकर मराठे यांची शास्त्रीय आणि नाट्यसंगीताची मैफल अप्रतिम झाली. त्यांचे तिन्ही सुपुत्र त्यांच्या साथीला होते हे वैशिष्ट्य २० जानेवारीला प्रवेशद्वाराजवळ श्रीमती वसुंधरा मराठे, सौ. वृंदा मराठे आणि माहेरवाशीण सौ. सुलभा सहस्त्रबुद्धे यांनी अतिशय सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या. प्रारंभी आपल्या स्वागतपर भाषणात बापूसाहेब मराठे म्हणाले की सांप्रत काळांत ब्राह्मणांनी अनेकत्वाचा लोप करुन एकत्वाची कास धरावी. एकजूट राखून समाजाचे आणि स्वतःचे हित साधणे हाच युगधर्म आहे. नंतर विशेष कतृत्वाबद्दल ज्या ५ लोकांचा सत्कार केला गेला. त्यांचा परिचय श्री. रमेश भि. मराठे यांनी करुन दिला सत्कारमूर्ती पैकी अर्थतज्ञ श्री. शरदराव मराठे म्हणाले की सध्याच्या काळात ब्राह्मणवर्गाला नोकरीची शक्यता दुरावणार आहे त्यामुळे व्यवसाय कोणता करायचा हे ठरवून मन एकाग्र करुन सर्वस्व पणाला लावण्याची तयारी पाहिजे कष्टसाध्य यशाची कक्षा आधिक रुंद असते त्याला उशीरा फळे आली तरी अनंतकाळ मिळतात. सिडकोचे अध्यक्ष नारायणराव मराठे म्हणाले की आपल्या भावी आयुष्याची रुपरेषा तरुणपणीच आखावी व्यवसायाचे क्षेत्र कोणते यापेक्षा मेहनत किती याला महत्व आहे. आपल्या आवडीच्या क्षेत्रात तनमनधन अर्पून काम करण्यात एक वेगळाच आनंद असतो तत्वज्ञानाचे विकासक डॉ. मोरेश्वर मराठे म्हणाले की उद्देशपूर्ती साठी जास्तीत जास्त काम करावे सतत सत्कार्य करत रहावे. आमादर श्री. माधव कृष्णा मराठे म्हणाले की भरपूर कष्ट करीत राहिले की स्वयंप्रेरणा प्राप्त होते योग्य मार्गदर्शनाने कार्यातील तृटी भरुन काढता येतात. जिद्द आणि अढळ श्रद्धा यामुळेच कार्यात यश प्राप्त होते. वास्तुशास्त्रज्ञ श्री. शशीकांत मराठे म्हणाले की आपण एकाच व्यवसायावर अवलंबून राहू नये कारण प्रत्येक व्यवसायात चढउतार असतात. त्यामुळे एका व्यवसायात उतार तर दुसऱ्यात चढ असा समतोल साधला जातो.

यानंतर श्री. रमेश भि. मराठे यांनी पुणे शाखेच्या कार्याची थोडक्यात माहिती दिली नंतर उपस्थितांपैकी काहिंनी आपली मनोगते व्यक्त केली त्यामधे म. प्र. ने ब्राह्मणांची माहिती गोळा करावी, साहित्य प्रसिद्धीस हातभार लावावा, उद्योग व उद्योजकांची डिरेक्टरी तयार करावी, नोकरी मिळवून देण्यात मदत करावी, सहकारी पतपेढी स्थापना करावी. रुग्णालय, वृद्धाश्रम व सहनिवास स्थापन करावे असे विचार व्यक्त केले नंतर श्री. लक्ष्मण

Marathe Pratishthan

शंकर मराठे यांनी हितगुज आर्थिक सहाय्य मिळाले तर पृष्ठसंख्या वाढवता येईल असे आग्रहपूर्वक सांगितले. अध्यक्षीय समारोपाच्या भषणात श्री. सुरेशभाऊ मराठेंनी भावपूर्ण सांगितले का उद्योगक्षेत्रात तरुणांचा सहभाग आवश्यक आहे. कार्यवाह श्री. वि. के. मराठे यांनी नेमक्या शब्दात समारोप केला. जिलबीच्या सुग्रास भोजनानंतर ४ तास करमणूकीचे कार्यक्रम झाले. यामधे लहान थोर, प्रसिद्ध व नवोदित कलावंतांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. विशेष म्हणजे २ दिवसाच्या अधिवेशनातील अलौकीक अनुभव काव्यबद्ध करुन सौ. निर्मला मराठे यांनी योग यावा भेटीचा पुनः पुन्हा या २० कडव्यांच्या काव्याने रसिकांची दाद मिळवली.

६) ६ व समेंलन – ४ ऑक्टोबरला उपस्थित कुलबांधव श्री क्षेत्र गणपतीपुळे व मालगुंड येथील केशवसुत स्मृतिस्थानाला खास गाडीने भेट देऊन आले. संध्याकाळी ६.३० वा. परस्पर परिचय झाले. भोजन झाल्यावर गोंधळाच्या कार्यक्रमाला सुरवात झाली देवीची पूजा करुन संबळाच्या नादलहरी आसमंतात पसरु लागल्या. खास कणकवलीहून आणलेले गोंधळी तालासुरावर देवीची आळवणी करु लागले. कुलबांधव दिवटी हातात धरुन देवीचा जयजयकार करीत फेर धरु लागले, मन हेलावून टाकणारा हा कार्यक्रम अजूनही लक्षात आहे.

५ ऑक्टोबरला सकाळी स्वागताध्यक्ष श्री. कमलाकर नरहर मराठे यांचे स्वागतपर भाषण श्री भाऊ मराठे यांनी वाचून दाखवले यात त्यांनी रत्नागिरी शहर व जिल्ह्याची सर्वांगीण माहिती सांगितली नंतर ८० च्या पुढील वृद्ध कुलबांधवांचा सत्कार करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले की कोकणवासी कुलबंधूंनी हातातले सोन्याचे ताट भिरकावून शहराकडे धाव घेण्याचे थांबवावे. कोकण रेल्वेमुळे शीघ्र गतीने होणारा कोकणचा विकास आणि पर्यटनाच्या विकासात तरुणांनी सहभागी व्हावे व्यवसाय मार्गदर्शक श्री. अरविंद देशपांडे म्हणाले की व्यवसायाची पारख त्याच्या अंगभूत गुणांवरुन होणे आवश्यक असते. पारख चोख असेल तर यशप्राप्ती निश्चित होते. निसर्गसंपन्न आणि कच्च्या मालाने समृद्ध असलेल्या कोकणात अनेक उद्योग निर्माण करता येतील हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले व अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती दिली.

यानंतर ''प्रतिष्ठान काल–आज आणि उद्या'' या विषयावर अनेकांनी आपले विचार व्यक्त केले दुपारी आमरसाचे भरपेट जेवण झाल्यावर ४.३० वा. रत्नागिरीचे यशस्वी आणि किर्तीवान उद्योजक श्री. नानासाहेब भिडे आणि श्री. भाऊसाहेब पटवर्धन यांनी कोकणातील व्यवसायांच्या संदर्भात उपयुक्त मार्गदर्शन केले. कोकणात बुद्धी आणि कच्चामाल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. फक्त कल्पनाशक्ती, नविन उत्पादने तयार करण्याची इच्छा आणि चिकाटी या गुणांची जोड दिली तर कोकणातील कोणताही व्यवसाय यशस्वी होऊ शकतो. संध्याकाळी कुलबंधू व भगिनींचे करमणूकीचे कार्यक्रम झाले. रात्री शेवटचा अविस्मरणीय जाखडी हा ग्रामीण नृत्याचा कार्यकम झाला. याचे वैशिष्टे म्हणजे वाघाची गती वाढते तशी मुलांच्या नृत्याची गती वाढते.

७) ७ वे संमेलन – प्रवेशद्वारात सौ. सुवर्णा मराठे यांनी फुलांची अतिशय सुंदर रांगोळी काढली होती. प्रवेशद्वारातच नऊवारी साडी व नथ घालून सौ. मंजिरी अरुण मराठे व माहेरवाशीण सौ. मोनिका नरेंद्र महाजन यांनी सर्व उपस्थितांचे पेढा व स्वागतिका देऊन हसतमुखाने स्वागत केले. प्रारंभी श्री. कालिदास मराठे यांनी अभिनव पद्धतीने परस्पर परिचयाचा कार्यक्रम घेतला. तो खूपच रंगतदार झाला. संध्याकाळी युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष श्री. सतीश मराठे यांची श्री. गजानन मराठे आणि मराठ्यांचा जावई श्री. विनायक लिमये यांनी मुलाखत घेतली .त्यामधे आपण या पदापर्यंत कसे आलो हे त्यांनी सांगितले. अनेक कुलबांधवांनी त्यांना बँकाविषयी प्रश्न विचारले त्यांनी सर्व प्रश्नांना मुद्देसुद व समर्पक उत्तरे दिली. नंतर डॉ. सुधाकर मराठे यांच्या शास्त्रीय गायनाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले २३/१२ च्या सकाळी स्वागताध्यक्ष विंग कमांडर श्री. य. ल. मराठे म्हणाले की हितगुजमुळे जवळीक साधली जाते. त्यासाठी संपादकांचे हात सर्वांनी बळकट करावे. तरुणांनी उद्योगधंद्यात शिरुन स्वतःची व राष्ट्राची प्रगती करावी. नंतर श्री. वि. के. मराठे यांनी प्रतिष्ठानचा अहवाल सादर केला. ८० वयाच्या पुढील वृद्धांचा सत्कार करण्यात आला. नंतर श्री. ल. श. मराठे यांनी हितगुज वृद्धी आणि प्रसार यावर आपले विचार व्यक्त केले. कुलबांधवांनी हितगुजला सढळ हाताने मदत करावी. पोस्टेज

Marathe Pratishthan

वाढल्यामुळे काही कुलबांधवांनी घरपोच अंक नेऊन द्यावे. त्यामुळे संपर्कही वाढेल. हे काम पुणे शाखा उत्तम रितीने करत असून इतरांनीही अनुकरण करावे. नंतर म. प्र. चे अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे म्हणाले की तरुणांमधे शक्ती, बुद्धी आणि युक्ती आहे त्यांना म. प्र. साठी आकृष्ट करावे व मार्गदर्शन करावे. नंतर श्री. प्रभाकर दामोदर मराठे यांनी योगसाधनेवर भाषण केले. संध्याकाळी विविध गुण दर्शनाचे आकर्षक कार्यक्रम झाले.

२४/१२ ला सकाळी श्री. अनुरुप मराठे यांनी तणाव मुक्त जीवनावर विचार व्यक्त करुन मार्गदर्शन केले. यानंतर कर्नल प्रमोदन मराठे यांनी तरुणांसाठी विकास मार्गदर्शन केले. ते खूपच उपयुक्त ठरले. यानंतर गटचर्चेचा कार्यक्रम झाला. यामधे प्रतिष्ठानकडून तरुणांच्या अपेक्षा, कुटुंबसल्ला केंद्र-काळाची गरज, माझी जीवनातील वाटचाल आणि रक्तगट व वैद्यकीय चाचण्या की कुंडली यापैकी कशाच्या आधारे लग्न ठरवावी? असे ४ विषय ४ गटांना दिले होते. या सर्व विषयांवरील चर्चा खूपच रंगतदार झाल्या. गटप्रमुखांनी चर्चेचा गोषवारा सभेपुढे मांडला. तरुण उद्योजकांशी चर्चा करुन कर्नल प्रमोदन मराठे व श्री. हेमंत महादेव मराठे यांनी तरुणांना मार्गदर्शन केले अनेक कुलबांधवांनी आपली मनोगते व्यक्त केली? अधिवेशनाची सांगता सौ. अनुराधा मराठे यांच्या सुश्राव्य गायनाने झाली यांनी आपल्या बहारदार गाण्यांनी सर्वांना मंत्रमुग्ध करुन सोडले परतीच्या प्रवासाला जातांना सर्वांना तिळगुळ देऊन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. सर्व माहेरवाशीणींची खणानारळाने ओटी भरुन त्यांची पाठवणी करण्यात आली. शेवटी निरोप देतो तुम्हाला हे स्वरचित काव्य सौ. निर्मला मराठे यांनी सादर केले.

या अधिवेशनातील विशेष उल्लेखनीय गोष्टी पुढीलप्रमाणे १) डॉ. र.ल.मराठे व डॉ.कानेटकर यांनी रक्तातील हिमोग्लोबीन तपासण्याची सोय केली होती. २) प्रॉक्टर अँड गॅम्बल कंपनीच्या सहकार्याने केसांच्या आरोग्यासाठी काही चाचण्या घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. ३) चक्रदेवांचे जावई श्री. सुहास दिक्षित यांनी रेल्वेचे काम कसे चालते हे विशद करणारे आकर्षक मॉडेल मांडून त्यानुसार ते माहिती सांगत होते. ४) रौप्य महोत्सवानिमित्त स्मृतिचिन्ह म्हणून कायमस्वरुपी वापरात येईल असे भिंतीवरील कॅलेंडर सर्वांना भेट देण्यात आले. ५) ९१ वर्षाच्या उत्साही तरुण आजी श्रीमती सुशीला दत्तात्रय मराठे यांनी कविता वाचन व नाट्यछटा सादर करुन सर्वांची मने जिंकून घेतली.

८) ८ वे संमेलन – हे अधिवेशन गोव्यातील बिंबल या आडवळणाच्या रम्य वनश्रीने नटलेल्या, घरगुती वातावरणात, अंगणात घातलेल्या चुडतांच्या मांडवात, निसर्गाच्या सहवासात घेण्यात आले दुपारी ३ वा. उद्घाटन सोहळ्यला प्रारंभ झाला सुरवातीला पाच सुहासिनिंनी नऊवारी साडी नेसून हातात पंचारती घेऊन मान्यवरांना ओवाळले. नंतर मान्यवर व्यासपीठावर स्थानापन्न झाले. तेव्हा सौ. शुभदा दीपक मराठे यांनी रचलेले जय व्याड़ेश्वर, जय सिद्धेश्वर हे स्वागतगीत लहान मुलांनी मधुर स्वरात गायले. स्वागताध्यक्ष श्री. सदाशिव नारायण मराठे यांनी मराठी आणि चित्रवानीचा सुरेख संगम साधून आपल्या भाषणांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. या अधिवेशनात विशेष कामगिरी केलेले कुलबंधू व भगिनी ७५ च्या पुढील वृद्ध आणि नववधूंचे सत्कार चाफ्याचे सुवासिक फूल व पुस्तक देऊन करण्यात आले. या अगणित सत्कारांमुळे हे सत्कार संमेलन आहे कां असे अनेकांना जाणवले पालखी या स्मरणिकेच्या संदर्भात बोलतांना श्री. कृष्ण काशिनाथ मराठे म्हणाले की प्रतिष्ठान ही पालखी असून आपण सर्व कुलबांधव या पालख़ीचे भोई आहोत. यावरुन प्रत्येक कुलबांधवांने म. प्र. साठी अविरतपणे कार्यकरीत रहावे असे सूचित केले.

१ मे च्या सकाळी सुरवात श्री. दिलीप कुलकर्णी याच्या पर्यावरण व भारतीय संस्कृती या व्याख्यानाने झाली. त्यांनी भारतीय संस्कृती ही पर्यावरणाशी समतोल राखणारी आहे हे विविध उदाहरणांनी प्रभावीपणे सांगितले. नंतर खुल्या चर्चेला सुरवात झाली. त्यामधे श्री. ह.मो.मराठे यांनी ब्राह्मण समाजाच्या संदर्भात आपले विचार मांडले. चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र डोंगरे यांनी चित्पावन संघ मजबूत करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले यानंतर श्री. कालिदास मराठे यांनी मराठे प्रतिष्ठान पुढील आव्हाने चर्चेसाठी मांडली या खुल्या चर्चेत उत्स्फूर्तपणे अनेक कुलबांधवांनी आपले विचार व्यक्त केले समारोप सोहळ्यात अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली. संध्याकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरवात घुमट आरतीने झाली. अनेक विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम झाले व रात्रीच्या जेवणानंतर गोधळ सादर करण्यात आला. या अधिवेशनातील विशेष

Marathe Pratishthan

उल्लेखनीय गोष्टी पुढील प्रमाणे १) भाजलेले काजू फोडून खाणे हा आगळावेगळा कार्यक्रम झाला. २) दोन्ही दिवस खास गोमंतकीय पद्धतीचा नाष्टा व जेवण होते त्यामध्ये कधी न पाहिलेल्या व खालेल्या नविन पदार्थांचा समावेश केलेला होता ३) सांस्कृतिक कार्यक्रमात खास गोमंतकांतले देखणी, फुगडी हे कार्यक्रम व दशावतारी नाटक झाले. ४) गोवा संमेलनाची आठवण रहावी म्हणून चांदीचे स्मृतिचिन्ह म. प्र. चे अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांनी करुन आणले होते. ५) माहेरवाशीणींची खणानारळाने ओटी भरुन त्यांना पुस्तक भेट देण्यात आले. ६) गोमंतक परिवाराने संमेलनाला आलेल्या प्रत्येक कुटुंबांच्या नावाने दिलीप कुलकर्णी यांच्य मतिमान संतुलन या पत्रिकेची १ वर्षाची वर्गणी भेट म्हणून पाठवली.

९) ९ वे मसंमेलन कर्नाटकातील उडिपी–दुर्ग येथे झाले (कर्नळग्राम) – १ मे ला सायंकाळी परस्पर परिचय आणि विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम झाले.

२ मेला म. प्र. चे कार्य आणि भावी योजनांच्या संबंधी माहिती देण्यात आली. ही चर्चा इंग्रजी व मराठीत झाली. संध्याकाळी चित्पावनांच्या द. कानडा स्थलांतराची ऐतिहासिकता, कानडी मराठे मंडळींची दिनचर्या, दक्षिण कानडातील मंदिरामधील नित्य व प्रासंगिक परंपरा, मराठे मंडळींचे सांस्कृतिक कार्य या विषयांवर कुलबांधवांनी आपले विचार व्यक्त केले. सहस्त्रार्जून व परशुराम आख्यान झाले. परंतु ही सर्व व्याख्याने चित्पावनी व कारवारी भाषेत झाल्यामुळे फारशी समजली नाहीत. रात्री अतिशय सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

३ मेला श्री. विघ्नेश अनंत मराठे यांचे योगावर प्रात्यक्षिकांसह माहितीपूर्ण व्याख्यान झाले. संमेलनाबद्दल अनेकांनी आपली मते व्यक्त केली. कर्तृत्ववान मराठ्यांचा सत्कार करण्यात आला. या अधिवेशनात विशेष उल्लेखनिय गोष्टी पुढीलप्रमाणे १) सर्व उपस्थितांसाठी वाहनांची सोय करुन मराठे मिल्क प्रॉडक्ट, कुटिरोद्योग केंद्र, ग्रॅनाइटचा कारखाना, परशुराम मंदिर व राही कृषीकेंद्रांना भेट देण्यासाठी नेले होते. २) सी. डी. द्वारा बोडण विधीची उत्कृष्ट माहिती देण्यात आली. ३) सांस्कृतिक कार्यक्रमात कु. वेदश्री सोमदेव मराठे हिने भरतनाट्यम व कुचिपुडी नृत्य सादर केले. विशेष म्हणजे डोक्यावर मेणबत्ती घेऊन थाळीनृत्याचा अविष्कार सादर केला. ४) जानव्यासाठी सूतकताईचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. ५) सर्व उपस्थितांना हरिहरेश्वरची फोटोफ्रेम भेट देण्यात आली. ६) कर्नाटकात म. प्र. ची शाखा काढून ती मुंबईला जोडण्याचे ठरले.

अशाप्रकारे आतापर्यंत म. प्र. यांनी म. प्र. चे रोपटे लावले. अशाप्रकारे आतापर्यंत म.प्र. ची ९ अधिवेशने यशस्वीपणे पार पडली. वा. ग. आणि ना. बा. मराठे यांनी म. प्र. चे रोपटे लावले. अनेक कुलबांधवांनी या रोपट्याची कष्टरुपी मशागत करुन पैसारुपी पाणी घातले. त्यामुळे आज म. प्र. चा ३५ वर्षाचा वृक्ष डौलाने उभा राहून अनेकांना सावली देत आहे. म. प्र. ची अखिल भारतीय ९ अघिवेशने हे त्याचेच प्रतिक आहे. त्यामळे दिवसेंदिवस मोठ्या संख्येने कुलबांधव अधिवेशनांना उपस्थित रहात आहेत. अधिवेशनामुळे नव्या ओळखी होतात. जुन्या ओळखींना उजाळा मिळतो, अनौपचारीक गाठीभेटी होतात. त्यामुळे दुःखाचा भागाकार आणि सुखाचा गुणाकार होत असल्याचा अनुभव येतो. विविध विषयांवर चर्चा होऊन विचारांची देवाण घेवाण होतेय त्यामुळे म. प्र. च्या वाटचालीची गती वाढते आणि आपले परस्पर सहाय्याचे उद्दिष्ट गाठून ''परस्परं भावयन्तः'' हे बोधसूत्र अर्थपूर्ण झाल्याचा प्रत्यय येतो.

या अधिवेशनापासून एक गोष्ट मात्र खटकते की यामधे ठराविक कालावधी नाही. मी प्रारंभी दिलेला संमेलनाचा चार्ट पाहिला तर काही अधिवेशने लागोपाठ झाली तर काही संमेलनांमधे खूपच अंतर होते. असे होऊ नये म्हणून म. प्र. ची संमेलने पंचवार्षिक असावीत असे वाटते. पहिल्या (म्हणजे यापुढे संमेलन ५ वर्षांनी कोठे होणार याची घोषणा करावी त्यासाठी गोवा व पुणे सोडून इतरांनी पुढाकार घेऊन अधिवेशनाची धुरा सांभाळावी कारण गोवा व पुण्यात ९ पैकी ६ संमेलने झाली आहेत.

सौ. निलांबरी मराठे (पृ.२८०)
६४३, नारायण पेठ, नू. म. वि. प्राथमिक शाळेसमोर,
अप्पा बळंत चौक, पुणे – ४११ ०३०.
मोबाईल ९४०४२४१७६१

Marathe Pratishthan

## मराठे प्रतिष्ठानची अखिल भारतीय संमेलने

| अधिवेशन क्रमांक | दिनांक व महिना | साल | गाव | स्थळ | वर्गणी माणशी | उपस्थिती | स्वतंत्र अंक | स्वागताध्यक्ष | सुत्रसंचालन | प्रारंभ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २६ व २७ जानेवारी | १९८० | गोवा | वामनेश्वर मंदीर ढवळी, ता. फोंडा | – | ७० ते ८० | – | श्री. मधुकर विष्णू मराठे | – | श्री. रमेश मराठे–गोवा यांचे स्वागत गीत |
| | | | पुरळ | – | – | १५ ते २० | – | श्री.सुरेशभाऊ मराठे | – | |
| | २२ व २३ फेब्रुवारी | १९८६ | गोवा | श्री. रवळनाथ संस्थान मुळगांव (अस्नोडा) | ३५/– | १५० ते २०० | स्मरणिका | श्री. ना. बा. मराठे | – | गणपती अथर्वशीर्ष सौ.खांबेटे– स्वागतगीत |
| | २१ व २२ नोव्हेंबर | १९८७ | पुणे | ज्ञानेश मंगल कार्यालय | ३५/– | २२५ ते २५० | विशेषांक | श्री. शशिकांत भास्कर मराठे | – | वैदिक मंगलघोष |
| | १९ व २० जानेवारी | १९९६ | पुणे | ज्ञानेश मंगल कार्यालय | ५०/– | २५० ते ३०० | – | श्री.सुरेशभाऊ मराठे | सौ. निलांबरी मराठे श्रीमती शुभदा शंकर मराठे | गणेश स्तवन सौ.अनुराधा श्रीसुक्त व वेदपठण सौ मंगला |
| | ४ व ५ ऑक्टोबर | १९९७ | रत्नागिरी | गुरुकृपा मंगल कार्यालय | १५०/– | २०० ते २५० | – | श्री. कमलाकर नरहर मराठे | श्री. भाऊ मराठे | ब्रह्मवृंदाचे स्वस्तिवचन व इतर मंत्र सौ. शुभदा जोशी–स्वागतगीत |
| | २२,२३,२४ डिसेंबर | २००३ | पुणे | ज्ञानेश मंगल कार्यालय | २००/– | २५० ते ३०० | स्वागतिका | विंग कमांडर श्री. यशवंत लक्ष्मण मराठे | माहेरवाशीण सौ. निलीमा पटवर्धन सौ. निर्मला मराठे | वैदिक ईशस्तवन सौ.मंगला गणेश स्तवन श्री. रोहन |
| | ३० एप्रिल व १ मे | २००५ | गोवा | श्री. पुरुषोत्तम विष्णू मराठे यांचे घर बिंबल, खातोडे, सत्तरी | २००/– | २५० ते २६५ | पालखी | श्री. सदाशिव नारायण मराठे | सौ. शुभदा दीपक मराठे श्री. प्रदीप अनंत मराठे | लघुरुद्र श्री. विष्णू पांडुरंग मराठे स्वागतगीत |
| | १,२,३ मे | २००९ | कर्नाटक | श्री हरिहरेश्वर मंदीराच्या प्रांगणातील सभामंडप दुर्गाग्राम, ता. कार्कळ (उडिपी) | | १५० ते २०० | वंश | श्री. विष्णूमूर्ती मराठे | प्राचार्य पद्मभूषण मराठे | अथर्वशीर्ष पठण सामुहिक पवमान पठण |

Marathe Pratishthan

# बोडण एक कुलाचार

लेखिका : सौ. मेधा मराठे,
पद्मश्री, महाराष्ट्र बँकेशेजारी,
विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५

**बोडणाची तयारी**

कोकणस्थांत कांही घराण्यांत काही वर्षानंतर अगर घरात एखादे मंगल कार्य झाल्यावर बोडण भरण्याची पद्धत असते. त्या विषयी काही माहिती पुढे देत आहे.

चैत्र महिन्यांत पौष महिन्यात तसेच चातुर्मासांत बोडण करीत नाहीत. कांही लोकांकडे दसऱ्याला बोडण करतात. त्यालाही कांही कारण असते. सदर बोडण भरण्यासाठी काय तयारी करावी लागते ते अनेकांना माहीत नसते ते माहीत असले तरी अगोदर सर्व तयारी कशी करावी हे माहीत असेल तर वेळ वाया जात नाही व ऐनवेळी गोंधळ उडत नाही. त्यासाठी बोडणाची तयारी कशी करावी या बद्दलची माहिती खालीलप्रमाणे देत आहे. तयारी मुख्यतः १) तुळशीची पूजा व २) देवीची पूजा यासाठी करावी लागते. १. बोडण करायचे असेल तर तीन सवाष्णी, १० वर्षांच्या आतील एक कुमारीका सांगवी... सर्वजणी कोकणस्थच सांगाव्यात. जास्त बोडणे असतील तर त्या प्रमाणे सवाष्णी व कुमारीका सांगाव्यात. तीन सवाष्णी, एक कुमारीका व एक घरची गृहलक्ष्मी अशा पांच जणीने बोडण भरावे. बोडण भरायला सासू सून चालत नाही. दोन सख्या जावा चालत नाहीत.. आई व कुमारीका लेक चालत नाही.

पूर्वी सवाष्णी सांगायला जाताना प्रत्येकीला तेल, शिकेकाई देऊन कुंकू लावून आमंत्रण करायची पद्धत होती. आता कुंकू लावून सव्वा रुपया देतात. सवाष्णींनी बोडणात घालायला घरुन येताना दही दूध किंवा साखर आणावी. तसेच घरुन न्हाऊन यावे. घरुन आल्यावर हातपाय धुवून बसावे.

**तयारी :-** एका तबकामधे घंटा व छोट्या वाटीत देवी ठेवावी.

१) वस्त्रे :– तुळशीसाठी, देवीसाठी व गणपतीसाठी अशी तीन वस्त्रे ठेवावीत.

२) निरसे दूध अर्धा लिटर, तूप, दही प्रत्येकी एक भांडे, एक वाटी साखर, पाऊण वाटी मध.

३) विड्याची पाने सहा, सुपाऱ्या चार, फळ म्हणून खारका ३, बदाम ३, ३ विड्यासाठी दक्षिणा, हळद कुंकू, अष्टगंध, शेंदूर, बुक्का, नैवेद्यासाठी व लेण्यांसाठी छोटी कर्दळीची पाने.

४) फुले, ३१ दुर्वा, २ निरांजने, २ कापूर आरत्या (एक तुळशीसाठी व एक देवीसाठी) एक स्वच्छ धुतलेला लहान नॅपकीन.

५) २ थाट्यांमधे गंध (एक तुळशीसाठी व एक देवीसाठी), अक्षता, अत्तराचा फाया, देवीच्या नैवेद्याला एका वाटीत पंचामृत, गुळ खोबरे.

६) लेणी पाच पानांवर करुन ठेवावीत. कणकेत पाव चमचा हळद घालून दुधात घट्ट भिजवावी व त्या कणकेची लेणी करावीत.

७) वेणी, मंगळसूत्र, चार बांगड्या, २ वेढणी, भंडारा हळदकुंकवाच्या वाट्या हरा डेरा, देवीसाठी आसन, देवीच्या आरतीसाठी स्वतंत्र ताटलीत छोट्या पानावर ५ कणकेचे दिवे व दोन मुटके ठेवून दिव्यात फुलवाती व साजूक तूप घालावे. थोड्या अक्षता बाजूला ठेवाव्यात कापूर ठेवावा.

८) वाट्यात थोडे हळद, कुंकू व हरा डेऱ्यांत थोडे दूध घालावे. लेणी आधी केली असतील तर वाळू नयेत म्हणून झाकून ठेवावीत.

९) कालवते वेळी समई लावून ठेवावी.

**तुळशीच्या पुजेची तयारी**

वस्त्र, हळद, कुंकू, गंध अक्षता, फुले निरांजन उदबत्ती कापूर काड्याची पेटी दूध साखर, विडा व ओटीचे सामान. भांड्यात पाणी (नैवैद्यासाठी)

आरती झाल्यावर तुळशीची ओटी भरावी.

सुवासिनींचे पाय धुण्यासाठी गरम पाणी, भांड्यात दूध, ओटीसाठी तांदूळ, खोबऱ्याचे तुकडे, खारका सुपारी किंवा हाळकुंडे यांनी भरावी. गजरे द्यावेत. प्रथम कुवारणीपासून सुरवात करावी. तुळशीची ओटी व विडा सुपारी कुंवारणीला द्यावी.

**२) देवीची पूजा :-**

१) गणपतीची पूजा

प्रथम समई लावून ठेवावी.

पाटाखाली बोडणाची रांगोळी काढून पराती भोवती पांच

Marathe Pratishthan

पाट मांडावेत. पाटावर अक्षता घालून पितळी किंवा तांब्याची परात ठेवावी.

परातीत मधोमध अक्षता घालून आसन ठेवावे.

परातीत उजव्या बाजूला गणपतीसाठी थोड्या अक्षता ठेवाव्यात.

ताम्हण पळी भांडे घेऊन आचमन करावे.

नंतर गणपतीच्या सुपारीवर पाणी पंचामृत घालून नंतर शुद्धोदक घालावे.

गंध अक्षता पळीत घालून अर्घ्य घालून नंतर शुद्धोदक घालावे.

गंध अक्षता पळीत घालून अर्घ्य घालून सुपारी पाण्याने धुवून पुसून ठेवावी.

नंतर गंध हळद कुंकू अष्टगंध शेंदूर, बुक्का लावावा. वस्त्र घालावे. अक्षता घालाव्यात दुर्वा, लालफुले घालून उदबत्ती ओवाळावी. निरांजन ओवाळावे ओवाळताना घंटा वाजवावी. गूळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा. विड्यावर दक्षणा सुपारी ठेवून उदक सोडावे.

**२) देवीची पूजा :-**

देवी ताम्हनात घेऊन पाणी घालून नंतर वाटीतील थोडे थोडे पंचामृत घालून पुन्हा शुद्धोदक घालावे, पळीत पाणी गंध अक्षता घालून अर्घ्य घालावा. देवी पाण्याने धुवून पुसून आसनावर वस्त्र घालावे. सुवासीक फुले घालावीत उदबत्ती निरांजन ओवाळून पंचामृताचा नैवैद्य दाखवावा. नंतर कालवायला बसलेल्या सुवासिनींनी देवीवर हळद कुंकू वाहून लेणी घालावीत. भंडारा पुढे ठेवावा. हळदकुंकवाच्या वाट्या व हरा डेरा पुढे ठेवावा.

लेणी घालण्यास कुवारणीपासून सुरवात करावी नंतर देवीपुढे विडा दक्षणा फळ ठेवून उदक सोडावे.

पांच पानांवर घातलेला नैवेद्य दाखवावा. कुवारणीने आधी दाखवावा. नंतर कणकेचे दिवे लावून आरती करावी. (गणपतीची व देवीची) कापूर लावावा. नंतर देवीवर अक्षता घालाव्यात. नंतर नैवेद्य खालची पाने काढावीत. प्रत्येकीच्या पानाजवळ दिवे ठेवावेत. उजवीकडून सुरवात करावी. नंतर प्रथम कुवारणीचे व इतर सुवासिनींचे उताणे हात परातीला लावावेत व हाताला साजूक तूप लावावे. कालविण्यास सुरवात करावी. प्रथम पाच पळ्या दूध देवीवर घालावे. (पळीला सोन्याचा गोफ गुंडाळावा.) नंतर उजवीकडून प्रत्येक दिव्यावर दूध घालावे. कुवारणीच्या बाजूने सुरवात करावी. म्हणून कुवारणीला आपल्या उजव्या हाताला बसवावे. नंतर या क्रमाने दही, तूप, साखर, मध पांच पांच पळ्या घालाव्यात कालवताना देवीची स्तोत्रे म्हणावीत. कालवत असतानाच घरातील सर्वांनी नमस्कार करावा. कालवून होत असतानाच कुवारणीकडून वाटीत थोडा अंगारा काढावा. कालवून झाल्यावर सगळ्यांचे पालथे हात परातीला थांबवावेत (कुवारणीपासून सुरवात करुन) नंतर थोडे थोडे पुरण हाताला लावायला देवून थोड्या पाण्याने परातीतच हात धुवावेत. सुपारी पैसे परातीतच धुवून कुवारणीला द्यावेत. परातीतच देवीला पुन्हा आंघोळ घालून तिची पूजा करावी. हळद कुंकू लावून तोंडाला साखर लावावी व देवात नेऊन ठेवावी. परातीतील अंगारा डब्यात ओतून परात निपटून काढावी. पण परात दुसरे दिवशी धुवावी. घरच्या कुलदेवताला व देवीला असे दोन महा नैवेद्य दाखवावेत. देवीचा नैवैद्य कुवारणीला द्यावा. जेवणे झाल्यावर विडा दक्षणा द्यावी. कापड देवून नारळाने ओटी भरावी.

सौ. मेधा मराठे, (पृ. २३५)
विश्रामबाग

# प्रामाणिक प्रवासी

**श्री. मोहन सदाशीव मराठे**

एक प्रवासी आपल्या कुटुंबासह रेल्वेने प्रवास करत होता. रात्रीच्या जेवणानंतर सर्वजण झोपी गेलो. रात्री ११.३० वा. ह्या प्रवाशाने उठून घड्याळाकडे पाहिले. तो अस्वस्थ वाटत होता व घड्याळाकडे सारखा पहात होता रात्रीचे १२ वाजले. ह्या प्रवाशाने उठून तत्परतेने चेन खेचली. गाडी थांबली. गार्ड चौकशी करायला आला त्याने चेन कुणी व का ओढली विचारले ह्या प्रवाशाने त्याला सांगितले, माझा मुलगा माझ्याबरोबर प्रवास करतो आहे. त्याचे मी अर्धे तिकीट काढले आहे. आत्ता १२ वा. त्याला १२ वय पूर्ण झाले आहे व तुम्ही त्याचे. अर्ध्या तिकीटाचे पैसे माझ्याकडून घ्या. गार्डने कपाळाला हात लावला.

५, रामभुवन, अहिंसा मार्ग, खार (प.).
मुंबई ४०० ०५२.



Marathe Pratishthan

# अभागी यमुना

**सौ. जानकीबाई मराठे**

**मुंबई ता. ५ एप्रिल १८९७**

प्रास्ताविक :- सौ. जानकीबाई मराठे यांची 'अभागी यमुना' ही कथा 'तिची कथा' या श्रीमती मंगला आठलेकर संपादित पुस्तकाच्या प्रास्ताविकात सौ. जानकी मराठे यांच्या 'अभागी यमुना' या कथेचा उल्लेख व थोडा भाग वाचायला मिळाला मराठे आडनावामुळे त्यांची ही कथा मिळवावी व 'हितगुज' मध्ये छापली जावी यासाठी प्रयत्न सुरु केले. दोन वर्षापूर्वी 'मिळून साऱ्याजणी' या मासिकात डॉ. वंदना बोकील कुळकर्णी यांची स्त्री लेखिकावरच्या लेखमालेत जानकीबाई मराठे यांच्या या कथेचा उल्लेख मिळाला. त्यांना मी ही संपूर्ण कथा कोठे मिळेल या संबंधी पत्र लिहिले. त्यांनी मुंबई, मराठी ग्रंथसग्रहालय, नायगांव येथे 'मासिक मनोरंजन' अंकात ही कथा मासिक जीर्ण कारणाने स्वतः लिहून घ्यावी लागेल असे सांगितले

५ जूलैच्या मुंबई भेटीत मी या ग्रंथालयाला भेट दिली. श्री संतोष पांगे, ग्रंथपाल यांच्या सहाय्यामुळे मार्च-एप्रिल-मे १८९७ च्या अंक ७-८ मधे पृ. कृ. १७०-१७४ वर ही कथा मिळाली.

जानकीबाई मराठे यांचा परिचय संक्षिप्त मराठी वाङमय कोश खंड १ मध्ये पुढीलप्रमाणे दिला आहे.

मराठे जानकीबाई (काळ अनुपलब्ध) कथा लेखिका. पत्र लेखनाचे तंत्र वापरुन लिहिलेली 'अभागी यमुना' व्यक्तीचित्रणात्मक 'लीला', 'चंपा', 'बापूसाहेब' अशा कथा त्यांनी लिहिल्या.

त्यांनी इंग्रजी कथा अनुवादिलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने कॉनन डामएच्या कथा समाविष्ट आहेत. प्रारंभीच्या काळातील लेखिका म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनिय आहे. स्त्री साहित्याचा मागोवा खंड - १ संपादन - मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरुणा ढेरे, विनया खडपेकर मध्ये पृ.८४-८५ वर 'विधवेचे दुःख' हा विषय त्यात स्त्री कथाकारांनी हाताळला. 'अभागी यमुना' लेखिका जानकीबाई मराठे (मनोरंजन मार्च-एप्रिल १८९७) या कथेत विधवा यमुनेचे आईच्या मृत्युनंतर वहिनी कसे हाल करते हे लेखिकेने दाखवले आहे.

कथेवर 'सौ. जानकीबाई मराठे' असा उल्लेख आहे. मराठे कुलवृत्तांतात त्यांचा शोध घेण्याचा मी प्रयत्न करतो आहे. त्यांनी कथा १८९७ साली लिहिली. याचा अर्थ त्यांचा जन्म १८६०-७० दरम्यान झाला असावा. ती खाली देत आहे.

**कालिदास मराठे**

प्रिय भगिनी गंगू!

तुझें पत्र पोंचले आईच्या अंतकाळी तुला येतां आलें नाही, क्रियाकर्मातरसमयींहीं तुझें येणें झालें नाहीं, या बद्दल तुला अतिशयित दुःख झालें म्हणून लिहितेस. हे दुख वाटण्याचीच गोष्ट ! पण उपाय काय? तूं पुण्याला किंवा साताऱ्याला असतीस तर तुला सहज येतां आलें असतें. परंतु ग्वाल्हेर कांही जवळ का आहे? नुसत्या येण्याजाण्याखालींच पन्नास साठ रुपये उडून जायचे! नारायणरावजींची प्राप्तिही अशी नाहीं, कीं ते एवढा खर्च सोसूं शकतील. त्यांना मिळणार अवघे साठ रुपये. कुटुंबवत्सलाचें घर खायला चार मंडळी. जेमतेम खर्च भागायचीच मारामार ! तूं काटकसरीनें वागतेस म्हणूनच कसाबसा संसार चालला आहे. अशी स्थिती असल्यामुळे, केवळ नाईलाज झाल्याने, अंतकाळी तुला आईची भेट झाली नाही. त्याबद्दल दुःख करुं नकोस. या जन्मी आतां आई कधीही आपल्या दृष्टीस पडणार नाहीं, तिची सेवाचाकरी आपल्या हातून आता कधीही होणार नाही, ही गोष्ट तुझ्याचशी काय, माझ्याही अंतःकरणात सलत आहे.

पण गंगू! आपण रडून रडून नद्याही वाहविल्या, तरी आई आपल्या दृष्टीस पडणार आहे का ग! ती गेली. आम्हांस टाकून गेली. अक्षयी टाकून गेली! आंता तिच्याकरिता शोक करुन काय फळ? तिनें आपल्यास जें सुशिक्षण दिलें आहे, त्याप्रमाणे आपण वागून लोकांकडून भलें म्हणवून घेणें, हेंच आतां आपल्या हाती राहिलें आहे व तसें केलें म्हणजेच आपल्या आईच्या आत्म्याला परलोकी शांतता मिळणार आहे. यास्तव लाडके गंगू! तूं शोक सोडून देऊन आईच्या सदुपदेशाप्रमाणें वागत जा, असें तुला आतां माझें वडील बहिणीच्या नात्याने सांगणें आहें. तूं भिऊं नको. आतां मीच तुला आईच्या जागीं आहे. मलाच तूं आपली आई समज. मी तुला यत्किचिंतही कमी पडूं देणार नाहीं. संसारात लक्ष गुंतवून मनाचे कसेंतरी सांत्वन कर.

तुला आईची भेट झालीं नाहीं याबद्दल तूं नारायणरावजीं समोर कधींही दुःख प्रदर्शित करुं नको. ते पडले पुरुष. आपल्या बायकांसारखी त्यांची स्थिती नसते. आपल्याला दुःख होतांच आपण तें सारें बाहेर ओकून टाकतों. पुरुष आंतल्या आंत झुरत असतात.

Marathe Pratishthan

आपल्यापाशीं खर्चायास पैसे नसल्यामुळे बायकोला पाठवितां आले नाहीं, याबद्दल ते बिचारे अगोदरच कष्टी झाले असतील. आणखी तूं जर अशी एकसारखी शोक करीत बसलीस, तर त्यांच्या मनाची स्थिति कशी बरें होईल? त्यांनी मला जे पत्र पाठविले आहे त्यावरुन त्यांना या बद्दल दुःख झाल्याचे दिसून येत आहे. त्यांचे दुःख तू आणखी दुणावूं नकोस, त्यांच्या मनास ज्या गोष्टींपासून यत्किंचित दुःख होईल अथवा होण्याचा संभव असेल, ती गोष्ट तूं प्राणांतीही करुं नकोस ! स्त्रीला पति हेंच परम दैवत आहे. अनेक जन्मी जेव्हां महान पुण्य करावें, तेव्हाच कुठें पतिसेवेचा लाभ घडतो. म्यां अभागिनीनें पूर्वजन्मी केवढे अघोर पातक केलें होतें नकळे, की आज मी पतिसेवेला अंतरले आहें! असो, या कपाळकरंटेच्या हकीकतींचे स्मरण देऊन मी तुला आणखी दुःखी करुं इच्छित नाहीं.

आईला मरुन अजून पुरता महिनाही झाला नाहीं, तोंच घरामध्यें विलक्षण स्थित्यंतर झालें आहें. दादाची स्थिति पूर्वीप्रमाणेंच आहे. एकना दोन! परंतु वैनीबाईंनी भार उलटापालट करण्याचा धडाका लाविला आहे! बिचारी आपली म्हातारी काशी मोलकरीण आमच्या इथे आजकाल का नोकरीस राहिली होती? तुला, मला नी दादालाही तिनेंच आंगाखांद्यावर खेळविलें. लहानांचे मोठें केलें. आमची दुसरी आईच म्हटली तरी चालेल! त्या बापडीच्यानें वृद्धावस्थेमुळें आता काम होत नाही म्हणून वैनीबाईंनी कालपासून तिला रजा दिली. हाय! तिची त्यावेळची ती अति दीन मुद्रा, अश्रुभरित नेत्र आणि हृदयविदारक रोदन पाहून माझें अंतःकरण कसें दुभंग होऊन गेलें !

काय करुं ? वैनी अशा क्रुद्ध मुद्रेने तिच्या आगांवर आली कीं तिच्यापुढें बोलण्याचे मला साहस झालें नाही ! आणि बोलून उपयोग तरी काय होणार होता ? मलाही भलभलतें ऐकून घ्यावे लागले असतें. आता कांही आपली आई राहिली नाहीं. वैनीचेंच राज्य? अरेरे ! पोर आवडी, काशी जातेवेळीं, कांही केल्या तिच्या कडेवरुन उतरेना. तिचा तिला फार लळा. घट्ट बिलगून राहिली होती. परंतु त्या निर्दय आई वैनीनें जोरानें एक चापटी मारुन पोरीला काशीपासून हिसकावून घेतल्यामुळे तिने रडून रडून आकांत केला. त्यावेळी मलाही फार रडूं आले!

पत्र बरेच लांबले. आज अधिक कांही लिहित नाहीं. रामू आणि लली यांची खुशाली कळीव. आवडी नि विनू कुशल आहेत. दादाही खुशाल आहे. वैनीची अर्धशिशी पुन्हा उठली आहे. कारण दुसरें काय असणार? कुपथ्यच! नारायणरावजींची प्रकृति कशी आहे? उत्तर शीघ्र पाठीव. मार्गप्रतिक्षा करीत बसतें, हे आशीर्वाद.

तुझी बहीण,
यमुना

ग्वाल्हेर, शुक्रवार
ता. ९ एप्रिल १८९७

परम प्रिय ताई!

तुझें पत्र कालच पोंचले. रात्रीच जबाब लिहिण्याचे मनांत होतें, परंतु मुलीने असे भंडावून सोडलें की कांही एक सुचेना ! सटवी फारच दुःख देते. तिकडून किनई तिला अगदी डोक्यावर चढविली आहे. यावेळी रामू शाळेंत गेला आहे. लली निजली आहे, घरात पूर्ण शांतता आहे व म्हणूनच मी हे पत्र लिहिण्यास बसले आहे.

ताई! आईला पाहिल्याला मला आज उणींपुरीं दोन वर्षे झाली गं! या जन्मी आतां तिची भेट होणार नाही हे मनांत आल्याबरोबर अंतःकरण अगदीं भडभडून येते! ती आपल्याला सोडून गेली हे कांही केल्या मनास खरंच वाटत नाहीं! आपल्या माडीवर ती पाय पसरुन बसलीं आहे, तूं तिला महाभारतांतील कथाभाग वाचून दाखवीत आहेस, तें चित्र अजून कसें माझ्या डोळ्यांसमोर आहे गं! मी ज्यावेळीं ग्वाल्हेरीस यावयास निघालें, त्यावेळीं, सज्जलनेत्रांनी मजकडे एकसारखी पाहत असलेली व प्रेमातिशयामुळें कंठ दाटून आल्याकारणानें व्याकुळ मुद्रेनें मला पोटाशी आलिंगून निरोप देते वेळीची ती तिची मूर्ति, आतां या वेळीं माझ्यापुढें कशीं एकसारखी उभी आहे! हाय! आई! आई! तुजसारखें तें अहेतूक प्रेम, आंता या हीनभाग्येवर कोण ग करील? 'गंगू', 'गंगू' म्हणून प्रेमानें आता मला कोण हाक मारील? हा-य, हा-आय्!

ताई! तुझ्यासाठीं आमचें काळीज कसें तिळतिळ तुटत आहे! वैनीचा स्वभाव कळलाना आता तुला? तिच्या पोटात विकल्प भरला आहे. आजवर आपली आई होती त्यामुळें तिला कांहीहीं बोलतां येत नसे कीं करतां येत नसे. परंतु आतां तर ती घरधनीण होऊन बसली आहे. नी तो धनीणपणा पहिल्या प्रथम काशीवर गाजविला! वैनीबाईचे रंगढंग मी केव्हापासून ओळखून आहें. ही गोष्ट मी तुला आजच सांगते आहें असें नाहीं.

Marathe Pratishthan

[illegible] दिवसांपासून सांगत आहें. परंतु मी उगीच [illegible]तरी संशय घेतें असे बोलून तूं मला दूषण देत होतीस व उपदेशही करीत होतीस! ताईसाहेब! आतां तरी [illegible]ना आपल्याला अनुभव, कीं खुळी गंगू बोलत होती तें खोटें नव्हते! तिच्या घराण्यांत कोणची बाई चांगली [illegible] कीं हीच एक चांगली निपजेंल?

तुझें पत्र तिकडेही दाखवले. म्हणायचें झालें कीं, [illegible]दराव पुणेकर परवां पुण्यास जायचे आहेत. मे महिन्याच्या अखेरीस पुन्हा इकडेस येतील. त्यांनाच सांगतो काशीला बरोबर आणायला. राहील बिचारी म्हातारी मुलीला खेळवीत आपल्या इथें! म्हातारीला या [illegible]यात हाकलून लावणाराचें भगवान कधीही बरे करणार नाही. ही हकीकत वाचताच मला तर इतका राग आला आहे ताई! काय करुं ? दादाही अगदी लहानच का अजून? आत तीस वर्से जी म्हातारी तुझ्या घरांत खपत आहे, आपणा सर्वांचे मलमूत्र जिनें काढले, आपल्यास नाचविलें बागडविले, तिला विनापराध तुझी बायको घालवून देते नी तूं स्वस्थ राहतोस? बायकोला कांही बोलत नाहीस? ठीक बाबा! चांगले केलेस! इतका भला माणूस आपण कुठे पाहिला नाही ! मी जर आज मुंबईला असतें तर काय झालें असतें तें झाले असतें, दादाला चांगलाच झाडला असता!

ताई! तूं जी नेंहमीं नेहमी एवढी भीत असतेस, त्या तुला एवढी भीति कसली ग? देवानें तुला अशा दशेस आणले आहे तरी अगदी निराधार केली नाही. बायकोच्या सांगण्याने पाठीशीं पाठ लावून आलेला भाऊ कदाचित् परका होईल, परंतु पाठीस पाठ लावून आलेली बहीण, ताई! कधीहीं परकी होणार नाहीं! तुला तिकडे यत्किंचित त्रास होत असल्यास तूं मोकळ्या मनाने आम्हांस लिहून कळीव. तुला पालखीत बसवून आमच्या घरी आणूं व सगळ्या संसाराची मालकीण तुलांच करुं! तुझ्यासारखी दयाळु बहीण कोणाच्या दैवी आहे?

तिकडच्या सांगण्यावरुन मीं हे एवढ्या जोराने लिहित आहे. आणि माझा स्वभाव तर तुला माहितच आहे. योग्य तें बोलण्यास मी कोणाचीही भीड धरणार नाही. मग प्रत्यक्ष भाऊ असो कीं दुसरे कोणी असो !

आम्ही सर्व मंडळी सुखरुप आहों. आपल्याकडील कुशल कळवावें. दर आठवड्याला पत्र पाठवावें. हयगय करु नये, हे विज्ञापन.

तुझी आवडती बहीण
गंगू

ग्वाल्हेर, मंगळवार
ता. १० एप्रिल १८९७

ताई!

तुझ्याकडून बरेच दिवस पत्र न आल्यामुळे फार काळजी लागली आहे. तुला माझें मागचे ता. ९ शुक्रवारचे पत्र पोचलें की नाही? तुझी तब्बेत ठीक आहेना? तिकडूनही तुला दोन पत्र पाठविणें झाले तरीही तुजकडून उत्तर नाही! तुझा समाचार कळावा म्हणून तिकडून दादाच्या नावें ही एक पत्र पाठविलें होते. पण दादाकडूनही जबाब नाही. याचा अर्थ काय? घरांत कोणी आजारी बिजारी नाहीं ना? वैनीने कांही तंटा भांडण उकरुन काढलें नसेलना? ताई! तुला मी हात जोडतें, तू अशी निर्दय होऊन स्तब्ध राहू नकोस! आईच्या स्नेहाला तर आजन्म अंतरले, आंता माझी थोरली बहीणही तूंच आणि आईहि तूंच! हे पत्र पोचतांत घडीचाही विलंब न करितां, उलट टपालावरून तिकडील सविस्तर हकीकत कळीव. लली आणि रामू खुशाल आहे. पोरीनें तर मावची केव्हा येनाल? मावची केव्हा येनाल? असा एकसारखा ध्यास घेतला आहें. कळावें, हे विज्ञापना.

आपली लाडकी
गंगू.

मुंबई, शुक्रवार
ता. २३ एप्रिल १८९७

प्रियकर गंगू,

तुझी दोन्ही पत्रें योग्य वेळी पोंचली, नारायणरावांचीही पोंचली, कामाच्या गडबडीमुळे आणि मातृशोकामुळें, मन अस्थिर झाल्या कारणानें हा वेळपावतो उत्तर पाठविणें झाले नाहीं. नारायणरावजी मला याबद्दल क्षमा करतीलच. इकडील सर्व मंडळी सुखरुप आहे. आज कित्येक दिवस विनूला किचित ज्वर येत आहे. सध्या कमी आहे.

तूं नेहमी काळजी करीत असतेस हे ठीक नाही. मजकडून एखादे प्रसंगी नियमित वेळीं पत्र न गेल्यास तूं एवढी काळजी कां करतेस? मला तर इकडे वेळ अवेळ नाही. संथपणे पत्र लिहिण्यास संधी सापडत नाही. यामुळे

Marathe Pratishthan

उशीर होतो. तरी तूं भलताच विकल्प मनांत आणून काळजी करु नकोस. माझ्या क्षुद्र जीवाची मेली एवढी मातब्बरी ती काय? वीतभर पोटाची खांच कुठेतरी भरता येईल. माझ्याविषयी कांही एक मनांत न आणतां तूं संसारातच आपलें मन घाल आणि आनंदाने रहा. तूं खुशाल असलीस म्हणजेच मला आनंद आहे. सवडीप्रमाणे पत्र पाठवीत रहा. हे आशीर्वाद.

तुझी हतभागी ताई,
यमुना.

ग्वाल्हेर, सोमवार
ता. २ मे १८९७

ताई!

तुझे ता. २३ एप्रिलचे पत्र आज पोंचले. एवढा उशीर होण्यांचे कारण समजत नाही. पोष्टामध्येंच कांही गडबड झाली होती की काय तें समजण्यास साधन उरले नाही. ललीने सटवीनें पत्राचे कव्हर फाडून त्याच्या चिंध्या चिंध्या करुन टाकल्या!

ताई! तुझी हकीकत आहे तरी काय? तुझें पत्र हातांत घेतल्याक्षणी जीव कसा व्याकुळ होतो. एखादें परकी माणूस, दुसऱ्यास एखाद्या अपरिचित माणसास, जपून जपून जसें एकेक शब्द लिहत असतें. त्याप्रमाणे तूं हे पत्र लिहिले आहेस! फार काळजी घेऊन पत्रातील मजकुर लिहिला आहेस! एकेक हकीकतीवर घटका घटका विचार करुन, घटका घटका थांबून, मग दुसरी हकीकत लिहिली आहेस.

हे पत्र लिहिते वेळची तुझी स्थिती दुसऱ्या कोणास न समजो; परंतु मी तर तुझ्या आईच्या पोटी जन्मलेली तुझी सख्खी बहीण! तुझ्या माझ्या शरीरांतच एकाच आईचे रक्त खेळत आहे. असें असल्यामुळे, पत्र लिहितेवेळी तूं एकसारखे उसासे टाकीत होतीस व अश्रूवर्षाव करीत होतीस याची साद मला तुझें पत्र देत आहे.

ताई ! तूं माझ्याशी मन मोकळें करुन वागत नाहीस. तुझे दुःख तूं गुप्त राखीत आहेस. आजपावतो तूं आपल्या मनातील व्यथा माझ्याशी कधीही लपविली नाहींस, मग आजच माझा असा छळ करणें तुला बरें वाटतें का? तूं तिकडे दुःख करीत राहून तें मला इकडे कळूंही नये व त्यामुळें माझा जीव इकडे रात्रंदिवस खालवर होत असला हें तुला पुरवतेंना! ताई, माझी तुला काहींच का ग दया येत नाही?

तुझ्या पत्रातील शेवटचें एक वाक्य वाचून तर मन अत्यंत व्यथित झाले, पोटाची वीतभर खांच मेली कुठेंही भरेल! असे जें तूं लिहिलेस तें कां बरें ताई! दादा काही बोलला का तुला? वैनीशीं कांही बोलाचाली तर झाली नसेल ना? तुला माझ्या गळ्याची शपथ आहे! तूं मला अशी दुःखात लोटू नकोस. काय प्रकार आहे तो न चोरतां न लपविता सविस्तर लिहून कळीव. मी जर तेंथें असते तर कोणाची मगदूर लागली असती तुला सट् की फट् म्हणायला.

तुझे पत्र वाचून जीव मुळीच थाऱ्यावर राहीनासा झाला आहे. तूं जर या पत्राचे उत्तर मना!पासून सविस्तर नाहीं लिहिलेंस, तर मी तुझीच शपथ वाहून सांगते, मजपाशी जें खिडूक मिडूक आहे ते सारें विकून टाकून मी एकदम मुंबईस निघून येईन. मला अगदीच चैन नाहीसें झाले आहे.

तिकडून अजून कचेरीतून येणें झालें नाही. तिकडच्या येण्याची अजूनही वाट पाहत बसण्यास आजची डांक चुकेल. यामुळें तिकडचे दाखविल्याविनाच आज हे पत्र पाठवित आहे. कचेरीतून येणें होताच तुझे पत्र दाखवून मी जबाब काय लिहिला तोही कळवीन. तिकडचे आणि माझें मन नेहमी एकत्र असतें हें तू जाणत असशीलच. आम्हां उभयतात कोणाही दिवशी आणि कसल्याही बाबतीत मतांतर म्हणून होत नाही.

लली, रामू खूशाल आहेत. पत्राचे उत्तर अगदी जरुर उलट डाकेतून पाठवावे. फार काळजी लागली आहे, हे विज्ञापना.

आपली गंगू.

प्रेषक – श्री. कालिदास मराठे (पृ.५४१) गोवा

---

१८९७ साली जानकीबाई मराठे यांनी ही कथा लिहिली. ही जुनी दुर्मिळ कथा आपले कुलबांधव आणि शिक्षणतज्ञ श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे (गोवा) यांनी परिश्रमपूर्वक, शोध घेऊन मिळविली आणि हितगुजच्या १००व्या अंकासाठी प्रकाशनार्थ पाठविली त्याबद्दल श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे (पृ.५४१) यांचे आभार मानते. तसेच त्यांची सुकन्या सौ. श्वेता कार्लेकर, पुणे हिने इमेल वर ही कथा पाठविली म्हणून तिचेही अभिनंदन.

त्यांचा दूरध्वनी क्रमांक ०८३२-२३१३८०५
पत्ता : श्री २१०, ढवळी, पो. कवळे,
ता. फोंडा, गोवा. पिन-४०३४०१



Marathe Pratishthan

## चित्रकार- ओंकार समीर अग्निहोत्री (पृ.६४८)

श्री. ओंकार समीर अग्निहोत्री याचे वय अवघे तेरावे असून एवढ्या लहान वयात त्याने चित्रकलेचा छंद नुसता जोपासलाच नाही तर वाढविला आहे. कारण अहमदाबाद येथे त्याच्या चित्रांचे प्रदर्शन आर्टगॅलरीमध्ये ३ व ४ ऑक्टोबर असे दोन दिवस भरले होते. लोकांनी गर्दी करुन त्याच्या चित्रांचा देखणा सोहळा अनुभवला. त्यामुळे त्याला चांगले प्रोत्साहन मिळत आहे. ओंकारची तेथल्या (अहमदाबाद) दूरदर्शनवर मुलाखत झाली. त्याच्या चित्रप्रदर्शनाची प्रसिद्धीही दुरदर्शनने दाखविली. स्थानिक वृत्तपत्रात तसेच टाईम्स ऑफ इंडिया मधे ओंकारच्या चित्रप्रदर्शनाविषयचे लेखही प्रकाशित झाले.

त्याला आबाद मुनी ग्रुप तसेच लायन्स क्लब तर्फे सुवर्णपदके मिळाली आहेत. श्रीमती उमा बेडेकर त्याच्या मार्गदर्शक गुरु आहेत. तसेच सौ. अपर्णा अग्निहोत्री आणि श्री. अरविंद अग्निहोत्री या आजी-आजोबांचा पाठिंबा, प्रोत्साहन आणि कौतुक त्याला सतत लाभत असते.

चित्रकलेच्या व्यतिरिक्त त्याला खेळांचीही आवड आहे. इ. ९वीत तो शिकतो. अभ्यासातही त्याची प्रगती उत्तम आहे. चिरंजीव चित्रकार ओंकार हा आपले कुलबांधव श्री. प्रकाश गणेश विद्वांस यांचा नातू आहे. माहेरवाशीण मीनल प्रकाश विद्वांस आता आरती समीर अग्निहोत्री हिचा ओंकार मुलगा आहे.

ओंकारला पुढील ऊज्वल भवितव्याविषयी शुभेच्छा! त्याच्यातला चित्रकार-कलाकार उत्तरोत्तर बहरत राहो, उमलत राहो, प्रगतीपथावर जावो या मराठे प्रतिष्ठान आणि समस्त कुलबांधवांच्या ओंकारला शुभेच्छा आणि शुभाशिर्वाद.

*With Best Complimensts from*


**Satish Aatmaram Marathe**
**PANORAMIC GROUP OF COMPANIES**
**PANCARD CLUBS LIMITED**
Insured with New India Assurance Co. Ltd.
Central Government Registered Co.

**Wants to Invest Money with Good Returns**

Invest money is 3,6,9 year's / Pension Plan Quarterly and Monthly and get returns One and Half time, Double Triple of your Investment respectively. Besides this get Medium, Accidental Death Insurance from New India Assurance Co. Ltd. on you Investment absolutely free.

**DONT WASTE TIME**
Invest Good amount
For Details Contact :-
**Shri. S. A. MARATHE**
Mob. : 9326077413, 9960816797

Marathe Pratishthan




## सवलतीच्या दरात उपलब्ध

# “आमचा कविता संग्रह”

## श्री. वि.म. व सौ. मेधा मराठे
## सौ. विद्या वैशंपायन

पत्ता : ‘पद्मश्री’ विश्राम बाग,
सांगली - ४१६४१५
टेली. ०२३३-२३०००७२
मो. ९४२०६७८९६५

*With Best Complimensts from*

# Uday D. Marathe
## Chief Life Insurance Consultant
Life Insurance Corporation of India

A/7, Garuda Society, Gavanpada,
Vidyalaya Marg, Mulund (E),
Mumbai - 400 081.


Res. : 2565487 Mob. : 9892265644
Email : udaymarathe@rediffmail.com


Marathe Pratishthan

# ‘हितगुज’ च्या
# शतकमहोत्सवी अंकानिमित्त
# हार्दिक शुभेच्छा

## श्री. अशोक वैद्य
## श्री. मुकुंदा नातू
## श्री. चंद्रकांत परांजपे

Marathe Pratishthan



## श्रीमती संध्या सदानंद खांबेटे (पृ.६९६)

### (गायिका)

संध्या खांबेटे या मुंबई विद्यापीठाच्या B. Com पदवीधर आहेत. संगीतामधील संगीत अलंकार (अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय) ही पदवी त्यांनी प्रथम श्रेणीत प्राप्त केली आहे. सुरुवातीच्या काळात ठाण्याचे श्री. वाय. टी. वैद्य यांचेकडे त्यांचे संगीतातील शिक्षण झाले. सं. अलंकार साठी त्यांना कै. डॉ चारुशीला दिवेकर यांचे मार्गदर्शन लाभले. काही काळ त्यांना पं. यशवंतबुवा जोशी यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. सध्या त्या पं. नारायण बोडस यांच्याकडे पुढील शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेत आहेत. आजपर्यंतचा सांगितिक प्रवास केवळ त्यांच्या आई मुळेच झाला असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. अप्रत्यक्षपणे त्यांच्या आई सौ. शुभदा खांबेटे यांनी त्यांच्यावर संगीताचे संस्कार केले व सुगम संगीतासाठी त्या आपल्या आईलाच गुरुस्थानी मानतात.

जवळपास १९९५ सालापासून कळवा येथील स्वरसाधना संगीत विद्यालयात शास्त्रीय संगीत गायन विभागाचे काम त्यांनी पाहिले. तसेच त्यांच्या घरी देखील त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्याचप्रमाणे गांधर्व महाविद्यालयाच्या परिक्षांना विद्यार्थ्यांना बसवितात. गांधर्व विद्यालयाच्या परिक्षा घेण्यासाठी ही त्यांची नियुक्ती होत असते. अनेक संगीत स्पर्धांना परिक्षक म्हणून त्यांनी काम केले आहे.

मुंबई आकाशवाणीवर शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम त्यांनी काही वर्षे केले. दादर माटुंगा कल्चर सेंटर, वाशी, ठाणे तसेच ठाण्याबाहेर त्यांचे शास्त्रीय तसेच सुगम, नाट्य संगीताचे कार्यक्रम झाले आहेत. ठाण्यातील प्रतिष्ठीत प. रामभाऊ मराठे स्मृतीसामारोहमध्ये त्यांनी हजेरी लावली आहे.


संध्या सदानंद खांबेटे (पृ.६९६)  
६०१, बंगश्री टॉवर, दाजी रामचंद्र रोड, चरई ,  
ठाणे- ४०० ६०१  
फोन ०२२-२५३४५९७० मो. ९८६७०७२२४६


## वाचकांचा पत्रव्यवहार

सौ सुमेधा प्रभाकर मराठे,  
संपादिका हितगुज, मुंबई,  
महोदया,

हितगुजच्या ताज्या अंकातील आपण लिहिलेली लघुकथा मला अत्यंत आवडल्याचे मी दुरध्वनी वरुन आपणांस या अगोदर कळविले आहे. त्यावेळी आपण हितगुजच्या १००व्या अंकासाठी काही मजकुर पाठवावा व माझ्या मुलींनाही तसे सांगावे असे सुचविले. उत्तम लेखिका आणि संपादिका मला आपल्यामध्ये आढळली. आपल्या सूचनेनुसार माझी पत्नी सौ .जयश्री हिने लिहिलेला सांगली ते लंडन हा लेख मी पाठविणार आहे. तसेच माझी ज्येष्ठ कन्या सौ. नेहा आठवले मालाड ही तिने लिहिलेल्या दोन ती कविता हितगुज कडे पाठविणार आहे. माझी दुसरी कन्या सौ. निलिमा पटवर्धन लिहिलेली एक लघुकथा 'हितगुज' कडे पाठविणार आहे. सौ. निलिमा ही एम. ए. (संस्कृत) असून आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर मुख्यतः संस्कृत कार्यक्रमाची निर्मिती ही ती करते. माझ्या मुली हितगुज कडे त्यांचे लिखाण परस्पर ई-मेल वरुन बहुधा पाठवतील. हितगुज इ-मेल आयडी हितगुजच्या अंकात नमूद केला जातो. माझ्या पत्नीचा लेख मात्र आम्ही पोस्टाने पाठवू. कार्यक्रमास उपस्थित रहायचा आम्ही प्रयत्न करु.  
कळावे,  
'हितगुज' ला आणि आपणा उभयतांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

आपला  
श्रीराम मराठे (पृ. ४३)

Marathe Pratishthan

# मिशन ए ॲडमिशन

सौ. गायत्री गो. लेले (पृ.२३५)

माझा मोठा मुलगा श्री. गौरांग हा २००२ मधे बारावी परीक्षा पास झाला. त्याला आर्किटेक्ट शाखेत अभियांत्रिकीला प्रवेश पाहिजे होता. त्या वेळी त्याची व आमची काय धडपड झाली या बद्दलचा माझा लेख दै. सकाळ मधे प्रसिद्ध झाला होता. (लेखात त्याचे नांव श्रीराम असे लिहिले आहे). त्याला शेवटी पाहिजे त्या कोर्सला प्रवेश मिळाला. तो शिवाजी विद्यापीठातून बी.आर्च. झाला व नंतर भारती विद्यापीठातून सुवर्ण पदक मिळवून एम. आर्च झाला तसेच U.S. Green Building Council ची LEED AP ची परीक्षा पास झाला. सध्या तो इ.डी.अेस (Energy designs solutions) या कंपनीत असून पुणे ऑफीसचा मुख्य आहे.

बारावीची पीरक्षा संपली व त्यानंतरच्या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा जाहीर झाली, की आपल्या पाल्याला इच्छित अभ्याक्रमासाठी प्रवेश मिळावा म्हणून सुरु होते, मिशन ए ॲडमिशन.

गेल्या वर्षी आम्हाला याच मिशनला सामोरे जावे लागले त्याची ही हकिकत. मिशन ए काश्मीर चित्रपटाचे चित्रिकरण करण्यास लागला नसेल एवढा वेळ या मिशन ए ॲडमिशनला लागतो,असा माझा अनुभव आहे. आपल्या पाल्याला विशिष्ट महाविद्यालयात आणि विशिष्ट अभ्यासक्रमालाच प्रवेश मिळावा, असे वाटत असेल तर, वाजवीपेक्षा कितीतरी अधिक वेळ, पैसा व श्रम खर्च करण्याखेरीज आणि प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जाण्याखेरीज सध्याच्या पालकांपुढे पर्यायच राहिलेला नाही, हे या अनुभवाने आम्हाला पुरेपुर शिकविले.

आमच्या श्रीरामला बारावीत जेमतेम सत्तर टक्के गुण मिळाले आणि आर्किटेक्ट होण्याचे त्याचे स्वप्न बारगळणार असेच वाटायला लागले. पण 'आर्किटेक्ट एन्ट्रन्स' ची वाट अद्याप मोकळी होती त्यात चांगले गुण मिळाले तर सर्व काही सुरळीत होईल या आशेवर आम्ही स्वतःला सावरले . बारावीचा निकाल लागला २२ मे रोजी आणि आर्किटेक्ट एन्ट्रन्स झाली २६ तारखेस. त्यात श्रीरामने कमालच केली आणि तो चक्क पाच जिल्ह्यात पहिला आला. अगदी आनंदाने पेढे वाटावे असे हे यश, पण ज्या दिवशी ॲडमिशन होईल तेव्हा बघू असे म्हणून गप्प बसलो. एन्ट्रन्सच्या परीक्षेसाठी अर्थातच पुण्यात वेगळा क्लास लावला होता . त्याची फी व अन्य खर्चापोटी सहा-सात हजार रुपये खर्च झाले.

एन्ट्रन्सच्या निकालानंतर २-३ दिवसात प्रवेश अर्ज उपलब्ध होतील असे वाटले होते, पण प्रत्याक्षात ते २८ जूननंतर मिळणार असे कळले. दरम्यान इंजिनियरींगचे प्रवेश अर्ज मिळण्यास सुरवात झाली होती. त्यामुळे एक पर्याय हाताशीअसावा म्हणून चारशे रुपये मोजून तो अर्ज भरला. हा अर्ज साधारणतः पाच-सहा हजार मुले भरतात म्हणजे वीस -पंचवीस लाख रुपये महाविद्यालयांच्या खजिन्यात अगदी सहजी जमतात.

आम्हाला खरी प्रतिक्षा होती ती अर्थातच आर्किटेक्टच्या प्रवेश अर्जाची पुनःपुन्हा चौकशी केल्यानंतर कळले की ७ जुलैला नक्की मिळतील परंतु दुपारी तीननंतरच अखेर ओळखीच्या एका प्राध्यापकांनी मदत केली आणि ८ जुलैला तो अर्ज पदरात पडला. किंमत फक्त अडीचशे! हा अर्ज भरणे तसे सोपे नाही. त्यातील 'प्रेफरन्स' नीट भरले नाहीत तर तुमचे काही खरे नाही. त्यात काही घोटाळा व्हायला नको म्हणून मेरीट सीट व पेमेंट सीटचे कोडनंबर घालून दोन वेळा कच्च्या झेरॉक्सवर रंगीत तालीम केली आणि मगच प्रत्यक्ष अर्ज भरला. तो दाखल करण्याची शेवटची तारीख होती १६ जुलै आणि मेरीट लीस्ट लागणार होती ती २३ जुलैला.

युनिव्हर्सिटी मेरीट मध्ये श्रीरामचा नंबर साठावा होता तर महाराष्ट्र मेरीटमधे तो सहाशेव्या नंबरवर होता. म्हणजे आता मेरीट सीट मिळाली नाही तरी त्याची पेमेंट सीट नक्की झाली होती. अर्थात नेहमीप्रमाणे येथेही ३३ टक्के जागा अनुसुचित जातीजमातीचे विद्यार्थी आणि ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव असतात. मेरीट लीस्ट लागली तरी 'ॲलोकेशन लीस्टची 'वाट पाहणे भाग होते. ती २९ जुलैला लागणार असे कळले म्हणून श्रीराम मोठ्या उत्साहाने बुधगाव कॉलेजवर गेला पण परत आला ते मात्र कपाळाला हात लावूनच. 'स्टे' आल्यामुळे ती यादी लागणे लांबणीवर पडले होते. अखेर ८ ऑगष्टला 'स्टे' जी

Marathe Pratishthan

उठला आणि १३ तारखेस 'अॅलोकेशन लीस्ट' जाहीर झाली. 'प्रिन्स शिवाजी मराठात' पेमेंट सीट मिळाली तसे तीस हजाराचा एक व पाच हजाराचा एक असे दोन ड्राफ्ट काढून तेथे प्रवेश घेतला. अर्थात 'सेकंड राऊंड अॅडमिशन' च्या आशा होत्या त्यामुळे 'मेरीट सीट' साठीचे प्रयत्न चालूच ठेवले. पण एक महिना उलटला तरी 'सेकंड राऊंड' ची तारीख जाहीर होत नव्हती. पुढे २९ सप्टेंबरला मुंबईत जे. जे. मध्ये तो राऊंड आहे असे समजले तेव्हा तिकडे जायची तयारी सुरु केली. दरम्यान, जे. जे. चा राऊंड रद्द झाला असून, तो ३ ऑक्टोबरला वालचंदमध्येच होणार, अशी बातमी कानावर आली.

या सेकंड राऊंडमध्ये श्रीरामला मेरीट सीट मिळाली पण ती आम्हाला नको असलेल्या कॉलेजात. आता प्रतिक्षा होती ती तिसऱ्या राऊंडची. मात्र सेकंड राऊंडची अॅडमिशन रद्द केल्याशिवाय त्यात भाग घेता येत नाही. असे समजले. पण सेकंड राउंडला जेथे प्रवेश मिळाला होता तेथील कर्मचाऱ्यांनी पन्नास रुपयांचे रटिस्ट्रेशन करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे एक दिवस कोल्हापूरला जाऊन रजिस्ट्रेशन केले. आणि ७ ऑक्टोबरला श्रीराम मुंबईला गेला. त्याचे नशीब जोरावर होते म्हणून की काय, कराडच्या एका मुलीने कोल्हापूरची अॅडमिशन पुण्याला ट्रान्सफर करुन घेतली आणि मग त्या जागेवर त्याची वर्णी लागली.

२२ मे ते ७ ऑक्टोबर हे साडेचार महिने अॅडमिशनच्या या युद्धात गेले खरे पण शेवट गोड झाला. शेवटच्या राऊंडची शेवटची सीट आमच्या पदरात पडली पण त्यासाठी किती आर्थिक झीज, शारिरीक दगदग आणि मानसिक त्रास सोसावा लागला ते आमचे आम्हालाच माहित.

सौ. गायत्री गो. लेले (पृ.२३९)
लेले वाडा, दिंडी वेस,
मिरज, जि. सांगली पिन – ४१६ ४१०

# रेल्वे

रेल्वेबाई, रेल्वेबाई, किती भरधाव धावताबाई
रुळाशिवाय तुला कधी, चालता मुळी येत नाही ॥१॥
आधी होते नऊ डबे, त्याचे झाले बारा डबे
बाहेरच्या गाडीला ही, असतात पंधरा, अठरा डबे ॥२॥
हिरवा, पिवळा, नीळा, लाल, रंग तुझे किती तरी
मला मात्र आवडतो हा जुना रंग किती तरी ॥३॥
इकडून तिकडून दोन्हीकडून, सदा तू फिरतअसतेस
कामावरच्या लोकांना तू त्यांच्या घरी सोडत असतेस ॥४॥
अमीर गरीब भेद असा तुझ्या मनी कधीं नसतो
सगळयांनाही घेऊन पोटी प्रवास तुझा चालू असतो ॥५॥
दिडशे वर्षापूर्वी तुला, इंग्रजांनी चालू केली
आम्ही आता पुढे जावून कोकणरेल्वे सुरु केली ॥६॥
मालगाडी मधून माल, जिकडे तिकडे नेत असतेस
तुझ्या या फिरण्याने, रोजगार देत असतेस, ॥७॥
तुझी अशी जनसेवा सदा आपली चालू असते
तुझ्या या फिरण्यावर अर्धी मुंबई जगत असते ॥८॥

सौ. ऊषा विठ्ठल लेले (मराठे)(पृ.१२०)
कुर्ला, मुंबई, भ्रमणध्वनी : ९९६९१९८६३३

## SCIENCE - PUZZLE Answer

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 M | 2 I | 3 C | R | 4 O | G | R | 5 A | 6 M |
| 7 G | O | A | ■ | S | ■ | ■ | 8 C | O |
| ■ | N | ■ | 9 G | ■ | 10 S | 11 T | E | M |
| 12 K | I | N | E | 13 T | I | C | ■ | |
| 14 G | C | ■ | 15 O | I | L | ■ | 16 M | N |
| ■ | ■ | 17 C | L | ■ | 18 T | E | A | T |
| 19 R | 20 A | D | O | 21 N | ■ | ■ | 22 P | U |
| 23 D | I | ■ | 24 G | A | 25 S | ■ | ■ | M |
| 26 X | R | A | Y | ■ | 27 N | A | P | ■ |

(Explainatory Notes : Co-carbon monoxide, gc- gas chromatography, mn (Mn) - managenese, cl (Cl) - chlorine, pu (Pu) - plutonium (artificial element), mg (Mg) - magnesium, ca (Ca) - calcium, os (Os) - osmium, tc (Tc) - technetium, kg (Kg) - kilogram, ti (Ti) - titanium, cd (Cd) - cadmium, rdx - Research Development Explosive - chemically it is cyclotrimethelenenitramine, na (Na) - sodium, sn (Sn) - Tin)

Marathe Pratishthan

# SUMMARY OF MY SWIMING LIFE
# DATTATRAY MARATHE
# FROM MAY 1989 TO 2014

| DATE | NAME | EVENT | MEDAL |
|---|---|---|---|
| 17/02/2008 | YMCA | Free Style 50 Mtr. | Silver |
| 18/01/2009 | GMAAA | Free Style 25 Mtr. | Bronze |
| 12/07/2009 | YRS | Free Style 50 Mtr. | Gold |
| 22/01/2012 | MIG | Free Style 25 Mtr. | Spl. Prize Silver Trophy |
| 12/01/2014 | MIG | Free Style 25 Mtr. | Spl. Prize Gold Trophy |
| 02/02/2014 | YMCA | | Spl Prize for oldest Swinner |
| 20/10/1997 | N. Z. PJS | Free Style 50 Mtr. | Silver |
| 07/08/2009 | HVPM | Free Style 50 Mtr. | Gold |
| 08/08/2009 | HVPM | Breast troke 50 Mtr. | Gold |
| 20/09/2008 | LSCTP | Free Style 50 Mtr. | Gold |
| 21/09/2008 | LSCTP | Breast troke 50 Mtr. | Gold |
| 26/02/2010 | 6th National | Free Style 50 Mtr. | Gold |
| 28/02/2010 | 6th National | Breast troke 50 Mtr. | Gold |



श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे (पृ.३३६)
पोहणारे वीर, वय वर्ष - ९०

***Jubilant Enpro :-***

***Dear Mr. Marathe,***

***Wish you a very Happy 90th Birthday !!!!***

*Wish you all the happiness and Joy in the world. May you add more Zest, Josh, Zing and Life to your years and may you be blessed with good Health, Love, Peace and Prosperity.*
*Cheers!!!*

***Pradeep Digvekar***
***Jubilant Enpro Pvt. Ltd.***

Marathe Pratishthan

# प्रेमळ पित्याचे पुण्यस्मरण
# कै. विष्णू नारायण मराठे

लेखक : सदानंद विष्णू – घराणे क्र. ५२ (वेंगुर्ले)
(पृ. ४१४)

कै. श्री. विष्णू नारायण मराठे यांचे श्री. सदानंद मराठे हे द्वितीय चिरंजीव आहेत. त्यांचा जन्म दि. १७ सप्टेंबर १९५२ चा. ते एम.कॉम (कॉस्टिंग) आहेत. प्रथम मुंबईतील शेअर बाजारातील प्रमुख कार्यालयात, अकाउंटस् ऑफिसर म्हणून त्यांनी काम केले. नंतर पटेल रोडवेज मध्ये अकाउंटस् मॅनेजर स्वेच्छानिवृत्ती घेऊन सध्या 'गुंतवणूक सल्लागार' म्हणून ते व्यवसाय करतात. पुढील लेखात त्यांनी वडिलांच्या गौरवशाली कार्याचा घेतलेला आढावा वाचकांना निश्चित प्रेरणादायी ठरेल.

### वडिलांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

दिवाळीच्या सुट्टीची चाहूल लागली आणि आपण कुठेतरी बाहेर जाऊया अशी मागणी माझ्या मुलीने केली. मी हैदराबादला जाण्याचा बेत ठरवला. हैदराबाद का? असे तिने विचारताच, तुला एक गंमत दाखवायची आहे असे तिला सांगितले.

ठरल्याप्रमाणे आम्ही हैदराबादला पोहचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून सिकंदराबादला गेलो. सिकंदराबादला रेल निलायम या भव्य इमारती समोर मोटार उभी राहिली. आम्ही इमारतीच्या जवळ गेलो. इमरातीवर, ही इमारत १९७३ साली पूर्ण झाली, ही रेल्वेची एक विशाल वास्तू आहे. त्यावर हेलीकॉप्टर उतरविण्याची सोय आहे. या वास्तूचे इंजिनियर V. N. Marathe अशी पाटी वाचल्यावर माझी पत्नी व मुलगी चकित झाल्या ३५ वर्षापूर्वी बांधलेली भव्य, भक्कम व विशाल इमारत आजही सर्वांच्या मनात भरते. त्याकाळी एक कोटी रुपये खर्च करुन रेल्वेसाठी बांधली. हा माझा वडिलांचा सर्वांत मोठा प्रोजेक्ट होता.

### त्यांनी केलेली महत्वाची कामे

बरौनी रिफायनरीज – बिहार; एच.एम.टी. – हैदराबाद; वारंगळ रिजनल इंजिनिअरींग कॉलेज – आंध्र; मराठा प्रेस – वरळी; साहित्य सहवास – वांद्रे (पूर्व); शिक्का नगर – गिरगाव; लोकमान्य नगर – माटुंगा; राम सेतू पुल –नाशिक; मराठे उद्योग भवन – प्रभादेवी; स्काऊट पॅव्हेलियन – शिवाजी पार्क; गाजलेल्या सिनेताररका, उषा किरणचा पाली हिलवरील शुभं करोति सुंदर टुमदार बंगला; पोद्दार कॉलेजचा डोम; जुने प्लाझा व अरोरा थिएटर्स

माझे वडिल विष्णु नारायण मराठे यांचा जन्म ३० ऑगस्ट १९१८ रोजी सांगली येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगलीत झाले. माध्यमिक शिक्षण गिरगावातील युनियन हायस्कूल मध्ये झाले. त्यांचे गणित व विज्ञान हे विषय फारच आवडीचे होते. त्यामुळे मॅट्रीक पास झाल्यावर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये सायन्स शाखेत त्यांना सहज प्रवेश मिळाला.

पुण्यात राहून कॉलेजचे शिक्षण घेता, घेता, त्यांनी व्यायाम, पोहणे, तसेच सकाळी उठून पळण्याचा सराव कधी सोडला नाही. इंटरसायन्सला असताना त्यांना त्यावर्षीचे Gold Medal मिळाले. तेथून पुढे त्यांनी पुणे इंजिनिअरींग कॉलेजला प्रवेश मिळवला. शिक्षण पूर्ण करताना त्यांना त्यांच्या वडीलांचा व मोठे बंधू दत्तात्रय मराठे यांचा पूर्ण पाठिंबा होता. वयाच्या दहाव्या वर्षी आईच्या मायेची पाखर हरविलेल्या वि. ना. मराठ्यांना, वडिलांनी ती उणीव कधीच भासू दिली नाही. त्यांनी देखील उत्तम प्रकारे सिव्हिल इंजिनिअर होऊन, वडिलांना यश मिळवून दाखविले.

गणित विषयांचा अभ्यास पक्का असल्याने त्यांनी इंजिनिअरींग करताना Slide Rule कधीच वापरली नाही.

इंजिनियर झाल्यावर त्यांनी कामाची सुरुवात मनमाडला रेल्वे डिझाईन ऑफीसरची नोकरी मिळवून केली. त्यांच्या कामातील नैपूण्य बघून त्यांना कसारा घाटातील रेल्वे पुलांचे डिझाईन करण्याची संधी दिली गेली. ती कामगिरी उत्कृष्ट झाल्याने त्यांची बदली रेल्वेच्या मुंबई येथील मुख्यालयात झाली.

१९४४ साली त्यांचा विवाह वाटेगावच्या

Marathe Pratishthan

दिवेकरांच्या मुलीशी म्हणजे लीला दिवेकर हिच्याशी झाला. काही दिवस ते दोघे गिरगावातील चाळीत राहिले. नंतर माहिमच्या गोरेवाडीत राहण्यास आले. वडिलांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले पण माझ्या आईने मोठ्या धैर्याने त्यांना साथ दिली. सर्व प्रकारे कष्ट सोसण्यात तिने कधीही तक्रार केली नाही. माझ्या आईने सदैव हसतमुख राहून आम्हा पाचही भावंडांचे संगोपन केले. आम्हा सर्व भावडांना शिक्षणाचे महत्व व पुस्तक मैत्री जोपासण्याचे धडे आई वडिलांमुळे मिळाले.

१९४६ साली माझ्या मोठ्या भावाचा जन्म झाला. मुलाच्या बारशाला सोन्याची साखळी करण्यासाठी वडिलांनी त्यांचे Gold Medal मोडले. पण देव पाठीशी सदैव असतो. वडिलांचे कष्ट व त्याग वाया गेले नाहीत. पुढे मोठा झाल्यावर माझ्या मोठ्या भावनेही इंजिनिअरींग मध्ये चांगल्या प्रकारे उत्तीर्ण होऊन Gold Medal मिळवले. धन्य ते माता-पिता!

नोकरी सोडून वडिलांनी स्वतःच Building Contractor & R.C.C. Designer चा व्यवसाय सुरु केला. त्यांच्या हाताखाली काम करणारी बहुतेक सर्व मराठी माणसे होती. त्यातील दहा ते बारा माणसे नंतर खूपच नावारुपास आली.

वडिलांची हुशारी, मेहनत, जिद्द व त्याला आमच्या आईची सर्व प्रकारे कष्ट करण्याची तयारी, समाधानी वृत्ती याची जोड लाभल्याने त्यांच्या वयाच्या केवळ ४० व्या वर्षी वांद्रा पश्चिम मुंबई येथे लिंकींग रोड वर स्वतःच्या मालकीची दोन मजली इमारत उभी राहिली. मातृदेवो भव-पितृदेवो भव हे सदैव मनात जपणाऱ्या माझ्या आई वडिलांनी स्वतःच्या घराला नाव दिले राधा-नारायण, जी वास्तू आजही अभिमानाने ताठ उभी आहे. मी व माझा धाकटा भाऊ आमच्या कुटुंबासह आज या वास्तूतच राहतो. आज आईवडिल हयात नाहीत पण या वास्तूच्या रुपाने त्यांच्या प्रेमाची पाखर आमच्यावर नक्कीच आहे.

विशेष म्हणजे त्यांच्या पुणे इंजिनिअरींग मधल्या मित्रांनी ग्रॅज्युएशनची पन्नाशी व साठी दोनदा एकत्र करुन साजरी केली. ग्रॅज्युएशनचे साठावे वर्ष कॉलेजच्या प्राचार्यांसोबत साजरे केले. त्या सर्व मित्रांनी मिळून सिव्हील इंजिनिअरींगमध्ये शेवटच्या वर्षीचे पहिले बक्षिस माझ्या वडिलांच्या नातवानीच पटकावले. अशा रितीने तिन्ही पिढ्यांनी सिव्हील इंजिनिअरींगमध्ये घवघवीत मिळविले.

त्यांनी त्यांचे उर्वरित आयुष्य, वयाच्या ८३ वर्षापर्यंत समाज कार्यात व मुलामुली, सुना, जावई, नातवंडासोबत सुखासमाधानाने व्यतीत केले.

लेखक : सदानंद विष्णू
घराणे क्र. ५२ (वेंगुर्ले) (पृ. ४१४)

## गौळण

यशोदे तुझा नंदलाला
मुरलीने करीतो खुणा ।।धृ.।।

बसले मी होते रंगमहाली पतीच्या शेजारी
मुरली घेवून कोठली आला तुझाच ग श्रीहरी
बावरले मी अंतःकरणी काय करु
सांगना...........यशोदे तुझा नंदलाला ।। १ ।।

आम्ही गौळणी साऱ्या मिळुनी जातो यमुनेला
गोद्या, पेंद्या सवे घेवूनी आडवी आम्हाला
कळंबावरती घेवूनी मुरली वाजवी ग
तराणा ........ यशोदे तुझा नंदलाला ।।२।।

काय करावे काही सुचेना
आवरी गे मोहना
रागे भरला तुझा शहाणा घालीतो धिंगाणा
एका जनार्दनी विनंती करीते
आवरीरे मोहना ...... यशोदा तुझा नंदलाला ।।३।।

सुधाकर मराठे (पृ.५७), नागांव


**Kuchipudi Dance Academy, Thane**
1st registered institution in
Maharashtra imparting training in
traditional Kuchipudi style.

For enrolment Contact:
Singarmani Suchitra Rane
**9820920462.**
Add.: 1202, Ratnatej, Dhaval Hills,
Gawand Baug, Pokhran Road No. 2,
Thane( West), 400610.



Marathe Pratishthan

# कै. विष्णू नारायण मराठे



जन्म ३१ ऑगस्ट १९१८ मृत्यू १४ डिसेंबर २००१

श्लोक : लोके गुरुत्वं विपरीततां वा स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति ।
माणूस आपल्या सत्कृतींनी आपल्या उज्वल भविष्याचा शिल्पकार बनतो ।।

## यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन

Marathe Pratishthan

# SCIENCE - PUZZLE

डॉ. सुरेंद्रनाथ मराठे (पृ.२८४)
मो. ०२०-२४२३१६८६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | | | 5 | 6 |
| 7 | | | | | | | 8 | |
| | | | 9 | | 10 | 11 | | |
| 12 | | | | 13 | | | | |
| 14 | | | 15 | | | | 16 | |
| | | 17 | | | 18 | | | |
| 19 | 20 | | | 21 | | | 22 | |
| 23 | | | 24 | | 25 | | | |
| 26 | | | | | 27 | | | |

Clues (Horizontal)

1 - one millionth of a gram (10g)
7 - state where National Institute of ocenography is situated.
8 - very poisonous gas-oxide of carbon
10 - the trunk of a tree
12 - a kind of energy possessed by a body by virtue of its motion
14 - abbreviated name of powerful technique to analyse mix of volatile substabces
15 - a greasy liquid / glyceride
16 - (chemical) symbol of an element
17 - (chemical) symbol of an element
18 - nipple
19 - inert - radioactive gas
22 - (chemical) symbol of an element
23 - prefix-represemting magnifude of 'two' e.g. xxoxide, xxbasic etc.
24 - one of the states of matter
26 - electromagnetic radiation technique used to get photographics of bones in the body
27 - the wooly threads on the surface of cloth

Clues (vertical)

1 - (chemical) symbol of an element
2 - a type of chemical bond
3 - (chemical) symbol of an element
4 - (chemical) symbol of an element
5 - a person of highest skill, playing card
6 - term related to mass and velocity of a body
9 - a branch of science dealing with the study of structure of earth
10 - sediment from moving water
11 - (chemical) symbol of an element
12 - commonly used unit of weight in the market of in hospitals (abbreviated)
13 - (chemical) symbol of an element
16 - pictorial or chart like representation of areas e.g. country, streets, rivers, mountains etc.
17 - (chemical) symbol of an element
19 - name (abbrevi) of explosive (chemical)
20 - mixture of gases necessary to breath
21 - (chemical) symbol of an element
25 - (chemical) symbol of an element

Marathe Pratishthan

# द्वितीय वर्ष पुण्यस्मरण



**कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे (पृ.५३८)**
**टिळकवाडी, बेळगांव**

आठवणी निशीदिनी सोबत असती तरी कृपाकटाक्ष तुझा राहो आम्हांवरी

**श्रीपाद नारायण मराठे, बेळगांव**
**सौ. जयश्री (गौरी) सदाशिव परांजपे, गारगोटी**
**सौ. वंदना (प्रियंका) प्रकाश कुलकर्णी, कोल्हापूर**
**निर्वाण तिथी : भाद्रपद वद्य सप्तमी तिथीनुसार यंदा ता. १६-०९-२०१४**

**मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुधा श्रीपाद मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

---

## 'हितगुज' च्या
## शतकमहोत्सवी अंकानिमित्त हार्दिक शुभेच्छा

## बार्शीकर मराठे परिवारातर्फे
## हार्दिक शुभेच्छा

प्रे-मोहन मराठे (पृ.३६५)
खार, मुंबई - ४०० ०५२
फोन - ९८१९९६४७६५

Marathe Pratishthan

# नशीब आणि विचार स्वातंत्र्य
# कैकयीची गोष्ट

सौ. विजया का. मराठे, गोवा

श्रीराम सतरा वर्षाचे झाले. तेव्हा राजा दशरथाने त्यांना युवराजपद देण्याचे नक्की केले. या सोहळ्याची पूर्वतयारी झाली आणि सगळे अयोध्यावासी या समारंभात सहभागी होण्यास उत्सुक झाले.

राणी कैकयीला ही बातमी मिळाली तेव्हा तिला आनंद झाला कौसल्या पुत्र राम तिचा अत्यंत लाडका होता. कैकेयीचा स्वतःचा पुत्र भरत पण त्याच्याहून तिने श्रीरामावर अधिक प्रेम होते. अत्यंत आनंदून जाऊन कैकयीदेवी शारदेच्या मंदिरात गेली. शारदा ही कैकेयीची कुलदेवत होती. आणि कैकेयीस श्रीरामासाठी प्रार्थना करायची होती.

पृथ्वीतलाचे रहिवासी या बातमीने आनंदित झाले होते. पण स्वर्गातील देवनगरी मध्ये एकच खळबळ माजली होती सर्व देव विमनस्कतेने ब्रम्हदेवाच्या समोर हजर झाले.

"हे जन्मदात्या" सर्वदेव एक सुरात म्हणाले "विष्णूने रावणासारख्या दुष्टांचा सर्वनाश करुन असुरांपासून पृथ्वीतलाची सुटका करण्यासाठी श्रीरामस्वरुपाने जन्म घेतला. पण त्याचे पिताजी त्याला युवराज बनवुन अयोध्येतच ठेवण्याच घाट घालत आहेत. श्रीरामाच्या जन्मामागचे मूळ कारण त्यांना माहित नाही. त्यामुळे ते असे घडले आहे. श्रीराम जर कायम अयोध्येत राहिले, तर ते त्यांचे जन्म कार्य कसे करणार? मानवाच्या हातून दैवी योजना कशा धुळीस मिळतात हे चालणार नाही. श्री विष्णू स्वतःच रामावतारात असल्यामुळे या बाबतीत तुम्हीच काही करु शकता. आम्हाला या संकटातून वाचवा. हे ब्रम्हदेवा"

यातून मार्ग कसा काढावा हे ब्रम्हदेवांना सुचले नाही. म्हणून ते इतर देवांसह विद्येची देवता शारदा हिजकडे गेले.

माता शारदेने त्यांची मागणी ऐकली आणि मदतीचे आश्वासन देवून ती तेथून गुप्त झाली. मंदिरात राणी कैकेयी श्रीरामसाठी प्रार्थना करीत होती. तिथे देवी शारदा प्रकट झाली.

शारदेच्या दर्शनाने कैकेयीस कोण आनंद झाला! शारदा तिला म्हणाली "माझ्या लाडक्या बाळे, तू माझी एक लाडकी भक्त आहेस आणि मी तुला यापूर्वी अनेक वर दिले आहेत. आज मात्र मीच तुझ्याकडून एक वरदान मागण्यास आले आहे तो तू मला देशील का?"

कैकेयी काही क्षण अवाक् होऊन उभी राहिली. मानव आणि देव यांचे संबंध इथे उलट होऊन पहात होते. नेहमी मानवास देवतेचे आशीर्वाद मिळतात. इथे देवताच तिच्या कडे झोळी पसरुन उभी आहे.

परंतु शारदा भक्त कैकेयीने लगेच होकार दिला. मग देवी शारदेने तिला आपल्या मागणी मागचे कारण सांगितले. पुढे ती म्हणाली "काही काळापूर्वी तु दशराथाला एका कठीण समयी मदत केलीस. तेव्हा त्याने तुझ्या दोन इच्छा पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. तू तुझ्या मागण्या राखून ठेवल्या होत्या."

आता या समयी तू राजापूढे तुझ्या मागण्या ठेवाव्यात अशी माझी इच्छा आहे. एका मागणीद्वारे त्याने श्रीरामास चौदा वर्षे वनवासास पाठवावे आणि दुसऱ्या मागणी नुसार तुझा पुत्र भरत यास युवराज पदाची धुरा सांभाळण्यास द्यावी.

देवीचे हे शब्द ऐकून राणी कैकेयीला भयंकर हादरा बसला. देवी शारदा इतकी क्रूरपणे का बोलते आहे? माझ्या लाडक्या रामाला जंगला मध्ये वनवासाला पाठवायचे कशासाठी? आणि ते ही जेव्हा त्याला युवराज बनवायचे ठरविले आहे तेव्हा? ही तर क्रूर थट्टा आहे. की रामाच्या जागी त्याचा धाकटा बंधू भरत याला युवराज बनवायची सूचना देवी करते आहे? आणि हे सगळे मी करायचे। मी, राणी कैकेयी? या जगामध्ये मग कैकेयीहून अधिक दुष्ट कोण असेल?

कैकेयीचे मन सैरभैर झाले. तिला भोवऱ्यात सापडल्यागत वाटले. तीची परिस्थिती पाहून देवी शारदेने तिला सावरले. देवी म्हणाली "मुली तुला वाटते ना, मी दुष्ट हृदयहीन आहे? परंतु तुला हे माहित नाही की, मी हे का करते आहे."

श्रीराम कोण आहेत तुला माहीत आके का? ते ती

Marathe Pratishthan

केवळ दशराथाचे आणि कौसल्याचे पुत्र नाहीत. लक्ष्मण-भरताचे बंधू नाहीत. ते प्रत्यक्ष विष्णूचे अवतार आहेत. रावणासारख्या दुष्ट प्रवृत्तीचा या जगातून नायनाट करण्यासाठी आणि पुन्हा या जगात धर्मराज्य आणि सुखशांती आणण्यासाठी श्रीरामांचा जन्म झाला आहे. या कार्यासाठी रामास या राज्याच्या बाहेर, खूप दूर, दक्षिणेकडे जाण्याची गरज आहे. त्याचा असा युवराज्याभिषेक झाला तर हे कसे शक्य होणार. तू भावनावश होऊन केवळ स्वतःचा आणि अयोध्येचा विचार करु नको. या जगातील सर्व जीवमात्रांचा विचार कर. दैवी शक्तीच्या या योजनेत हातभार लाव. हा अयोध्येतला सोहळा थांबव. श्रीराम चौदा वर्षानंतर यशस्वीपणे परत येतील आणि मग अनेक वर्षे राज्या करतील. तो पर्यंत तुझ्या भरताला राज्य सांभाळू दे.

"पण माते हे माझ्याच्याने होणार नाही. मी दैवी शक्ती नाही. मी एक सामान्य माता आहे. श्रीरामावरच्या ममतेला झुगारुन, राजा दशरथाचा कायमचा रोष पत्करुन जगण्याची माझी शक्ती नाही."

"अख्खे जग मला दोष देईल. सर्वात दुष्ट स्त्री म्हणून माझी अवहेलना होईल. तुम्ही देव मंडळी मला आशीर्वाद द्याल, पण साऱ्या जगाचा दुष्टीने मी कायमची दुष्ट स्त्री बनेन ते तुम्ही कसे थांबवू शकाल?"

"नाही"देवी शारदा म्हणाली. "माझ्यावर विश्वास ठेव. योग्य वेळ आल्यावर मी एवढे करेन की तुझे खरे रुप, तुझी रामभक्ती आणि जगासाठी तू केलेला हा महान त्याग लोकांच्या लक्षात यावा."

एवढे संभाषण झाल्यावर राणी कैकेयीकडून आश्वासन घेऊनच शारदा अंतर्धान पावली. स्वर्गातील सर्व देवांनी सुटकेचा श्वास सोडला. शारदेला दिलेले वचन कैकेयीने पाळले. राजा दशरथाकडे जाऊन तिने आपाला हटट् पुरा करुन घेतला. त्याप्रमाणे श्रीरामाला चौदा वर्षे वनवासाला पाठवले गेले.

प्रसिद्ध राम-रावण युद्धात रावणाचा मृत्यु आणि अवघ्या राक्षससेनेचा विनाश झाला आणि विजयी श्रीराम अयोध्येस परतले. त्यांनी स्वतःच राजा दशरथाला शारदा कैकेयी भेटीचे वृत्त आणि कैकेयीने केलेल्या त्यागाची माहिती दिली आणि रामाच्या विनंती नुसार दशरथाने कैकेयील क्षमा केली.

वेद व्यास रामायण या पवित्र ग्रंथामधील ही दुर्मिळ क था य कथेतून कळते की दैवी नियमांप्रमाणे चालणारे नशीब आणि मानवी कर्मावर अवलंबिलेले व्यक्ती विचार स्वातंत्र्य यांच या विश्वाच्या योजनेत स्वतंत्र कार्ये असतात आणि ती आधीपासून ठरलेली असतात.

सौ. विजया का. मराठे
विद्यानगर, अन्नपूर्णा निवास,
खोर्ली, म्हापसा, गोवा


## तृतीय पुण्यस्मरण

**कै. सौ. रोहिणी प्रकाश विद्वांस (पृ६४८) अहमदाबाद**

निर्वाण तिथी- अश्विन शु. १५ (कोजागीरी पौर्णिमा) २०११ सन
यंदा ८-१०-२०१४

**श्री. प्रकाश गणेश विद्वांस - अहमदाबाद**
**सौ. आरती समीर अग्नीहोत्री - अहमदाबाद**
**सौ. अश्वीनी अमीत जोशी - ठाणे**
**मिलिंद प्रकाश विद्वांस**

**मराठे प्रतिष्ठान द्वारा सौ. रोहिणी प्रकाश विद्वांस यांना विनम्र श्रद्धांजली**


Marathe Pratishthan

# योगासने-
# सर्वांगीण स्वास्थासाठी

सर्वांगीण स्वास्थासाठी योगासंनासारखा दुसरा व्यायाम नाही शरीरातील विविध ग्रंथींना फक्त योगासनामुळेच आराम मिळतो सूर्यनमस्कार हा योगासनांतील सर्वांगीण व्यायामप्रकार आहे. सूर्यनमस्कारांत ५-६ योगासने समाविष्ट आहेत.

स्थिरसुखआसनम् हे योगासनाचे प्रमुख सुत्र आहे. शरीरावर अजिबात ताण वेडावाकडा देऊ नये. जबरदस्तीने योगासने करु नयेत. योग कर्मसु कौशलम् आपल्या दैनंदिन व्यवहारात कामे कुशलतेने, सहजतेने पार पाडता येतात. योगाच्या अभ्यासामुळे योगासने कधी सुरु करावीत याला वयाची कुठलीही अट नाही. मानसीक आजार तसेच शारिरीक व्याधी यावर योगासनांसारखा रामबाण ऊपाय नाही.
योगासने नियमित करावी त्यामुळे त्याचा फायदा होतो

श्री. प्रभाकर दामोदर मराठे (पृ.१२०)

यांच्या पुणे येथील मराठे प्रतिष्ठानच्या सातव्या अधिवेशनातील दि. २३-१२-२०13 ला संपन्न झालेल्या भाषणातील हा सारांश.

# कृतार्थ

नियतीच्या फटक्यात एका होत्याचे होई नव्हते
तुझ्या जगातील खेळाचा हाच खरा अर्थ आहे...
जीवन हे जगण्यासाठी मन तुझा आधार शोधीते
तुला आळवणे, भक्ती करणे आमुचाच स्वार्थ आहे...
घडते काही अतर्क्य जेव्हा तुझे अस्तीत्व कळे
तूच या जगताचा त्राता नाव तुझे हे सार्थ आहे...
हे मी केले, ते मी केले नको बढाया बुद्धीच्या
काय तुझे अन काय माझे हिशेब सारा व्यर्थ आहे...
लोभ मोह अहंकाराचे मनावर जे कीटण चढते
ते सारे दूर करण्यास नाम तुझे समर्थ आहे...
ध्येय बघणे अन् कर्म करणे मर्म आहे जीवनाचे
तरी तू दिलेल्या दानातच जीवन माझे कृतार्थ आहे...
कृतार्थ आहे...

सौ. भाग्यश्री दत्तात्रेय मराठे (नागपूर)
प्रेषक - श्री. श्रीनिवास मराठे, दादर (पृ.

## 'हितगुज' च्या
## शतकमहोत्सवी अंकानिमित्त हार्दिक शुभेच्छा

नामस्मरणाचे व भक्तीचे संस्कार करणारे सदाचरणी, निस्पृह
माझे वडील वैकुंठवासी श्री. केशव वामन भातखंडे
पी.एच.डी. प्रबंधासाठी मागदर्शन करणारे माझे मार्गदर्शक कै. वसंत विठ्ठल पारखे
माझे संपादक गुरु स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कृतीशील अनुयायी
श्री. विक्रम नारायण सावरकर
यांच्या स्मृतीला विनम्र हार्दिक आभिवादन

डॉ. सुमेधा प्रभाकर मराठे

Marathe Pratishthan

'हितगुज'

शतक महोत्सवी अंक

## हार्दिक शुभेच्छा

# श्री. उत्तम जोशी
# श्री. मनिष जैन
# श्री. कमलेश

Marathe Pratishthan

बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्य चिरकाल टिकणारे असते हा विचार गमतीशीरपणे सुचविणारी ही कविता

## ध्यास मनीचा

जन्मसिद्ध हक्क हा स्त्रीचा, नटण्या मुरडण्याचा
सर्वांमध्ये सुंदर दिसणे, ध्यास हा मनीचा ।।धृ।।

काय नेसू आज मी बाई, काय नेसू आज
दिवस आज आहे बाई, मंडळात खास
क्वीन मंडळाची बनणे, क्षण प्रतिष्ठेचा
मैत्रिणीस सर्वही माझ्या खास जळवण्याचा।।१।।

कालचीच साडी सुंदर, तरी नेसणार नाही
मान सतत ठेवते मी, रिपीट साडी होणे नाही
सदा यत्न त्यांचा मला कमी लेखण्याचा
आता चान्स देणार नाही मला हरवण्याचा ।।२।।

भारी साडी वरती शोभे, सेट हा हिऱ्यांचा
मेकअप, पर्स, चप्पल, थाट जमला मॅचिंगचा
आता क्षण जवळी आला, क्वीन बनण्याचा
जन्मभरीचे हे स्वप्न पूर्ण करण्याचा ।।३।।

स्टेजवरुनी येताना पाय घसरला
मैत्रिणींचा सावरण्याला हात पुढे आला
हाच वेळ, हाच क्षण, धुंदी उतरण्याचा
मित्रमैत्रिणी हा ठेवा सदा जपण्याचा ।।४।।

बाह्यसौंदर्याची छाप, काही क्षणांची
आंतरीक सौंदर्य ही शिदोरी जन्माची
दिसण्यापरी सुंदर असणे ध्यास मग मनीचा
तेच खरे सत्य आहे,मार्ग तो सुखाचा ।।५।।

सौ. सुलभा सुरेंद्रनाथ मराठे (पृ. २८४)
बिबवेवाडी, पुणे - ३७
फोन : ०२०-२४२३१६८६

## टीक्कर

टिकरीचा खेळ खेळतानाच शिकले
चौकटीतून बाहेर न पडण्याचा नियम
जर खेळात टिकून राहायचं असेल कायम
काचापाणी खेळतानाच शिकले
हळुवारपणाची गंमत दुसऱ्यांना न दुखवता
आपल काम करण्याची करामत!
लपाछपी खेळतानाच शिकले
लपायची अन हळूच अवतरण्याची मजा
इतर सगळ्या चकव्यांची गुंगाऱ्याची
वाटत नाही आता सजा
आंधळ्या कोशिंबिरीने शिकविले
अंधारातून कसा घ्यायचा अंदाज
मिट्ट काळोखातून आत्मविश्वासानं
पावल टाकण्याचा बाज
भातुकलीत रमता रमता बालपण सरलं
अगदी नकळत असेल त्याच्यात
आनंदान दिवस साजरा करत करत

सौ. नेहा आठवले (पृ. ४३)
मालाड मुंबई

## दादाचं घर बाई उन्हात

तुझी नि माझी जंमत वहिनी ऐक सांगते कानात
आपण दोघी बांधू या ग दादाचं घर बाई उन्हात
उगाच करतो खोडी ग, मलाच म्हणतो वेडी ग
तुला चिडवितो, मला रडवितो आणिक हसतो गालात
खेळ मला ग आणी ना, साडी तुजला देईना
ऐट दाखवी वरती आणिक सदा तो अपुल्या तोऱ्यात
वहिनी का ग हिरमुसली? नकोच का शिक्षा असली?
फितूर होशिल दादाला ही शंका येते मनात

गीत - जयंत मराठे संगीत - यशवंत देव
स्वर - आशा भोसले

प्रेषक - श्री. शैलेन्द्र भास्कर मराठे (पृ.०१७)
दहिसर मुंबई , मो. ९८२०४०४५५४

Marathe Pratishthan

# जीवन जगण्यासाठी गीता

सौ. माधवी कमलाकर जाईल (पृ.७५३)

।। ॐ नमो भगवते वासुदेवाय ।।

वसुदेवसुतं देवं कंसचाणूर मर्दनम् । देवकीपरमानंन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।।

अशा या जगद्गुरुने मोहग्रस्त अर्जुनाचे निमित्त करुन आपल्या सर्वांच्या कल्याणासाठी अर्जुनास गीता सांगितली.

''श्रीमत्भगवतगीता'' हे वैदिक विद्येचे सार आहे, आणि वैदिकसाहित्यातील सर्वात महत्वाचे उपनिषद आहे. गीता आपल्याला जीवन जगण्याची कला शिकविते.

भगवंत म्हणतात मनुष्य जन्म हा एक अमोल ठेवा आहे. परब्रह्माला जाणून घेणे हे या जीवनाचे सार्थक आहे.

भगवंताच्या इच्छेने सर्व घटना घडत असतात. त्याच्या इच्छेवाचून झाडाचे पानही हलत नाही. आपण श्रद्धा आणि विश्वास ठेवून त्याच्या चरणी लीन झालो की तो तुमचाच होतो.

आपल्या देहरुपी मंदिराच्या गाभाऱ्यात भगवंताचे अधिष्ठान आहे. भगवंताचा एक अंश प्रत्येकाच्या ह्दयात चैतन्य रुपाने रहात असतो. म्हणून प्रत्येक माणसांत, प्राण्यात भगवंत आहे. म्हणूनच आपण प्रत्येकात देव बघावा भगवंताला नमस्कार करताना, दोन हात जोडताना तुमचे ह्दय व त्याचे ह्दय एकरुप होऊदे.

कर्तव्यासाठी कर्तव्य. प्रेमासाठी प्रेम, कर्मासाठी कर्म ही श्रीकृष्णाची मौलीक शिकवण आहे. मनुष्याची अध्यात्मिक प्रगती पायरी पायरीने होत असते. तो स्थूलापासून सूक्ष्माकडे, सुक्ष्मापासून, सुक्ष्मांतर विचारांकडे जात जात अखेरीस अंतीम लक्ष्य जे अनंतपूर्णत्व ते तो प्राप्त करुन घेतो. भगवंत म्हणतात – तुम्ही स्वरुपतः शुद्ध, बुद्ध, मुक्त साक्षीस्वरुप आत्मा आहात, त्या तुमच्या स्वरुपाचा लोप कधी झाला नाही, आणि कधी होणार नाही.

आपल्या दुःखाचे कारण कर्म नव्हे तर आसक्तीच आपल्या दुःखाचे कारण आहे. धनवान होणे फार चांगले आहे पण श्रीकृष्णाचा उपदेश असा आहे, की अर्थोपार्जन कर, पैशासाठी प्राण पणास लावून प्रयत्न करा, परंतु त्यावर आसक्त होऊ नका, पती–पत्नी, पुत्र, कन्या, आप्तेष्ट–मान–यश वैगरे सर्व बाबतीत हाच उपदेश आहे. तुम्ही या साऱ्यांचा त्याग करण्याचे कारण नाही, तशी आवश्यकताही नाही. फक्त एवढेच लक्षात ठेवा की त्यावर कधी आसक्त होऊ नका. अनासक्तीने सर्व करा परंतु कशातही स्वतःला गुरुफटून घेऊ नका. अनासक्तीचा भाव आत्मसात केल्या नंतर मग तुमच्या दृष्टीने भले किंवा बुरे, शुभ–अशुभ काहीच राहणार नाही. स्वार्थच भल्या बुऱ्याचा भेद उत्पन्न करतो.

आपली दृष्टी साफ करणे आणि प्रगतीच्या व उन्नतीच्या मार्गावर वाटचाल करीत असलेल्या मानवजातीकडे विशाल दृष्टीने पहावयास लावणे हे भगवंताचे थोर कार्य आहे.

जगात ज्याला पाप म्हणता येईल असे जर काही असेल तर ते भय आहे. अर्जुन जेव्हा असाह्य होऊन मी युद्ध करणार नाही असे म्हणतो, अर्थात असे प्रसंग आपल्याही जीवनात येतात.

गीतेतील –

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्वय्युपपद्यते ।

क्षुद्रं ह्दयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।३।। (अ. २ रा.)

हा एकच श्लोक समजून घेतला तरी सारी गाता वाचल्याचे पुण्य लाभेल या एका श्लोकात गीतेचे सर्व सार साठलेले आहे. भगवंत म्हणतात – तुझ्याठायी पापाचा लेशही नाही, तुझ्या ठायी दुःखाचा कणही नाही, तू सर्व शक्तिचे भांडार आहेस तेव्हां ऊठ आणि स्वतःचे दिव्य स्वरुप प्रगट कर. हे लक्षात ठेवले की तुम्ही कुठल्याही प्रसंगाला सहज सामोरे जाल. दुबळेपणाच्या साऱ्या कल्पना कुठल्या कुठे नाहीशा होतील.

आपली मनोवृत्ती जशी असेल तसे आपल्याला जग दिसते, आपले विचार वस्तूंना सुंदर बनवितात, तसेच आपले विचार त्यांना कुरुप बनवितात. सारे जग

Marathe Pratishthan

आपल्या मनांत असते. फक्त प्रत्येक गोष्टीकडे योग्य दृष्टीने पहा.

तुम्ही केलेल्या कर्मानुसार तुमचा भूतकाळ भविष्यकाळ प्रारब्ध हे त्याला माहित असते. योग्य वेळी व योग्य ते फळ तो तुम्हाला देत असतो. हा भगवंत कुणाला फुकट काही देत नाही, नामदेवराय लडीवाळपणे भगवंताची थट्टा करताना म्हणतात – देशी तेव्हा देशी ऐसा असशी उदार तू! संसारात आपल्याला आपल्यासाठी रहायचे नाही तर संसारासाठी आपण रहायचे, ही संसारात रहाण्याची विद्या गीता शिकविते सत् अर्थात परमेश्वराची सार्वत्रिक सत्ता मान्य करावी, आणि असत् म्हणजे व्यावहारिक सत्तेत मोडणाऱ्या गोष्टींची कधीही सत्ता असत नाही, हे ओळखावे.

गीतेत भक्ती या विषयाचे पुनः पुनः वर्णन आहे. भक्तितत्वाचे जे सार आहे त्याची परिसीमा गीतेत आहे. याचा अनुभव आपण वारकरी जेव्हा पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनास जातात तेव्हा येतो.

चंद्रभागेच्या वाळवंटी सर्व वारकरी संतमेळा जमल्यावर या भक्तिप्रेमाच्या महापूरात तहानभूक, निद्रा केव्हांच वाहून जातात आणि उरते ते एकच नाम पांडुरंग, पांडुरंग यापांडुरंगाच्या नामघोषात पांडुरंग ही रंगून जातो. ''अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग'' अशी अवस्था होते. सर्व वारकरी देवदर्शनाचा सुखद आनंद घेतात सारे व्याप ताप त्याच्या पायी वाहून चिदानंद अमृतानुभव घेतात, आणि परत जाताना साऱ्या संसार तापाला समर्थपणे तोंड देण्याची शक्ति अनन्य भावाने पांडुरंगाकडे मागतात. घरी आल्यावर त्याच संसार चक्रात सापडतात. पण मनांत पांडुरंगाचे स्मरण करुन, त्या प्रसंगाला तोंड देतात.

भक्तिला ज्ञानाची जोड मिळाली की हा संसाराचा भवसागर सहज तरुन जातो. अज्ञानाची काळोखी नाहीशी होऊन, स्वच्छ प्रकाश पडला की ब्रह्मदर्शन घडते. तुकाराम म्हणतात –

देव पाहवया गेलो, तेथे देवची होऊनी ठेलो । आठव नाठव गेले भावाभाव ।

मोक्षाच्या मार्गाने जाण्यासाठी सद्गुरुंची कृपा झाली की आपल सर्व आयुष्यचं बदलून जाते. तो आपल्याला भगवंताकडे जाण्याचा योग्य मार्ग दाखवतो.

आम्ही कोण? कशासाठी आलो? व काय करायचे एवढे ज्याला कळले की त्याचा परमार्थ पार पडला म्हणून समजावे.

भगवंत म्हणतात – कशाचीही अपेक्षा न करता सर्व कर्मे भगवंताला अर्पण करुन त्याच्या चरणी लीन व्हा.

प. पू. भक्तराज म्हणतात – या जीवनात आपली भूमिका एका पाहुण्याची असावी. आपण पाहुणे आहोत, आणि पुन्हा आपल्याला आपल्या घरी जायचे आहे. ही जाणीव ठेवावी. बाईने कसाही स्वयंपाक केला तरी पाहूणा त्याला चांगलाच म्हणतो. तो सर्व गोष्टी गोड मानून घेतो. त्याचप्रमाणे आपण जीवनातील सुख दुःखाचा आनंदाने स्वीकार केला पाहिजे. आपल कायमच घर प्रभूचरणाशी आहे. आपण आपल्याघरी रागावतो, हट्ट करतो, रुसतो म्हणून परमेश्वराशी भांडाव, रागवाव, रुसाव त्याच्याकडे हट्ट करावा. पाहुणा त्याचे वास्तव्य संपल की सगळ्यांचा निरोप घेऊन आनंदाने आपल्या घरी जातो. म्हणून देह सोडताना जीव आनंदाने वेडा व्हावा कारण तो आपल्या घरीजात असतो.

''आशा करावी परमेश्वराची । करु नये कधी व्यर्थ नराची ।।''

सौ. माधवी कमलाकर जाईल
(पृ. ७५३)
फ्लॅट नं. १५, आदित्य नाकोडा,
के/५, गौरीशंकर, सिंहगड रोड,
पुणे – ४११ ०३०.

## आरोग्यं धनसंपदा -

१) १०० ग्रॅम गुळामध्ये ८० मि. ग्रॅ. खनिजद्रव्ये/क्षार असतात अर्थातच लोह त्यातले मुख्य ! एक चमचा (५ ग्रॅम ) गुळामधून २० कॅलरीज मिळतात.

२) साखरेत कॅलरीज असतात, पण क्षार नाहीत. ऊन्हातून आल्यावर त्वरीत कॅलरीज व पाणी मिळण्यासाठी गूळ-पाणी देण्याची पद्धत चहा च्या फर्माईशीपेक्षा नक्कीच चांगली.

३) नाचणीलाडू, मूगाचा लाडू, मेथीचे लाडू, डिंक लाडू रुचकर व स्वादिष्ट पौष्टिक तत्वांनी बनविला जातो. त्यापासून सांधेदुखी, मधुमेह, कंबरदुखी, रक्तशुध्द, हिमोग्लोबीनची कमतरता भरुन काढणे, अशक्तपणा दूर करणे बाळतीणीसाठी (प्रसुतीनंतर) उपयुक्त असे अनेक फायदे आहेत.

Marathe Pratishthan

'हितगुज'

शतक महोत्सवी अंक

# हार्दिक शुभेच्छा

## श्री. प्रमोद पुरोहित
## श्री. विनोदभाई
## श्री. दादा पोवळे

Marathe Pratishthan

# मुळा धरणावर एक दिवस आम्ही आपत्तीशी लढलो
## एक थरारक अनुभव
## लेखक अभि. श्री. वि.म.मराठे, निवृत्त कार्यकारी अभियंता (पृ.२३५)

आजकाल आपत्ती निवारण यंत्रणेचा बराच बोलबाला होत आहे. त्यासाठी स्वतंत्र विभागही उघडले आहेत. पण जवळ जवळ पन्नास वर्षापूर्वी आम्ही ओव्हरसियर म्हणून मुळा धरणावर कार्यरत असताना आपत्ती निवारणासाठी आमची कशी तयारी करुन घेतली होती व तीची परीक्षा आम्ही कशी दिली या बद्दलची माहिती खाली देत आहे. त्यावेळी मा. माधवराव चितळे जे आज जागतिक किर्तीचे जलतज्ञ आहेत ते आमचे कार्यकारी अभियंता होते.

मुळा धरणाच्या कामात २० मे १९६१ रोजी कॉफर डॅम फुटल्या नंतर नदी पात्रांतील काम बंद झाले होते. त्या नंतर चेनेज २३०० ते ५२०० मधे ड्रीलींग ग्राऊटींग, कॉंक्रीट डायफ्रॅम इ. कामे चालू होती. नदीला पूर आल्यास सदर कामाना धोका पोहोचू नये या साठी चेनेज ५२०० जवळ कटऑफ मधे आडवा बांध घातला होता. सदर बांधामधे पाईप घातलेली होती. व तीवर गेट बसविले होते. त्यामुळे नदीचे पाणी वाढले तर गेट बंद करुन पाणी आंत येणार नाही अशी व्यवस्था होती. सायरन ऐकताच वसाहतीतील अभियंते, उपअभियंते मुकादम, मेस्त्री यांनी धरण स्थळावर जायचे होते. तेथे गेल्यावर कोणी मजूर आणायचे, कोणी ट्रॅक्टर्स आणायचे इ. कामे ठरवून दिली होती. अशा रितीने आम्ही पुराची आपत्ती आली तर तोंड देण्यास सज्ज झालो होतो.

आणि एके रात्री दोन अडीचच्या सुमारास वसाहतीत सायरन ऐकताच आम्ही एकमेकांना जागे केले व सर्व जण ऑफीसजवळ उभ्या असलेल्या ट्रकमधून साईटवर पोहोचलो. आणि आपआपल्या कामाला लागलो. ट्रक्स ट्रॅक्टर्स कामाच्या ठिकाणी आले, मजूर वसाहतीतून मजूर ही आले, व कामाला सुरवात झाली. अर्ध्या तासांत कामाला गती आली. मिक्सर्स व इतर मशीनरी ओढून नेऊ जाऊ लागली, तीन चार ठिकाणी मजूर सिमेंटची पोती ट्रक्समधे भरु लागले, पंपांची कनेक्शनस सोडविली जाऊ लागली. सर्व जण कामात असतानाच मा. चितळे साहेब व मा. शुक्ल साहेब पाहणी करुन सूचना देऊन गेले. सर्व सामुग्री बाहेर काढण्यास आणखी तासभर लागला असता. तेवढ्या वेळांत बांध फुटू नये म्हणून जो तो प्रार्थना करीत होता.

आणि चार वाजण्याच्या सुमारास परत एकदा सायरन वाजला व सर्व काम थांबविण्याच्या सूचना दिल्या गेल्या. पाणी आत उतरु लागले असेल म्हणून आम्ही किती पाणी उतरले ते बघण्यासाठी बांधाकडे धावलो. तेव्हा मा. चितळेसाहेब व मा. शुक्ल साहेब नदीकडे तोंड करुन बांधावर उभे होते. आम्ही तेथे पोहोचलो तेव्हा कळले की नदीला पूर वगैरे आला नव्हता. मा. चितळेसाहेबांनी आपत्कालीन लढण्याच्या आमच्या क्षमतेची परीक्षा घेतली होती. ती मधे आम्ही सर्व जण पास झालो होतो.

त्या वेळी आपत्तीशी लढलेले आम्ही सर्वजण आज निवृत्त अभियंते म्हणून समाजात वावरताना एखादी आपत्ती आली तर काहीं करु शकतो अशी उमेद बाळगून आहोत.

वि.म. मराठे (निवृत्त कार्यकारी अभियंता)
पद्मश्री, विश्रामबाग, सांगली ४१६४१५
मो. ९४२०६७८९६५

❑❑❑

**ह स रे हि त गु ज**

### पुणेरी पाटी

अब की बार कुणाचेही असो सरकार पण बेल वाजवू नका १ ते ४ इथे दुपारी झोपतात मतदार

### तडका

फ्लिपकार्टचा उगम पुण्यात झाला असता तर.... वेबसाइट दुपारी १.३० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत च सुरु राहील. खरेदी करायची नसल्यास लॉग आऊट करावे.... हे बघ ते बघ असे करत बसू नये. स्वर्हरवर लोड येऊन तो क्रॅश झाल्यास त्याची भरपाई तुमच्याकडून वसूल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी एकदा क्लिक केलेली वस्तू परत घेतली जाणार नाही.

Marathe Pratishthan

# मी- पंचवटीचा मास्टर शेफ ? हा हा हा !

श्यामला पुरंदरे (पृ. ७५५)

अनिकाचा मुंबईहून रात्री फोन आला, आज्जी, मी व रोहन उद्या सकाळी ११ च्या सुमारास येत आहोत. खूप मजा करुया. आमच्या आवडीचं काय बनविणार आहेस?

एरवी सांधे दूखतात म्हणून सतत कुरकुरणारी मी, पण नातवंडे येणर म्हणून हत्तीचं बळ अंगात संचारल बासुंदी-पुरी, पालक-पुलाव, कांदा-बटाटा सुकी भाजी व ओला-नारळ पुदिना -चटणी असा सर्वांच्या आवडीचा बेत आखला. परंतु करायला गेले एक व झाले भलतेच या गाजलेल्या नाटकाचा प्रयोग घरात रंगला.

भल्या पहाटे उठून हास्य क्लबला न जाता थेट देवां कडून २ लिटर चितळे दूध आणलं. लगबगीने जेवणाच्या तयारीस लागले. दूध तापयला ठेवलं मात्र, ते फसफसून खुदूखुदी हसायला लागलं. डोळ्यासमोर पाषाण गोल गोलं फिरायला लागले. पण दुसऱ्याक्षणी राणी लक्ष्मीबाईच स्मरण करुन त्वेषाने एक भलं मोठं लिंबू कापून दुधाचं पनीर केलं. आता ही लढाई एकटीने लढून जिंकायचीच असा पक्का निश्यच केला. पहिली खेळी खेळली की मेन्यू पूर्णपणे बदलला व दुसरी म्हणजे तोफेचे ३ आवाज ऐकू येई पर्यंत कोणीही स्वयंपाकघरात प्रवेश करायचा नाही. युद्धास सुरवात झाली. टांगलेल्या पंचामधील निम्म पनीर एका पातेल्यात घेऊन त्यात मॅश केलेले उकडलेले बटाटे, बारीक चिरलेला कांदा व पालक हिरवी मिरची-लसूण-आले यांची पेस्ट हिंग, जिरेपुड, सुकखोबर पुदिन्याची गोळी, मीठ भरपूर कोथींबीर व लिंबू रस असं सर्व मिश्रण जोशाने कालवले त्याचे लहान लहान गोळे करुन ब्रेड क्रमसं मध्ये घोळवून शॅलो फ्राय केले. घाबरतच चव बघीतली. तोंडातून शब्द उमटले, क्या बात है! सु र वा ती ला कोसळलेल्या गारपीटीचं आता घामात रुपांतर झालं मग दुसऱ्या इनिंगसाठी सज्ज झाले. उरलेल्या निम्म्या पनीरकडे तीक्ष्ण कटाक्ष टाकला. प्रेमाने कढईस तूपाचा हात फिरविला व त्यात पनीर साखर वेलदोडा, दालचिनी पूड, केशर, मनुका, ओला नारळ २ डाव मँगो पल्प व १ डाव टोमॅटो प्युरे घातले. हे मिश्रण एकत्र मंद आचेवर सतत ढवळत शिजविले. ताटाला तूप लावले व मिश्रणाचा वड्या पाडल्या त्यावर बदाम व काजूचे काप चारोळ्यासह भुरभुरले व घाम पुसला.

रिक्षेमधून नातवंडांनी घरात पाऊल टाकले मात्र व एकदम म्हणाले, ''काय घमघमाट सुटलाय!'' एकदाचा माझा जीव भांड्यात पडला दुपारी जेवताना पंचामधून खाली ठिबकलेल्या ताकाची कढी व गुजराती स्टाईलची मूगाची खिचडी जेवल्यावर सर्वजण तृप्त झाले. तिन्ही सांजेला शुभंकरोती म्हटल्यावर समस्त महिला वर्गाला उद्देशून एक आरती म्हटली.

'दमत नाहीस, थकत नाहीस, घेतला वसा टाकत नाहीस. जेव्हा ओरडतो पोटात कावळा, तेव्हा चिऊ होऊन भरवतेस पनीर टिक्का !'

नातीने काव्य फेसबुकवर चढवलं What's app चं स्टेटस् बदललं, नातावाने Twitter वरती स्त्रीशक्तिला, सलाम ठोकला तिच्या कल्पकतेला, दोघांच्या मित्रांच्या reactions आल्या, कौतुकाने रेसिपिंचा आनंद उपभोगला ,

'wow ! so यमी ! cute is your granny ! !'

रात्री झोपायच्या आधी कधी नव्हे ते वर्तमानपत्रातील प्रा. रमणलाल शहा यांच्या 'आजचा दिवस' कडे पाहिलं व आसमान ठेंगण झालं. 'हाती घेतलेलं काम जिद्दीने व चिकाटीने पूर्ण कराल. कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभून मानसिक प्रसन्नता लाभेल.' एका दगडात दोन पक्षी या म्हणीचा प्रत्यय आला. परमेश्वराचे आभार मानले. व शांत चित्ताने झोपी गेले.

आता ८ मार्चला महिला दिन निमित्त पंचवटी महिला मंडळाची सभा होईल. त्यावेळी फसलेल्या एकाच पदार्थापासून कमीत कमी दोन भिन्न चवीचे पदार्थ बनविण्याचा कार्यक्रम आखूया व सर्वांनी त्यांचा आस्वाद घेऊ या.

धन्यवाद!

लेखिका श्यामला पुरंदरे (जाईल) पृ. ७५५
२७ ब वृंदावन, पंचवटी, पाषाण,
पुणे - ४११ ००५
मो. ९४०३६२५७२४



Marathe Pratishthan



# कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस
# (पृ.६२३)
# यांच्या स्मरणार्थ

सन १८५० च्या सुमारास ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्यांच्या दप्तरातील पाच कर्मचाऱ्यांची निवड करुन त्यांना सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण दिले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांची सब ओव्हरसियर म्हणून नेमणूक केली गेली.

भारतातली हे पहिले पाच इंजिनिअर. त्यातील एक होते आमचे खापरपणजोबा कै. श्री. महादेव व्यंकटेश विद्वांस.

सब-इंजिनिअर या पदापरून निवृत्त झाल्यावर त्यांनी पुण्यातील मंडईपाठीमागे श्री मार्कंडेश्वराचे मंदिर बांधले. विश्वस्त निधी स्थापन करुन मंदिर विश्वस्तांच्या ताब्यात दिले. आयुष्याचे शेवटचे दिवस त्यांनी याच मंदिरात काढले.

शेलारवाडी ते देहू हा रस्ता त्यांनी स्वखर्चाने बांधला व बोर्डाच्या स्वाधीन केला, जिच्या व्याजातून या रस्त्याच्या मेन्टेनन्सचा खर्च निघेल एवढी देणगीही त्यांनी बोर्डाला दिली.

पुणे वेदपाठशाळेच्या संस्थापकांपैकी ते एक होते.

अशा आमच्या खापरणपजोबांना आमचे विनम्र अभिवादन व हितगुज च्या शतकमहोत्सवी १०० अंकाला शुभेच्छा !

– विद्वांस कुटुंबिय

Marathe Pratishthan

## वर्मावर बोट

सुधीर गाडगीळ एकदा प्रख्यात गायिका माणिक वर्मांची मुलाखत घेत होते. हलक्याफुलक्या वातावरणात चाललेल्या मुलाखतीत गाडगीळांनी माणिकताईंना त्यांच्या यजमानांबद्दल विचारले, 'तुमची आणि त्याची पहिली भेट कुठे झाली?' मात्र माणिक वर्मा त्याचे उत्तर द्यायला टाळाटाळ करत होत्या. त्यावेळी प्रेक्षकांत बसलेले पु. ल. देशपांडे उद्गारले, 'अरे सुधीर, सारखं त्यांच्या 'वर्मा' वर बोट ठेवू नकोस!

## अभिप्राय

विख्यात नाटककार माननीय सुरेख खरे यांनी हितगुज चे भरभरुन कौतुक केले. भाषणात ते म्हणाले, इतका सुरेख, सुंदर, वाचनीय अंक आणि तोही विनामूल्य हा मला बसलेला सुखद धक्का आहे. फुकट काही ठेऊ नका. कारण फुकट मिळालेल्या गोष्टींची किंमत वाटत नाही. हितगुज चे सर्वच अंक मूल्यवान आहेत. यातली संपादकीय ही विशेषकरुन सामाजिक भान असलेली अशी दूरदृष्टीने सामाजिक जाण ठेऊन लेखन केलेली दिसतात. हे केवळ रिपोर्टिंग नाही. अहवाल नाही. या अंकातील मुलाखती आयुष्याला मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. दर्जेदार, दुर्मिळ घटना या मुलाखतींमध्ये आल्या आहेत. त्यामुळे गुणवत्ता टिकून राहील. आज इलेक्ट्रॉनिक्स माध्यामात जितके मराठे संख्येने आढळतात तितके कुणीच माझ्या पाहाण्यात नाहीत. आजच्या कॉम्प्युटरच्या काळात मराठी माणूस दूर जाताना दिसतो आहे. पण या हितगुज च्या माध्यमातून तुम्ही मराठे मनाने जवळ येच आहात ही आनंदाची गोष्ट आहे. तुमच्यात आत्मीयतेचा, जवळीकेचा, प्रेमाचा पूल बांधला जातो आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे असो.

अमृत महोत्सवी प्रकाशन समारंभ

## सहस्त्रचंद्र दर्शन शुभेच्छा

**श्री. चिंतामण त्र्यं मराठे (पृ.२४८)**

**जन्म - देवदीपावली मार्गशीर्ष शु. १, दि. ८/१२/१९३४**

माजी अध्यक्ष – ब्राह्मण सभा कळवा
माजी उपाध्यक्ष – जेष्ठ नागरिक संघ कळवा
अध्यक्ष तक्रार निवारण समिती सहकार बाझार कळवा
अंतर्गत हिशोब तपासनीस सहकार बाझार कळवा

**शुभेच्छुक**

श्री. यशवंत त्र्यंबक मराठे, माणगांव
श्री. प्रभाकर त्र्यंबक मराठे, वडोदरा
श्री. विलास त्र्यंबक मराठे, बोरवाडी
सौ. सुधा शरदचंद्र साठे गोरेगांव
सौ. रोहिणी चिं. मराठे, कळवा
श्री. जयप्रकाश मराठे, पुणे
डॉ. चंद्रशेखर मराठे, पनवेल
सौ. शुभदा दिलीप जोशी गोरेगांव

Marathe Pratishthan

मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज' या मुखपत्राच्या
शंभराव्या अंकासाठी
हार्दिक शुभेच्छा !

श्री हेमंत मराठे यांचे

**मराठे इलेक्ट्रॉनिक्स**

नामांकित कंपन्यांचे

एल इ डी टिव्ही., फ्रिज, वॉशिंग मशिन, ए. सी. चे विक्रेते

ए/२, प्रशांत कुटीर, तुळींज रोड, वर्तक टॉवर जवळ, नालासोपारा (पूर्व)
९८२२८४७१२०, ९२२०६९९९५७

**Bajaj Allianz, Life Insurance Co. Ltd.**

**Insurance Consultant - Mr. Hemant Marathe**

9822847120, 9220699957

मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज' या मुखपत्राच्या
शंभराव्या अंकासाठी हार्दिक शुभेच्छा !

श्री. शरद अरुण मराठे आणि परिवार
गोरेगाव, मुंबई


Marathe Pratishthan

## सौ. देवयानी सुहास दीक्षित (चक्रदेव) (पृ. ७३२)



माझे संगीताचे प्राथमिक शिक्षण पुणे भारत गायन समाज (शनिपार) पुणे येथे झाले. नाशिकरोडला श्री रामभाऊ कुलकर्णी यांचेकडे झाले मुंबईला रंगशारदा प्रतिष्ठानतर्फे कै. श्री. लालजी देसाई यांच्याकडे नाट्यसंगीताचे शिक्षण मिळाले.

सध्या सौ. शैलाताई दातार आणि श्री. सुधीर दातार यांच्याकडे शिक्षण चालू आहे.

पुणे भारत गायन समाजातर्फे घेण्यात येणाऱ्या बालगंधर्व शास्त्रीय नाट्यसंगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक.

सांगली येथे होणाऱ्या अण्णासाहेब कराळे संगीत स्पर्धेत नाट्यसंगीत विभागात प्रथम क्रमांकाचे बक्षिस आणि फिरता चषक.

दादर, माटुंगा कल्चरल सेंटरतर्फे घेण्यात येणाऱ्या नाट्यसंगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक अशा अनेक स्पर्धांमधून सहभाग अनेक कार्यक्रमांमधून सहभाग.

मी बी.कॉम. (कॉमर्स) पदवीधर असून संगीतात एस.एन.डी.टी. तर्फे एम. ए. (संगीत) पदवी घेतली आहे.

सध्या शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीताचे

## विडंबन -गीत

(चाल – तुझ्या गळा माझ्या गळा)

तुझ्या गोळ्या माझ्या गोळ्या एकेक करुनी खाऊ सगळ्या  
तुझं बी.पी., माझं बी. पी. आणखी शुगर कोणाला ?  
यंत्र लागले कानाला, चष्मा आला डोळ्याला ।।१।।

तुझे पांढरे, माझे पांढरे डाय ही आला जोडीला  
आणखी टक्कल कोणाला ? विगहि आला डोक्याला ।।२।।

दांतदुखी दाढ दुखी एकेक लागले पडायला  
कवळी लागली तोंडाला ।।३।।

कंबरदुखी, पाठ दुखी, टाच दुखीही जोडीला  
फ्रोझन शोल्डर कोणाला ? पट्टा लागला मानेला ।।४।।

तुझे गुडघे, माझे गुडघे, रिप्लेस करुनी धावू गडे  
मोतीबिंदू हा कोणाला ? लेन्सही लावू डोळ्याला ।।५।।

माझी सत्तरी तुझी पासष्टी काठीही आली हाताला  
ऐकू येईना कानाला शब्द कळेना कोणाला ।।६।।

हार्ट अ‍ॅटॅक सौम्य तुला एन्जीओग्राफी केली मला  
एन्जीओप्लास्टी कोणाला ?  
बायपास आला नशिबाला ।।७।।

तू आणि मी, मी आणि तूं दोघे मिळूनी गोळ्या खाऊ  
वळूनी जरा मागे पाहूं हिरवळ हृदयी साठवूं या ।।८।।

संकलन – अच्युत म. चक्रदेव (पृ. ७३२)  
चिंचवड, पुणे – ३३.

## भगवत्‌गीता समर्थपणे जगायला शिकवते

ज्ञानेश्वरी म्हणजेच भगवत्‌गीता. सूर्य प्रकाशतो. प्रकाश पणे हेच त्याचे कर्म आहे. याच्या परिणामाची सूर्याला जाणीव नसते. पण त्यामुळे पृथ्वीवरचे जीवन चालते. त्याचप्रमाणे परिणामांचा विचार न करता, आपल्या स्वभावाप्रमाणे, समाजाच्या हिताचे– स्वधर्माचरणाचे कर्म प्रत्येकाने केले तर त्या माणसाचे जीवन सुखकर बनून, समाजाचा उत्कर्ष होतो.

गीता म्हणते, कर्माच्या जंजाळ्याला कंटाळून कर्मच टाकणारा भित्रा, फलाशेने कर्म करुन, बऱ्यावाईट गतीला जाणारा अज्ञानी, गीतेच्या दृष्टीने थोर तो की जो कर्म करतो. पण कर्म फलात अडकत नाही. गीतेची थोरवी याच्यातच आहे की, ती कर्म करुन कर्मबंधनातून मुक्त होण्याचा मार्ग शिकविते. गीतेत पलायनवाद नाही. गीता ही कर्मास तोंड देण्यास साधकास समर्थ करते. गीतेचे हेच वैशिष्ठ आहे.

(ज्ञानेश्वरीतील कर्मयोग– श. वा. दांडेकर)

Marathe Pratishthan

# जरा संभालके!

श्री. निरंजन प्रभाकर मराठे
(पृ.१२०)



२९ डिसेंबर २०13 वर्षाचा शेवटचा रविवार. वी. रेंजरचा पदरगड सर करण्याचा प्लान होता त्यात मी सामील झालो. कर्जत लोकल पकडली. मच्छिन्द्र आणि अजय हे वी रेंजर सोबती भेटले. सर्व मिळून १६ जण कर्जत गाठेपर्यंत सव्वा सात झाले. फक्कड चहा मारला, थंडीवरील रामबाण औषध. सुमो आणि बोलेरो गाडीने कर्जत सोडले आणि खांडस गावाकडे कूच केले. मध्येच एका ठिकाणी गाडीने जोरदार उडी घेतली की पोटात धस्स झाले!

खांडस गावातून पुढे आलो की दोन फाटे फुटतात एक शिडीघाटचा आणि दुसरा गणेशघाटाचा. गणेशघाट मार्गे आम्ही पदरगडला निघालो. वाटेतील गणपती मंदिर आणि विहिरीवर दोन ठिकाणी क्षणभर विश्रांती घेतली. विहिरीवर पाणी नक्की भरुन घ्या कारण पुढे वाटेत आणि गडावर पाण्याचा ठणठणगोपाल आहे. घसारायुक्त रस्ता तुडवत आणि झाडाच्या आधारे आम्ही चिमणी प्रस्तारोहाणापाशी आलो. जेमतेम एक माणूस जाईल एवढीच जागा. मच्छिंद्रने रोप टाकला म्हणून पटापट पार झाला आणि १५ फूट कातळ कड्यापाशी आलो. एका बाजूला पूर्ण दरी. जराजरी पाय घसरला तरी एकदम खाली. येथेही मच्छिंद्रने रोप टाकला आणि आम्ही सगळे माकडासारखे भरभर वरती गेलो एक थरारक अनुभव गाठीशी जोडून.

वरती गेल्यावर अजून एक ५ फुटापर्यंतच्या पायऱ्या नष्ट झालेल्या कातळ टप्पा येतो. पण झाडाच्या मदतीने तो पार करता येतो आणि कातळात भक्कम कोरलेल्या दगडी पायऱ्या चढून गेल्यावर एक गुहा दिसते आणि दोन कातळ कडे दिसतात ज्याला कलांवतीणीचे महाल असे संबोधतात. पाण्याची दोन रिकामी टाकी आणि एक छप्परविरहित मंदिर पाहून एका महालातील कातळ गुहेत आलो. ज्यात १५ –२० जण दाटीवाटीने बसू शकतात आणि तेथून भीमाशंकरचे दाट जंगल आणि नागफणीचे दर्शन होते.

येथे अन्नोदक उरकून थोडी विश्रांती घेतली आणि किल्ले उतरण्यास प्रारंभ केला. मंगेश, मी आणि हेमंत असे जरा पुढे होतो. मंगेशच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही टप्पे नेटाने उतरुन खाली आलो आणि आराम करीत बसलो. दगड बऱ्यापैकी ठिसूळ आहेत याची प्रचीती आली. मागून येणाऱ्यापैकी एकाने दगड खाली पाठवला आणि तो पाव फूट जवळून दरीत टाटा करीत निघून गेला, आम्ही अजून खाली जायचे ठरवून विहिरीपाशी आलो.

मंगेशला निसर्गाची हाक आली आणि तो जंगलात गेला. अचानक माकडांचे चित्कार येऊ लागले. ५–८ माकडे मंगेशच्या मागे लागली. मंगेश जीव मुठीत घेऊन धावत सुटला आणि माकडे मागे लागली. तो जंगलातून बाहेर आला आणि माकडे मागे फिरली. आम्ही सुटकेचा निश्वास टाकला. हे रामायण घडून गेले असेल नसेल तोपर्यंत सगळे खाली आले. संत्र्यांचा आस्वाद घेऊन अंताक्षरी खेळत आम्ही गणपती मंदिर कधी गाठले हे समजले नाही. पवनने किटो चप्पल घातली होती आणि एका ठिकाणी धडपडून पायाला ठेच लागून घेतली. त्याची मस्त मलमपट्टी केली आणि ब्रेक के बाद अंताक्षरी परत सुरु झाली. परतीच्या गाडया वाट पहात होत्या. तडक कर्जतकडे प्रयाण केले. अंताक्षरी शेवटपर्यंत जोरात चालू होती. पण ज्याला सुरवात आहे त्याला शेवट हा असतोच. त्याप्रमाणे बदलापूरमध्ये एका दुसऱ्या ग्रुपने आवाजाच्या बाबतीत कडी केली आणि आम्ही थांबलो. दादर येईपर्यंत निद्रादेवीच्या अधीन झालो. मनोमन एकच विचार होता पदरगड जरा संभालके मेरे भाई!

श्री. निरंजन प्रभाकर मराठे (पृ. १२०)
इंद्रायणी दर्शन – पहिला मजला ए–१,
तळेगाव–दाभाडे. मो. ९८२०७३४८८४

शुद्ध भावविण, जो जो केला तोतो सीण
तुका म्हणे कळे, परि होताती आंधळे...... तुकाराम महाराज

कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।



Marathe Pratishthan

भाऊसाहेबांनी (वि.गो.) हितगुजची मुहुर्तमेढ रोवली
आणि आमच्या लक्ष्मण काकांनी (ल.शं.) त्यांचे संवर्धन केले
याचा आम्हाला अभिमान आहे.

## हितगुजच्या पुढील वाटचालीसाठी
## शुभेच्छा!

## मराठे परिवार गोमन्तक

**सौ. मेघना दीपक (अध्यक्षा)**
९१-७०६६२५४२८६

**श्री. अरुण रमाकांत (कार्यवाह)**
९१-८७९६११००८१

Marathe Pratishthan



हार्मोनियम गुरु श्री. दिलीप गोसावी यांचा सत्कार करताना
प्राचार्य पंडित प्रमोद धुंडिराज मराठे (पृ.१२९) मध्यभागी तालयोगी पं. सुरेश तळवलकर


'हितगुज'

शतक महोत्सवी अंक

## हार्दिक शुभेच्छा

**Amit Kamat**
**9821027258**

## Kamat & Co.
Clearing & Forwarding Agents


Marathe Pratishthan

# अनोळखी

सौ. निलिमा पटवर्धन, पुणे

कालची का परवाचीच गोष्ट. एका लग्नाला गेले होते. तर तिथे ती भेटली. एकमेकींना बघून आम्ही दोघीही हसूच लागलो. अगं परत? हो ना. आम्ही असें भेटण्याची ही जवळजवळ तिसरी का चौथी वेळ होती. आम्ही दोघी – संपूर्णपणे अनोळखी तरी ही एकमेकींच्या अगदी परिचयाच्या.

सुमारे ४ वर्षापूर्वी ती मला पहिल्यांदा भेटली. एस.टी. मध्ये. आम्ही सगळी भावंडे मिळून अगदी मुलाबाळांसकट गणपतीपुळ्याला निघालो होतो. बसमध्ये तीही चढली. तिच्याबरोबर तिचा नवरा आणि मुलगी होती. बस सुटताना एकमेकींना बघून आम्हाला दोघींनाही खूप आनंद झाला. अगदी हात हलवून आम्ही दोघींनी एकमेकींना ओळखीची खूण केली. माझ्या मुलाने मला विचारलेही की कोण आहेत ह्या. मी सांगितले नाव आठवत नाहीये पण आम्ही दोघी मैत्रिणी आहोत. तो हसलाच. आईचे काहीही असते असा भाव त्याच्या त्या हसण्यात मला जाणवला. पण मी दुर्लक्ष केले. बस वाटेत थांबल्यावर ती माझ्या जवळ आली. तिचेही तेच. ओळख आहे पण नाव विसरले होते. आम्ही सगळे संदर्भ तपासून पाहिले. शाळा, कॉलेज, नोकरी, मुलांच्या शाळा– नातेवाईक, सासर, माहेर–––सगळे सगळे तपासून झाले. पण कुठलीच लिंक लागेना. संपूर्ण प्रवासभर तिचाच विचार. तिचाच चेहरा आठवत होता. तो खूप जवळचा होता. पण त्या चेहऱ्याचे नाव मात्र मी पार विसरुन गेले होते. गणपतीपुळ्यात आम्ही भावंडांनी भरपूर मज्जा केली. एकाच हॉटेलमध्ये उतरल्यामुळे आम्ही दोघीही अधूनमधून भेटत होतो. आणि हुरहूर अधिकच वाढत होती. तिचीही अवस्था फारशी वेगळी नव्हती.

सुट्टी संपली. सगळेच जण आपापल्या कामाला लागले. मीही संसाराच्या आणि नोकरीच्या चक्रात पूर्णपणे गुरफटून गेले. तिची आठवण हळूहळू विरळ होत गेली.

त्यानंतर अंदाजे एका वर्षाने ती भेटली. आमच्या घराच्या जवळच. पुन्हा तेच. एका अनामिक ओढीने दोघीही एकमेकीजवळ आलो. विचारपूस केली. पण हाय! पुन्हा तेच. नावाची आठवण नाही. पण ओळख होती. आम्ही बराच वेळ गप्पा मारल्या. पण ना मी तिचे नाव विचारले ना तिने. काय उपयोग त्या नावाचा? नाव कळून वा न कळून काहीही फरक पडत नव्हता. दोघींनीही ठरवूनच टाकले. आता काहीही आठवायचेच नाही. मैत्री तर त्याशिवायही होतीच. आता तीच लक्षात ठेवायची. संदर्भ आपोआपच उलगडतील. एकमेकींना पुन्हा भेटण्याचा वायदा करुन आम्ही निघालो. बोलता बोलता पत्ता किंवा फोन नंबर मात्र घ्यायचा राहिला. पण आता मात्र हुरहुर लागली नाही.

त्यानंतर बाईसाहेबांना मी एका सिग्नलवर पाहिले. चक्क स्वयंसेवक म्हणून ट्राफिकचे नियंत्रण करत होत्या बाईसाहेब. मी जवळ जाऊन तिच्याशी बोलायचा प्रयत्न केला. पण तिने चक्क मला हाकलून दिले. खूप गडबडीत आहे म्हणाली. फावल्या वेळात असा सामाजिक उपक्रम राबविणे हा तिचा छंदच होता म्हणे. मला भारी गम्मत वाटली. आणि तिच्याबद्दल अभिमानही वाटला.

त्यानंतर आत्ता भेटली ही. एका लग्नात. मस्त सिल्कचा ड्रेस घातला होता. दिसायला तर ती छान आहेच. आणि त्यात हा लेमन कलर अगदी खुलत होता. लग्नात भेटल्यामुळे पुन्हा एकदा संदर्भ जोडले जाण्याचा आशा पल्लवित झाल्या होत्या. ती मुलीकडून आली होती आणि मी मुलाकडून. लग्न माझ्या एका भाच्याचे होते. आणि तिच्या शेजारी राहणाऱ्या मुलीचे. चला आता निदान तिचा पत्ता समजला. हेही नसे थोडके. आता मात्र एकमेकींच्या घरी जायचेच असें पक्के ठरवले आम्ही. आता माझ्याकडे तिचे नाव होते, पत्ता होता. पण त्याही पलीकडे जाऊन तिची घट्ट मैत्री होती. माझ्यासाठी तेवढीच महत्वाची होती.

नावात काय आहे असे शेकस्पिअर म्हणून गेला. पण खरेच काहीच नसते का हो नावात? अमुक अमुक नाव मला कोणीतरी बहाल करते. कधी माझी आई किंवा माझी आत्या. कधी कधी आजोबांची आठवण म्हणून नातवाचे नाव आजोबांचेच ठेवले जाते. आवडत्या देवाचे नाव, आवडत्या कवीचे नाव,

Marathi Pratishthan

[illegible] नावे, आवडत्या नेत्याचे नाव - नवीन जन्माला आलेल्या बाळाला आपण आपल्याला हवे ते नाव देतो. मग सवयीने त्या जीवाला सुद्धा हेच आपले नाव असे वाटू लागते. मग लोकही त्याला त्या नावाने ओळखू लागतात. हे नावाच आपली ओळख बनते हळूहळू. माझ्या ह्या मैत्रिणीलाही नाव होते. आता मला ते समजलेही होते. पण ते समजूनही मला तिची खरी ओळख समजलीच नव्हती. असें का होते कधीकधी? अचानकच कोणीतरी अनोळखी ओळखीचा वाटतो आणि एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबाबतही अकारणच द्वेष किंवा मत्सर वाटतो. प्रत्येकालाच हा अनुभव कधी ना कधी येतो.

माझ्या लेकाचेच उदाहरण आहे. तो बालवाडीत असताना त्याच्या वर्गात एक मुलगा होता. माझ्या लेकासारखाच तोही अगदी गोड होता. शांत आणि समंजस होता. दोघांचीही एक गम्मत होती. हे दोघे कुठेही समोरासमोर आले की एकमेकांच्या अंगावर अगदी धावून जात. त्यांची भांडणे सोडवणे हे आम्हा पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी मोठे जिकीरीचे होऊन बसे. एकदा तर हे दोघे एका बागेत समोरासमोर आले. तिथेही दोन प्रतिस्पर्ध्यांसारखे एकमेकांवर अक्षरशः तुटून पडले. त्यांचे हे वैर पाहून आम्ही हैराण झालो होतो. त्यांचे हे वैर ह्या जन्मीचे नक्कीच नव्हते.

माझ्या मैत्रिणीचेसुद्धा तसेच होते. आमची ही मैत्री ह्या जन्माचीच असेल असें सांगता येत नाही. महाकवी कालिदासाचे एक प्रसिद्ध वचन आहे. भावान्तराणि भवन्ति जननांतरसौहृदानि त्याप्रमाणे कांही भावबंध जन्मोजन्मीचे असतात, हेच खरे.

सौ. निलिमा पटवर्धन (पृ.४३)
पुणे,
भ्रमणध्वनी - ९८२२७१७४१७

**मराठे प्रतिष्ठान, मराठे परिवार आणि हितगुज १०० व्या अंकापर्यंत कार्य करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन व शुभेच्छा !**

**खांबेटे परिवार : कर्णावती (अहमदाबाद) गुजरात**
**वंशावळी वृत्तांत घराणे १०१ वे खांबेटे बुरोडी,**
**कोळथरे पान ६६७**

**श्री. किशोर रामचंद्र खांबेटे - वय वर्ष ६३ - ०९८७९०५९८६६**
**सौ. मंगला किशोर खांबेटे - वय वर्ष ६१ - ०९९७९५८९०८९**
**श्री. मिथुन किशोर खांबेटे - वय वर्ष ३१ - ०९८२५८७९३६९**
**सौ. हिना मिथुन खांबेटे - वय वर्ष २८ - ०९८२५८०९७७४**
**चि. विश्वराज मिथुन खांबेटे - ६ महिने**

**नविन पत्ता -**
**३, गणेश, दर्शन अपार्टमेंट, पहिला मजला, श्रीपादवाडी जवळ,**
**दक्षिणी सोसायटी, मणीनगर, अहमदाबाद - ३८०००८.**

Marathe Pratishthan

# शतजन्म

सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे (पृ.३९२)

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात, लहानपणी वडील कै. श्री. पु. गोखले यांच्या बरोबर जातच होते. त्यावेळी स्मारकही बाल्यावस्थेत होते. पण पुढे स्मारकाची भव्य वास्तू उभी राहिली त्यानंतर, म्हणजे २००५ मध्ये मी स्मारकात काम करावं अशी इच्छा श्रीपुंनी व्यक्त केली. त्यांचा शब्द मोडणं शक्य नव्हतं आणि पुढे मागे कुठल्यातरी सामाजिक कार्यात सहभागी व्हायचं हे मनांत होतंच, त्यामुळे मी स्मारकाच्या कार्याला वाहून घेतलं.

सावरकर जयंती, त्यांचा आत्मार्पण दिन आणि इतर काही निमित्तानं, स्मारकात वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करीत होतो. पण ते करताना एक जाणवू लागलं की या कार्यक्रमांना तरुण पिढी अभावानंच असते. या पिढीनं काही ऐकायला हवं असेल तर त्यांना रुचेल, पटेल अशा स्वरुपात कार्यक्रम करायला हवा, सावरकर विचार मांडायला हवा असं वाटत होतं.

२५ फेब्रुवारी २००७ ला, सावरकरांच्या आत्मार्पणदिनाच्या पूर्वसंधेयला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गीतांवर एक छोटासा कार्यक्रम करण्याचा योग आला. प्रसिद्ध गायिका वर्षा भावे यांच्या कलांगण या संस्थेच्या सहकार्यानं हा कार्यक्रम झाला. हा कार्यक्रम सगळ्यांना आवडला तर वीर सावरकरांच्या प्रतिभेवर आणि कार्यावर एक भव्य कार्यक्रम करायचा असं मनोमन ठरवलं होतं आणि वर्षाला बोलूनही दाखवलं होतं. सर्वांना परिचित अशी दहा गाणी आणि त्याबाबतची माहिती असा हा कार्यक्रम सर्वांना खूपच आवडला आणि पाहता पाहता माझ्या मनातला भव्य कार्यक्रम २७ मे २००७ या दिवशी साकारही झालाा. कार्यक्रमाचं नाव होतं.. शोध हा नवा .. शतजन्म शोधिताना.

लहान कार्यक्रम ते भव्य शतजन्म यात तीन महिन्यांचा कालावधी दिसत असला तरी कार्यक्रमाची संकल्पना तयार करुन ती समितीपुढे मांडण, त्यासाठीची पैशाची गणितं मांडणं, ते मंजूर करुन घेण यात एक महिन्यापेक्षा अधिक काळ निघून गेला होता. कार्यक्रमाची कल्पना नुसती डोक्यात असून उपयोग नव्हता ती कागदावर उतरवणं गरजेचं होतं. कार्यक्रमाचं शीर्षक काय असावं याबाबतीतही बराच विचार करुन शतजन्म



शोधिताना हे शिर्षक निश्चित झालं आणि सावरकरी साहित्याचा आणि विचारांचा शोध अशी कल्पना ठरवली. हा कार्यक्रम कुठल्या तरी वाहिनीवर दाखविला जावा यासाठी प्रयत्न सुरु केला. सावरकरांवर कार्यक्रम म्हणजे काय असणार, असं काही गंभीर ऐकण्याची लोकांची मानसिकता नसते इथूनच सुरवात झाली. सावरकरांच्या अप्रचलित गीतांवर नृत्य, नाट्यप्रवेश या कार्यक्रमात असतील. मनोरंजन आणि निवेदनातून सावरकर विचार मांडले जातील, हे कार्यक्रमाचं स्वरुप ई. टिव्हीच्या अधिकाऱ्यांना पसंत पडलं आणि ई टिव्हीवरुन कार्यक्रम प्रसारित होण्याचं ठरलं. त्यासाठी ध्वनी आणि प्रकाश याची वेगळी सोय करणं गरजेचं होतं. पहिला प्रयोग वांद्र्यांच्या रंगशारदात होणार होता पण आम्हाला आवश्यक वीजपुरवठा ते करु शकणार नव्हते मग डीजी सेट भाड्याने आणावा लागला. नेहमी कार्यक्रम करणाऱ्यांना यात काही विशेष काही वाटणार नाही पण माझ्यासाठी सर्वच नवीन होतं कारण कार्यक्रमाला जाऊन फक्त निवेदन करणं एवढाच अनुभव गाठीशी होता. त्यामुळेच कार्यक्रम उभारण्याचा कुठलाही अनुभव नसताना, एकदम स्वातंत्र्यवीरांवरचा कार्यक्रम हे माझ्यासाठी शिवधनुष्य होतं. स्वा. सावरकरांनी लावणी लिहिली आहे, तरुणाईला आवडतील अशी भावगीतंही लिहिली आहेत हे फारसं कोणाला माहिती नव्हतं. त्यामुळे सर्वांना सुपरिचित गीतांबरोबरच त्यांची लावणी, पोवाडा, फटका, भावगीतं, स्फुर्तीगीतं आम्ही कार्यक्रमात घेतली. या अप्रचलित गीतांतं संशोधन आणि संगीत दिग्दर्शन वर्षा भावे यांनी केलं. संगीत संयोजनाची जबाबदारी कमलेश भडकमकर यांनी स्वीकारली. नवीन गाणी स्वरबद्ध होऊन

Marathe Pratishthan

ध्वनिमुद्रितही झाली. वर्षाचा शिष्यवर्ग आणि प्रसिद्ध अभिनेत्री अमृता सुभाष यांनी ही गाणी गायली.

नृत्य दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली ती रुपाली देसाई यांनी. ऐतिहासिक काळ, सवाई माधवराव [illegible]. माधवराव पेशवे असे उल्लेख असल्यामुळे रुपालीला सुद्धा खूप विचारपूर्वक नृत्य दिग्दर्शन करणं आवश्यक होतं आणि ते तिनं केलंही.

सांगलीचे मुकुंद पटवर्धन नेपथ्य करणार होते पण त्यांची तब्येत बिघडल्यामुळे आयत्या वेळी ही जबाबदारी अजित दांडेकर यांनी स्वीकारली आणि उत्तम नेपथ्य तयार केला. शीतल तळपदे यांनी प्रकाश योजना केली. सावरकरांच्या कार्यक्रमात पार लाईट्सचा वापर? अशी प्रतिक्रिया उमटली. तसेच आयत्यावेळी, विनोद आणि महेंद्र पवार हे मित्रद्वय सामील झाले आणि उत्तम दिग्दर्शन करुन त्यांनी माझी काळजी आणि भार हलका केला.

संगीत नृत्य हे सोपं नव्हतंच पण माझ्यासाठी आव्हानात्मक होतं ते निवेदन. सुमारे दहा हजार पानाचं साहित्य आणि सुमारे बारा हजार ओळींच काव्य लिहिलेल्या स्वा. सावरकरांच्या कार्याचा आढावा घ्यायचा तो केवळ अडीच तासात, कमीतकमी शब्दात आणि जरा सोप्या भाषेत, हे खरोखरंच कठीण होतं. या कार्यक्रमासाठी माझ्या समोर होता तो तरुण वर्ग. त्यामुळे मुलांना कळेल, पटेल आणि रुचेल असं निवेदन लिहायचं होतं. या लिखाणात किस्से, विनोदी चुटके असणार नव्हते. इतिहास सांगायचा होता पण तो रुक्ष, किचकट न वाटेल हे पहायचं होतं. सर्वसाधारणपणे दोन गाण्यांमधलं निवेदन एखादं मिनिट असावं हे संकेत पण इथे सांगण्यासारखं इतकं होतं की कित्येक ठिकाणी निवेदन चार चार मिनिटांच होतं. २७ मे या दिवशी कार्यक्रम आहे तेव्हा निवेदन ५ मे पर्यंत तयार हवं, असं बंधन मा स्वतःवर घातलं होतं. पण अनंत प्रापंचिक अडचणी आणि बांधिलकीमुळे ते पूर्ण झालं ते २४ तारखेला. गाण्यांचा क्रम ठरल्याशिवाय निवेदनाचं जोडकामही शक्य नव्हत. २५ मे या दिवशी रंगीततालीम होती. मी लिहिलेलं निवेदन तटस्थ राहू शकणाऱ्या एखाद्या जेष्ठ व्यक्तीनं तपासावं असं वाटत होतं. जे लोकांना परिचित नाही ते मला सांगायचं होतं. ज्यामुळे दंगे होतील, वाद होतील असं काही मला लिहायचं नव्हतं. सावरकरांचे विचार आणि कार्य इतकं मोठं आहे की, अल्पावधीत सगळं सांगणं शक्यच नव्हतं. त्या घडीला, हा विचार बदल तो घाल याच्यासाठी वेळच नव्हता. स्मारकाचे तत्कालिन अध्यक्ष मिलिंद गाडगीळ यांच्याकडे मी रंगीततालमीच्या दिवशीच, संहिता तपासायला पाठविली. त्यावेळी ते कर्करोगानं त्रस्त होते. त्यांची केमोथेरपी सुरु होती. तरीसुद्धा त्यांनी संहिता वाचली, फक्त एका संदर्भाच स्पष्टीकरण मला विचारलं आणि उत्तम आहे असा शेरा दिला.

सर्व साधारणपणे करमणुकीसाठी आलेला रसिक दीर्घ निवेदन ऐकेल का? काय प्रतिक्रिया येतील, लावणीसारखी नृत्य सादर झालेला सावरकरांवरचा कार्यक्रम रसिकांना मान्य होईल का, हे प्रश्न मनात घेऊनच पहिला प्रयोग सादर केला आणि त्या प्रयोगाला मिळालेला उदंड प्रतिसाद, निवेदनाबद्दलच्या अतिशय उत्तम प्रतिक्रिया आमचा उत्साह वाढविणाऱ्या ठरल्या. सावरकर अभ्यासक, त्यांचा सहवास लाभलेली काही जेष्ठ मंडळी कार्यक्रमाला उपस्थित होती. त्यांच्याकडून मला अपेक्षित प्रश्नांची सरबत्ती सुरु होतच होती, पण मंजिरी संहिता उत्तम आहे. त्यातला एकही शब्द बदलण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळेला तुला वाटेल तेव्हाच त्यात बदल कर असं मिलिंद गाडगीळ यांनी सर्वांसमक्ष सांगितल्यामुळे माझी सुटका झाली.

सावरकरांवरचा कार्यक्रम म्हणजे बौद्धिक खाद्यच असणार, पण आईसाठी जायला हवं म्हणून बळेच आलेल्या माझ्या चिरंजीवांनी, आई तू ग्रेट आहेस आणि सावरकरांविषयी आम्हाला काहीच माहित नव्हतं ते तुझ्यामुळे कळलं असं म्हणत कार्यक्रम संपताक्षणी धावत येऊन मारलेली मिठी ही माझ्यासाठी सर्वात आनंददायी प्रतिक्रिया होती. पण त्याचवेळेला ज्यांच्या प्रेरणेनं हे घडलं ते माझे वडील श्रीपु हयात नसण्याचं दुःखःही तितकंच बोचर होतं.

शतजन्म शोधिताना चा पहिला प्रयोग तीन तासांचा झाला ई. टिव्हीकडून अर्ध्यातासांच्या जाहिराती धरुन अडीच तास कार्यक्रम दाखविला जाईल असं मलाा सांगण्यात आलं होतं. म्हणजे एक तासाचा भाग कापला जाणार होता. विषयाच्या जाणकाराने संपादन केलं तर ठिक अन्यथा कशीही कापाकापी होईल म्हणून संपादनाच्या वेळी मला बोलवा असं मी सुचवलं होत. पण प्रत्यक्षात, ध्वनिफिती हैदराबादला पाठविल्या असून

Marathi Pratishthan

तिथेच त्याचं संपादन होईल असं कळल्यावर माझी काळजी अजूनच वाढली. १० जून २००७ ला भीतभीतच शतजन्म चं प्रक्षेपण पाहिलं आणि आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. कारण कुठलीही कात्री न लावता, जाहिरातींसकट साडेतीन तास कार्यक्रम दाखविला गेला. सावरकरांच्या कार्यक्रमाला इतका वेळ मिळाल्याची दूरचित्रवाणीच्या इतहासातली ही पहिलीच घटना आणि त्याला सावरकर स्मारक, मी, कार्याध्यक्ष रणजीत सावरकर कारणीभूत झालो याचा मनस्वी आनंद झाला.

पन्नास कलाकारांच्या संचात होणाऱ्या या कार्यकमाचे आतापर्यंत मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, सोलापूर, इंदूर, बुरहाणपूर, गोवा अशा ठिकाणी ३६ प्रयोग झाले आहेत. सावरकर विचार घेऊन गावोगावी र्यक्रम होणं पोहोचायचे आहे आणि कार्यक्रमाची शंभरी पार करायची आहे. मासेस आणि क्लासेस साठीच्या कार्यक्रमांच्या या जमान्यात, असे विचार देणारे कार्यक्रम होणं सोपं नाही, पण अशक्यही नाही.

स्वा. सावरकरांवरच्या शतजन्म शोधिताना या पहिल्या कार्यक्रमानंतरच त्यांच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश टाकणारे अनेक कार्यक्रम उभे राहिले ज्यात शतजन्ममधील अनेक गीतं सादर होतात. त्यामुळे या सर्व कार्यक्रमांचं, नवीन गाण्यांचं श्रेय, निःसंशय शतजन्म शोधिताना या रंगमंचीय आविष्काराचंच.

सौ. मंजिरी श्रीनिवास मराठे (पृ. ३९२)
दादर, मुंबई

## सुशांत हेमंत मराठे




विलेपार्ले (पू.) मुंबई
शिक्षण – M. Com.

**क्रिकेट कारकिर्द (Opening Batsman and Wicket Keeper)**

- सर्व वयोगट स्पर्धांमध्ये (U-14, U-15, U-17, U-19, U-25) मुंबई संघाकडून खेळला व काही स्पर्धांमध्ये मुंबई संघ नेतृत्व देखिल केले. West Zone च्या संघामध्ये देखिल होता.
- U-19, च्या भारतीय संघाचा उपकप्तान होता
- रणजी ट्रॉफी मध्ये सातत्याने मुंबई संघाकडून गेली काही वर्षे खेळतो आहे.
- गेली ५ वर्षे IPL स्पर्धेत Mumbai Indians संघामध्ये समावेश.
- गेली ६ वर्षे Air India च्या संघाकडून खेळतो व Air India मध्येच कायमस्वरुपी नोकरी करतो.
- गेल्या वर्षी Kanga League या स्पर्धेत CCI च्या संघाकडून खेळतांना 237 not out हा त्याचा Score हा या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक वैयक्तिक Score आहे.


**'हितगुज' १०० व्या अंकासाठी हार्दिक शुभेच्छा !**

**परचुरे प्रकाशन मंदीर**
**गिरगांव, मुंबई - ४०० ००४.**

Marathe Pratishthan

# PKM LECTURE.....

श्री. प्रमोद कृष्णा मराठे (पृ.३७६)



Dear Friends,

Today I will be speaking about Atomic Energy DEVELOPMENT in INDIA in general and Radiation Protection in particular.

At the outset let us not target the contribution to the world of science in INDIA by Dr. Homi Jehangir Bhabha the visionary in developing indigenous ATOMAIC ENERGY PROGRAM and the whole hearted support given to him by our late Prime Minister Pt. Jawaharlal Nehru for which India's recognized as a developed nation in the field of scientific field. This further led us to development of indigenous Space Research program for which full credit must be given to Dr. Vikram Sarabhai.

Atomic Energy Program started with the inauguration of Tata Institute of Fundamental Research at Coloba in Mumbai in Dec. 1945. In this institute became the foundation of atomic energy in realated research along with basic research by our scientists. Due to their efforts Dr. BHABHA was able to establish first Nuclear Reactor in ASIA NAMED APSARA that become critical (Started) in the year 1955 this gave big thrust to our nuclear research. This reactor was inaugurated by late Pt. Jawaharlal Nehru. He described it as a temple of modern India. This proved to be the beginning of ATOMIC ENERGY ESTABLISHMENT later renamed as BHABHA ATOMIC RESEARCH CENTRE in the fond memory of Dr. HOMI BHABHA by late Prime Minister SMT. INDIRA GANDHI in the year 1967. Dr. BHABHA envisioned establishment of training school to train our scientists and engineers to fulfill his dream. He always believed in indigenous efforts for the development in nuclear research. IN the year 1968 first nuclear power station was established. this gave our scientists and engineers firsthand experience in operating maintaining repairing of nuclear power station.

Radioisotopes are those species of atoms which emits radiations from their nucler. Some of them such as radium are naturally occurring but most are produced in nuclear reactors. This resulted in developing comprehensive research program in isotope technology. This helped our scientists to undertake front line research in various topics related to nuclear fuel cycle, like mining of uranium ore, converting it compatible for use as fuel in nuclear reactor, disposal of nuclear waste when it becomes in efficient for use as fuel, electronics and instrumentation instruments development, medical applications, agriculture, engineering science improving quality in food preservation etc.

Certain compounds containing some special radiosotopes called radio pharmaceuticals are used for nueuro, cardic-vascular and host of other diseases. Nuclear energy and associated basic research involves exposure to various types of radiations. The persons working in this field are likely to be exposed to ionizing viz. X-RAYS, BETA, GAMMA and NEUTRONS. These are called ionizing radiations except neutrons. Neutrons being uncharged particle when interacts with any material or human body products ionizing particles. These ionizing radiation's interact with human body. They utilized to benefit of mankind. Many of tasks earlier considered difficult are performed with its use successfully.

It is well-known that these radiations are useful in health, industry, agriculture, research etc. In health sector to diagnose and treatment of diseases like types of cancers to give relief from sufferings and cure the ailment. In different industries like petroleum refineries pipelines for flaw detection, in agriculture to improve crop yield, to extend the shelf life of onions potatoes variety of spices fish etc.

When it is diagnosed in a person any unnatural growth called tumor at any place in his body radiation therapy is advised at certain stage. This depends on the size and location of the tumor. The oncologist decides the amount to which patient is to exposed gradually. This varies for condition of individual patient. The

Marathe Pratishthan

science dealing with is known as radiation therapy. In engineering industry to detect any design or manufacturing defects radiation equipment known as radiography camera without much difficulty. This is called non destructive testing of material. In petroleum industry the pipe line defects leakages flow monitoring, can be detected instantly to take appropriate repair work. In water irrigation and water resources below ground level radiation equipment called soil moisture gauge is used.

In the case of agriculture the radiation exposure removes any weeds, bacteria affecting the healthy growth of plants. The shelf life of cereals fruit vegetables spices susceptible to adverse to adverse fluctuations are controlled thereby increasing it without damaging its quality. This is called as food preservation. In India there is food irradiator plant at Lasalgaon near Nashik processes onions and potatoes is called as poton project.

In case of preservation various medical products from bacterial growth radiation is successfully employed known as radiation sterilization with gamma radiation. The medical products a like injection syringes, ointment surgical cotton. Capsules and surgical products are exposed to gamma radiation plant at TROMBAY B.A.R.C. to sterilize them by exposure in controlled conditions.

The radiation worker is provided with a radiation detector which indicates the amount of radiation to which he is exposed is recorded and detailed permanent records are maintained at personnel monitoring service of Radiation Protection Department in Bhabha Atomic Research Centre Mumbai. Individual edical and monitoring assists to check his work practices and strict adherence to regulation and rules prescribed. Observance of principle of radiation protection viz. optimum time, maximum distance from the radiation source proper use of radiation safety devices is useful to avoid unnecessary exposure to radiation. Like any other radiation our body can tolerate certain amount of radiation without any ill effects. The way we protect ourselves from solar radiation our body can withstand limited amount of it due to in built mechanism in human being. The records of individual radiation worker are maintained at P.M.S.. Any undue exposure due to violating safety guidelines are duly reported and concerned individual is accordingly advised for safe use of radiation. The dept. periodically conducts safety aspects related courses training for medical and industry updating their knowledge by solving the difficulties encountered by them in safe use of radiation.

Considering the utility value of radiation as a tool in medical applications, industry, food preservation, archeological dating which determines the age of a particular sample, forensic science to help criminal investigation. The Nuclear power is considered as clean source of energy. We are capable of constructing, operating maintaining upgrading nuclear reactor for electrical power generation and related research in our country.

I hope I have introduced to you a subject commonly not studied.


श्री. प्रमोद कृष्णा मराठे (पृ.३७६)
बी १/२, रुणवाल नगर, कोलबाड, ठाणे (प.)
पिन - ४०० ००६ दूरध्वनी - २५४७७५११



**MR. ASHOK MARATHE**
**MRS. PRATIBHA A. MARATHE**
Insurance Advisor for

- LIC of India
- Mediclaim
- Fire Policy
- Society Insurance
- Senior Citizen's Mediclaim Policy
- Mediclaim for Diabets Patients

For Further details Contact : Mob. 9867622197 / 9987719623

***Best Wishes to Hitguj for Further Journey***


Marathe Pratishthan



दि. २६ ऑगस्ट २००९ ला उदयपूर येथे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते लाइफटाईम अचीव्हमेंट ॲवॉर्ड जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना श्री मोहनराव मराठे (पृ.३६५)

'हितगुज'

शतक महोत्सवी अंक

# किरात परिवारा द्वारा हार्दिक शुभेच्छा

**श्री. मेघश्याम केशव मराठे (पृ. ३९६)**

**अधिवक्ता श्री. शशांक श्रीधर मराठे**

**सौ. सीमा शशांक मराठे**

**चि. चिन्मय शशांक मराठे**

**किरात परिवार आणि किरात ट्रस्ट**

**वेंगुर्ले - जिल्हा सिंधुदुर्ग, पिन - ४१६५१६**

Marathe Pratishthan

# “मराठे प्रतिष्ठान,” मुंबई

## गोव्यात संपन्न झालेले अ. भा. मराठे परिवाराचे पहिले यशस्वी सम्मेलन

मुंबईत हल्लीच स्थापन झालेल्या मराठे प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने दि. २६ व २७ जानेवारी १९८० रोजी गोव्यातील ढवळी (ता. फोंडा) येथील वामनेश्वर मंदिरात अखिल भारतीय मराठे परिवार सम्मेलन यशस्वीरित्या पार पडले.

ठिकठिकाणच्या मराठे कुटुंबातील सुमारे ७०/८० स्त्री-पुरुष या पहिल्याच संमेनलाला उपस्थित होते. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष तर्कतीर्थ श्री. लक्ष्मण शास्त्री हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे येवू न शकल्याने कराडचे श्री. मधुकर विष्णू मराठे अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी अध्यक्षांनी मराठे कुळांतील एक विद्वान सत्पुरुष केवलानंद सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार घातला व श्री. रमेश मराठे (गोवा) यांनी स्वागतगीत म्हटले.

मराठे प्रतिष्ठानची स्थापना

संमेलनात अनेकांनी आपले विचार मांडले व मराठे प्रतिष्ठानची स्थापना व कार्य याविषयी सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेर ठिकठिकाणी असलेल्या मराठे कुळांतील हुशार होतकरु व गरजु मुलांच्या सर्वांगीण शिक्षणाची सोय करणें, नवीन व चालू उद्योग व्यावसायिकांना आर्थिक व तांत्रिक मदत देणे, सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करणे वगैरे उद्दीष्टे या प्रतिष्ठानच्या कार्याबाबात ठरविण्यात आली असून मराठे कुटुंबातील मिळवत्या व्यक्तिने रु. १०१ एकदम किंवा ५/१० रु. च्या हप्त्याने देऊन प्रतिष्ठानचे आजीव सभासद व्हावे असे आवाहन या संमेलनात करण्यात आले व त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. मुंबईतील मराठे उद्योगभवनाच संचालक श्री. सुरेश मराठे यांची मुंबईत झालेल्या बैठकीत या प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी नियुक्ती झालेली असून या संमेलनाचे प्रमुख संयोजक श्री. वा. ग. मराठे हे प्रतिष्ठानचे कार्यवाह आहेत. प्रतिष्ठानच्या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी व मराठे परिवारातील मंडळींना संघटीत करण्यासाठी विभागवार प्रतिनिधी या संमेलनात निवडण्यात आले.

### सूर्यप्रभा कुकरची प्रात्यक्षिके

बेळगाव येथील एक समाज कार्यकर्ते श्री. प्रभाकर मराठे यांनी अनेक प्रयोगाद्वारे तयार केलेल्या सुर्यप्रभा कुकरचे प्रात्यक्षिक सर्वांना पाहवयास मिळाले.

केवळ सुर्याच्या ऊष्णतेवर अत्यंत साध्या व सोप्या उपकरणाद्वारे कोणत्याही इंधनाशिवाय अन्नपदार्थ शिजविता येतात हे प्रत्यक्ष पहावयास मिळाले.

संमेलनास उपस्थित असलेल्या वयोवृद्ध व कर्तबगार व्यक्तिंचा सत्कार करण्यात आला. मराठे कुल वृतांताच्या कामाची सुरुवात करणारे वेंगुर्ल्याचे किरात पत्राचे संस्थापककै. अ. वा. मराठे यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन मराठे प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमास प्रसिद्धीचे कामी किरातचे संपादक श्री. के. अ. मराठे यांनी देऊ केलेल्या सहकार्याबद्दल आभारही मानण्यात आले.

दि. २७ रोजी संध्याकाळी संमेलनाचा समारोप झाला हे पहिलेच संमेलन वामन ग. मराठे, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली गोव्याचे सर्वश्री कालिदास मराठे, कृष्णा सदाशीव मराठे, प्रकाश मराठे, पां. द. मराठे इत्यादींनी बरेच परिश्रम घेऊन यशस्वी केले.

संघटकाचे आवाहन

मराठे आडनांव असेल्या चित्पावन कपिगोत्री परिवाराचे संघटन करण्याचा हा प्रथमच प्रयत्न आहे. त्यामुळे महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अनेक ठिकाणी नोकरी-व्यवसाय निमित्ताने विखुरलेल्यासर्वच मराठे कुलबंधुंशी संपर्क साधता आलेला नाही. ज्यांच्याशी संपर्क साधता आला त्यांनी आपल्या परिसरातील व माहितीतील मराठे कुलबंधूंची माहिती कळवावी. व त्याचप्रमाणे मराठे प्रतिष्ठानच्या कार्याचे महत्व लक्षात घेऊन त्याचे सभासद व्हावे. यासाठी

श्री. वा. ग. मराठे
१६१/१२८८, मोतीलाल नगर (१)
गोरेगांव (प.) मुंबई ४०० ०६२.

तसेच

श्री. कालिदास ला. मराठे
४४५, धारवादिवडें, गोवा
यांचेशी संपर्क साधवा.

Marathe Pratishthan

# प्राचीन मराठी संतकवयित्री

## महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई, बेणाबाई

प्राचीन मराठी संतकवयित्रींचा परिचय करुन घ्यावयाचा म्हटले तर अनेक तारकांचा समूह दिसू लागतो. सर्वांचा मिळून प्रकाश होऊन पसरलेली ती एक आकाशगंगा असते. महदाईसेपासून सुरुवात करुन मुक्ताबाई, जनाबाई, आऊबाई, लिंडाई, लाडाई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मला, प्रेमाबाई, बहिणाबाई, वेणाबाई, बयाबाई, इत्यादी अनेक संतकवयित्री डोळ्यांसमोर येतात.

सुमारे सातशे वर्षापूर्वी मराठी भाषेत ग्रंथरचना सुरु झाली तेव्हापासून पेशवाई अखेर जसे अनेक संतकवी महाराष्ट्रात होऊन गेले तशा काही संत कवयित्रीही होऊन गेल्या. ह्या कवयित्री जरी मोठ्या विदुषी नव्हत्या तरी त्या भक्तांच्या एकनिष्ठ उपासिका असल्यामुळे त्यांची कविता फार प्रेमळ आणि हृदयंगम उतरली आहे. शिवाय तीत स्त्रीस्वभावातील मार्दव, भावनांची उत्कटता आणि भाषेचा साधेपणा ही वैशिष्टे असल्यामुळे संतकवींच्या कवितेपेक्षा ही संतकवयित्रींची कविता पुष्कळ बाबतीत अगदी स्वतंत्र व पृथगात्म अशी आहे.

### भातुकलीचा खेळ

संतकवयित्रींची रचना म्हणजे भातुकलीचा खेळच आहे. घरांत दिवाळीचा सण आला म्हणजे फराळाचे तयार असतेच. त्यांतून थोडे काढून मुलींना देतात. त्याच्याच आधारावर मुली स्वतःचा खेळ मांडतात व आपला वेगळेपणा दाखवितात, पण वस्तुतः घरात घडलेल्या पहिल्या कार्याची ती नक्कल असते. भक्तिपरंपरा निर्माण करणारे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदासांसारखे पंथसंस्थापक व संवर्धक या संतापासून ज्यांनी स्फूर्ती घेतली, त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ज्यांचा विकास झाला अशा या संतकवयित्री. त्यांच्या वडिलधाऱ्या संतांच्या घरी शिजलेल्या पक्वानांतूनच ही त्यांची भातुकली साजरी होणार. एक गोष्ट मात्र त्यांची स्वतःची म्हणून दखविता येईल, ती म्हणजे त्यांनी स्विकारलेले काम कसे पार पाडले. मुलगी भातुकें घेते ते आईनेच तयार करुन दिलेले असते. पण डाव मांडल्यावर त्यांत ती सासूचा अक्षर सुनेचा, आईचा वा मुलीचा, नवरा वा बायकोचा किंवा अन्य काहींचा अभिनय वठवते, तो मात्र तिचा स्वतःचा असतो. त्यानेच तिच्या व्यक्तिमत्वाची घडण होते व खेळ खेळण्याचा आनंद तिचा स्वतःचा असतो. व्यक्तिचा जीवनविकास त्यामुळे होतो. तेव्हा वेगळे व नवे तत्वज्ञान त्यांनी कसे आत्मसात केले, ते वठवून दाखविले, व 'स्वांतसुखाय, बहुजनहिताय' कसे केले ते मात्र त्यांच्या जीवनावरुन पूर्णपणे कळते.

### आद्य कवयित्री महदंबा

मराठी भाषेतील आद्य, पहिली संतकवयित्री महदंबा उर्फ महदाईस. महानुभाव वाङमयातील 'धवळे' या गीतांची कर्ती. हिचा काळ शके १२०९ – १२२५ धवळ्यांबद्दल डॉ. वा.ना. देशपांडे म्हणतात 'धवळ्यांची भाषा जुनी परंतु साधी असून त्यात उपमा अपेक्षादि अलंकाराचा अभावच आहे. परंतु साधे वर्णन, साधी भाषा व साधे विचार-विकार असूनही एखादे काव्य हृदयंगम कसे होते, याचा 'धवळे' हा उत्कृष्ट आदर्शच म्हटला पाहिज. गतिशीलता हा गुण धवळ्यांत आहे त्यामुळे या काव्यात एक प्रकारचे प्रवाहित्व आले आहे.

त्याचप्रमाणे महदंबेचे 'मातृकी-रुक्मिणी स्वयंवर' काव्य उपलब्ध आहे. कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहाची सुरस कथा रंगविण्याचे कौशल्य या काव्यात दिसत. कांकणे, अंदु, रत्नहार यासारख्या दागिन्यांची, वस्त्रप्रावरणांची नावे माहितीपूर्ण ठरतात. प्रत्येक ओळीत आद्याक्षरांचा क्रमसाधणार हे काव्य काव्यरचनेच्या दृष्टीने सरस व पुढील पंडिती काव्यावर छाप पाडणारे असे आहे.

चांपेगौर कांती चापयाच्या वृत्ती  
चांपौली साजतिः चक्रपाणी –

असे ती म्हणते.

'धवळ्यां' मधे विवाहातील  
लौकिक सोहळ्यांचे महदंबेने  
तन्मतेने केलेले वर्णन आनंददायी,  
सरस आहे. रुखवत देऊन  
आलेल्या विद्याधारींना रुक्मिणीने  
विचारले कृष्ण कसा दिसला ग?  
त्या किती चतुर होत्या पहा –  
''सर्वांगी न देखों तुमचा वो कांतु  
देखियले जे आंग तेथौनि न  
ढळतीची लोचन''  
आणि लगेच त्या दचकून म्हणतात  
– तुझा पती आम्हा पिताः दुजा

Marathe Pratishthan

नाठवे विचारु
श्रीकृष्णाचे दर्शन होतांच,
कैसी संभ्रमीत झाली माडावरुनियां
घालूं पाहे झेंप

या अेकाच ओळीत रुक्मिणीची उत्कंठा वर्णन केली आहे. स्त्रीमनाचे हे कंगोरे स्त्रीमनाखेरीज कोण ओळखणार? आद्य कवयित्रीचे हे आद्य काव्य अत्यंत चित्तवेधक असे आद्य मराठी स्त्रीगीत आहे.

**संतकाळाचे तीन खंड पडतात**

(१) ज्ञानेश्वर, नामदेव यांचा एक कालखंड

(२) एकनाथांचा व

(३) तुकाराम – रामदासांचा कालखंड, वारकरी–रामदासी संप्रदाय

पहिल्या खंडात संतकवयित्रींची संख्या विपुल दिसते. त्यावेळी सर्व संतांच्या काव्यशक्तिस जणू बहर आला होता. वसंतात सर्व पक्ष्यांस गावेस वाटते. त्याप्रमाणे त्यावेळी पुरुषसंत व स्त्रीसंतांसही कविता स्फुरत होती.

यानंतरचा दुसरा कांलखंड एकनाथांचा यात नाव घेण्याजोगी कवयित्री आढळत नाही. तिसरा कालखंड तुकाराम–रामदास यांचा यांतील कवयित्री संख्येने थोड्या असल्या तरी त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल व काव्याबद्दल माहिती जास्त निश्चितपणे मिळते.

पहिल्या कालखंडात निवृत्ती, ज्ञानदेवांच्या जोडीने मुक्ताबाईच्या नावाचा गजर होतो तो पुढील भजनात

''निवृत्ती, ज्ञानदेव सोपान,
मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव,
तुकाराम ।
आवडीने ही नामे गाती ते नर
पावती मंगलधाम ।।''

तेव्हा संतकवींत ज्ञानेश्वरांचा जो मान तोच मान संतकवयित्रींत मुक्ताबाईंचा. विकल्पाची किंवा प्रपंचाची निवृत्ती झाल्यावर ज्ञानप्राप्ती होण्यास उशीर लागत नाही व या ज्ञानसोपान मार्गाने जाणारास मुक्ती दूर नाही. मुक्ताबाईचा जन्म शके १२०१ म्हणजे इ.स. १२७९ ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, पाठीवर मांडे भाजले या चमत्कारात मुक्ताबाई बरोबर होतीच. भावांच्या कार्यात ती समरस झालेली दिसून येते. तिचे अभंग थोडे असले तरी त्यांत आत्मानुभवाचा जोर तिच्या वाणींत भासतो. पंढरीमाहात्म्य, नाममाहात्म्य व संतसमागम या विषयावर तिची अभंगरचना आहे. सगुण आणि निर्गुण या कल्पनांच्याही पलीकडे जाण्याचे सामर्थ्य मुक्ताबाईच्या ठिकाणी आहे. म्हणून.

निर्गुणाची सेज सगुणाची बाज । तेथे केशिराज पहुडले । अशी कल्पना ती करु शकते. मुक्ताबाईस लहानपणीच खडखडीत आत्मज्ञान लाभले होते. आपला आध्यात्मिक अनुभव खालील अभंगात तिने वर्णिला आहे –

मुंगी उडाली आकाशी ।
तिने गिळिले सूर्यासी ।
थोर नवलाव झाला ।
वांझे पुत्र प्रसवला ।
माशी वियाली घार झाली ।
देखोनि मुक्ताई हासली ।।

योगमार्गाचा अनुभव सांगणारा हा कूट अभंग आहे. एकदा ज्ञानेश्वर रागावून, निराश होऊन ताटी लावून बसले असता, त्यांना उद्देशून लिहिलेले मुक्ताईचे अभंग ''ताटीचे अभंग'' म्हणून प्रसिद्ध आहेत.

रागे भरावे कवणासी ।
आपण ब्रह्म सर्व देशी ।।
ऐशी समदृष्टी करा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।
योगी पावन मनाचा ।
साहे अपराध जनाचा ।।
विश्व जालिया वन्ही ।
संते सुखे व्हावे पाणी ।।

असा उपदेश ज्ञानेश्वरांना ती करताना दिसते भावनेची कोवळीक तिच्या या ताटीच्या अभंगातून पाहून तिला राहवेना. ती म्हणते, अखंड गेला नाही?

चांगदेवाने ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा का आशीर्वाद हे न उमगल्याने कोरा कागद पाठविला तेव्हा हा तर अगदीच कोरा आहे, अशी प्रतिक्रीया तिने व्यक्त केले. पुढे चांगदेव तिचा शिष्य होतो. चांगदेवाने त्याच्या अभंगात, मुक्ताई जीवन चांगण्या दिले असा तिचा म्हणजे गुरुचा उल्लेख केला आहे. मुक्ताबाई तापीतीरी माणगाव यथे वैशाख वद्य द्वादशीस, शके १२९९ त. कीर्तन करीत असता, वीज पडून भगवत्स्वरुपी लीन झाली. एदलाबादेस तिची समाधी आहे.

एकूण मुक्ताबाईचे जीवन व वाङमय हे विद्युतलतेप्रमाणे क्षणभर चमकून जाणारे पण मनाला चटका लावणारे आहे.

**जनाबाई**

ज्ञानदेवांच्या संगात ज्याप्रमाणे मुक्ताई चमकली त्याप्रमाणे पंढरपुरांतील नामदेवांच्या संगतीत जनाबाई तेज पावली. मुक्ताबाईस कुलपरंपरेचा, भावांचा आधार तर जनाबाई कोण, कुठली याबद्दल माहिती नाही. संतचरित्रकार महिपतीच्या मते नामदेवांचे वडील दामाशेठी हे

Marathe Pratishthan

…असता दमा व कुरुंद या …डल्याने आपली लहान मुलगी …शेठीच्या स्वाधीन केली. काही …च्या मते देवळाच्या यात्रेत …रवलेली, आई-बापापासून …कलेली मुलगी दामाशेठीने आणून …ढविली. घरी नामदेव विठ्ठलभक्तीत …लेले होते तीच विठ्ठलभक्ती …तिच्याकडे आली. आपला उभा जन्म …नाशेठीच्या घरी दासीपणाने वागून … भगवत्‌चिंतनांत रंगून तिने …ढला. यापलीकडे जास्त माहिती …तिच्याबद्दल उपलब्ध नाही. पण …तिच्या अभंगांनी व गुणवर्णनपर …ण्यांनी अवघा महाराष्ट्र झुलतो आहे …हे नक्की!

'संतवाटिकेतील जाईची वेल' …असा गं. ब ग्रामोपाध्ये तिचा उल्लेख …करतात. जनाबाईचे अभंग म्हणजे …सुंदर भावगीते आहेत. स्त्रीमनाचा …हळुवारपणा आणि भक्तीची उत्कटता …तिच्या सर्व अभंगांमध्ये दरवळताना …दिसते.

'नाम विठोबाचे घ्यावे ।
मग पाऊल टाकावे ।
नाम तारक हे थोर ।
नामे तारिले 'अपार'

असा उपदेश जनाबाई करते –

विठो माझा लेकुरवाळा ।
संगे गोपाळांचा मेळा ।
किंवा
ये गं येग विठाबाई ।

तुझे चरणीच्या गंगा । इतुक्यांसहित त्वां बा यावे । माझे रंगणी नाचावे ।

माझा रंग तुझे गुणीं ।
म्हणे नामयाची जनी ।।

यासारख्या अभंगातून भक्ती व वत्सलभाव दिसून येतो. तिच्या सर्व अभंगात देवाबद्दल भक्ती, श्रद्धा आणि विश्वास भरलेला आहे. हे जग कसे निर्माण झाले ? तत्वमसी इ. तत्वशोधनात गुंतण्यापेक्षा ती देवाच्या सगुण स्वरुपावर विश्वास ठेवते. देव-माता-पिता-सहोदरु-कान्हा त्याचप्रमाणे तिचा खेळगडीही देव आहे इतका की, वेळप्रसंगी रागावून त्याला चार शिव्या देण्यासाठी जनाबाई कचरत नाही.

अरे विठ्या विठ्या,
मूळ मायेच्या पोरट्या ।
किंवा
धरिला पंढरीचा चोर ।

प्रेम बांधुनिया दोर हे यासारखे अभंग याची साक्ष देतात. झाडलोट करी जी ।

केर भरी चक्रपाणी
किंवा
देव खाते, देव पिते ।
देवावरी मी निजते ।

य अभंगातून विठ्ठलाशी एकरुपात पाहावयास मिळते.

परमेश्वरप्राप्तीची तळमळ, आर्तता, भावनेची उत्कटता, वाणीतील गोडवा, विठ्ठलप्रेमामुळे जास्तच उत्कट झालेला त्यामुळे जनाबाईच सारे अभंग भावमधुर बनले आहेत.

संत नामदेवांच्या प्रेरणेने विस्तारलेल्या या संतकवयित्रीत कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मला तसेच नामदेवांच्या कुटुंबातील बायको, बहीण, सुन आदि स्त्रियाही येतात.नामदेवांमुळे पुष्पासंगे मातीस वास लागे असे होऊन त्याचे घरदारच संत बनून अभंगरचना करीत होते.

**कान्होपात्रा**

वि. कां. राजवाडे यांनी कान्होपात्रेचा काल शके १३९० दिला आहे. पंढरपूरापासून ४ कोसावर मंगळवेढे या गावची शामा गणिकेची कान्होपात्रा मुलगी. तिला संतमंडळीतील वैशिष्ट्य मिळण्याचे कारण तिचे असाधारण चारित्र्य. तिची आई वेश्या त्यामुळे कुळातच गायन-नर्तनाची कला होती. पण ते सर्व करायचे सोडून कान्होपात्रेला तरुणपणी वैराग्य येऊन ती विठ्ठलाचे गुणवर्णन करु लागली. त्यावेळी बेदरच्या बादशाहच्या कानावर तिच्या रुपाची कीर्ति गेली. त्याने तिला आणण्यास राजदूत पाठविले. बादशहाची इच्छा म्हणजे आज्ञाच. तिला पकडून आणण्यासाठी राजाचे शिपाई पंढरपुरास आले. त्यावेळी देवाचा निरोप घेण्यासाठी म्हणून ती गाभाऱ्यात गेली व देवाच्या पायावर डोके ठेवून आपले शील वाचविण्यासाठी तेथेच परमेश्वरचरणी लीन झाली! नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा फुंटो पाहे । हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहली तैसे देवा । किंवा पतित पावन म्हणविसी आधी – तरी का उपाधी भक्ता मागे ।

नको कान्होपात्रा देह समर्पण । करावा जतन ब्रीदासाठी ।

यासारखे पुष्कळ अभंग कान्होपात्रेचे प्रसिद्ध आहेत.

Character is lost, everything is lost या प्रमाणे वागून तिने चारित्र्य व शुचिता, पावित्र्य अबाधित ठेवले.

**सोयराबाई**

प्रसिद्ध संत चोखामेळ्यांची बायको सोयराबाई. पुत्र प्राप्तीसाठी तिने विठोबाची प्रार्थना केली. प्रसुतकाळ जवळ आला असता घरात काही सामग्री नाही म्हणून चोखामेळा बहीण निर्मळेकडे गेला. इकडे पांडुरंगाने सोयराबाईंची सेवा

Marathe Pratishthan

केली. तिच्या अभंगातील भाषा सोपी, साधी आहे. अभंगाच्या शेवटी 'म्हणतसे महारी चोखियाची' असा उल्लेख ती करते. निर्मळा हिने ही २४ अभंग रचले आहेत. दोघींनी नाम-महात्म्य गायिले आहे.

**तुकाराम-रामदासांचा तिसरा कालखंड**

या कालखंडात बहिणाबाई व वेणाबाई या दोन सुप्रसिद्ध संतकवयित्री होऊन गेल्या भागवत संप्रदायाचा इतिहास बहिणाबाई पुढील अभंगात सांगते –

संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया ।
उभारिले देवालया ।
नामा तयाचा किंकर ।
तेणे केलासे विस्तार ।
जनार्दन एकनाथ।
खांब दिला भागवत ।
तुका झालासे कळस ।
भजन करा सावकाश ।
बहीणी म्हणे फडकती ध्वजा ।
निरुपणा केले बोजा ।।

ह्या संतकवयित्रीचे चरित्र पुष्कळ बाबतीत आगदी अद्वितीय आहे. लहानपणापासून परमार्थाकडे ओढा. हिच्या चरित्रात आलेली गाय-वासरांची गोष्ट विस्मयजनक आहे. बहिणाबाईने तिच्या १३ जन्मांची जी हकीकत दिलेली आहे ती विश्वसनीय मानली तर 'पुर्नजन्म व पूर्वजन्म' या विषयी अभ्यास करणाऱ्यास ती उपयुक्त वाटेल. मानसशास्त्राच्या दृष्टीनेही तिच्या चरित्रातील काही घटना अत्यंत विचारणीय आहेत. दुष्ट मुंबाजीने बहिणाबाईच्या गायीला मारले असता, तुकारामाच्या पाठीवर वळ ऊठले. तुकारामाच्या या शिष्या होत. अभंगात त्या म्हणतात –

एकनिष्ठ भाव तुकोबाचे चरणी ।
म्हणोनी बहिणी लाघलीसे ।
बहिणी म्हणे तुका सदंगुरु सहोदर ।
भेटला अपार सुख होय ।

अत्यंत प्रासादिक, साध्या भाषेतून रेखाटलेले स्त्रीसुलभ व भाववेधक चित्र म्हणजे बहिणाबाईचे अभंग असे म्हणावयास हरकत नाही. वेरुळजवळील देवगाव हे त्यांचे माहेर. बालपणी रत्नाकर पाठकशी विवाह झालाय समर्थशिष्य जयरामस्वामी वडगावकर यांचा थोडा सहवास लाभला.

**वेणाबाई**

वेणाबाई समर्थ रामदासांची शिष्या कोल्हापूर येथील देशपांडे घराण्यात शके १५४९ मधे जन्म झाला. आजोळी व माहेरी रामदाससंप्रदाय, त्यामुळे लहानपणापासून रामाची सेवा, मिरजेस सासरी तुळशीजवळ 'भागवत' वाचीत असता रामदासस्वामी भिक्षेस आले. मुलीस विचारले, ''मुली वाचतेच पण समजते काय ?'' त्यावेळी ''प्रयत्न करते आहे''– तिने रामदासांना जीव म्हणजे काय? शिव म्हणजे काय? यासारखे पंचवीस प्रश्न विचारले. रामदासांनी कविताबद्ध उत्तरे दिली. वेणाबाईचे पंचवीस प्रश्न प्रसिद्ध आहेत. रामदासांच्या कीर्तनास ती रोज जाई. तिने अनुग्रह देण्याची रामदासस्वामींना विनंती केली. त्याप्रमाणे रामदासस्वामींनी तिच्यावर कृपा केली. पण सासू-सासऱ्यांना तिची ही परमार्थवृत्ती आवडली नाही. लोकांनी टिंगलटवाळी केली. नानाप्रकारे छळ केला. कोंडून घातलेल्या खोलीत विषबाधेने तळमळत असता, रामदासस्वामी प्रकट झाले आणि काठी फिरवून विष उतरले गेले. पुढे मिरजेस रामदासस्वामींनी मठाची स्थापना केली. या मठाची महंत वेणाबाई होती.

वेणाबाईंचा आध्यात्मिक अभ्यास दांडगा होता. कवित्व व वक्तृत्वही होते. पुराण-कीर्तने करीत. समर्थ फार थोड्या शिष्यांना कीर्तन करण्यास परवानगी देत. वेणाबाईलाही कीर्तन करण्यास परवानगी होती. यावरुन तिचा पारमार्थिक अधिकार मोठा होता हे निश्चित. तिच्या मार्गदर्शनाखाली इ. स. १६७८ मधे सज्जनगडावर कीर्तनसम्मेलन झाले. त्यावेळी एक दिवस शिवाजीमहाराजांनी कीर्तन केल्याची नोंद आहे. सीतास्वयंवर, रामगुहसंवाद, कौल, इ. लेखन आहे. चैत्र वद्य १४ चा दिवस होता. सज्जनगडावर वेणाबाईंनी कीर्तन केले, आरती झाली व समर्थ रामदासांच्या पाया पडून त्याचवेळी त्या समर्थचरणी लीन झाल्या.

बाईयाबाई या वेणाबाईंच्या शिष्या प्रेमाबाई कृष्णभक्त कवयित्री होऊन गेल्या. या सर्व मराठी संतकवयित्रींनी जे काही काव्याद्वारे, अभंगाद्वारे सांगितले आहे, ते त्यांत पूर्णपणे रंगून, समरस होऊन सांगितले आहे. या सर्व संतकवयित्रींचा पारमार्थिक अधिकार आणि आध्यात्मिक अनुभव फार मोठा असल्यामुळे व त्यांची सगळीच कविता स्वयंस्फूर्तिजन्य असल्यामुळे एक प्रकारचे दिव्य तेज त्यांच्या कवितेत सर्वत्र आढळते.

डॉ. सुमेधा प्रभाकर मराठे
(पृ.१२०)

Marathe Pratishthan

# वास्तुकथा

सौ. निलीमा विष्णू विद्वांस

आमचे घर जे खूप कष्ट करून आर्थिक ओढाताणही सहन करून बांधले होते. त्यासाठी गृहतारण सोसायटीचे कर्ज काढले होते. पण बाजारपेठेपासून तसे लांब आणि जंगलाचे साम्राज्य पसरले होते म्हणून प्रथम दर्शनी तिथे घर बांधणे मला पसंत नव्हते. पण हळू हळू तिथे वस्ती होईल. सवय झाली की तो ही भाग चांगला वाटेल असे ह्यांचे मत होते म्हणून घर बांधले गेले. आधी जागा खरेदी, मग दोन तीन वर्षांनी जोते बांधकाम, पुढे दोन वर्षांच्या अंतराने घर बांधणे झाले. प्रथम दोन खोल्या बांधून झाल्या, विहीर झाली, इतर सुविधा नंतर झाल्या. सहा महिन्यानी लाईट आले.

प्रथम आम्ही महिनाभर रहावयास आलो. पण किर्र झाडी. सापांचे साम्राज्य आणि वीज नाही त्यामुळे अंधारात ते प्राणी पार घरात येऊन बसत. म्हणून परत जुन्या भाड्याच्या घरात आलो. नंतर आजुबाजूला आणखी दोन तीन घरे उभी राहिल्याने सर्वांनी मिळून लाईट साठी प्रयत्न चालू केले आणि त्यामध्ये आम्हाला यशही आले पुन्हा आम्ही आमच्या हक्काच्या घरात आलो. तो दिवस अक्षय तृतीयेचा होता.

दहा वर्ष राहिलेले भाड्याचे घर तेथील परीसर, सुस्वभावी माणसे सोडून जाताना खूपच वाईट वाटले. त्या वास्तुला नमस्कार करुन म्हटले की तू आमचे रक्षण केलेस, आसरा दिलास, आमच्यावर खूप उपकार केलेस त्यासाठी आम्ही सर्व कुटुंबीय तुझे ऋणी आहोत. स्वतःच्या घरात जरी जात असले तरी तुला विसरणार नाही. इथले सारे सुख दुःखाचे क्षणही विसरणार नाही आणि खूपच जड अंतःकरणाने त्या घराचा, घर मालकांचा आणि इतर माणसांचा निरोप घेतला. आपलेच घर समजून आम्हाला भेटायला आमच्या घरी येत जा असे सर्व गांधी परिवारानी म्हणजेच घर मालकानी आम्हाला सांगितले. अजूनही आमचे त्यांच्याशी सलोख्याचे संबंध आहेत.

आमच्या स्वतःच्या नव्या घरात प्रवेश केला. जुने घर, माणसे दृष्टी आड झाल्याने थोडे जड झाले. सुरुवातीला तिकडे सतत येणे जाणे होत असे पण नंतर आमच्या घराचा परिसर आवरण्यात वेळ जाऊ लागला. नवीन घरात माणसांची ये जा चालू झाली. पै-पाहुणेही सतत येऊ लागले. आणि त्यातच वेळ जाऊ लागला. हळुहळु आपले घर आवडू लागले. छोटीशी बाग लावली. खूप फुल झाडे लावली. त्याना पाणी घालण्यातला आनंद घेऊ लागले. छोटी रोपे थोडी मोठी होऊ लागली. त्यांना कळ्या येऊ लागल्या. आपल्या जागेतील झाडांवरील अर्ध उमलल्या कळ्या आणि फुले पाहून रोपे लावण्याचा खूप आनंद झाला. जणु जागा, घर आणि फुलझाडे लावल्याचे सार्थक झाले. आजच्या कळीचे उद्या पूर्ण विकसीत फूल झालेले पाहून निसर्गाचे आभार मानले. दृष्टी डोळस दिल्याबद्दल देवाचे खूप खूप उपकार मानले. निरनिराळ्या आकारांची, सुंदर रंगांची फुले भरभरुन मिळू लागली. तीच गोष्ट फळांची, झाडावरील पिटुकले हिरवे फळ बघता बघता आकार रंग बदलून झाडावर झोके घेऊ लागले. मधुर चवीचा आस्वाद देऊ लागले.

दोन खोल्यांचे घर नीटनेटके ठेवले की मन प्रसन्न रहाते. त्याचा लळाही लागतो. आमचे तसेच झाले मुले ही परिसरात बाबांच्या बरोबर त्यांच्या कुवती प्रमाणे कामे करीत होती. बाबांच्या मेहनतीला तोड नव्हती. आर्थिक अडचण तर होतीच पण जिद्द आणि कष्ट करण्याची ताकद, तयारी त्यामुळे त्यांनी स्वतः दगड माती डोक्यावरुन वाहून आणून ते जंगलही मंगल बनविले सुरुवातीला हा भाग पाहून आम्ही घर बांधले म्हणून लोकांनी कदाचित प्रेमापोटीही असेल पण बरेच वक्तव्य केले होते परंतु बदललेला परिसर पाहून सर्वांनी आश्चर्याबरोबर बाबांच्या कर्तृत्वाचे व मेहनतीचे खरेखुरे मनापासून कौतुक केले. आपला परिसर हा स्वच्छ हवा आपले आणि येणारांचे मन आनंदित राहिले पाहिजे म्हणून सतत ते कष्ट करीत होते आम्हालाही घराचा, जागेचा मनापासून लळा लागला रांगोळ्यांनी अंगण शोभत होते आणि कलाही जोपासली जात होती. घराला सणावारी दारच्या हिरवी पाने व रंगीबेरंगी फुलांचे तोरण मन मोहीत करुन जात होते. फुले, फळे तसेच दारच्या भाजीपाल्यांचा आम्ही मनमुराद आस्वाद घेत होतो.

Marathe Pratishthan

आजुबाजूच्या लोकांना ते देण्यातला आनंद अनुभवीत होतो.

घर स्वतंत्र असल्याने मुक्या प्राण्यापक्षांना आसरा देऊन त्यांचे खाणे पिणे व झोपण्याची उत्तम सोय केली जात होती आमच्या बरोबर त्यांचेही ते घर होते त्यामुळे त्या सर्वांचाही मुक्त संचार चालू असे. श्वान, मांजरे यांची संख्या भरपूर वाढत होती. अन्न, निवारा आणि प्रेम मिळाल्यावर ते कशाला कुठे जातील? त्यांना आमचा व आम्हालाही त्यांचा लळा लागला होता. एखादे कोणी दिसले नाही तर बेचैन होऊन जायचे-आजारपणात औषधांबरोबर प्रेम दिल्याने ते बरेही होत होते. पण जर कोणाला मृत्यू आला तर घरातलेच कोणी गेल्याप्रमाणे दुःख होत असे त्यांचे मरणोत्तर क्रियाकर्म ही यथोचित केले जात होते. अनेक वेळा बाळे झाल्याने पांच सहा चंपू आयांचे कुटुंब नियोजनाचे डॉक्टर घरी बोलावून फी देऊन ऑपरेशन करुन घेण्यात आले होते. हे सारे त्यांच्या आणि आमच्याही हितासाठीच होते ही सेवा निरपेक्ष बुद्धीने केली जात होती. रोजचे जेवण उत्तम दर्जाचे असे सणाला गोडधोड देऊन त्यांचा ही सण साजरा केला जात असे. त्या सर्वांना जेवण देऊन नंतर आम्ही जेवायला बसत होतो. रोजच्या जेवणात दूध ताक असेच परंतु श्रावण महिन्यातील प्रत्येक शुक्रवारी सर्वांना खास एक एक कप दूध वेगळे मिळत असे. त्यांच्या आजारपणात न रागावता, न चिडता मनापासून त्यांची सेवा करीत होतो. त्यामुळे इतरांच्या दृष्टीने आम्ही कौतुकाचा विषय असू तर काहीजणांना हा वेडेपणाच आहे असे वाटत असे. पण त्याकडे लक्ष न देता हे काम अविरत चालू होते. पण हे सारे त्या प्राण्यांना आम्हाला आणि देवालाही कळत होते. आम्ही सर्वजण आनंदाने एकत्र रहात होतो. त्यांचा आणि आमचा ऋणानुबंध असावा.

आम्हाला घरामधे सर्व प्रकाराचे सुख-दुःखाचे अनुभव येत होते अनेक कसोट्या घेतल्या गेल्या पण त्यात आम्ही प्राणी-पक्षी आणि परमेश्वर यांच्या आशीर्वादाने पार पडलो. गणपती बाप्पाचे आनंदाने स्वागत करुन त्यांना पांच दिवस गोडाधोडाचे नैवेद्य करुन प्रसन्न मनाने अर्पण करीत होतो. तसेच नवरात्र, दिवाळीही धामधुमीत साजरी होत होती, संक्रांतीला तीळ-गुळाची देवघेव होती. गुढीपाडव्याचा उंच बांबू, जरतारी वस्त्र डौलाने फडकत होता. असे सारे सण आनंदाने जात होते. दोन्ही मुलांची लग्ने या वास्तुने पाहिली. तसेच सुदृढ नातवंडांचे बोबडे बोल ऐकले. चांगला माणूस होण्यासाठी त्यांनी पहिले चिमुकले पाऊलही याच वास्तुत टाकले तेव्हा वास्तु आणि आम्हालाही खूप आनंद झाला.

बघता बघता घर एकवीस वर्षांचे झाले. मुले बाळे इतरत्र गेली. आम्हीही थकलो होतो त्यामुळे मोठ्या कष्टाने बांधलेले घर विकावे लागले. खूपच दुःख झाले. घराची, झाडामाडांची खूपच आठवण येते. मन सैर भैर होते. वास्तुला कधीच विसरता येणार नाही. मनात एका कोपऱ्यात घराचा आनंद पण दुसऱ्या कोपऱ्यात घर गमावल्याचे दुःख कायम शिल्लक राहिले आहे. तेही जपून ठेवले आहे त्या वास्तुला आमचा शतशः प्रणाम. ज्यांना ते दिले तेव्हा घराला स्वच्छ मनाने सांगितले की जसे आमचे रक्षण केलेस व आनंद दिलास तसाच त्यांना ही दे.

अगदी शेवटचा निरोप मात्र हुंदके देऊन झाला कारण आता ती कायमची ताटातूट होती. ऋणानुबंध संपला होता. नवीन वाटचाल करायची होती.

सौ. निलीमा विष्णू विद्वांस
(पृ. ६५८)
बदलापूर, जि. ठाणे
मो. ९८६०८३४८६१

❒❒❒


**हितगुजच्या १००व्या अंकाला शुभेच्छा**

**श्री. रमेश रामचंद्र मराठे (पृ.२८०) पुणे**
**सौ. नीलांबरी रमेश मराठे (पृ. २८०) पुणे**

Marathe Pratishthan



Marathi Pratishthan






BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**
**८/१३, सहकार नगर,**
**वडाळा, मुंबई ३१.**

त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. या न्यासाचे मुखपत्र असुन फक्त सभासदांसाठी वितरित होते. पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ, सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई -३१.
दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल:prabhakar_marathe@yahoo.com वेबसाईट : www.marathepratishthan.org

DTP Printed by : Nirmiti Arts - 9323301200

Marathe Pratishthan